मकरंद पुष्पमाला-पुस्तक १९ वें

राणीचंद्रावती.

(मनोरंजक कादंबरी.)

लेखक व प्रकाशक.

नरहर नारायण पटवर्धन.

वाई 'मोदवृत्त' छापखान्यांत छापिलें.

शके १८३२.

प्राथमिक शब्द

लोकमनोरंजन करतांना लोकांच्या क्षुद्र मनोवृत्तींना उत्तेजित करून त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न ह्या कृतींत केलेला नाहीं. कथानकांतील व्यक्तींचें स्वभाववर्णन प्रस्तुत स्थितीस उपदेशपर होईल इतक्या स्पष्टपणें नाहीं. पण ह्मणून तें शील बंनाविण्यास निरुपयोगी आहे असें मात्र नव्हे. तें सर्व कालीं सर्व स्थितींत उदाहरणीय असेंच रेखाटलें आहे.

कथानकाचा काल श्री शंकराचार्यांच्या नंतरचा घेतला आहे. कथानकांत निर्दिष्ट केलेलीं दक्षिणेंतील राष्ट्रें इतिहासांत सांपडणार नाहींत. मगधेश्वरासंबंधीं कथानकांत केलेलीं दर्पोक्ति तत्कालीन मगधराष्ट्रास लागू पडणार नाहीं. तरी अशा प्रकारची लोकस्थिति बौद्ध धर्माच्या र्‍हासकालीं असण्याचा संभव आहे. कथानक काल्पनिक आहे इतकें सांगितल्यावर त्याच्या ऐतिहासिक सत्यासत्यतेचा प्रश्नच रहात नाहीं.

प्रस्तुत प्रयत्न कितपत साधला आहे याचा निर्णय वाचक करो.

पुस्तककर्ता.

अनुक्रमणिका.

राणी चंद्रावती.

प्रकरण १ लें.

कृष्णाप्रपात.

ग्रीष्म ऋतूचे दिवस. भगवान् दिनकराचा प्रखर ताप होत होता. ह्या ऋतूंत मनुष्यदेहांतून संतत स्रवणारे घर्मबिंदु धारारूपानें वाहूं लागतात. मनुष्यप्राणी तृषाक्रांत होतो. तृषाशमनार्थ त्यानें कितीहि जलपूर्ण कुंभ उदरसात केले तरी तृषा शमन होत नाहीं. मानवदेह जणूं जलशोधक यंत्रच बनतो. मात्र या यंत्रांतून पाझरणारें पाणी पवित्र व मधुर असण्याऐवजीं अशुद्ध व क्षारयुक्त असतें. अशावेळीं ग्रीष्मकालाचें सानंद वर्णन करण्यास कोणास उत्साह असणार? म्हणून आह्मी त्याचें वर्णन करण्याच्या भरीस न पडतां कथानकास प्रारंभ करतों.

एके दिवशीं चार घोडेस्वार कृष्णेच्या उत्तर तीराच्या मैदानांतून आपला मार्ग क्रमीत होते. ते अतिशय श्रांत दिसत होते यावरून ते फार लांबून आले असावेत. ते मनुष्यवस्ति व रहदारीचे रस्ते मुद्दाम टाळीत होते. ते शेतांतून व माळांवरून समोर पूर्व दिशेस सारखे जात होते. त्यांस त्या प्रदेशाची पूर्ण माहिती असावी असें दिसतें. मनुष्यवस्ति अगर एखादें मंदिर यांखेरीज इतर कोठें एकहि झाड दिसत नव्हतें. प्रखर उन्हानें लहानसान झुडपें कधींच वाळून कोळ झालीं होतीं. त्यामुळें तो वनश्रीहीन भूप्रदेश फारच भयाण दिसत होता. वारा तुफान होता व उन्हाच्या प्रखरतेनें तो सुद्धां अति उष्ण भासत होता. मधूनमधून लहानमोठे ओढे ह्या अश्वारोही स्वारांच्या मार्गक्रमांत येत. पण तेथें आपली अथवा अश्वांची तहान भागविण्यास एक क्षणहि न थांबतां ते शक्य तितक्या जलद जात होते. तो चक्रवात व तें ऊन हीं असह्य होतीं— तरी त्यांनींच आपल्या ह्या स्वारांचा बचाव केला.

तो धामधुमीचा काळ होता. दक्षिणेंतील राज्यांतून पक्षाभिमान अति-

रेकास पोंचला होता. स्वकीय युद्धांत एका पक्षाची मंडळी विरुद्ध बाजूस क्वचितच दया दाखवीत असे.

वर निर्देश केलेल्या दिवशीं सकाळीं विजयपुरच्या सैन्यांतील अश्वस्वारांचें एक पथक मुख्यसैन्यास मिळण्याकरतां जात होतें. तें मुख्य सैन्य राजाचा कनिष्ठ बंधु चंद्रशेखर याचें बंड मोडावयास गेलें होतें. बंडाचा खरा उत्पादक विजयपुरचा माजी प्रधान द्युमत्सेन होता. त्यानें कुमारास नांवाला पुढं केलें होतें. त्याचा मुख्य हेतु पूर्वाधिकार मिळविण्याचा होता व तें अशक्यहि नव्हतें. कांतिनगरच्या राजास विजयपूरकराचा चांगला सूड घ्यावयाचा होता; ह्मणून त्यानें द्युमत्सेनास मदत देण्याचें कबूल केलें होतें. कांतिनगराधिपति मोठा शूर असून त्याचें सैन्य साऱ्या दक्षिणेंत उत्तम होतें. म्हणून विजयपुरच्या राजास आपल्या भावानें निदान त्याच्या नांवानें उभारलेल्या बंडाचा पुरा मोड करणें अवश्यक होतें. सरहद्दीवर जयसेन नांवाचा एक तरुण सरदार होता. राजानें त्याला मुख्य सैन्यास जाऊन मिळण्याचा हुकूम केला होता. त्याप्रमाणें तो जात असतां मार्गांत शत्रूच्या दुप्पट मोठ्या सैन्यानें त्यास गाठून त्याचे अर्धे अधिक लोक ठार केले. व बरेच पळून गेले, पण कांहीं आपल्या शूर तरुण धन्याबरोबर मधून मधून शत्रूंशीं सामना करीत जाऊं लागले. राहतां राहतां हे चारच स्वार त्यांच्या श्रेष्ठ अश्वांमुळें शिल्लक राहिले. तेहि मोठ्या शर्थीनेंच बचावले. ते चार स्वार एका लहान टेंकडीवर असतांना शत्रूच्या नजरेस पडले. त्यांनीं दुप्पट वर्गानें ह्यांचा पाठलाग आरंभला. पण त्या वेळीं वाहूं लागलेल्या उष्ण झंझावातानें व त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या धुळीच्या गगनचुंबी लोटांनीं हे स्वार दिसेनासे होऊन बचावले.

बंडाच्या गोष्टीशीं आपला कांहीं संबंध नाहीं. तें कसें उद्भवलें व द्युमत्सेन—बंडाचा मुख्य उत्पादक—याच्या मृत्यूनंतर कसें लयास गेलें इत्यादि हकीकतीशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं. पण हे स्वार कोण? कोठून आले व अशा स्थितींत का? ह्याची माहिती वाचकांस व्हावी एतदर्थच वरील हकीकत येथें दिली आहे.

ते स्वार एकमेकांशीं अक्षरहि बोलत नव्हते. उन्हाचा त्रास होऊं नये

ह्मणून त्यांनीं मुखाला धाटे बांधले होते. त्यांच्यापैकीं दोघांस ज़बर जखमा झाल्या होत्या. ग्लानीमुळें त्यांच्यानें घोड्यावर नीट बसवत नव्हते. त्यांतला एक त्यांचा नायक जयसेन होता. त्याचें वय अजमासें तेवीस चोवीस वर्षांचें असावें. त्याच्या अंगांत उत्तम मखमलीचा जरीचें काम केलेला अंगरखा होता. सकाळीं झालेल्या युद्धांत बरेच वार त्याच्यावर बसल्यानें क्वचित स्थलीं आंतील चिलखत दृग्गोचर होत होतें. त्याच्या डोक्यास असलेल्या पोलादी शिरस्त्राणानें त्याचें कपाळ झांकलें गेलें होतें. त्यानें कमरेस हिरवा शेला बांधला होता व त्याच्या पायांत मऊ चढाऊ जोडा होता. त्याच्या डाव्या बाजूस तरवार लोंबत होती व पाठीशीं धनुर्बाण होता. त्या वेळच्या विजयपूरच्या सरदाराप्रमाणेंच हा त्याचा पोषाख होता. त्या सर्व राज्यांत जयसेनाहून शूर अन्य तरुण नव्हता. ते शांततेचे दिवस नव्हते हें वर सांगितलेंच आहे. आपसांतील यादवीमुळें देशभर बंडें व धामधूम सुरू होती. जयसेनास भय कसें तें बिलकुल माहीत नव्हतें. शत्रूची गांठ पडली कीं तो त्यांचा खरपस समाचार घेतल्याविना रहात नसे. तो साहसी होता. त्याच्या साहसानें एखाद्या समयीं सेनानीचे हेतु निष्फळ व्हावयाचे तरी सरहद्दीवरच खरें युद्धशिक्षण मिळणें शक्य ह्मणून कांतिचंद्र आपल्या पुतण्यास केव्हां केव्हां सरहद्दीवर महत्वाच्या जागीं एखाद्या हुषार सेनानायकाच्या हाताखालीं पाठवीत असे. जयसेनाबरोबर बचावून आलेल्या तिघां इसमांपैकीं एकाचें नांव किसननाईक—हाच हल्लीं ह्या मंडळीचा मार्गदर्शक होता. जयसेनाची जखम घाईघाईनें बांधली होती. चिलखताचा दाब पडल्यानें तिच्यांतून रक्तस्राव होत होता. त्यामुळें जखमेवरील पट्टे भिजून शरीरास चिकटल्यानें त्यास दुःख होऊं लागलें होतें. तें किसनच्या लक्षांत येऊन तो ह्मणाला, "महाराज ! भिऊं नका. चारच घटका नंतर तुह्मी किल्ल्यांत सुरक्षित पोंचाल. हा पहा, माझ्या ताब्यांतील डोंगर स्पष्ट दिसूं लागला. थोड्या वेळांत आपण माझ्या लोकांत जाऊं व तुमची जखम पुनः नीट बांधूं."

जयसेनानें उत्साहपूर्ण उत्तर केलें, " होय, मी दम धरीन. पण काय हा माझा अविचार ! केवळ माझ्या असावधतेनें असा प्रसंग ओढवला.

कितीतरी लोकांच्या मरणास मी कारण झालों ! ईश्वर मला क्षमा करील काय ? काका बोलल्या खेरीज रहाणार नाहींतच. किसन ! तुझ्यामुळेंच मी आज वांचलों. "

ही मंडळी थोडीशी पुढें गेल्यावर त्यांना कांहीं भिल्ल भेटले. ते किसनच्या पायां पडून ह्मणाले, " नाईक ! आपण सुरक्षित आलां. दैवानें खैर केली ह्मणावयाची. तुह्मी लढाईंत पडला असें आह्मीं ऐकलें. कांहीं इसम तुमच्या शोधाला तेथें गेले सुद्धां. "

किसन ह्मणाला, " गड्यांनो ! गप रहा. मी सुरक्षित आहे. तुह्मांस दिसलें ना ? मजबरोबर कोण आहे पहा. कदाचित शत्रु मागून येत असतील म्हणून खिंडीचें रक्षण करा. तुह्मांला न आटपण्याइतके ते असले तर त्यांना फसवीत फसवीत टेंकड्यांत घेऊन जा. तोंपर्यंत आह्मी भगवतीपाशीं जाऊं. "

त्या भिल्लांतील एक वृद्ध मनुष्य म्हणाला, " नाईक ! भगवतीला जाऊन काय करणार ? कृष्णामाता तर दुथडी भरून चालली आहे. "

बोलतां बोलतां ते एका उंचवट्यावर येऊन पोंचले. कृष्णानदी पूर्ण भरलेली पाहून किसन ह्मणाला, " वेळ असता तर आपण खालच्या गांवीं गेलों असतों; पण तितका अवकाश नाहीं व मातेच्या पलीकडे तर गेलेंच पाहिजे. "

थोडा वेळ विचार करून तो पुनः आपल्या लोकांस ह्मणाला, " नारायणपुरास जा व कोळ्यांना छोट्या उतारावर तयार रहाण्यास सांगा. उशीर लागला तर किसनशीं गांठ आहे ह्मणावें. जयसेनानें तरवारीनें वाघाशीं कसा सामना केला, त्या दिवशीं तुह्मीं त्याजबरोबर किती आनंदानें वेळ घालविला याची आठवण तुह्मांस आहेना ? जा तर मग. सूर्यास्तापूर्वी त्याला किल्ल्यांत पोंचविलें नाहीं तर आपलें जीवित व्यर्थ ! "

किसन भिल्लांचा नाईक होता इतकेंच नव्हे तर तो भिल्लराजाचा नातलगहि होता. हा भिल्लराजा प्रसंग पडल्यास रणांत पांच हजार फौज उभी करण्यास समर्थ होता. हा राजा विजयपूरचा मांडलिक होता. राजानें किसन व त्याचे लोक सम्राटाच्या मदतीस कायमचे दिले होते.

किसनच्या प्रदेशांत जयसेन कित्येक वेळां शिकारीला आला होता. त्याच्या उदार स्वभावामुळें तो किसनला व त्याच्या लोकांना जीव कीं प्राण वाटत असे. आपल्या नाईकाचें भाषण ऐकल्याबरोबर दोन तरुण भिल्ल तीरासारखे धांवले; ते क्षणांत दिसेनासे झाले.

कांहीं वेळानें किसन जयसेनासह नारायणपुरास पोंचला. तेथें सर्व तयारी होती. एका न्हाव्यानें जयसेनाची जखम पुनः बांधली. किसननें त्यास थोडेंसें खावयास घातलें व त्याला एका खाटेवर निजवून घेऊन जाण्याची व्यवस्था केली. तेव्हां देवानें वांचविलेल्या ह्या अमोल जीवासह कशाला जाणून बुजून मृत्यूच्या मुखांत शिरतां असे उद्गार कोणीं काढलेले ऐकून किसन म्हणाला, " चूप ! ह्याहूनही भयंकर पूर असतांना मी अनेकवेळां पार गेलों आहे. कृष्णामातेनें मला कधीं दगा दिला नाहीं. आणि येथें रहाण्यांत तरी अर्थ कोणता ? फक्त बारा इसम खिंडीचें रक्षण करीत आहेत. ते शत्रूंस होतां होईतों येऊं देणार नाहींत, पण त्यांचा नाइलाज झाला तर येथें फुकटच मरावें लागेल ना ? "

जयसेनाची खाट खांद्यावर घेऊन किसनचे भिल्ल निघाले. त्यांचा रस्ता फार अरुंद होता. कित्येक ठिकाणीं खडक असे चमत्कारिक उभे होते कीं, पुढें जाण्यास मार्गच नाहीं असें वाटे. मध्येंच एके ठिकाणीं किसन थांबला. तो जयसेनास म्हणाला, " मातेची शोभा मोठी प्रेक्षणीय असेल. चला, मी ती तुम्हास दाखवितों. "

किसननें दर्शविलेल्या एका बुरजासारख्या शिलास्तंभावर त्याच्या लोकांनीं जयसेनाची खाट ठेवली. तेव्हां कृष्णेचें भीषण स्वरूप जयसेनाच्या दृष्टीस पडलें. त्या स्वरूपांत शोभा व भीषणता होती. प्रथम तर जयसेनानें डोळे मिटलेच; कारण तो भयानक क्रीडा करीत असलेला जलसमूह त्याला बघवेना. किसन त्या कड्याच्या अगदीं टोंकाशीं उभा होता. तो म्हणाला, ' थोडासा वारा सुटून हें धुकें नाहींसें झालें म्हणजे मातेचें खरें सौंदर्य दिसेल. '

अल्पावकाशांत धुकें अदृश्य झालें व जयसेनाला कृष्णेचा धबधबा खाल-पासून वरपर्यंत पूर्ण दिसला. कृष्णेस मोठा पूर आल्यानें तिचें विस्तीर्ण पात्र जास्तच विस्तीर्ण झालें होतें. तो अपार जीवनसमूह कित्येक पुरुष

उंचीवरून खालीं पडत होता. कडा एकसारखा तुटलेला नव्हता म्हणून प्रवाह या खडकावरून त्या खडकावर अशा रीतीनें खालपर्यंत पडत होता. त्यामुळें खालपासून वरपर्यंत जलाचे तुषारच तुषार उद्भवून एक अपूर्व शोभा दिसत होती. जलपतनानें बनलेल्या खोल गर्तांत पाणी हल्लीं वेगानें पडत होतें, त्यामुळें जन्म पावणारा ध्वनि सर्वत्र घुमत होता. तळाशीं एक गंभीर डोह होता. त्यांत पाण्याचा मुख्य प्रवाह पडत होता. इतर प्रवाहहि तेथेंच येऊन आदळत होत. ते प्रवाह एकमेकांवर आपटत तेव्हां महान् तरंगलीला उत्पन्न करीत. ते तरंग पुन: आपटून सर्व तुषारमय बने व त्या योगानें त्या निर्जन ठिकाणीं एक अपूर्व पण भीतिप्रद देखावा दिसत होता. त्यावर प्रेक्षकांची नजर ठरत नसे, पण किसन चिरपरिचयानें त्या जलप्रपाताकडे गंभीर मुद्रेनें एकसारखा पहात होता. तो म्हणाला, ' ही कृष्णामाता पहा; येथेंच आम्ही तिची पूजा करतों, फुलें वहातों, व नवसहि फेडतों. खालीं पवित्र कुंडें आहेत; पूर नाहींसे झाल्यावर आम्ही तेथें जातों व मातेचे नवस फेडतों. चला, बराच वेळ झाला; आपणांस गेलें पाहिजे. '

त्या अद्भुत चमत्काराच्या दर्शनानें ईश्वराची अतर्क्य लीला जयसेनाच्या मनांत आली. तो म्हणाला, " किसन ! क्षणभर थांब. प्रथम माझी चित्तवृत्ति गोंधळली, पण आतां मी स्थिर झालों आहे. क्षणकाल मला हें अलौकिक दृश्य पाहूं दे. "

सहस्ररश्मि भगवान् क्षितिजा जवळजवळ पोंचला होता. त्याचें तिरपें किरण त्या जीवनसमूहावर पडून तो प्रपात अपूर्व सौंदर्यानें विलसूं लागला. प्रथमारंभींचा भयजनक देखावा जाऊन आतां त्या प्रपाताचें फक्त शांत व मनोहर स्वरूप नयनगोचर होत होतें. प्रथम पूर असल्यानें प्रवाह कर्दममय होता, तरी ज्या ज्या ठिकाणीं सूर्यकिरण पडले होते तेथें असंख्य इंद्रधनुष्यें दिसत. क्षणांत तीं नाहींशीं होत व क्षणांत दिसून येत, असा चमत्कार चालला होता. कांहीं इंद्रधनुष्यें दिसतांच नाहींशीं होत, तर कांहीं अल्पजीवीं असत. तीं त्या प्रचंड व क्षुद्र प्रवाहांचे पुष्पहारच भासत होतीं. शुभ्र प्रस्तरमय तें स्थान ! तेथें उगवलेले वृक्ष व वनस्पति ह्यांनीं जणूं भगवती कृष्णेचा सन्मान करण्याकरतां, तिला नमन करावें म्हणून,

त्या जीवनसमुहाकडे आपलीं शिरें व देहहि नत केले होते. आतां आतां तर त्या वृक्षपर्णांवर उडालेल्यां तुषारांवर सूर्यरश्मि पडून सर्वत्र दिसूं लागलेल्या तेजस्वी मौक्तिकमाला व तळाशीं नुकत्याच जन्म पावत असलेल्या अंधकारानें गंभीर होऊं लागलेला जलसंचय, अशी निसर्गाची विलक्षण शोभा पाहून नास्तिकसुद्धां ईश्वरचरणीं लीन व्हावयाचा !

घटका अर्ध घटका त्या निसर्ग सौंदर्याचें पान करून जयसेन ह्मणाला, " पुरे, पुरे ! माझें अंतःकरण कसें भरून गेलें आहे ! ईश्वराचीं अशीं अनेक कौतुकस्थळें आहेत अं ! किसन ! चल, मी हें दृश्य कदापि विसरणार नाहीं. "

त्या दुर्गम मार्गानें जात असतां वाटेंत कांहीं शिला आडव्या आल्या होत्या. त्यांना वळसा घालून गेल्यावर जलदुर्गाचा भव्य किल्ला त्याच्या दृष्टोत्पत्तीस आला. किल्ल्यावर, तटबंदीवर, झुडपांवर, सर्वत्र अस्तोन्मुख झालेला सूर्य आपल्या अनंत हस्तांनीं क्रीडा करीत असल्यामुळें किल्ल्याचा उदासीनपणा कमी झाला होता. किल्लेदार नीलवर्ण जयसेनाचा मावसभाऊ होता. उताराच्या ठिकाणीं प्रवाह बाणाच्या टप्प्यांतच होता. त्याठिकाणीं प्रवाहास जोरा फार होता, तरी पात्रांत कोठेंहि खळबळ नव्हती; तें शांत दिसत होतें. किसनच्या आज्ञेनें वाऱ्याच्या झुळकेबरोबर नाविकांनीं ती खाट प्रवाहांत लोटली. थोड्या वेळांत आपली मंडळी परतीराला सुरक्षित पोंचली; पण ह्यावेळीं जयसेनास मूर्छा आली होती. संध्याकाळ असल्यानें किल्लेदार कृष्णातीरावर आला होता. जयसेन मूर्छित झालेला पाहून किसन नीलवर्णास ह्मणाला, " एखादी निवाऱ्याची जागा पहा व वैद्यराजास बोलवा. "

नीलवर्णानें उत्तर केलें, " ते आजच रामगडास गेले. पूर उतरेल तव्हां ते येतील. पण थांब, येथें जवळच एक वृद्ध बावा रहातो त्याजकडे आपण यास नेऊं. "

किसन ह्मणाला, " फार उत्तम ! माझे लोक ह्यास तेथपर्यंत नेतील. मात्र आपला एक चाकर बरोबर द्या. ते भगवन् अंध आहेत तरी ह्यास तेव्हांच बरें करतील. "

नीलवर्णानें उत्तर दिलें, " मीच स्वतः जाऊन सर्व व्यवस्था लावतों. "

प्रकरण २ रें

पुनर्जन्म.

रात्र झाली तरी हवेंतील उष्मा न्यूनता पावला नव्हता. वायुलहरीबरोबर प्रपातध्वनि ऐकूं येत होता. जयसेनास भयंकर ज्वर भरला होता. तो आपले पाणीदार नेत्र उघडून शून्य दृष्टीनें सभोंवार पाहूं लागला. तो कोणासहि ओळखण्याच्या स्थितींत नव्हता. तो बरळूं लागला. त्या वृद्ध साधूनें वारंवार त्याची नाडी पहावी, डोकें चापचावें; पण ज्वर उतरण्याचें चिन्ह दिसेना. वृद्ध जवळ असलेल्या मुलीस ह्मणाला, " बाळ ! त्याजजवळ बैस; त्याच्या मस्तकाचा कपडा कोरडा होऊं देऊं नको. कदाचित् प्रातःकाळच्या सुमारास त्यास आराम वाटेल. मी ईश्वरचिंतन करतों. "

जयसेनाच्या सुंदर चेहऱ्यावर मधेंच दुःखाचे विकार दिसावे; मधेंच त्याची मुद्रा आवेशयुक्त व्हावी. त्यानें मोठ्यानें रणगर्जना करून अर्धवट उठावें व हातांत तरवार असल्याप्रमाणें हात फिरवूं लागावें. पण त्या बालेनें त्यास पुनः निजवून लहान मुलाप्रमाणें थोपटावें. केव्हां केव्हां त्याचा घसा कोरडा होऊन त्यानें क्षीण आवाजानें जलयाचना करावी, त्यावेळीं ती त्यास एक औषधी पेय पाजी; ह्मणजे कांहीं काळ तो स्वस्थ होई. तिच्या आजोबाकडे—तो वृद्धवीतरागी तिचा आजा होता—कधीं कधीं आजारी लोक येत. तेव्हां लीलेस त्यांची व्यवस्था करावी लागत असे. इतर स्त्रियांप्रमाणें तिचा स्वभाव भित्रा नव्हता, किंवा पुरुषांप्रमाणें आजाऱ्याजवळ बसून त्याची शुश्रूषा करण्याचा कंटाळा तिला नव्हता. रोग्यांना पहावयास वृद्ध गांवांत जाई तेव्हां तो अंध असल्यानें लीलाच त्याच्या मार्गदर्शकाचें काम करीत असे.

लीलादेवी सुमारें सोळावर्षांची होती. तिच्या वयाच्या मुलींपेक्षां ती उंच होती. ती शरीरानें सडपातळ होती. तिचा वर्ण गौर होता व त्यांत पीतवर्णाची झांक होती. ती निरोगी व सशक्त होती. ह्यावेळीं तिचे कृष्ण कुंतल मानेवर व स्कंधावर इतस्ततः लोळत होते. तिच्या

प्रशस्त ललाटाला कुंकुमतिलक शोभा देत होता. तिचे उज्ज्वल नेत्र अर्ध उन्मीलित होते. त्या नेत्रद्वयांत विलक्षण तेज दिसत होतें. कोणींहि तिला एकदां पाहिलें तरी विसरत नसे. तिची मुद्रा नेहमीं मंदस्मित होती. ते पहा; तिनें आपले नेत्र पूर्ण विस्तारले. ते नेत्र कधीं कोणावर क्रुद्ध होतील हें संभवनीय आहे काय ? कधींच नाहीं. अद्यापपर्यंत त्या निर्दोषबालिकेला या दुष्ट जगाचा अनुभव नव्हता. तिच्या यौवनदशेस नुकताच आरंभ झाला होता. पेय देतांना तिचे मृदुहस्त दीपप्रकाशांत दृग्गोचर होत; त्यावरून ती तरुणपणीं सौंदर्यखनि होईल असें वाटे. अद्याप तिचें सौंदर्य पूर्ण विकसलें नव्हतें. तरीपण तिचें निर्दोष मुखमंडल व त्यावरील मंदहास्य ह्यांनीं ती मोहक दिसत होती. ती वृद्धाच्या गृहाची स्वामिनीच होती. तिचीं वस्त्रें साधींच होतीं. कांहीं चांगलें कपडे व दागिने एका पेटींत आजोबांनीं ठेवले आहेत हें तिला माहीत होतें. त्याबद्दल व स्वतःच्या पूर्वचरित्राबद्दल वृद्ध कधीं बोलत नसे. एकदां त्यानें तिला सांगितलें होतें, 'बाळ ! एखाद्यावेळीं मी तुला सर्व सांगेन. तूं अद्याप लहान आहेस व ती हकीकत दुःखपरिप्लुत आहे.' आजोबा एक राजकैदी आहे इतकीच माहिती सध्यां लीलादेवीस होती. लीलेला मातृसुख मिळालें नाहीं तरी वृद्धाच्या प्रेमवर्तनानें तिचा शैशवकाल सुखांत गेला. त्यानें तिला संस्कृताची ओळख करून दिली होती व एका परिचयाच्या गृहस्थाकडून तिला लिहावाचावयास शिकविलें होतें. आतांशा वृद्धाचें सर्व लिखित तीच आपल्या सुंदर अक्षरानें लिहून ठेवीत असे. लहानपणीं गांवांतल्या कांहीं मुली तिच्याशीं खेळावयास येत; पण तिची बाल्यावस्था संपल्यावर चकाट्या पिटणारांचा संपर्कसुद्धां तिला होऊं नये ह्मणून वृद्धानें त्यांचें जाणेयेणें बंद केलें होतें. ती पितामहाबरोबर गांवांत जाई तेव्हां वृद्धाबद्दलच्या पूज्यभावामुळें तिच्याशीं गप्पा मारावयाचें साहस करण्यास कोणी धजत नसे. त्यांच्या घरीं कामकाज करण्यास एक वृद्धशी बाई होती. तिला सर्वजण मावशी ह्मणत. वृद्धाचें लिहिण्याचें काम नसल्यास लीलादेवी अंबामावशीस मदत करी.

ज्वरानें अस्वस्थ असलेल्या जयसेनाकडे पाहून तिनें एक दीर्घ निःश्वास टाकला. याची अशी स्थिति कां व्हावी ? भर तारुण्यांत, कीं

जे दिवस वैभव व कीर्ति मिळविण्यांत जावयाचे, ईश्वरानें ह्याची अशी अवस्था कां केली ? ह्याच्या या स्थितीनें ह्याच्या आईबहिणीस व पत्नी असल्यास तिला किती दुःख होईल बरें ? एकमेकांचे प्राण घेणें, एकमेकांना जखमी करणें, देशचेदेश उध्वस्त पाडणें, परस्परांचीं बायकामुलें अनाथ करून त्यांना शोक उत्पन्न करणें, ह्यांखेरीज दुसरें कांहीं ज्यांत नाहीं अशा लढाया लोक लढतात तरी कशाला कोण जाणे ! हजारों लोक जखमी होऊन नुसत्या जमिनीवर उन्हाच्या तापांत तळमळत पाणी पाणी करीत आहेत, त्यांच्या जखमांकडे कोणी लक्ष देत नाहीं, जिकडे तिकडे मांस व रक्त यांचा चिखल झाला आहे– असें रणभूमीचें चित्र तिच्या डोळ्यांसमोर उभें राहिलें. आणि ह्या नुसत्या विचारांनींच तिचा देह रोमांचित् झाला.

हल्लीं तिच्यासमोर तो सुंदर तरुण होता. त्याची विशाल छाती व पिळदार पुष्ट दंड उघडे असल्यानें स्पष्ट दिसत होते. स्वप्नांत एखाद्यावेळीं त्याच्या चेहऱ्यावर मंद स्मित येई तेव्हां तो फारच रम्य दिसे. इतक्यांत दुःखामुळें त्यानें तळमळावें व केविलवाणी मुद्रा करावी. त्याबरोबर तिला रडूं येई तें मुळींच आवरेना. तरीपण ती त्याजकडे निश्चलपणें पहात होती.

" बाळ ! तूं आतां नीज. तुला कंटाळा आला असेल व रात्रहि बरीच झाली आहे. " ईश्वरचिंतन आटोपल्यावर तो वृद्ध ह्मणाला.

" छे, छे, मला कंटाळा आला नाहीं व झोंपहि येत नाहीं. आणि आतांच तर त्याजकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. तो अंगावर पांघरूण राहूं देत नाहीं, मजकडे पाहून पाणी मागतो व त्याच्या मस्तकावरचें वस्त्राहि ओलें ठेवावें लागतें. आजोबा ! पण काय होईल हो ? " लीलेनें प्रश्न केला.

जयसेन अतिशय अस्वस्थ झाला ह्मणून लीलेच्या आग्रहावरून त्या वृद्धानें पुनः त्याची नाडी पाहिली. तो ह्मणाला, " बाळ ! हीच वेळ आहे. ह्यानंतर तो बरा होईल किंवा ईश्वर त्यास घेऊन जाईल. त्या परवां तयार केलेल्या पुड्या घेऊन ये पाहूं. " ती गेल्यावर वृद्ध आपल्याशींच म्हणाला, " देवा !

मला थोडा वेळ पहातां येतें तर मीं ह्याची स्थिति प्रत्यक्ष अवलोकन केली असती. कित्येक जें मीं ऐकलीं नाहींत तीं नांवें हा बडबडतांना ऐकूं येत आहेत. काय ? कांतिचंद्र याचा चुलता ? हा कांतिचंद्र कोण ? द्युमत्सेन ! काय, अद्याप तो दुष्ट जिवंत आहे ? मी असा अंध व असमर्थ होऊन येथें बसलों आहे तरी ह्या वेळींहि विजयपूरच्या त्या भव्य इमारती, तो दरबारचा थाट, तो युद्धास जातेवेळचा देखावा, राजा विलासराज, व त्याचें विषयीं वर्तन, हीं सर्व कशीं मजसमोर स्पष्ट दिसत आहेत. परमेशा ! काय चमत्कार ? ज्यावेळीं मला वैभव व कीर्ति मिळण्याच्या बेतांत होती त्याचवेळीं मला अंधत्व व कैद प्राप्त झाली ! असो; तुला तें योग्य वाटलें; मीहि त्याचा आनंदानें स्वीकार केला. ” लीलेच्या पदांचा ध्वनि ऐकून तो ह्मणाला, “ मीं अद्याप तिला ही हकीकत कळूं दिली नाहीं व पुढेंहि मला खबरदारी घेतली पाहिजे. बाळ ! पुड्या आणल्यास कां ? ” तो मोठ्यानें ह्मणाला.

“ ह्या घ्या, आजोबा ! त्या कशा द्यावयाच्या तें आतां सांगा. ” पुड्या पुढें करून ती ह्मणाली.

पुडीचें अनुपान सांगून वृद्ध म्हणाला, “ बाळ ! आतां आपला उपाय संपला. ईश्वर काय करील तें खरें. मी श्रमलों आहे. मी जरा पडतों. तुला कमजास्त वाटल्यास मला हांक मार. पण किल्लेदाराचीं माणसें कोठें आहेत ? आतां त्यांनीं बसावयास पाहिजे. ”

“ कांहीं ना कांहीं सबब सांगून ते सर्वजण गेले. मी एकटीच आहें. पण ह्या तरुणाला आणल्यापासून एक मनुष्य सारखा बाहेर बसला आहे. तो भिल्ल आहे. ‘ मला आंत येऊं देणार नाहींत ! ’ तो ह्मणतो. आजोबा ! त्याला बोलावूं कां हो ? ” लीलेनें विचारलें.

“ होय; बाळ ! जा; त्याला बोलाव. ईश्वराजवळ उच्चनीच हा भेद नाहीं. तुजबरोबर सोबतीस त्याला हाक मार. वत्से ! लोकांना असेंच समतेनें वागीव. त्यांजवर उपकार करीत जा. ” तिच्या तोंडावरून हात फिरवून तो ह्मणाला.

पुडी दिल्यावर लीला बाहेर जाऊन त्या भिल्लास ह्मणाली, “ ऊठ, मजबरोबर चल. ”

" बाई ! मी भिल्ल आहें. साधूजींच्या पवित्र मठांत मला कोण येऊं देईल ? " किसननें उत्तर दिलें. तो भिल्ल दुसरा कोणी नसून किसनच होता.

" आजोबा तुला बोलावीत आहेत, तेव्हां कसलीहि शंका मनांत न आणतां मजबरोबर चल. "

आनंदभरित होऊन किसन तिच्या मागोमाग गेला. वृद्धास वंदन करून तो जयसेनाजवळ जाऊन बसला. लीलेसमोर आतां दोन मनुष्यें होतीं. एक भव्य सुंदर युवक नुकताच तरुणावस्थेंत येत असलेला, व दुसरा रांकट, चेहरा पाहिल्याबरोबर क्रूर दिसणारा, झुपकेदार मिशा व कल्ले असलेला, कपाळावर युद्धांत खुणा झालेला, पण यावेळीं ज्याच्या मुद्रेवर दुःख व काळजी पूर्ण उमटली आहे असा. दोघेहि निराळ्या जातींचे, निराळ्या धर्मपंथाचे. पण या दोघांत असा काय संबंध असावा बरें ? हा विचार मनांत येऊन तिला फार आश्चर्य वाटलें. पहांटपर्यंत तीं दोघें तशींच बसलीं. पक्षी किलबिल करूं लागले. जयसेन इतकावेळ संशयस्थितींत होता. आतां त्यानें डोळे उघडले. किसनला पाहून तो क्षीण आवाजानें ह्मणाला, ' किसन ! मला स्वप्न पडत होतें. चंद्रकेतुला मारलें तेव्हांची त्याची क्रुद्ध मुद्रा मजपुढें येऊन मला बोलावीत होती. पण मधूनमधून एक स्वर्गदेवता येऊन मला उत्तमसें पेय पाजीत असे, ती त्याला हांकून देई. त्यामुळें चंद्रकेतूला मला नेतां आलें नाहीं. '

तो पुनः स्तब्ध झाला. पण हें जीवन व मृत्यु यांचें युद्ध फार वेळ टिकलें नाहीं. थोड्याच वेळांत त्याच्या डोळ्यांतून जलबिंदु आले; श्वास नियमित वाहूं लागला; व देह घर्मान्वित झाला. किसन लीलेस ह्मणाला, " बाई ! तो आतां बरा होईल. त्यास आणखी पांघरूण घाल व तूं आतां स्वस्थ नीज. खरोखरच जयसेनानें ह्मटल्याप्रमाणें तूं स्वर्गातील देवता आहेस. "

सर्व रात्रींत तिनें एक क्षणहि नेत्र मिटले नव्हते. त्या भिल्लाचे ममतेचे शब्द ऐकून तिला अत्यानंद झाला. ती तेथेंच एका कोंपऱ्यांत चटईवर निजली. तेव्हां तिच्या डोळ्यांतून अश्रु आले व तिला न कळत हुंदकेहि बाहेर पडले; कांहीं वेळानें तिला मोकळें वाटून झोंप लागली.

शिवालयाच्या भिंतींत घरटीं करून राहिलेले पोपट, मैना आदिकरून

पक्षी गडबड करूं लागले. पक्षिगण भक्ष्य मिळविण्याकरतां घरट्यांतून बाहेर पडूं लागले. सूर्यनारायणाच्या आरक्त किरणांनीं हळुहळू त्या प्रदेशांतील वस्तुमात्र दृग्गोचर होऊं लागली. किल्ल्याच्या पायथ्याशीं कृष्णानदी एखाद्या शांत तलावाप्रमाणें दिसत होती. प्रपाताचा शब्द अद्याप मंद मंद ऐकूं येत होता. मठांत फक्त मावशी उठली होती. नित्य कृत्यें करीत असतां ती मनाशीं ह्मणूं लागली, "कोण ती भयंकर रात्र ! माझ्यानें कांहीं बसवलें नसतें. पण माझी बाई साऱ्या रात्र तेथून हलली नाहीं. काय त्या आरोळ्या व तें बरळणें ! पण तिला मुळींच भय वाटत नाहीं. मीं मघां जाऊन पाहिलें तों ती भोळी पोर तेथें खुशाल स्वथ निजली आहे आणि तो भिल्ल ! मेल्यानें मजकडे पाहून मला निघून जा ह्मणून खूण केली. मलातर तेथें मुळीं झोंप आली नसती. पण माझी लीलादेवी एक देवता आहे. ती केव्हांहि चांगल्या कृत्यांत निमग्न असते. ती दमली असेल; मी तिला इतक्यांत उठवीतच नाहीं."

"मावशी ! ए मावशी !" बाहेरून कोणीतरी हांक मारली, "कोणीकडे आहेस ? मी चहूंकडे पहातों पण कोणीसुद्धां दिसत नाहीं. काय लेंकाचे सारे मेले कीं काय ?"

स्वतःच्या चर्पटपंजरींत व्यत्यय आलेला न आवडून मावशी रागानें ह्मणाली, "नीघ जा, मेल्या ! केव्हांचा ओरडतो आहे. ते सगळे निजले आहेत.' दार उघडल्यावर आलेल्या इसमास पाहून ती ह्मणाली, 'आं ! कोण ? चंद्रा ! तूं कां एवढ्यानें ओरडत होतास ?"

"हें पहा, मावशी ! रामप्रहरांत तूं रागावत जाऊं नकोस. अशानें तुझा सर्व दिवस संतापांत जाईल. किल्लेदार निघाले सुद्धां असतील. त्यांनीं मला पुढें पाठविलें आहे. ते आपल्या भावाच्या भेटीस येत आहेत." चंद्रानें उत्तर दिलें.

"मी तुला सांगतेंना जा ह्मणून. असे पन्नास किल्लेदार आले तरी मी त्यांना एव्हां जागे करणार नाहीं. तो रात्रीं जगतो कां मरतो अशी अवस्था होती. पण देवदयेनें त्यास आतां स्वस्थ निद्रा लागली आहे. जा, लवकर पळ नाहींतर किल्लेदाराचे लोक येऊन एकच गोंगाट होईल. त्या आवाजानें मेलेले सुद्धां जागे होतील." मावशी ह्मणाली.

" तूं ह्मणतेस तर मी जातों. पण किल्लेदाराला कांहीं हा निरोप आवडणार नाहीं. त्यांनीं आपल्या भावाकरतां महाल स्वच्छ करून सजविला आहे. सकाळपासून आचारी आपल्या कामाला लागला आहे. " चंद्रा बोलला.

' असें कां ! ' मावशी डोळे मिचकावीत ह्मणाली, ' तर तीं सारीं पक्वान्नें तुह्मांलाच खावीं लागतील. कारण तो अगोदर खाणारच काय ह्मणा, पण जें खाईल तें आजोबा आज्ञा करतील त्या खेरीज दुसरें कांहीं त्या तरुणाला घालावयाचें नाहीं. '

वरील निरोप पोंचल्यामुळें नीलवर्ण आला नाहीं. तरी वारंवार मनुष्य येऊन अद्याप तो तरूण निजला आहे असा निरोप घेऊन जाई. सूर्यास्ताच्या सुमारास जयसेन जागृत झाला. आपण कोठें आहों हेंच त्यास पहिल्यानें समजेना. लीलादेवीला पाहून तो ह्मणाला, " तूं कोण आहेस? होय; रात्रीं ज्या देवतेनें मला स्वर्गीचें अमृत दिलें तीच तूं ! "

कन्या लीला त्यास हळूच ह्मणाली, " आपण स्वस्थ निजा. आपणांस बोलूं देऊं नये अशी अजोबांची आज्ञा आहे. " तो पुनः बोलण्याचा प्रयत्न करूं लागला हें पाहून ती जरा जोरानें ह्मणाली, " आपण वेडे कां आहां ? अशानें मला आजोबांना बोलवावें लागेल. "

तिचें क्रोधाविर्भावाचें भाषण ऐकून जयसेनास उलट मौजच वाटली. तो तिजकडे कृतज्ञतापूर्वक पाहून म्हणाला. " होय. सुंदरी ! मी निजण्याचा प्रयत्न करतो; पण तूं मात्र माझ्या स्वप्नांत येत जा. "

दुसऱ्या दिवशीं किल्लेदार स्वस्थ राहीना. वैद्यराज रामगडाहून परत आले होते. पडदे लावलेल्या मेण्यांतून रुग्ण जयसेनास वर नेण्यास हरकत नाहीं असा अभिप्राय त्यांनीं दिल्यानें तर किल्लेदार जास्तच गडबड करूं लागला; तेव्हां वृद्धाच्या अनुमतीनें जयसेन संध्याकाळीं किल्याकर गेला.

———

प्रकरण ३ रें

रामगडचे बौद्ध भिक्षु.

रामगड किल्ला कृष्णा व तुंगभद्रा यांच्या मधल्या प्रदेशाच्या पश्चिम भागांत होता. आमच्या कथानकास प्रारंभ होण्यापूर्वी शें सवाशें वर्षे रामगड व त्या भोंवतालचा मुलूख तेथील राजापासून विजयपूरनरेशानें जिंकून घेतला होता. विजयपूर राज्याच्या सीमान्त प्रदेशांत हा किल्ला असल्यानें मोठा महत्वाचा गणला जात असे. सभोंवारच्या रानटी जातींवर दरारा रहावा झणून येथें बरीच सेना होती. किल्ला पहातां-क्षणींच भव्य व प्रेक्षणीय वाटे. कधीं काळीं झालेल्या स्फोटानें ज्वलत्पर्वताच्या मुखांतून निघालेल्या रसाच्या बनलेल्या खडकावर हा किल्ला बांधला होता. अवश्य ठिकाणीं एकेक, दोनदोन, तीनतीन तट बांधून किल्ल्याची मजबुती केली होती. किल्ल्याच्या उत्तरेस एक सरोवर होतें. त्या प्रसन्न व विस्तीर्ण सरोवराच्या स्वच्छ सलिलानें मनुष्याच्या मनास आल्हाद वाटत असे. वास्तविकच आहे; कारण ह्या सरोवराच्या दर्शनानें भगवान् श्रीरामचंद्राच्या मनाचीहि सीताविरहानें प्राप्त झालेली विषण्णता क्षणकाल दूर होऊन त्या बंधुद्वयानें कांहीं दिवस येथें वसति केली अशी आख्यायिका होती. रामगड गांव किल्ल्याच्या पूर्वेस असून आपल्या कथानकाच्या वेळीं भरभराटींत होता. त्या ठिकाणीं धनगर व कोष्टी यांची मोठी संख्या होती. ते शांत व निरुपद्रवी होते. तेथले पुष्कळ धनगर व कोष्टी बौद्धधर्मी होते, हें ऐकून तुझांला कदाचित् आश्चर्य वाटेल. वाचकहो ! ते बौद्धधर्मी कधीं बनले हें नक्की सांगतां येत नाहीं. अशोकराजानें स्थापन केलेल्या संस्थेंतून कोणी बौद्ध भिक्षु रामगडास येऊन त्यानें येथल्या लोकांना बौद्धधर्माची दीक्षा दिली असावी. तेव्हांपासून ते बौद्धच राहिले. ब्राह्मणधर्माच्या पुनर्वर्चस्वाच्या कालांतहि त्यांनीं बौद्धधर्माचा त्याग केला नाहीं. आसपासच्या खेड्यांतहि थोडे फार बौद्ध धर्मी अवशिष्ट होते. रामगडचा बौद्ध मठपति बराच मोठा अधिकारी असे. बुद्ध देवाचें मंदिर फारसें सुंदर नव्हतें, पण

मंदिरांतील भगवान् बुद्धाची मूर्ति अवर्णनीय होती. मठांतील भिक्षूंनीं लहानशी शाळा स्थापली होती. शाळेंत तद्देशीय भाषा शिकविली जाई. विजयपूरच्या राजांनीं या बौद्ध मठास कांहीं इनाम जमीन दिली होती. विजयपुराधिपतींना अशोकसिंहासनस्थ गुप्त वंशीय पुरुषांनीं संकट प्रसंगीं अनेक वेळां सहाय्य केलें होतें. त्यामुळें रामगडच्या बौद्ध विहारास राजाश्रयाचा लाभ झाल्यानें बौद्धधर्माच्या उतरत्या काळांतहि हा मठ मोडला नाहीं.

सध्यां रामगडास दोन मठपति होते. कृष्णमूर्ति कांहीं दिवस शासन-पीठांत एक अधिकारी होता. रामगडचा पूर्वीचा मुख्य मठपति अनीतिमान् व उपदेशाच्या कामांत हयगय करणारा आहे असा संशय आल्यावरून त्याच्या जागेवर कृष्णमूर्तीस पाठविले होते. तो स्वतःस अगदीं कर्मठ ह्मणवीत असे. त्यानें हिंदुस्थानांत व तिबेटांत पुष्कळ प्रवास केला होता. त्यानें तिबेटांत अनेक लोकांस बौद्धधर्माची दीक्षा दिली होती. त्यानें नीतिमत्ता पहाण्याच्या उद्देशानें बऱ्याच विहारांची कडक चौकशी केली होती. पण त्याची स्वतःची वर्तणूक चांगली नव्हती. त्यानें धर्माच्या कामांत इतकी कळकळ दाखविली नसती व इतकें सहाय्य केलें नसतें तर जशा त्यानें शासन पीठसभेकडून लोकांना भयंकर मरणाच्या शिक्षा देवविल्या तशीच त्याची अवस्था झाली असती.

कृष्णमूर्ति उच्च कुलांत जन्म पावला होता. तो स्वरूपानें देखणा होता. लोकांवर त्याचें वजन सहज पडत असे. पण तो विषयी व इंद्रियसुखासक्त होता. रामगडच्या गरीब बौद्धांना तो काळाप्रमाणें वाटे. ते मनांत ह्मणत, ‘ केव्हांना केव्हां याला आपल्या पापाचें प्रायश्चित्त भोगावें लागेल. तो सरळ व शांत गौतमबुद्ध कोणीकडे व हा त्याचा पापकर्मा शिष्य कोणीकडे !’

रामगडचा दुसरा मठपति सूर्यमणि वर वर्णन केलेल्या कृष्णमूर्तीच्या अगदीं उलट होता. तो मगधांतून इकडे आल्यास बरींच वर्षें लोटलीं होतीं. तद्देशीय भाषा शिकून तो त्या भाषेंत त्रिपिटकें व नीतिग्रंथ ह्यांचीं भाषांतरें करीत होता. शासनपीठाचीं कामें त्यास आवडत नसत. ‘कोठें तरी लांब एकांतवासांत आपणांस पाठवावें अशी त्यानें विनंति केल्यावरून मठपति महंतांनीं त्याला रामगडास पाठविलें होतें.

कृष्णमूर्ति व सूर्यमणि हे अंतरंगाप्रमाणें बहिरंगांतहि भिन्न होते. एक काळा व खुनशी तर दुसरा गौरवर्ण व सौम्य, लोकांस धर्मज्ञान कसें होईल इकडे चित्त असलेला. रामगडचे बौद्ध सूर्यमणीस पूज्य मानीत. त्याचीं पूर्ण कळकळीचीं, उपदेशपूरित, रसाळ भाषणें ऐकण्यास इतर लोकहि येत असत. खऱ्या बौद्धाचें वर्तन कसें असावें यावर तो प्रवचन करीत असतां श्रोतृसमुदायाच्या डोळ्यांतून नकळत अश्रुधारा वाहूं लागत. त्या भोळ्या गरीब लोकांना तो दुसरा बुद्धच वाटे !

थोडया वर्षांपूर्वीं मगधांतून त्याची बहीण मनोरमा आली होती. ती सुंदर व सद्गुणी असल्यानें पतिनिधनानंतर मगधांत राहिली असती तर कोणा सरदाराशीं अगर राजकुमाराशीं तिचें लग्न झालें असतें व ती आज ऐषआरामांत असती. पण आपल्या बंधूच्या अद्भुत गोष्टी ऐकून आपणहि तसेंच भगवान् बुद्धाच्या सेवेंत आयुष्य घालवावें अशा प्रबल इच्छेनें तिनें कुमारीवर्गाची दीक्षा घेतली, व ती रामगडास सूर्यमणीकडे आली. ती हुषार असल्यानें तेथील भाषा लवकरच शिकली. आपल्या बंधूनें केलेलीं धर्मग्रंथांचीं भाषांतरें ती सुंदर अक्षरांनीं लिहून ठेवी. मनोरमेवर तेथल्या गरीब लोकांची फार प्रीति बसली. तिनें आजारी लोकांस औषधें द्यावीं व उपदेशपर गोष्टी सांगाव्या. शरपंजरीं पडलेल्या लोकांना लागलेली तळमळ तिनें आपल्या मधुर भाषणानें नाहींशी करून त्यास शांति प्राप्त करून द्यावी. मनोरमा जें शिकवी तें मुलें मोठ्या हौसेनें शिकत. विहाराच्या शाळेंतल्या शिक्षणाचें काम आतां तीच करीत होती. जशी ज्याची योग्यता तसा उपदेश ती करीत असे. रामगडाच्या दुर्गपतीच्या घरीं तिला स्वकुटुंबांतलीच एक समजत. दुर्गपति बौद्धांचा द्वेष करीत नव्हता. सूर्यमणि गरीब लोकांवर उपकार करून त्यांच्या उपयोगीं पडतो हें पाहून दुर्गपतीला संतोष होई. दुर्गपति कधीं कधीं शास्त्री व सूर्यमणि यांचा वादप्रसंग घडवून आणी. मनोरमा किल्ल्यांत जात असे तेव्हां लहान मुलें, तशाच मोठ्या स्त्रिया तिच्या भोंवतीं गोळा होत. मनोरमा त्यांस प्रेमानें बुद्धदेवाचें चरित्र, व त्यानें केलेले चमत्कार सांगत असे. मनोरमा अत्यंत मनोरम होती. लहान मुलें, " तूं गालास रंग लावलास काय ? " ह्मणूनसुद्धां तिला विचारीत. ती

कधीं कधीं त्यांना आपल्या देशच्यीं गाणीं ह्मणून दाखवी. अशा रीतीनें सूर्यमणि व मनोरमा यांचा काल आनंदांत जात होता. तीं बंधुभगिनी संध्याकाळच्यावेळीं कधीं सरोवराच्या तीरावर फिरतांना तर कधीं निकटवर्ती वृक्षछायेंत विश्रांति घेतांना दिसून येत. त्यांनीं विहारांतील आपल्या निवासस्थानाभोंवतीं लहानशी बाग करून तींत अनेक फलपुष्पांचीं झाडें लावलीं होतीं. आणखी कसलीही गरज त्यांना नव्हती. दैवीसंपत्तीनें तीं संपन्न होतीं व भौतिक वस्तूंची जास्त अपेक्षा त्यांना नव्हती. अहाहा ! ईश्वर जर निरंतर असेंच चालवील तर स्वर्ग व मृत्यु यांत भेद तो काय ? पण कृष्णमूर्ति आल्यापासून थोड्याच महिन्यांत त्यांच्यावर कठीण प्रसंग आला. त्या बंधुभगिनींच्या संकटांना सुरवात झाली. ती हकीकत पुढें क्रमशः कळेलच.

प्रकरण ४ थें.

छळाची तयारी.

एक दुसऱ्यावर जुलूम करणारा, काय वाटेल तें करून इंद्रियविषयक इच्छा तृप्त करणारा, निर्दय अंतःकरणाचा, व सदसद्विवेकबुद्धिहीन आणि दुसरा शांत, सहनशील, ईश्वरसेवापरायण, व म्हणूनच भौतिक विपत्तींना न भिणारा, असे दोन इसम यदृच्छेनें एकेठिकाणीं प्राप्त झाले तरी त्यांचें सख्य कालत्रयीं व्हावयाचें नाहीं असा जगाचा नियमच आहे. सुष्ट व दुष्ट यांची संगति कधींहि व्हावयाची नाहीं. मग ह्या निसर्गनियमास रामगडचे बौद्ध भिक्षुच अपवाद कोठून असणार ?

सूर्यमणीनें आपल्या व्यवसायबंधूला लोकांवर जुलूम न करण्याबद्दल, व त्याच्या इंद्रियसुखासक्तीबद्दल किती वेळां विनवून पाहिलें, पण व्यर्थ ! कृष्णमूर्तीस त्याचें काय होय ? पालथ्या घड्यावर पाणी ! कृष्णमूर्तीची खात्री होती कीं, मगधांतील शासनपीठांत आपलें चांगलें वजन आहे. शासनपीठाचे सर्व अधिकारी आपले मित्रच आहेत. मग कां तो ह्या गरीब भिक्षूला केवळ समानाधिकाराचा ह्मणून दाद देणार ? उलट, त्यानें कांहीं उच्छृं-

खल बौद्ध तरुणांना उत्तेजन देऊन त्यांची एक टोळी बनविली. उपदेशा-च्यावेळीं ते सूर्यमणीस त्रास देऊं लागले. त्यानें सांगितलेल्या नियमांचें त्यांनीं मुद्दाम उल्लंघन करावें. अशा प्रकारें कृष्णमूर्तीनें सूर्यमणीला तेथून हांकून देण्याचा उपक्रम केला !

सूर्यमणि धर्मसंबंधीं कामांत दुर्लक्ष करतो म्हणून मुख्य मठाकडे तक्रार करण्यास किती सोपें ? आपल्या सत्कृत्यांना तो अडथळा करतो अशी ओरड करण्यास काय हरकत ? सूर्यमणि व त्याची बहीण मनोरमा बौद्धधर्माचा तिरस्कार करतांत, दुर्गपतीच्या घरीं तो व विशेषतः मनो-रमा वारंवार जाते येते असें कळविण्यास कशाची अडचण ? जर त्या बंधुभगिनीची ताटातूट करतां येईल तर मग मनोरमेचें संरक्षण कोण करील ? मनोरमेला पाहिल्यापासन एका दुष्ट विकारानें कृष्णमूर्तीला ग्रासून टाकलें होतें. तिला जबरीनें उघड पळविणें ह्मणजे स्वतःचा नाश करून घेणें. किंवा प्रत्यक्ष प्राणासहि मुकणें होय, हें तो जाणून होता. शासन-पीठाच्या अध्यक्षाजवळ आपलें कितीहि वजन असलें तरी सूर्यप्रकाशा-सम स्पष्ट अपराधाची क्षमा करणें कोणासहि शक्य नाहीं हेंहि तो समजून होता. पण जर कां सूर्यमणीस शासनपीठाकडे पाठवितां आलें तर त्यास तिकडे कित्येक महिने, नव्हे वर्षेंहि लागतील. त्याचा पत्तासुद्धा रहाणार नाहीं, अशी पण तजवीज करतां येईल; व मग असहाय मनो-रमा--, अशा दुष्ट विचारांच्या ताब्यांत कृष्णमूर्ति सांपडला होता आणि दिवसेंदिवस ते विचार दाबणें त्याला अशक्य होऊं लागलें. बुद्धदेवाच्या सेवेंत व मठसंबंधीं कृत्यांत नेहमीं त्या रमणीचा संबंध येई. तिच्या सान्नि-ध्यानें कृष्णमूर्तीची पापवासना प्रबलतर होत गेली. त्यानें लवकरच एक लांबलचक पत्र मगधास पाठविलें. त्या पत्राचा कांहीं भाग पुढें दिला आहे:—

' सूर्यमणि रात्रंदिवस पुस्तकांत गढलेला असतो. तो मठांतील शिस्ती-कडे अगर मठाच्या लौकिकाकडे मुळींच लक्ष देत नाहीं. तो नेहमीं पर-धर्मीयांचीं पुस्तकें वाचतो. त्याचे मित्र ब्राह्मण वगैरे लोकच आहेत. भोळ्या बौद्धांपुढें उपदेश करीत असतां तो खोट्या धर्माचींच तत्वें प्रति-पादन करतो. या दूरच्या प्रदेशांत महत् श्रमानें स्थापन केलेला विहार

तो लवकरच ब्राह्मणधर्मीयांचें मंदिर बनवील. आणि दक्षिण देशांतील ही बौद्धधर्माची भयंकर हानि होईल. मग बौद्धधर्माच्या पुनरुज्जीवनाची आशाहि इकडे करावयास नको. त्याच्या बहिणीनें इहलोकींच्या सुखाचा त्याग नुसता मुखानें मात्र केला आहे. विलासिनी रमणींचे विलासहि तिच्या चैनीपुढें फिके होत. ती नेहमीं दुर्गपतीच्या घरीं जाते. तेथें तिच्या सौंदर्याची फार प्रशंसा करतात. दुर्गपति श्रीमान् आहे. त्याचा मुलगा युद्धास गेला आहे. तो परत आल्यावर त्याच्याशीं मनोरमेचा विवाह होणार अशी दाट वदंता गांवांत आहे. '

त्या पत्राच्या अखेरीस, सूर्यमणीस बहिष्कार घालून त्याला एकटेंच मगधास बोलवावें, जरूर वाटल्यास शासनपीठानें त्याची चौकशी करावी, मनोरमेला वर्षाकालाचीं संकटें सहन होणार नाहींत. म्हणून तिचा भाऊ परत येईपर्यंत तिला येथेंच असूं द्यावें. विहाराबाहेर जाण्याची मनाई केल्यास कदाचित् तिचें वर्तन सुधरेलही, अशा सूचना केल्या होत्या. ह्यांत कृष्णमूर्तीचा कांहीं दुष्ट हेतु असेल असा कोणालाहि संशय येण्याचें कारण नव्हतें. पत्राची मधुमय भाषा पाहून, एक हुषार बुद्धिमान् भिक्षु खोट्या धर्माकडे वळला आहे व त्याला मठपति महंताकडून उपदेश होणें जरूर आहे; तेव्हां सूर्यमणीस बोलाविलें पाहिजे असेंच मठाधिकाऱ्यांना वाटलें.

मगधाहून रामगडास बातमी पाठविणें सोपें नव्हतें. मुद्दाम जासूद पाठवावे लागत. ते अनेक श्रमसंकटें सोसून पोंचत असत. कधीं कधीं व्यापाऱ्यांचे तांडे जात त्यांजबरोबर पत्रें पाठवीत असत. असा एक तांडा मगधांतून आला त्याबरोबर कृष्णमूर्तीचें इच्छित आज्ञापत्र आलें. कृष्णमूर्तीच्या इच्छेप्रमाणेंच त्या आज्ञापत्रांत मजकूर होता. कृष्णमूर्तीला " सूर्यमणीस बहिष्कार घालण्याचा व त्याला मगधांत पाठविण्याचा अधिकार दिला होता. आज्ञापत्रासोबत, शासनपीठासमोर येऊन हजर व्हावें अशी सूर्यमणीस एक अनुशासनपत्रिका होती. आज्ञापत्रांत कृष्णमूर्तीची मठाच्या कल्याणाची कळकळ, त्याची दक्षता. धार्मिक बाबनींतला त्याचा जागरूकपणा, इत्यादींबद्दल त्याची प्रशंसा केली होती. मठपति महंतांची आज्ञा होईपर्यंत मनोरमेवर सक्त

नजर ठेवावी, तिला विहाराबाहेर जाऊं देऊं नये अशी कृष्णमूर्तीस आज्ञा होती. हें काम बजावण्यास कृष्णमूर्तीनें थोडाहि उशीर लावला नाहीं. दुसऱ्या दिवशीं पौर्णिमा होती. पौर्णिमेचें उपदेशाचें काम संपल्यावर त्यानें सर्वांसमक्ष सूर्यमणीस बहिष्कार घातला. मठपतींचें कोणतेंहि काम त्यानें करूं नये अशी कृष्णमूर्तीनें मनाई केली व त्यास शासनपीठाची आज्ञापत्रिका दिली.

त्या दिवशीं सूर्यमणि मंदिरांतून लवकर परतला, ह्मणून मनोरमेनें मुलांना सुट्टी दिली. बुद्धमूर्तीच्या चरणांशीं ती आज्ञापत्रिका ठेवून ध्यानस्थ बसलेल्या आपल्या भावास तिनें पाहिलें. ह्मणून खोलींत प्रवेश न करतां ती बाहेरच थांबली, तों तिच्या कानीं सूर्यमणीचे पुढील शब्द पडले.

" भगवन् ! तुला वाटल्यास या संकटांतून मला पार कर. कदाचित् मला छळतील, माझे हाल करतील ह्मणून, बुद्धदेवा ! तें सर्व सहन करण्यास मला शक्ति दे. मीं तुझ्या सेवेंत मुळींच दुर्लक्ष केलें नाहीं. देवा ! मी अज्ञ आहें. माझ्या हातून पदोपदीं चुका घडल्या असतील. मला तुझ्या सहाय्याची जरूर आहे. मजवर कृपा कर. मी तुला शरण आहें. मला स्वतःची काळजी मुळींच वाटत नाहीं. तुजवर माझा पूर्ण विश्वास आहे. तुला योग्य दिसेल तेंच तूं करशील. "

नतमस्तक सूर्यमणीनें बुद्धमूर्तीच्या चरणांना अश्रूंनीं स्नान घातलें. त्याची मुद्रा पूर्ववत् शांत झाली. कांहीं वेळानें तो बाहेर आला. प्रकोष्ठद्वाराशींच त्याला मनोरमा भेटली. तिचें अंतःकरण विरघळून गेलें होतें. " भाऊ ! तूं हें कसें सहन करशील ? तूं असा काय अपराध केलास कीं, त्यानें तुजवर असा प्रसंग आणावा. " इतकेंच ती बोलूं शकली.

" मनोरमे ! " तो शांत चित्तानें ह्मणाला, " मी हें सर्व सहन करीन. अगे ! भगवान् बुद्धानें नाहीं कां संकटें सोसलीं ? मी कशालाहि भीत नाहीं व तूं पण भिऊं नये. बुद्धदेवाच्या सेवकांनीं संकटें सोसलींच पाहिजेत. त्यांनीं संकटांना भितां कामा नये. धीर धर. "

" भाऊ ! मी अबला आहें व अबलांना पुरुषांइतकें धैर्य नसलें तरी बुद्धदेवाची इच्छा असल्यास मीसुद्धां हें सहन करीन. पण कृष्णमूर्तीची कृति मला कधीं सहन होणार नाहीं. आज्ञापत्रिका खरी आहे काय ? " तिनें प्रश्न केला.

"होय; ती जशी असावी तशी आहे." खोलींतून आज्ञापत्रिका आणून देऊन तो ह्मणाला, "ती अगदीं बरोबर आहे इतकेंच नव्हे तर तिची भाषासुद्धां फार सौम्य आहे. वाचून पहा ह्मणजे तुलाहि कळून येईल. त्यांत तुला संकट तें कसचें वाटतें ? उलट, तूं आनंद मानावास कीं, आपल्या बंधूची कामगिरी जगास स्पष्ट दिसेल. तूं स्वस्थ ऐस. मला फार दिवस लागावयाचे नाहींत."

"भाऊ ! तूं एकटाच जाणार ह्मणूं नको; मलाहि घेऊन चल. येथें त्या दुष्टाच्या संगतींत मी एकटी एक क्षणाहि रहाणार नाहीं." मनोरमा भीतियुक्त अंतःकरणानें ह्मणाली.

"तुला बोलावलें असतें तर आपण दोघें गेलों असतों. पण नुकत्याच सुरू झालेल्या प्रावृट्काळाचा विचार करूनच तुला बोलावलें नसावें. दुर्गपति व दुसरी मंडळी आहेतच तुझें रक्षण करावयाला. तुला त्रास देण्याचें धैर्य त्यास होणार नाहीं." सूर्यमणि बोलला.

"भाऊ ! होय, कदाचित् मला आपली काल्पनिक भीति वाटत असेल. तुझी व बुद्धदेवाची इच्छा असली तर मी रहाण्याचा प्रयत्न करीन." मनोरमा स्फुंदत ह्मणाली.

पण मनोरमेचें समाधान झालें नाहीं. तिला कृष्णमूर्तीची भीति वाटत होती. एरवीं तिनें सूर्यमणीला मोठ्या आनंदानें जाऊं दिलें असतें आणि त्याची कीर्ति होण्याचा समय आला ह्मणून आनंद मानला असता.

प्रकरण ७ वें.

छळ.

सायंकाळीं सूर्यमणि मंदिरांत गेला नाहीं. मनोरमा नित्याप्रमाणें गेली होती. पौर्णिमा असल्यानें आज मंदिराचे सर्व भाग प्रदीपित केले होते. आज कृष्णमूर्तीनें उपदेश केला, आणि इतरांबरोबर तोहि मंदिरांतून निघून गेला. बुद्धमंदिराच्या गाभाऱ्यांत दिवा असूं देण्याबद्दल मनोरमेनें सांगितल्यावरून नोकर बाकीचे दिवे मालवून निघून गेला. मंदिरांत

सर्वत्र शांतता होती. मनोरमेचा आवाज फार मधुर होता. मूर्तीकडे पूर्ण लक्ष लावून ती गाऊं लागली. श्रमामुळें तिच्या कपाळावर घर्मबिंदु चमकूं लागले. गायन आटोपल्यावर ती बोलूं लागली, " भगवन् ! भगधांत ज्या-प्रमाणें मोकळ्या मनानें मी तुझी प्रार्थना करीत असे तशीच आजहि केली. तुझ्याशिवाय आमचा त्राता कोण आहे ? "

आतां तिचे ओंठ हळुहळूं हलूं लागले. ती हात जोडून उभी होती. तिच्यावर दिव्याचा स्वच्छ प्रकाश पडला होता. स्तुति संपल्यावर नमस्कार करून विहारांत जाण्याकरतां ती मागें वळली तों कृष्णमूर्ति तिच्या दृष्टीस पडला. त्याला पाहून तिचें सर्व धैर्य गळालें. तिच्या हातांतला वीणा खालीं पडला.

" सुंदरी ! " कृष्णमूर्ति उद्गारला, " तुला व्यत्यय आला असेल तर क्षमा कर. माझ्या प्रकोष्ठांत मी एकटा बसलों असतां, तुझा सुमधुर आवाज ऐकूं आला. तूं मोकळ्या मनानें झटलेलीं सर्व गाणीं मीं दाराशीं उभें राहून ऐकलीं. तूं फक्त मुलांसमोर व तुझ्या भावासमक्ष गातेस. मी आलों झणजेच तूं कां बरें स्तब्ध होतेस ? मी असा हतभागी कां ? मलाहि थोडेंसें गातां येतें. लोक मला गायनपटु झणतात. आपण दोघें मिळून झणाव-यास हरकत कोणती ? "

तो दरवाजांत उभा होता. मनोरमा नम्र स्वरानें झणाली, " महाराज ! मला जाऊंद्या. "

कृष्णमूर्तीनें भिक्षुवेषाचा त्याग करून सरदाराचा पोषाख केला होता. त्यानें झटलें, " सुंदरी ! मजवर अशी क्रुद्ध होऊं नको. तुझा बंधु परत येईपर्यंत येथें तूं व मी दोघेंच आहोंत. तुला माहीत आहे कीं, तुला ताब्यांत ठेवण्याचा अधिकार मला आहे. पण अशा चारुगात्रीवर मी पहारा ठेवीन काय ? तूं मजकडे दयार्द्रदृष्टीनें पहा. तुझा बंधु परत येईपर्यंत आपण दोघे सुखानें काळ घालवूं. "

" कृष्णमूर्ति ! " मनोरमेनें आतुरतेनें प्रश्न केला, " भाऊ परत येईल काय ? आज्ञापत्रिका खरी आहे ना ? त्याच्या जीवास कांहीं घात होणार नाहीं ना ? तुझी परमपवित्र बुद्धदेवासमोर उभे आहां. मला खरें सांगा. "

" मनोरमे ! हें सर्व तुझ्या हातीं आहे. " कृष्णमूर्तीनें उत्तर दिलें.

बुद्धदेवास विनवीत होती तशाच करुणार्णव मुद्रेनें ती कृष्णमूर्तीकडे पाहूं लागली. तेव्हां क्षणमात्र ती आपल्या ह्मणण्यास कबूल झाली असें त्यास वाटलें. तो पुन: ह्मणाला, " मनोरमे ! मी तुला फिरून सांगतों कीं, हें सर्व तुझ्यावर अवलंबून आहे. सूर्यमाणि खात्रीनें परत येईल. त्यास मुळींच कष्ट होणार नाहींत. जर तूं— "

मनोरमेनें सोत्कंठ होऊन मध्येंच प्रश्न केला, ' बोला, तुमचें बौद्ध भिक्षूचें असें वचन मला द्या ह्मणजे मी तुमच्यासाठीं रात्रंदिवस बुद्धदेवाची प्रार्थना करीन. '

' भिक्षु ! ' कृष्णमूर्ति तिरस्कारानें उद्गारला. तो बोलला, ' मला वाटलें कीं, मी भिक्षु होतों आणि इच्छेस आलें कीं, मी शिलेदार बनतों. मनोरमे ! मजकडे पहा. मजवर कृपा कर. मगधाच्या शासनपीठाकडून होणाऱ्या छळांतून मी तुझ्या भावाला वांचवीन. पण जर तूं माझें ऐकत नसशील तर तुझा भाऊ तुला अंतरला ह्मणून समज. ' तुच्छतादर्शक विकट हास्य करून तो पुन: ह्मणाला, " कमलनयने ! तूं मला निर्दय, पाषाणहृदयी समजूं नको. ज्या बुद्धदेवाच्या मूर्तीस तूं सहायार्थ विनवीत होतीस त्याच या मूर्तीसमक्ष मी तुझी विनवणी करतों. मी तुझ्या अर्ध्या वचनांत वागेन. तुला येथें रहाण्याची इच्छा नसेल तर आपण लांब दुसरीकडे जाऊं. लंका, चीन, पारसिकांचा देश किंवा आणखी दुसरा देश आपण गांठूं व तेथें आनंदानें राहूं. चल, मनोरमे ! तूं अद्याप तरुण आहेस, सुंदर आहेस. एखाद्या राज्ञीहूनहि जास्त तुझी योग्यता आहे. चल, ह्या अफाट जगांत आपण कोठेंहि मजेंत काळ घालवूं. "

तो बोलत असतां मनोरमा एखाद्या क्रुद्ध देवतेप्रमाणें दिसूं लागली. इतकावेळ तिला बोलण्यास संधिच मिळाली नाहीं. आतां तर तिचा संताप अनिवार झाला. तिच्या नेत्रांतून अग्निकण बाहेर पडतात असें वाटूं लागलें पण त्यामुळें ती विशेषच सुंदर दिसूं लागली, ' नराधमा ! व्यर्थ रे भिक्षु

झालास! बुद्धदेवाचाहि अपमान केलास! त्याच्या अज्ञान बालिकेस तूं फसवूं पहातोस! तूं भिक्षु नाहींस असें सुद्धां म्हणालास. तुला बुद्धाची शपथ आहे. कृष्णमूर्ति! मला जाऊं दे. मी एक गरीब अबला आहें, तरी मी अशीच मगधांत गेल्यास तूं ज्यांची खात्री बाळगतोस त्यांना तुझीं कृत्यें समजतील. मला सुळावर चढविलें तरी मी मरेपर्यंत तुझीं कृत्यें जगास सांगेन.

दयार्द्रतेचा खोटा आव आणून कृष्णमूर्ति म्हणाला, "अरेरे! मग तुझे अमानुष हाल होतील. तुझे अवयव मांगाच्या दृष्टीस पडतील. छे, मनोहारिणि! ह्यापेक्षां त्यांचा चांगला उपयोग आहे. काय? तूं सांगणार म्हणतेस? जा, सांग; कीं तुझा भाऊ मेलाच. नाहीं तर माझें ऐक. माझी हो. मी तुझ्या भावाला वांचवितों." तो छातीवर हात ठेवून ताठ उभा राहिला.

भीतीमुळें मनोरमेला बोलवेना. ती जाऊं लागली असतां त्यानें हात पसरून तिला प्रतिबंध केला. त्यानें बळेंच तिला आपल्या हृदयाशीं धरलें. तो म्हणाला, "मनोरमे!"—पण सर्व विहारांत ऐकूं जाईल अशी एक कर्कश किंकाळी तिच्या मुखांतून निघाली. ती गाभाऱ्याच्या आंतल्या पायऱ्यावर बेशुद्ध होऊन पडली.

"काय मूर्खपणा मीं केला! माझें इङ्गत त्याला कळेल; आतां.. त्यानें किंवा मीं ह्या जगांतून नाहींसें झालेंच पाहिजे; अन्य मार्ग नाहीं." असें पुटपुटत कृष्णमूर्ति बाहेर पडला.

गायनाचा आवाज बंद झाला तरी अद्याप मनोरमा कां येत नाहीं म्हणून सूर्यमणि आश्चर्य करीत होता. इतक्यांत त्यास किंकाळी ऐकूं आली. "हा मनोरमेचाच आवाज! काय बरें असावें?" असें म्हणून तो निघाला. त्यानें तिला हाका मारल्या पण उत्तर मिळालें नाहीं. मंदिरांत दिव्याचा प्रकाश होता. गाभाऱ्यांत पायऱ्यावर आपली भगिनी मूर्छित पडलेली त्यास दिसली. त्यानें तिला हलकेंच उचललें तेव्हां तिच्या मुखांतून भीतिपूर्ण अस्पष्ट शब्दोच्चार बाहेर पडले, त्यांत कृष्णमूर्तीचें नांव होतें. "असें काय! हें कृत्य त्या दुष्टाचें तर एकूण!" तो स्वतःशीं म्हणाला.

त्यानें मनोरमेला प्रकोष्ठांत नलें. ससंज्ञ झालेल्या मनोरमेनें त्याचा हात धरून म्हटलें, " भाऊ ! तूं प्रतिशोध घेऊं नको. त्यानें बुद्धदेवाचा अपमान केला आहे. तोच त्यास शिक्षा करील. त्यानें माझा छळ केला; या कर्माचें प्रायश्चित्त त्याला भोगावें लागेल. माझ्या पावित्र्याकरतां वेळ आहे तोंच आपण पळून जाऊं. "

पण कृष्णमूर्तीनें मनोरमेचा अपमान केल्यानें सूर्यमणीचा क्रोधातिरेक झाला होता. आपला हात सोडवून तो कांहीं न बोलतां बाहेर पडला. त्यानें कृष्णमूर्तीचा पुष्कळ शोध केला पण तो त्याला आढळला नाहीं. पुन: त्याला मनोरमेची आठवण झाली. ती विहारांत एकटीच आहे हें आतां त्याच्या लक्षांत येऊन तो परतला. भावाचा आवाज ऐकतांक्षणीं मनोरमा बाहेर येऊन त्यास विचारूं लागली, " भाऊ ! तूं त्याला मारलें नाहींस ना ? बोल; स्तब्ध कां ? त्याला मारलें नाहीं असें तुझ्या मुखानें मला एकदा ऐकूं दे. "

" तो मला सांपडलाच नाहीं. मघां मी विकारवश झालों होतों पण तो आढळला नाहीं याबद्दल मला आतां समाधान वाटतें. कदाचित् मजकडून भिक्षुवराचा भंग झाला असता. आज्ञापत्रिकेप्रमाणें मी उद्यां निघालों म्हणजे तुला कोण संभाळील ? दुर्गपतीच्या घरीं तुला रहातां येणार नाहीं. लोक उगाच निंदा करतील, नसते संशय घेतील; आणि तो दुष्ट त्यावर मोठेंच प्रकरण रचील. आज्ञापत्रिका आली नसती तर देवनाभ म्हणतो त्याप्रमाणें केलें असतें. पण अनुशासनाचा भंग माझ्यानें करवणार नाहीं. "

तीं दोघें बराच वेळ स्तब्ध राहिलीं. शेवटीं मनोरमा म्हणाली, " आपण दुर्गपतीकडे जाऊं व त्यांचा सल्ला विचारूं. ते येथील सत्ताधीश आहेत; कदाचित् ते आपणां दोघांसहि मगधास पाठवूं शकतील. "

देवनाभास आपले हस्तलिखित ग्रंथ नीट ठेवण्यास सांगून तीं बंधुभगिनी किल्ल्यावर गेलीं. दुर्गपतीनें प्रथमच सूर्यमणीस विचारलें, " सूर्यमणि ! तुमचे नवीन मठपति व तुम्ही या दोघांमध्यें कांहीं तंटाभांडणें आहेत म्हणतात हें काय बरें ? तो नवीन आलेला भिक्षु एखाद्या शांत उपदेशकाप्रमाणें असावयाऐवजीं जणूं एक

सरळमार्गीच आहेसा वाटतो. माझ्याशीं मोकळ्या मनानें व मित्राजवळ बोलाल तसें बोला. मी शक्य ती मदत तुह्मांस करीन. ”

मगधाचें आज्ञापत्र कसें आलें, त्याचा भंग कां करतां येत नाहीं, मनोरमेशीं त्या दुष्टानें कसें वर्तन केलें, व ह्मणून आपण कां आलों इत्यादि हकीकत सूर्यमणीनें सांगितली. दुर्गपति विहाराच्या कारभारांत लक्ष देत नसे. पूर्वी सर्व सुरळीत चालत होतें, पण आतां तें पारडें फिरलें हें त्यास दिसून आलें. दुर्गपति मगधास एकदां विजयपूरचा वकील ह्मणून गेला तेव्हां काहीं दिवस होतां तेव्हां तो एकवेळ शासनपीठाचें काम पहा-ण्यास गेला होता. सूर्यमणीस जाऊं नको ह्मणणें शुद्ध वेडेपणा होय हें तो जाणून होता. मुख्य अडचण काय ती मनोरमेची. दुर्गपतीनें ह्मटलें, “ आह्मी सर्व तिला चाहतों. पण ती फार रूपवती आहे. माझा मुलगा लवकरच परत येईल. त्याच्या दृष्टीस ती पडावी असें मला वाटत नाहीं. पण मी आंत जाऊन येतों. त्यांचें काय ह्मणणें आहे तें पाहूं. ”

आपण स्वतः अपराधी ह्मणून जात असतां दुसऱ्यावर आरोप कसा करावयाचा ? मुख्य पीठीं आपल्यास कोणी सहायकर्ता नाहीं, मनोरमेला आज्ञापत्रिकेमुळें नेतां येत नाहीं आणि दुर्गपतीनें काढलेल्या शंकेमुळें येथें ठेवतां येत नाहीं. आतां करावें तरी काय ? अशा विचा-रांनीं सूर्यमणीची चित्तवृत्ति गोंधळून गेली.

थोड्या वेळानें दुर्गपति परत येऊन ह्मणाला, ‘ सूर्यमणि ! त्यांना कोणालाच कांहीं उमजत नाहीं. मला एक युक्ति सुचली आहे; तुह्मी तिला हरकत घेऊं नये. मी तुह्मां दोघांना राजकैदी करतों व— ’

सूर्यमणि आवेशानें उठून ह्मणाला, “ काय राजकैदी ? कोणच्या अपराधाबद्दल ? तुह्मांला माहीत नाहीं कां कीं, महान् शक्तिशाली मगध-राज हें कधीं सहन करणार नाहीं. ”

‘ सूर्यमणि ! ’ दुर्गपति हंसून ह्मणाला, ‘ तुमचा अपमान करावा असा उद्देश यांत नाहीं. मगधाधिपाची शक्ति आह्मी जाणून आहों. आजच सकाळीं दरबारकडून खुद्द राजमातेच्या हातचा खलिता आला आहे. राजा राजशेखराविरुद्ध कुमार चंद्रशेखरानें बंड उभारलें आहे. माजी प्रधान सुमत्सेन बंडाचा चालक आहे. त्यानें मगधांतून हत्यारें व लोक आण-

विले आहेत. येथल्या विहाराशीं बंडखोरांचा कांहीं व्यवहार आहे अशा बळ-कट संशयावरून विहारावर नजर ठेवण्याची आज्ञा झाली आहे. ' आपणास या गोष्टीची कांहीं माहिती नाहीं व ह्यांत आपला अल्पहि संबंध नाहीं असें सूर्यमणि सांगणार तोंच दुर्गपति पुढें ह्मणाला, " थांबा, मी काय सांगतों तें प्रथम ऐका. तुह्मी एखाद्या अर्भकाप्रमाणे या गोष्टीविषयीं अजाण आहां हें मला माहीत आहे. पण तो तुमचा दुसरा मठपति तसा नसावा ह्मणून मी त्याच्यावर नजर ठेवणार आहे. राज्ञीमातेच्या आज्ञेचा फायदा घेऊन, तुह्मांला अनुशासनाप्रमाणें वागतां येणार नाहीं अशीच तजवीज मी करतों. मनोरमेची व तुमची ताटातूट होणार नाहीं. तुह्मी अतःपर स्वतंत्र नाहीं व बरेच महिने कदाचित् असेच ग्हाल. तुमचा योग्य मान ठेव-ण्यांत येईल व सगळा खर्च दरबारचा असेल तुह्मांस वेळ न देतां किंवा न विचारतां जलदुर्गास मी तुमची रवानगी करतों. जलदुर्गच्या किल्लेदा-रास मी खलिता देईन. माझा एक जुना मित्र तेथें आहे त्यासहि एक पत्र देईन. तो मनःपूर्वक तुमचें स्वागत करील. वाटल्यास तुह्मी त्याजजवळ रहा. "

दुर्गपतीस ' नाहीं होय ' ह्मणण्याचा उपयोग राहिला नव्हता. दुर्ग-पति पुनः ह्मणाला, " आमची भाग्यशाली राज्ञीमाता तुह्मांस विजय-पुरास बोलावील तर मग भीति कशी ती मुळींच नको. मीं काय केलें तें व तुमची हकीकत लिहून आजच दरबारास थैली पाठवीन. आतां इतकें ध्यानांत ठेवा कीं, मी तुह्मांस पाठवीत आहें; तुह्मी स्वतः जात नाहीं. तुह्मी मुखत्यार नाहीं. "

पहाटेस दुर्गस्वामिनीनें मनोरमेच्या अंगावर बळेंच घातलेली शाल पांघरून मनोरमा व सूर्यमणि मार्गस्थ झालीं.

प्रकरण ६ वें

किल्लेदार नीलवर्ण.

सेनापति कांतिचंद्रानें कुमार चंद्रशेखराचे सर्व मदतगार पळवून लावले. माजी प्रधान द्युमत्सेन वेळ येईल तसा राज्याचा आधारस्तंभ किंवा राज्यघातकी, पण जो अत्यंत मुत्सद्दी असे शत्रुसुद्धां कबूल करीत, तो एका चकमकींत ठार झाला. राज्यद्रोही मनुष्याला कसें प्रायश्चित्त मिळतें हें सर्वलोकांस कळावें ह्मणून त्याचें शिर विजयपुरास वेशीसमोर एका सुळावर रोवून ठेवलें होतें. अगदीं सफल होतोसा दिसलेला बेत बंडखोरांपैकीं कांहीं मेल्यानें व कांहीं पळून गेल्यानें पूर्ण ढासळला. कुमार चंद्रशेखरास कैद केल्यावर एका दूरच्या किल्ल्यावर बंदोबस्तानें पण सन्मानानें ठेवण्यांत आलें. राजा समरभूमीवर होता ह्मणून राज्ञी-माता चंद्रावती राज्याचा अंतर्गत कारभार चालवीत होती. राजा राजशे-खर लहान असतांना तिनें मोठ्या कुशलतेनें अनेक संकटांतून राज्य-नौका सुरक्षित पार पाडली होती.

जयसेनास जलदुर्गास येऊन एक महिना झाला होता.

जलदुर्ग किल्ल्याच्या पूर्व बाजूस थोडेसें मैदान होतें तेथें जलदुर्ग गांव बसला होता. किल्लेदाराचा वाडा फार मोठा नव्हता. नीलवर्ण व जयसेन ह्यावेळीं बसले होते ती दरबारकचेरी होय. सृष्टि-सौंदर्य पहाणारांस जलदुर्ग चांगलें स्थल होतें. पण नीलवर्ण ह्या बाबतींत अरासिक होता. नीलवर्णाचा स्वभाव अतिशय द्रुढ होता. त्याचे वडील विजयपूरचे एक प्रसिद्ध सरदार होते. जागा रिकामी होतांच वडिलांना जबाबदार ठेवून दरबारनें त्याला जलदुर्गास नेमलें. जलदुर्गास येऊन नीलवर्णास दोन वर्षे झालीं होतीं. त्यानें पश्चात्तापपूर्ण अशीं बरींच पत्रें वडिलांस पाठविलीं. दरबारासहि एक दोन अर्ज केले. पण कुमार विजयी झाला असता तर नीलवर्ण त्यास मिळणार होता असा संशय आल्यावरून दरबारनें त्याच्या अर्जाकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं.

जलदुर्गास सृष्टि सौंदर्य उत्तम होतें. श्रीकृष्णेचें विशाल पात्र आपली

नयनमनोहर शोभा दर्शवीत होतें. किल्ल्याच्या वरच्या बाजूस कृष्णेचे दोन प्रवाह होऊन एक उत्तरेकडून व दुसरा किल्ल्याच्या दक्षिणेकडून वहात होता. उत्तरप्रवाह शांत होता. त्यांत खडक नव्हते. याच प्रवाहांतून किसन जयसेनास घेऊन आला होता. दक्षिणप्रवाह प्रस्तरमय होता. ते दोन्ही प्रवाह किल्ल्याच्या खालच्या बाजूस पुनः मीळून पावले होते. त्यामुळें जलदुर्ग एक बेटच बनला होता. त्यास जलदुर्ग नांव यथार्थ शोभत होतें. ते दोघे बंधु बसले होते तेथून उत्तम प्रकृतिसौंदर्य दिसत होतें. पश्चिमदिशेस आपण प्रथम पाहिला तसा नव्हे तरी अगदींच कमी न झालेला धबधबा आपली मौज दाखवीत होता. भगवान् दिवाकर क्षितिजाखालीं असल्यामुळें पूर्वदिशा आरक्त दिसत होती. क्षितिजाजवळचे नानाकृति ढग सुवर्णवलयांनीं वेष्टित झालेले दिसत होते. वर स्वच्छ नीलवर्ण व्योमप्रदेश दृग्गोचर होत होता. दक्षिण व उत्तर दिशांना असलेला मेघसमूह केव्हां पीतवर्णाचा तर लागलींच आरक्तवर्ण व इतक्यांत कृष्णस्वरूपही दिसत होता. श्रीकृष्णेचें सलिल अरुणप्रकाशानें उज्ज्वल झालें होतें. तिचा प्रवाह पूर्वदिशेस दूर अंतरावर असणाऱ्या टेंकड्यांत अंतर्धान पावत होता. अल्पावकाशांत सूर्यबिंब वर आलें. त्याचें किरणें सर्व वस्तूंवर पडल्यानें सर्व सुवर्णमय भासूं लागलें. दूरच्या टेंकड्यावर व पलीकडे असलेल्या पर्वतराजींवर सूर्यरश्मि पडून शोभा दिसूं लागली. सर्वत्र सुवर्णधारा स्रवतात असें वाटूं लागलें. इतक्यांत दिनमणि मेघपटलांनीं आच्छादित होऊन दिसेनासा झाला. सर्वत्र उदासीनता पसरली.

जयसेनानें प्रश्न केला, ‘ नीलवर्ण ! असे चमत्कार येथें कितीवेळां दिसून येतात ? ’

“ जयसेन ! दररोज असा देखावा दिसत असला तरी मी तिकडे लक्ष देईन किंवा तो पाहीन असें तुला वाटतें काय ? ” नीलवर्णानें उत्तर दिलें, “ जर तूं मजप्रमाणें येथें दोन वर्षें असतास तर वर्षांतून चार महिने राक्षसाप्रमाणें ओरडून भिवविणाऱ्या त्या धबधब्याला, त्या भेसूर खडकांना, खळखळाट करणाऱ्या पाण्याला, फार काय येथल्या प्रत्येक वस्तूला तूं शापदग्ध करूं इच्छिलें असतेस ! यमलोकांतसुद्धां

अशी शिक्षा नसेल. जयसेन ! मजवर तुझें कांहीं प्रेम असेल तर विजयपुरास गेल्यावर मजबद्दल खटपट कर. ”

“ होय, मी जरूर खटपट करीन. पण नीलवर्ण ! येथें तुझा वेळ तरी कसा जातो ? ” जयसेनानें विचारलें.

“ ऐक, येथें कोणी सुंदर स्त्रिया नाहींत तर मी त्यांच्यांत गुंग होईन. कोणी गायिका किंवा नर्तकी नाहींत. पलीकडे रामगडास आहेत. पण मी त्यांना जाऊं देणार नाहीं या भीतीनें त्या येतच नाहींत. देवाशपथ ! येथें एकहि सुंदरी माझ्या दृष्टीस पडत नाहीं. केव्हां केव्हां यात्रेला आलेल्या तमासगिरांचीं गाणीं ऐकण्यास मी जातों. पण त्यांत काय अर्थ ! त्या खालच्या शिवालयांतल्या म्हाताऱ्याची नात मात्र फार सुंदर आहे अं ! ती यौवनेकालीं अप्सरेलाहि लाजवील ! तिच्या आजाकडे मी जातों तेव्हां ती न थांबतां विजेप्रमाणें तेथून नाहींशी होते. पण, जयसेन ! तूं तिला पाहिलें असशीलच. ”

“ मला त्या प्रसंगाचें विशेष स्मरण नाहीं. ” जयसेनानें उत्तर दिलें.

नीलवर्णानें आपली हकीकत पुढें चालविली. तो म्हणाला, “ उन्हाळ्यांत मी सरबतें पितों, कधीं वैद्यराजाबरोबर द्यूतक्रीडा करतों, कधीं जुन्या कथा, पुराणें, कादंबऱ्या वाचतों; पण त्यांत सुंदर स्त्रियांची वर्णिलेली सिंहकटी, कमलपत्राशीं स्पर्धा करणारे नेत्र, तोंडल्याप्रमाणें आरक्त ओष्ठ, केतकीवर्ण इत्यादि वर्णन वाचलें म्हणजे मला त्रास येऊन मी तीं पुस्तकें टाकून देतों. कारण, तसलें वर्णन येथें कोठेंच प्रत्ययास येत नाहीं. कधीं मी रामगडास दुर्गपतीकडे जातों. त्यांना एक मुलगी आहे. ती सुंदर आहे व तिजबरोबर आंदण म्हणून बरेंचसें डबोलें मिळेल म्हणतात. पण ती मला कधीं एकटी भेटतच नाहीं. रामगडास बरेच सुंदर प्राणी आहेत, पण त्यांना येथें बोलावून काय करूं ? त्यांना काय हे राक्षसी खडक व सैतानी पाणी पहावयास बोलावूं ? आणि ती मंडळी पण येथें येण्याची इच्छा करीत नाहींत म्हणून मीच केव्हां केव्हां तेथें जातों. ”

नीलवर्णाचा हा आयुःक्रम ऐकून जयसेनास हंसूं आल्याविना राहिलें नाहीं. त्याची विचारसरणी पाहून जयसेनाच्या मनांत एकच क्षण, मन

त्या निर्दोष बालिकेबद्दल चिंता उद्भवली. पुढें एकदा त्यानें किसनला ही हकीकत सांगून ठेवली.

थोड्या वेळानें नीलवर्ण ह्मणाला, ' बरें, तें असो. तूं चंद्रकेतूला कसें मारलेंस. ' तो कोठें भेटला हें सांग पाहूं. तूं अजून ती हकीकत मला सांगितली नाहींस. '

" नीलवर्ण ! ती हकीकत आनंदाची आहे असें नव्हे. तुला सांगेन ह्मटलें होतें ह्मणून सांगतों पाहिजे तर. चंद्रकेतु द्रविड होता हें तुला माहीत आहेच. "

" पण तो अस्सल द्रविड नव्हता. मला वाटतें तो आपला असाच होता. " नीलवर्ण मधेंच बोलला.

" होय, पण फार दूरचा. असो; मला माझ्या पथकासह मुख्य सैन्यास जाऊन मिळण्याची राजाज्ञा झाली; त्याप्रमाणें मी निघालों. चार घटका गेल्यावर अरुणोदयाच्या सुमारास समोर एक धुळीचा लोट दिसला व लवकरच आमच्यांत दोन चार बाण येऊन पडले. थोडा अवकाश गेला नाहीं तोंच ते स्वार जवळ आले व त्यांनीं आमच्यावर जोरानें हल्ला केला. मी आश्चर्यचकित झालों, कारण त्या स्वारांचा पोषाख राजसैन्याप्रमाणेंच होता. पळून जाण्यासहि अवसर नव्हता. मीं त्यांच्या नायकास आव्हान केलें. पहातों तों तो चंद्रकेतु ! त्याला पाहून मी स्तंभित झालों. इतक्यांत त्यानें माझ्या रक्षकास मारलें व सर्व बळ एकवटून मजवर वार केला. मी जखमी झालों; पण जखमेकडे लक्ष देण्यास मला वेळ नव्हता. मींहि जोरानें वार केला. चंद्रकेतूनें चिलखत धारण केलें नव्हतें. तो मृत होऊन घोड्यावरून खालीं पडला. पण मरतांना त्यानें अशा चमत्कारिक दृष्टीनें मजकडे पाहिलें कीं तेव्हांची त्याची मुद्रा अजून माझ्या डोळ्यांसमोर स्पष्ट दिसते. चंद्रकेतु मारला गेला पण त्याच्याबरोबर असलेल्या क्रांतिकारकांच्या एका वीरानें त्याच्या सैन्याला धीर दिला. त्यांनीं उत्तेजित होऊन युद्ध आरंभलें. चंद्रकेतूस मारल्यावर मी मुर्च्छित झालों ह्मणून किसननें मला युद्धभूमी-पासून कोठें दूर नेलें होतें. त्यामुळें माझे सैनिक गलितधैर्य होऊन पराभव पावले. शत्रूंनीं माझे बहुतेक सैनिक मारले. त्यांनीं अवशिष्ट राहिलेल्यांना

पाठलाग केला. किसननें माझी जखम बांधली व मी संज्ञावान् झाल्यावर मला घेऊन तो इकडे निघाला. कारण, जलदुर्गाखेरीज आश्रयाला दुसरें जवळचें स्थान नव्हतें. मी आलों तेव्हांची स्थिति तुला माहीत आहेच. ”

“ शाबास, जयसेन ! याचें नांव धर्मयुद्ध ! बंडखोर राजसैन्याला नेहमीं असेंच वेषसाम्यतेनें फसवितात. लांबून दोन चार बाण समोरच्या सैन्यांत फेंकण्याची त्यांची नेहमींचीच युक्ति आहे. दुसरे सैनिक त्यांच्याच उद्देशाचे असले तर तेहि त्या बाणांना तसेंच प्रत्युत्तर देतात. पण प्रत्युत्तर न मिळाल्यास ते दुसऱ्या सैन्याला लागलींच ‘ शत्रूचें ’ ह्मणून ओळखतात. ही त्यांची आपसांतील खूण आहे. असो; बंडखोरांचा नायनाट झालाच आहे, तरी तूं विजयपुरास गेल्यावर जपून वाग. कोणत्यावेळीं काय होईल याचा नेम नाहीं. ’ नीलवर्णानें कळकळीचें बाह्य प्रदर्शन करून ह्मटलें.

जयसेनानें उत्तर केलें, ‘ मी त्याला भीत नाहीं. पण मीं द्वेषानें चंद्रकेतूचा खून केला असें ह्मणून कित्येक मजवर कातरतेचा नीच आरोप करतील, ह्याचें वाईट वाटतें. मजबरोबरच्या इसमांपैकीं एकजण तर मेलाच. माझ्याबद्दल साक्ष देण्यास आतां फक्त दोघे राहिले आहेत. ’

‘ पण जयसेन ! तुझी जखम पुरावा आहे ना ? आणि तूं मृतप्राय झाला होतास ह्याबद्दल मी, तो अंधळा वृद्ध व त्याची नात साक्षी आहोंच. ’

‘ होय, तें खरें; तुह्मी येथें आल्यानंतरच्या माझ्या स्थितीचा पुरावा कराल. पण तुह्मी तत्पूर्वींची काय साक्ष देणार ? ’ जयसेनानें प्रश्न केला.

‘ तुझे काका आहेत ना ? बंडखोरांचा नाश केल्यामुळें आज दरबारांत त्यांच्याविरुद्ध कोणी बोलणार नाहीं, व त्यांच्यावर राजाची मर्जी प्रसन्न असेल. ’

“ नीलवर्ण ! मीं किंचित् अन्यायवर्तन केलें असा नुसता संशय काकांना आला तरी ते माझा त्याग करतील ! मला मृत्यूचें भय वाटत नाहीं; पण निष्कारण अपकीर्ति होईल ह्मणून वाईट वाटतें. आणि चंद्रकेतु स्वप्नांत येऊन तूं मरशील असें ओरडतो. ” जयसेन ह्मणाला.

" चंद्रकेतु जिवंतपणींच भूत होता ! पण शिवालयातील ज्ञात्याकडून मी तुला तारीत देवर्वान, त्यायोगानें चंद्रकेतूचेंच भूत काय पण प्रत्यक्ष वेताळदखील तुला धक्का लावण्यास समर्थ होणार नाहीं. आपण उद्यां संध्याकाळीं त्याजकडे जाऊं. तुझ्यानें चलवेलना ? " नीलवर्णानें ह्मटलें.

इतक्यांत एका स्वारानें येऊन किल्लेदार नीलवर्णाला एक लखोटा दिला. तो स्वार रामगडच्या दुर्गपतीकडून आला होता. दुर्गपतीचें पत्र वाचून, नीलवर्णाला फार राग आला. पण करतो काय ? मुकाट्यानें आलेल्या माणसांची व्यवस्था करणें भाग पडलें. तो स्वत:शीं पण मोठ्यानें क्रोधयुक्तस्वरानें ह्मणाला, 'अहाहा ! काय पण आमचा अधिकार ! जसा कांहीं मी कैद्यांचा मेंढपाळच ! दुर्गपतीला काय राजकैदी ठेवण्यास रामगडास जागेचा तोटा पडला होता ? मजकडे पाठविले ते ! आणि कैदी कोण ? तर ह्मणे एक बौद्ध भिक्षु व त्याची भगिनी !' तो विकटहास्य करूं लागला.

जयसेन ह्मणाला, " नीलवर्ण ! अरे ! तसेंच कांहीं कारण असेल. बौद्धांची वस्ति तेथें असल्यानें कदाचित् दुर्गपतीनें त्यांना इकडे पाठविलें असेल. नीलवर्ण ! ते परधर्मी असले तरी तूं त्यांचा धिःकार करूं नयेस. कारण, त्यांनीं स्वत:स ईश्वरसेवेस अर्पण केलं आहे. ते मानवांचीं दुःखें हलकीं करण्याचा प्रयत्न करीत नाहींत कां ? आणि मानववंश हेंहि त्या विश्वव्यापी विराटपुरुषाचेंच एक स्वरूप आहे "

" बरें, बोवा ! चुकलों. मी त्यांना आपली बंधुभगिनी समजतों. " नीलवर्ण पुन: त्रासून ह्मणाला, " हे कसले राजकैदी ! काय ह्मणे त्यांना किल्ल्यांत खुशाल फिरूं द्या; त्यांना सन्मानानें वागवा; त्यांची इच्छा असेल तेथें त्यांस रहाण्याची व्यवस्था करून द्या. "

आलेल्या स्वारानें ते शिवालयांतील वृद्धाकडे राहूं इच्छितात असें सांगितलें. तेव्हां नीलवर्ण पुन: त्रस्तमानस झाला. त्यानें त्यांच्या व्यवस्थेस एक नोकर पाठविला. स्वत: जाण्याची जरूर त्याला वाटली नाहीं.

तो जयसेनास ह्मणाला, ' पहा ! तो भिक्षु किल्ल्यावर रहावयास येतां तर तितकी मजा झाली असती. त्याची बहीण फारच सुंदर आहे

ह्मणतात. मीं तिच्या सौंदर्याविषयींच्या पुष्कळ गोष्टी रामगडास ऐकल्या आहेत. '

जयसेनानें उत्तर केलें, " अरे ! आतांच तूं त्यांना आपली बंधुभगिनी मानलेंस ना ? "

या प्रश्नानें नीलवर्ण गोंधळला. त्यानें ह्मटलें, " हो तर ! नास्तिक माझी बंधुभगिनी ! " पण जयसेन पुन: कांहीं बोलणार असें पाहून तो ह्मणाला, " बरें तर. तं ह्मणतोस तसं कां होईना ? मी तिला आपली भगिनी समजतों आतां तर झालें ना ? "

प्रकरण ७ वें.

देवतेचें दर्शन.

सूर्यमणि व मनोरमा जलदुर्गास आल्यावर त्यांच्या दृष्टीस तो भव्य किल्ला दिसला. गोपाल गांवांतून गुरं घेऊन निघाले होते. बालसूर्यरश्मि वस्तुमात्र सुवर्णावगुंठित भासवीत होते. गांवांतील नारीजन डोक्यावर कलश घेऊन पाणी न्यावयास श्रीकृष्णातीरावर आला होता. आणि ही अपूर्व मंडळी पहावयास कांहीं लोक एकेठिकाणीं जमा झाले होते. सूर्यमणि व मनोरमा ह्यांना एका वृक्षछायेंत बसवून दुर्गपतीचा स्वार नीलवर्णास थैली देण्याला किल्ल्यावर गेला. तेथें घडलेला प्रकार वाचकांना मागच्या प्रकरणांत समजला आहेच.

" येथें जवळच साधु कोठें रहातो ? " स्वार किल्लेदाराकडे गेल्यावर सूर्यमणीनें एका गोपपुत्रास प्रश्न केला. त्या बालगोपानें सूर्यमणीच्या बरोबर जाऊन त्याला शिवालय दाखविलें. हाक मारतांच बालिका लीला बाहेर आली.

" हें तुझ्या वडिलांना दे. " सूर्यमणि पत्र पुढें करून ह्मणाला.

लीलेनें विनयानें उत्तर दिलें, " ते माझे आजोबा आहेत. तुह्मी याल तर मी त्यास तुमचें पत्र वाचून दाखवीन. कारण, ते अंध आहेत. "

पत्र घेऊन स्त्री घरांत गेली व थोड्या वेळांत आजोबास घेऊन येऊन ह्मणाली, ' हे पहा ते बौद्ध उपदेशक सूर्यमणि. '

' या, महाराज ! या. ' वृद्धानें स्वागत केलें, ' आपण दोघे एकाच परमेश्वराचीं लेंकरें आहों. हें घर आपलेंच समजा. तुमचे व माझे मित्र रामगडचे दुर्गपति तुह्मांस थोडे दिवस मजजवळ राहूं द्या ह्मणतात. मला मिळणारी मीठभाकरी मी आपणांस सादर करीन; पण आपली भगिनी कोठें आहे ? '

' त्या पलीकडच्या राईंत ती आहे. पण, आजोबा ! आह्मांला इतका सन्मान नको. आह्मांस आपलीं मुलेंच समजा. ' सूर्यमणीनें नम्रपणें उत्तर केलें.

सूर्यमणि मनोरमेकडे परत गेला तेव्हां स्वार किल्ल्यावरून आला होता. त्यांना शिवालयांत पोंचवून स्वार त्यांचा निरोप घेऊन रामगडास परतला.

लीलेनें प्रेमानें मनोरमेचें स्वागत केलें. मनोरमा आल्याचें समजतांच वृद्ध ह्मणाला, ' ये, मुली ! तुझें कल्याण होवो. मग तूं मला आपल्या देशच्या गोष्टी सांगशील ना ? ' लीलेचा हात तिच्या हातांत देऊन तो ह्मणाला, ' हिला संभाळ; नीट मार्ग दाखीव. लीला मातृहीना आहे. '

" लीला देवी ! तुला व मला दोघींना कोणी नाहीं. आपण दोघी भगिनी होऊं. " मनोरमा ह्मणाली.

" बरें तर, ताई ! " सरलहृदया लीलीनें उत्तर केलें.

लीलेच्या सरलस्वभावानें मनोरमेला अत्यानंद झाला. ती तिला कुरवाळीत ह्मणाली, " आपण दोघी प्रेमानें वागूं व जर आह्मी येथें राहिलों– "

" ताई ! " मनोरमेला अर्धेच थांबवून लीला सद्गदित स्वरानें ह्मणाली, " तुह्मी येथेंच रहा. तुह्मी आल्यानें मला किती आनंद झाला ह्मणून सागूं ! तुह्मीं नकाच जाऊं. "

दुपारीं किल्लेदाराकडून आलेली अन्नसामुग्री पाहून मनोरमा तिला ह्मणाली, " लीले ! आह्मांस इतकें सामान पाठविलें आहे कीं, त्याचें काय करावें हेंच मला सुचत नाहीं. "

" ताई ! उरेल तें तुह्मी भिक्षेकऱ्यांना व गरीब लोकांस वाटीत जा. तुह्मांला दररोज इतकी सामुग्री मिळेल. आमचें राष्ट्र श्रीमंत आहे ! ह्या तुमच्या नित्य व्यवस्थेंत कधींहि अंतर पडणार नाहीं. " लीलीनें साभिमान सांगितलें.

तिसरे प्रहरीं सूर्यमणि किल्ल्यावर गेला. त्या बंधुद्वयाला पाहून त्याचा काय ग्रह झाला हें आह्मी येथें सांगत नाहीं. मात्र दुसऱ्या दिवशी वृद्धाकडे आल्यावर आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग करण्याविषयीं त्यानें जयसेनास अभिवचन दिलें.

रात्रीं बाहेर भौतिक भूतांची प्रचंड क्रीडा चालली होती. आकाश घनाच्छन्न झालें होतें. वायु उग्ररूप धारण करून मनोवेगाची स्पर्धा करीत होता. मेघांच्या गंभीर गर्जना सुरू होत्या, व त्यांतच विजेचा कडकडाट होऊन ती चपला क्षणोक्षणीं चपल नागिणीप्रमाणें क्षणांत पूर्वेस तर क्षणांत उत्तरेस आपलें दिव्य तेज प्रकट करीत होती. त्या प्रकाशांत किल्ल्याची भेसूरता जास्तच भयानक भासत होती आणि मनोरमा निद्रावश होण्यापूर्वी मठांतील नवीन बिऱ्हाडीं आपल्या खोलींत भगवान् बुद्धाची अंतःकरणपूर्वक प्रार्थना करीत होती.

हळूच दरवाजा उघडून कोणी आंत आलेलें तिला समजलें. तिची प्रार्थना आटोपल्यावर लीला तिला ह्मणाली, ' ताई ! मेघगर्जना व विद्युत् ह्यांनीं मी भयभीत झालें. आजोबांना झोंप लागली व मी एकटीच जागी होतें, ह्मणून तुझ्याकडे अशा अवेळीं आलें याची क्षमा कर. '

मनोरमेनें ह्मटलें, ' बाळ लीला ! तुला केव्हांहि येण्यास परवानगी आहे. आपण भगिनी ना ? केव्हांहि संकोच बाळगूं नको. '

मनोरमेजवळ ती बालिका स्वस्थ निजली. पहाटे उठल्यावर ती ह्मणाली, " ताई ! मला सुखकारक स्वप्नें पडत होतीं. स्वर्गीय देवांगना येऊन माझी सेवा करीत होत्या व चहूंबाजूंनीं मजवर पुष्पवर्षाव होत होता. पण याचें कारण काय ? ध्यानांत आलें कां तुझ्या ? मी तुजजवळ निजलें होतें ह्मणून ! "

प्रभात झाल्यावर आजोबांच्या ऐवजीं मनोरमा लीलेसह रोग्यांना पहावयास गांवांत गेली. पंचमहाभूतें पूर्वीप्रमाणें शांतस्वरूप बनलीं होतीं.

श्रीसूर्यनारायण विरल मेघांतून डोकावीत होता. पश्चिमेकडे क्षितिजाजवळ एक कृष्णवर्ण मेघ दृग्गोचर होत होता. जणूं भौतिक महाभूतांनीं आपलीं रात्रीचीं प्रचंड व भयानक स्वरूपें तेथें बीजरूपानें ठेवलीं होतीं. आल्हादकारी सुशीतल मंदसमीरण मनास उत्तेजित करीत होता. प्रस्तरराशि व किल्ला स्नात झाल्यानें मळरहित होऊन बालसूर्याच्या मंद प्रकाशांत प्रफुल्लमुख दिसत होता. शुकसारिकादि पक्षी आनंदानें कलरव करीत क्रीडोद्देशानें इतस्ततः संचार करीत होते. त्या प्रभातकालीन सुगंध सुशीतल हवेनें भूतमात्र आनंदानें नृत्य करीत आहे असें भासत होतें.

संध्याकाळीं लीलादेवी मनोरमेला ह्मणाली, " ताई ! ऊन उतरलें. आपण बुरुजावर जाऊं. येतेस कां ? रामचरण बरोबर येत आहे. सूर्यमणींना हांक मारूं कां ? ते कदाचित् येतील. "

" होय, त्याला बोलाव. तो असल्यावर कशाचीही भीति नको. "

सूर्यमणि आल्यावर ह्मणाला, "आपल्याला लवकर आलें पाहिजे. किल्लेदाराचे बंधु आजोबाकडे येणार आहेत व मीं त्यांची प्रकृति पहाण्याचें कबूल केलें आहे. "

ते सर्व निघाले. किल्ल्याच्या बाजूनें गेल्यावर त्यास बुरुज दिसला कन्या स्वभावानुसार लीला भराभर पायऱ्या चढून गेली. शेवटच्या पायरीवर पोंचतांचं ती मनोरमेस ह्मणाली, " ताई ! ती पहा मौज. तरी अजून अर्धे खडक उघडे आहेत " मुद्दाम केलेल्या उंच वर्तुळाकार जागेवर मनोरमेस नेऊन लीला ह्मणाली, " ताई ! घटकाभर डोळे मिटून स्वस्थ बैस ह्मणजे तुला भीति वाटणार नाहीं. "

ती जागा तटाच्या सपाटीपेक्षां बरीच उंच असल्यानें दृष्टिपथांत कोणताहि अडथळा न येतां नजर सर्वत्र पोंचत होती. खालच्या बाजूस पर्वतश्रेणींत अदृश्य होणारा श्रीकृष्णेचा प्रवाह, वरच्या बाजूला शांत दिसणारा तो वारिसमूह, व मध्यभागीं विराजणारा तो प्रपाताचा गंभीर देखावा स्मृतिपटावर चिरस्थायि मुद्रा वठविण्यास समर्थ होता. मनोरमेला मौन झालेली पाहून लीला ह्मणाली, ' ताई ! हें ईश्वराचें अलौकिक कृत्य नाहीं काय ? मी सुद्धां पूर आला असतां अवाक बनून कित्येक घटका

स्वस्थ बसतें. ' अर्धपरिस्फुट आनंदोद्गार काढून ती म्हणाली, ' तो पहा पूर. हा रात्रीच्या पावसाचा परिणाम बरें. '

कृष्णेचें विशाल पात्र पूर्ण होण्यास एक घटकाहि लागली नाहीं. मेघगर्जनेपेक्षांहि मोठा आवाज उत्पन्न करीत तो भयानक प्रवाह खालीं उडी घेऊं लागला. सर्व खडक दिसेनासे झाले. वीचि, फेन, व जलतुषार ह्यांची गर्दी उडाली. कृष्णेचें सौम्य स्वरूप उग्रतर झालें. पण तें भयजनक दृश्य पुनः पहावेंसें वाटे. पाणी चढत चढत किल्ल्याच्या भींतीवर आदळूं लागलें. बालस्वभावी टाळ्यां वाजवीत म्हणाली, ' ताई ! भगवती श्रीकृष्णा आपणांस भेटायला येत आहे. '

एका व्याघ्रानें आपल्या वसतिस्थानांतून बाहेर पडून लहानशी गर्जना केली. बुरुजावर नरभक्ष पाहून त्यावर उडी मारण्याच्या बेतांत तो दिसला. रामचरण म्हणाला, " त्याच्याकडे पाहूं नका. कदाचित् तो निघून जाईल. अरेरे ! मजजवळ आज शस्त्रहि नाहीं. "

पण काय चमत्कार ! किल्ल्यावरून येणाऱ्या वाटेवरच्या झाडांतून एक बाण आला व उडी मारून बुरुजावर येण्यास बद्धकटि झालेल्या व्याघ्राला नमका लागला. वाघानें थोडीशी धडपड केली; पण बाण मर्मस्थानीं लागल्यानें तो जास्त गडबड न करतां एक भयंकर गर्जना करून जमिनीवर पडला व गडबडत येत मृत होऊन पायथ्यांत पडला. रामचरण व्याघ्रराजाकडे जात असतां वरून आवाज आला. ' रामचरण ! थांब, तो मेला नसेल. '

पण रामचरणानें एक दोन मोठाले दगड वरून लोटले. ते वाघास लागले तरी वाघ हलला नाहीं; म्हणून वरून येणाऱ्या मनुष्यास हाक मारून तो वाघाजवळ गेला. किल्ल्यावरून येणारी मंडळी अन्य कोणी नसून किल्लेदार व जयसेन हेच होते. ते किल्लेदाराच्या कित्येक नोकरांसह खालीं वृद्धाकडे जाण्यास निघाले होते. किल्लेदार सूर्यमणीस म्हणाला, ' आम्हीं तुम्हांस वरून पाहिलें. '

लीला मनोरमेस चिकटून म्हणाली, " मला त्याचें भय वाटतें. तो जेव्हां जेव्हां आजोबाकडे येतो तेव्हां तेव्हां मजकडे विलक्षण तऱ्हेनें

पहातो. त्याचे डोळे वाईट आहेत. तो जाईल तर बरें. पण, ताई ! स्त्रिया असतात त्या ठिकाणीं तो मुद्दाम कां येतो बरें ? ”

मनोरमेनें उत्तर दिलें नाहीं. नीलवर्ण पुनः ह्मणाला, ‘ आह्मीं वेळेवर आलों म्हणावयाचें. बरें झालें नाहीं तर त्या दुष्ट पशूनें तुमच्या बहिणीस भिवविलें असतें. अशा प्रसंगानें त्यांची गांठ झाली हें आमचें भाग्यच समजलें पाहिजे. आह्मी त्यांना वाघनखें पाठवूं. ह्या प्रसंगाची स्मृति म्हणून त्यांचा स्वीकार करण्याची आह्मी विनंति करतों. आजचा कृष्णेचा देखावा रौद्रस्वरूपी आहे. ’

किल्लेदारानें ज्या तऱ्हेनें मनोरमेबद्दल उद्गार काढले ती तऱ्हा सूर्यमणीस पसंत वाटली नाहीं. औपचारिक आभार मानून तो ह्मणाला, “ सूर्यास्त झाला; आम्हांस रजा असावी. ”

“ छे, सूर्यमणि ! आह्मीच जातों. तुह्मी खुशाल मौज पहात बसा. हरकत नसल्यास तुमच्याबरोबर जयसेन वृद्धाकडे येईल. कदाचित आणखी वाघ भेटेल; तेव्हा तो बरोबर असलेला बरा. ’ तीक्ष्णबुद्धि नीलवर्ण ह्मणाला व किल्ल्यावर परत गेला.

जयसेनानें फक्त एकदाच, त्या चिरस्मरणीय रात्रीं, सरला लीलेला पाहिलें होतें. तरी तो तिची मूर्ति केव्हांहि विसरला नव्हता. संधि पाहून तो हळूच तिला म्हणाला, “ मी मृत्युपंथास लागलों असतां मला येथें आणलें तेव्हां असाच भयंकर पूर होता त्याचें स्मरण आहे काय ? माझ्या स्वप्नांत येऊन मला अमृत पाजणारी स्वर्ग देवता तूंच ! ह्यापूर्वीच तुझे व तुझ्या आजोबाचे आभार मानावयास मीं यावें पण मी अतिशय अशक्त झालों होतों. ”

कुमारी लीलेनें आपल्या उज्ज्वल नेत्रांनीं एकवार त्याजकडे पाहिलें. नंतर अवनत दृष्टि करून ती सलज्ज भावानें म्हणाली, ‘ होय, मी विसरलें नाहीं. कोणासहि आपला भरवंसा नव्हता पण सर्वशक्ति परमेश्वराची कृपा ! ’

इष्ट देवतेशीं लीलेला जास्त बोलवलें नाहीं. जयसेन सूर्यमणीस ह्मणाला, “ चला, संध्याकाळ झाली; कदाचित् नीलवर्णाच्या ह्मणण्याप्रमाणें खराच वाघ येईल. ”

———

प्रकरण ८ वें.

::o::

पूर्वकथा.

जयसेनानें वृद्धास आपली सर्व हकीकत निवेदन केली. सूर्यमणीचें श्रेष्ठ वैद्यशास्त्रविशारदत्व जाणून वृद्धानें त्यास जयसेनाची औषधयोजना करण्यास सांगितलें. त्यानें जयसेनाची प्रकृति सर्वस्वी सूर्यमणीच्या हातीं दिली आणि आपण जयसेनाच्या विनतीवरून त्याच्या भयदूरीकरणार्थ एक ताईत दिला. तेव्हां जयसेनानें विचारलें, 'महाराज ! मी आपला उतराई कसा होऊं ? आपण माझा प्राण वांचविला. तुम्हांला काय पाहिजे ? मला आपल्याकरतां काय करतां येईल तें सांगा. मी आणि माझा चुलता कांतिचंद्र आपणांसाठीं काय पाहिजे तें करूं. खरोखर मी आपला व जिनें एकटीनें माझी शुश्रुषा केली त्या देवीचा आभारी आहे '

'तिचें नांव लीलादेवी.' वृद्धानें उत्तर केलें, 'तिनें फक्त कर्तव्य बजावलें. त्यांत विशेष तें काय ? तुझी अजून तिचें स्मरण ठेवलें ! मला वाटलें तुझी तिला विसरलां असाल. मी कोण आहे ? तुझीं मला काय हाक मारावी ? मी तुमच्यावर भरंवसा ठेवावा काय ? कांतिचंद्राचा पुतण्या आपल्या पूर्वजांप्रमाणेंच प्रामाणिक असला पाहिजे. मीं माझें गुह्य येथें कोणासहि सांगितलें नाहीं. विजयपुरास सर्व-जण जुन्या वैद्यास विसरले असतील मला स्वतःची फिकीर नाहीं. लीलेचें कसें होईल ? मी गेल्यावर तिला कोण सभाळील ? ती अनाथ आहे. तिला या जगात कोणीहि नाहीं.'

वृद्धाच्या चरणांना वंदन करून जयसेनानें ह्मटलें, "मीहि आपलें गौप्य कोणास सांगणार नाहीं. तुह्मी मला आपल्या मुलाप्रमाणें समजा."

"ऐक तर. तूं कधीं राजवैद्य सोमदत्ताचें नांव ऐकलें आहेस काय ?"

"होय, आजोबा ! तो मोठा नामांकित वैद्य होता ह्मणतात. लोक अद्यपि त्याचीं औषधें उपयोगांत आणतात. पण त्याचा अंत होऊन पुष्कळ वर्षे झालीं. तो तुमचा कोण होता ?"

"तोच मी सोमदत्त." वृद्धानें उत्तर दिलें.

'मग तुह्मी येथें कां ?' जयसेनानें साश्चर्य प्रश्न केला. एक दीर्घ निःश्वास टाकून वृद्ध सांगूं लागला. "कारण मला सर्व विसरले. माझ्या वेळचे बहुतेक लोक नष्ट झाले. कांहीं दुसऱ्या राज्यांत गेले व जे आहेत ते मला विसरले. नवीन मंडळीला मी मुळींच माहीत नाहीं. ऐक; नीट लक्ष दे. आमचें घराणें राजा जयसिंहापासून विजयपूरच्या सिंव्हासनाची एकनिष्ठ सेवा करीत आलें आहे. माझे वडील राजा विलासराजाच्या दरबारीं एक रणशूर सरदार होते. मी लहान असतांना आह्मी श्रीकाशीस गेलों. हरिद्वाराला माझ्या वडिलांनीं या जगाचा त्याग केला. जवळ द्रव्य पुष्कळ असल्यानें मीं नाना देश पहाण्याचा निश्चय केला. मी बराच व्युत्पन्न होतों व मला युद्धाचा वगैरे कंटाळा होता. मला वैद्यकी व शस्त्रक्रिया शिकण्याची इच्छा असल्यानें मी तिकडेच राहून त्यांचा अभ्यास केला. मी अनेक शहरें पाहिलीं. तेथें नामांकित विद्वानांशी माझा परिचय झाला. तिकडच्या एका विद्वान मनुष्याच्या रूपसुंदर गुणवती कन्येशी मी विवाह केला. नंतर मी तिच्यासह परत आलों. राजा विलासराजानें माझा बहुमान केला. मला कृष्णपूरची जहागीर दिली व आपल्याजवळ ठेवलें. लोक मला कृष्णपूरचा सरदार ह्मणूं लागले. मी राजाचा वैद्य होतों. त्याच्या खाजगी मत्र्याचें काम मीच करीत असें. मला द्रव्यराशी मिळूं लागल्या. माझा मानमरातब वाढला; पण मला फार गर्व झाला असावा. ऐश्वर्याच्या धुंदींत मी ईश्वरास विसरलों असेन. त्याचें भजनपूजन मी सोडून दिलें असलें पाहिजे. कारण मी सुखशैलाच्या शिखरावर असतां एकदम व तेंहि अन्यायानें माझें सर्वस्व नाहींसें झालें. मी दुःखसमुद्रांत लोटलों. ईश्वरीलीला आपणांस कशी समजणार ? राजाच्या पुढें पुढें बनलेल्या विषयांध वर्तनाविषयीं तुला गोष्टी माहीत असतीलच. त्यानें पदरच्या कित्येकवैद्यांना हांकून दिलें, कित्येकांना तुरुंगांत टाकलें, आणि कितीएक जणांना ठार केलें. मुला ! मनुष्य थोडा बरा झाल्याबरोबर जर लागलींच अत्याचार करूं लागला आणि मद्यप्राशनांत मग्न होऊं लागला तर त्याला निखालस बरा करण्याचें सामर्थ्य कोणत्या दिव्य औषधांत असणार ?

" एकदाचा विनाशकाल आला. संचितापुढें आपलें काय चालणार ? ईश्वरी इच्छेपुढें मानवी मनोरथाचा काय पाड ? ईश्वरी संकेत कोण टाळूं शकणार ? व्यवहारांत गर्क असतां काळ झडप घालतो तद्वत् वैभवगिरीच्या शिखरावर असतांना मी ह्या जिवंत मरणाच्या स्थितीला प्राप्त झालों; अद्याप माझी सुटका होत नाहीं. एकेदिवशीं पहाटे एक राजदूत माझ्या घरीं आला. राजा मृत्युपंथास लागला असून मला हाका मारीत आहे असें त्यानें सांगितलें. मला कांहींच तर्क होईना. रात्रीं राजा चांगला होता. मी राजद्वारजवळ गेलों. सर्वत्र गडबड उडालेली मला दिसली. एका वृद्ध सेवकानें मला बजावलें कीं, राजाला रात्रीं कोणीं जालीम मद्य आणून दिलें व राजा हल्लीं बेफाम आहे. पण मी राजावर फाजील विश्वास ठेवून तसाच पुढें गेलों. गालिच्यावर तो बहुतेक वस्त्रहीन पडला होता. मला पाहून तो उठून रागानें ओरडला, ' अरे घातक्या ! रात्रीं मजजवळ भूतं आणून ठेवलींस काय ? आतां तुला ठार करतों थांब. ' त्यानें मला खालीं पाडलें व गळा दाबून मारण्याचा प्रयत्न केला मी निसटून लोकांना हाका मारल्या; पण कोणी पुढें आला नाही. शवटीं तो आपल्या हुजऱ्यास ओरडून ह्मणाला, ' या चोराला धरा; ह्याचे डोळ काढा व एका दूरच्या किल्ल्यावर पाठवून द्या ह्मणजे याचें नांव सुद्धां ऐकूं येणार नाही. ' तो थकून पुन: गालिच्यावर पडला. मी उभा असतां राजाच्या एका प्रिय नोकरानें खंजीरानें माझे डोळे फोडले. इतर मंडळी स्वस्थ पहात होती. कोणीहि अडथळा करण्यास धजला नाहीं. मला अंध केल्यावर तेथून नेलें. माझ्या घरीं माझें सांत्वन झालें असतें; पण मला घरीं न नेतां येथें आणण्याची तयारी होईपर्यंत एका अंधार कोठडींत ठेवलें. कोणीं दयाळ इसमानें मला अन्नपाणी दिलें व आग होत असलेल्या डोळ्यांस थंड औषध लावलें. विजयपुराहून मी येथें कसा आलों हें मला स्मरत नाहीं. येथें आल्यावर मला प्रपातध्वनि ऐकूं आला. "

" राजा विलासराजाचा मद्यातिशयानें लवकरच अंत झाला. दुसऱ्या राजानें माझ्या पत्नीस येथें पाठवून दिलें. मला न्याय मिळावा, माझी सुटका व्हावी ह्मणून मीं नवीन राजास अर्ज केले, मित्रांस पत्रें पाठविलीं;

पण ते सर्व शाळूमित्र असल्यानें कोणींहि मला स्नेहभावानें मदत केली नाहीं. त्यावेळच्या किल्लेदारास माझे अर्ज पुनः न पाठविण्याबद्दल हुकूम आला. तो सज्जन होता. त्यानें मला ईश्वरावर विश्वास ठेवण्याचा उपदेश केला. मग मीं सर्व नाद सोडून या शिवालयाशेजारीं खोपटें बांधण्यास परवानगी मागितली. माझ्या स्त्रीनें आणलेल्या द्रव्यानें मीं ही कुटिका तयार केली. आणि मी येथें राहूं लागलों. कांहीं वर्षांनीं माझी साध्वी स्त्री मृत झाली. माझ्या मुलास एकांतवासाचा कंटाळा येऊन तो विजयपुरास गेला. तो बुद्धिमान् व शूर असल्यानें लवकरच सैन्यांत अधिकारी झाला. तो एकदां मला भेटावयास आला होता. त्याच्या पत्नीस कांहीं दिवस गेले असल्यानें तिला त्यानें येथेंच ठेवलें. त्यानें माझ्या मुक्ततेकरतां पुष्कळ प्रयत्न केले पण व्यर्थ ! सर्व लोक मला विसरले. एका लढाईंत तो नाश पावला; त्या दुःखानें त्याची स्त्री प्रसूत होऊन तिनें इहलोकाचा त्याग केला. तीच ही मुलगी. ती जन्मापासून मजजवळ आहे. आतां तीच माझा आधार; मी आज चाळीस वर्षें येथें आहें."

जयसेनानें आशापूर्ण उत्तर दिलें, 'पण या राज्यांतली न्यायदेवता अजून मेली नाहीं. मध्यें दोन कारकीर्दी झाल्या तरी तुह्मांस ओळखणारे अद्याप कांहीं लोक असतील. मी तुह्मांस प्रतिज्ञेनें सांगतों कीं. परमपूज्य राजमाता चंद्रावती हा अन्याय दूर करील. मी मातृपितृहीन झाल्यापासून तिनें मला पुत्राप्रमाणें वागविलें. द्युमत्सेनास ठार करून बंडाचें निर्मूलन केल्यामुळें राजाची मर्जी काकांवर प्रसन्न असेल तुह्मी निराश होऊं नका. माझी खात्री आहे कीं, आपण अजूनहि आनंदाचे दिवस पहाल. आपण लवकरच सुखी व्हाल !'

वृद्ध बोलला, "मला कांहीं नको. पण लीलेसाठीं मी खुषीनें येईन. स्वतः मला पुरून उरेल इतकें अन्न दिलें जातें. मला जास्त नको; पण लीला मोठी होऊं लागली. तिचा कोण संभाळ करील ? ती या जगांत अनाथ राहिली तर तिचें कसें होईल ? जयसेन ! तुला माहीत आहे कीं, ज्यांना स्वकीय ह्मणून कोणी नाहीं व जे गरीब आहेत त्यांना कोणी विचारीत नाहीं. ती आतां इतस्ततः बागडणारी लहान

मुलगी नाहीं. ती अजून निर्मलचरित्रा आहे. ह्या जगांतील दोषांचा संसर्गहि तिला नाहीं. पण ती एकटी राहिल्यास अशीच पावन राहील अशी खात्री कोण देऊं शकेल ? जयसेन ! मला वचन दे. तुझा आजा व मी निकट स्नेही होतों. ईश्वरानेंच जणूं तुला मज-करतां पाठविलें. मी गत झालों ह्मणजे तूं तिला सांभाळशील, तिची योग्य व्यवस्था करशील असें वचन मला दे. ”

जयसेन गंभीरतेनें ह्मणाला, “ परमेश्वर साक्ष ! तुमच्या आज्ञे-प्रमाणें मी करीन. ती येथें असती तर तुमच्यासमक्ष मी तिलाहि वचन दिलें असतें. ”

“ नको ! ती नाहीं हेंच चांगलें. तुजवर माझा विश्वास आहे. मी तिला जरूर तें सांगेन व मजप्रमाणें तीहि तुझ्या वचनावर विश्वास ठेवील. जा आतां; रात्र होत चालली; उद्यां सूर्यमणि तुजकडे येतीलच. ”

सूर्यमणीच्या कौशल्यानें जयसेन लवकरच पूर्ववत् झाला. सशक्त-तेनें त्याची भ्रांतिवट स्थिति गेली. आतां स्वप्नांत चंद्रकेतूची क्रोध-मुद्रा त्यास भिववीत नव्हती. लढाईंत जाऊन नांव मिळवावें व दर-बारच्या कारभारांत मिसळावें असें त्यास वाटूं लागलें. तो दररोज विजयपुराहून येणाऱ्या हुकमाची वाट पाहूं लागला.

प्रकरण ९ वें.

घात.

राजमाता चंद्रावतीच्या आज्ञेप्रमाणें सूर्यमणि व मनोरमा जयसेना-बरोबर विजयपुरास गेलीं. त्यानंतर एके दिवशीं लीला मनोरमेचें स्मरण करीत आपल्या खोलींत बसली होती. आज तिला हुरहुर वाटत होती. कां कोण जाणे ? ती स्वतःशीं ह्मणाली, ‘ ताई मजबद्दल विचार करीत असेल व तिचे विचार खिन्न असतील ह्मणून मला उदास वाटतें आहे; नाहींतर सर्व आनंदमय असतां मीच खिन्न कां ह्मणून ? ’

खरेंच; सरलस्वभावी लीला व देवगुणी मनोरमा परस्पर भगिनी

शोभत. वृद्ध नेहमीं मनोरमेचीं कर्णमधुर करुणामय गाणीं ऐकत असे. मनोरमेनें आपल्या देशचीं कित्येक गाणीं लीलेला शिकविलीं होतीं. मनोरमा पुनः कधींहि बुरुजावर गेली नाहीं. तिला वाघाच्या जबड्यांत सांपडण्याची इच्छा नव्हती किंवा किल्लेदाराच्या तावडींत जाण्याचें भय वाटत होतें हें सांगता येत नाहीं. तेथें पुन: जाण्याबद्दल लीलेनें केलेल्या विनंतीचा आदर कधीं झाला नाहीं. मनोरमेनें लीललाहि तेथें न जाण्याबद्दल उपदेश केला. ती ह्मणाली, ' एकटी जाण्यास तूं आतां लहान नाहींस.' त्यांचा वेळ बागेंतल्या फुलांच्या व फळांच्या झाडांची जोपासना करण्यांत जात असे. कधीं कधीं हिरव्या गार कुरणावरून चेटाच्या खालच्या भागांत त्या फिरावयास जात. पण मनोरमा गेली. आतां बालिका लीलेला कोण शिकवील ? तिला गाणीं कोण सांगेल ? तिला योग्य तो उपदेश करून सत्य मार्ग कोण दाखवील ? तिजबरोबर दूर्वाक्षेत्रांत फिरावयास कोण येईल ? मनोरमेचा सहवास तिला अल्पकालच झाला. पण मनोरमेचे शांत व उदात्त विचारांनीं तितक्या अल्पावकाशांतच लीलेचें मन किती तरी उन्नत झालें ! मनोरमा भेटली नसती तर कदाचित् ही सरल किशोरी अज्ञानमग्नच राहिली असती. पण मनोरमेसारखी योग्य मार्गद्रष्टी मिळाल्यानें तिचें अज्ञानपटल दूर झालें. पण, आतांशा तिच्या हृदयांत एक नवीन मनोभाव जागृत झाला होता आणि मनोरमेनें तिला किती सांगितलें तरी त्याबद्दलचा विचार तिच्या मनांतून नष्ट न होतां तो उलट वृद्धिच पावत होता.

मनाची खिन्नता घालविण्याकरतां ती वृद्धाला विचारून सायंकाळच्या सुमारास बुरुजावर गेली. वृद्धानें तिला प्रथम परवानगी दिली नाहीं. तूं अशी एकटी फिरण्यास आता लहान नाहींस असें वृद्ध बोलला. पण आज मला उदासीन वाटत आहे, पुढें पुनः मी जाणार नाहीं, अशी विनवणी तिनें केल्यावरून वृद्धानें परवानगी दिली. प्रपाताचा सौम्य प्रवाह सूर्यप्रकाशांत रुपेरी दिसत होता. वर्षाकालीं सतत दृग्गोचर होणाऱ्या भयानक स्वरूपापेक्षां आज कृष्णेचें स्वरूप सुंदर व मनोल्हादकारी होतें. असो; बाला काय करते आपण पाहूं या.

' ताई ! तूं भेटावें, अशी फार इच्छा मला आहे. गमगडास तुझी

कधीं परत जाल बरें ? मी शरीरानें येथें असलें तरी माझें मन तुजबरोबरच मेलें आहे. आजोबांना ईश्वरानें नेलें ह्मणजे मी तुजकडे येईन. इतक्यांत तिच्या मनांत अन्य विचार येऊन तिच्या कपोलयुगुलावर आरक्तता दिसूं लागली. ' माझी व त्यांची गांठ कधीं न पडती तर बरें होतें. ताईनें त्यांना विसरण्यास सांगितलें पण मी त्यांना कसें विसरूं ? ते येथेंच माझ्याशीं प्रेमशब्द बोलले. माझ्या मनांतून ती गात्र तर मुळींच जात नाहीं. मी ह्या जगांत एकटी राहीन. मी आजन्म ईश्वरसेवेस वाहून घेईन. पण ती मूर्ति विसरणें मला अशक्य आहे. ' अशा विचारांत ती मग्न होती.

किती भोळी पोर ही ! खरेंच; वृद्ध परलोकवासी झाल्यावर तिला कोणाचा आधार होता ? तिचा आजा दिवसानुदिवस थकत चाललेला तिला प्रत्यक्ष दिसत होता. वृद्ध निवर्तल्यावर तिच्या जीवनकलहास खरा प्रारंभ व्हावयाचा होता. त्याचा नुसता विचारच तिला विमनस्क करण्यास समर्थ होता. आणि आज तर ती मूळचीच खिन्न होती. इतक्यांत तिच्या परिचयाचा एक किल्लयावरचा नोकर शिवदास तेथें आला. त्याच्या नेत्रांतून अश्रु वहात होते.

" शिवदास ! कां रे रडतोस ? किल्लेदारानें मारलें कीं, काय ? " तिनें ममतेनें प्रश्न केला.

शिवदासानें उत्तर दिलें, " काय सांगूं ? नशीब माझें ! मी मेलों असतों तर बरें होतें. तुला वर घेऊन येण्याची आज्ञा मला झाली आहे. "

ती भीतीनें ह्मणाली, " शिवदास ! नको रे असें बोलूं. हूं; सांग, तूं केवळ थट्टेनें तसें ह्मणालास ह्मणून. "

शिवदासानें दुःखपूर्ण स्वरानें उत्तर दिलें, " बाई ! थट्टा नाहीं. "

ती कारुण्यमुद्रेनें ह्मणाली, " शिवदास ! असें करूं नको. मी तुझ्या मुलीप्रमाणेंच नाहीं कां ? मला त्या दुष्टाकडे नेऊं नको. आजोबाकडे घेऊन चल. ते तुला जन्मभर पुरेल इतकें बक्षीस देतील. मी तुझ्या पायां पडतें. पण — "

' मी तुझ्याशीं बोलत बसलों तर माझा विचार पालटेल. काम होणार नाहीं व फुकट मरावें लागेल. ' बोलत बोलत तो तिजकडे येऊं लागला.

' देवा ! संभाळ; ही मी आलें. ' असें ह्मणत ती बुरुजाच्या टोंकाशीं गेली. ती उडी मारणार इतक्यांत शिवदासानें तिला पकडलें. त्यानें तिला एखाद्या अर्भकाप्रमाणें धरलें. लीलेनें परोपरीनें त्याची विनवणी केली. त्याला आणाशपथा घातल्या. पण व्यर्थ ! तिनें दुःखावेशांत आपले ओंठ रक्त निघेपर्यंत चावले व ती मूर्च्छित झाली.

किल्लेदारानें आज्ञा केली त्याचवेळीं त्या बालिकेवर कांहीं संकट येणार असें शिवदासाला कळून चुकलें. पण त्याला आज्ञाभंग करवेना. आज्ञाभंग केल्यास पलीकडील खडकांत इतरांप्रमाणें आपणासहि समाधि मिळेल हें तो जाणून होता. आणि जरी तो दयाळु अंतःकरणाचा होता, लीलेवर स्वतःच्या मुलीप्रमाणें त्याचें प्रेम होतें, तिच्या पितामहाबद्दल इतर लोकांप्रमाणें त्याच्या मनांत पूज्यबुद्धि होती, तरी मनाचें धैर्य नसल्यानें तो किल्लेदाराच्या हुकमाची अमान्यता करूं धजला नाहीं. ह्या जगांत अशाच वृत्तीच्या लोकांची मोठी संख्या असते. दुसऱ्याचें यत्किंचित अहित न व्हावें म्हणून स्वतःच्या अर्थाचें भयंकर नुकसान करून घेण्याची बुद्धि असलेले लोक साधु होत; ते सर्व श्रेष्ठ जीव. स्वार्थाबरोबर परार्थ साधत असल्यास साधावा अशीच सामान्य मानवाची इच्छा असणार. स्वतःच्या अहिताचा प्रसंग येऊन ठेपल्यास इतरांची मनीषा आपल्या हातून दुसऱ्याचा प्रत्यक्ष नाश न व्हावा, दुसऱ्याच्या नाशास आपण प्रत्यक्ष कारण न व्हावें इतपतच असणार. अशाच वर्गापैकीं शिवदास होता. मानवानें श्रेष्ठ जीवांच्या गुणधारणाचा अभ्यास करावा, खरें. पण असा परोपदेश सोपा आहे. कृतींत आज कितीकांच्या हातून त्याचें अवलंबन होत आहे? ह्मणून वाचकहो ! शिवदासास दोष देण्यापूर्वीं थोडा विचार करा. आपल्याला ह्या त्याच्या वर्तनाबद्दल दोष देण्याचा किमपि अधिकार नाहीं. आपली योग्यता त्याजपेक्षां थोडीहि जास्त नाहीं असें विचार केल्यास आढळून येईल.

मूर्च्छा दूर होऊन लीलादेवी ससंज्ञ झाली, तेव्हां आपण एका मोठ्या पलंगावर असल्याचें तिला दिसून आलें. आपण किल्ल्यावर आहों असा तिनें तर्क केला, व त्या दुःखानें ती पुनः मूर्च्छित झाली. शिवदासानें

तिला ह्याच ठिकाणीं आणून ठेवलें, व मनाला अति दुःख वाटल्यानें तो कोणीकडे चालता झाला. तिच्याजवळ एक पोक्त वयाची स्त्री बसली होती. लीला शुद्धीवर आली. आजोबा नको ह्मणत असतां, मनोरमेनें मनाई केली असूनहि आज मी कशाला बुरुजावर आलें कोण जाणे! मनानें उदासीनता स्वीकारून अगोदरच भावी संकटाची सूचना दिली असतांहि मीं त्याचें ऐकलें नाहीं. आतां माझी मुक्तता कोण करील? मी आजोबांना निर्मलचरित्रा भेटेन काय? इत्यादि विचारांनीं ती दुःखित होऊन सचिंत झाली. लीलेला आणल्याची बातमी समजतांच नीलवर्ण तेथें आला. त्याच्या भाषणानें संतप्त होऊन लीला ह्मणाली, ‘ मला जाऊं द्या. आजोबा माझी वाट पहात असतील. तुमच्या बहिणीप्रमाणें मला समजा. तुह्मी एकदां आजारी असतांना आजोबांनीं किती त्रास सोसून तुह्मांस बरं केलें हें ध्यानांत आणा. त्यांनीं केलेले उपकार स्मरा. साधूचा अपमान व माझा छळ करूं नका दार उघडा व मला जाऊं द्या.’

नीलवर्ण खिदळत ह्मणाला, “ तुला सोडा? छे! हजार वेळ ह्मटलें तरी नाहीं. देवानें तुझ्याशींच माझा नेमानेम ठरविला आहे. तूंच माझ्या नशिबीं लिहिली आहेस. पोरी! तूं सुंदर आहेस. मी तुझा अंगीकार करण्यास तयार आहे. हित होवो वा नाश होवो मी तुला जाऊं देणार नाहीं. तूं कबूल अस अगर नस. मी कां तुला पोरीला विचारीत बसणार? मीनाक्षी! विचार कर. संपत्ति तुला मोह पाडणार नाहीं ह्मणतेस ह्मणून मी तुला येथून तशीच जाऊं देईन होय? सर्व उपाय व्यर्थ झाले तर मी—पण बोलनच दाखवायाला कशाला पाहिजे? मी तुला एकदां घेऊन भुगारून देण्यांत काय अर्थ आहे? तूं विवाहास कबूल होशील तर अब्रूनें राहून तुला मुलेंबाळें होतील, या नीलवर्णावर, त्याच्या संपत्तीवर, त्याच्या ऐश्वर्यावर तुला अधिकार गाजवावयास सांपडेल. तूं त्याची अर्धांगी होशील इतकेंच नाहीं तर तूं त्याची स्वामिनी होशील. हा नीलवर्ण तुझा दास होण्यास कबूल आहे. मग तुझा ह्मतारा आजा स्वस्थ चैनींत राहील. बोल, होय कीं, नाहीं? तुला माझ्या ताब्यांतून सोडविण्यास तुझा दीन आजा समर्थ नाहीं. येथून सुटावयास तुला अन्य मार्ग

नाहीं. तुझ्या आजानें एकदां माझा धिक्कार केला होता, आतां माझी पाळी आहे. पण तुझा अंगीकार करून मी त्याचा सन्मानच करीत आहे. तूं कबूल नसशील तर तुझें नशीब ! मात्र येथून अशाच सुटकेचें नांवहि मनांत आणूं नको.

बालिका लीला भयभीत झाली. नीलवर्णाच्या भाषणानें तिला भीति वाटली व ती पुन: मूर्च्छित होऊन खालीं पडली. जवळ असलेली स्त्री नीलवर्णास ह्मणाली, " अशानें तुह्मी तिला माराल. तिला भिववू नका. उत्तम उत्तम पदार्थ तिला द्यावयाचे, एखादा मोत्याचा हार तिच्या गळ्यांत घालावयाचा, तें सोडून तुह्मीं तिला भयाक्रांत केलेंत. ती अजून अल्पवयी बालिका आहे. "

किल्लेदार तिरस्कारानें ह्मणाला, " तिला असेंच वागविलें पाहिजे. ती कांहीं शहरांतली नव्हे. ती जन्मापासून एकांतवासांत वाढलेली स्वच्छंदानुवर्तिनी पोर आहे. पहिल्यानें ती अशींच खट्याळ घोडीप्रमाणें सोंगें करील. पण नाइलाज दिसला कीं मुकाट्यानें कबूल होईल. तिला उचला व पलंगावर निजवा. तुमच्या समजाप्रमाणें काय वाटेल तें करा. तिला उद्यां विवाहास तयार करा ह्मणजे झालें. उपाय नाहीं असें समजल्यावर तो थेरडाहि संमति देईल. "

ती स्त्री उद्गारली, " काय ? उद्यां ! तुह्मांला काय वाटतें कीं ती उद्यांच्या उद्यां तयार होईल ? ती कबूल होण्यास कित्येक आठवडे लागतील. "

नीलवर्णानें उत्तर केलें, ' मी तिची वाट पहात बसलों तर कधींच होणार नाहीं. एकदां ब्राह्मणानें मंत्र ह्मणून अक्षता टाकल्या कीं, संपलें. मग काय करणार ? मी सांगतों तसें करा. '

असें बोलून नीलवर्ण तेथून निघून गेला. ही प्रौढवया स्त्री कोण असावी ह्याचा अंदाज वाचकांना तिच्या भाषणावरून करतां येईलच. नीलवर्णानें रामगडच्या दुर्गपतीच्या कन्येची गांठ घेण्याचा प्रयत्न ह्याच स्त्रीच्या मार्फत केला होता. पण त्यांत यश न येऊन नीलवर्णास दुर्गपतीकडून सभ्यतेनें निरोप मिळाला. तेव्हां येतांना तो ह्या स्त्रीला बरोबर घेऊन आला. नीलवर्णाकरतां पत्नी शुंढीत असतां ह्या स्त्रीनेंच लीलेबद्दलचा त्याचा पूर्वग्रह उत्तेजित केला,

व तसें केल्यावांचून इलाजहि नव्हता. कारण स्त्री पाहून दिल्याखेरीज नीलवर्ण तिला रामगडास जाऊं देईना. त्यानें तिला विटंबना करण्याचीहि धास्ती घातली. लीलेला आताच भ्रष्ट करण्याचें त्याच्या मानांत कां आलें नाहीं. तिला पत्नी करण्याचा त्याचा खराच विचार होता किंवा ही सर्व भुरथाप होती हें सांगतां येणें शक्य नाहीं. कदाचित विवाह करून मग हवें तेव्हां त्याग करण्याचाहि त्याचा विचार असेल. तसें केल्यास विजयपुरास राजाकडेहि कोणीं तक्रार केली तरी राजा नीलवर्णास शासन करूं शकला नसता. लीलेच्या निर्मल यशाला जबरीनें कलंक लावला तर असतां तर नीलवर्णाचा सर्वतोपरी नाश झाला असता; कारण लीलचा वृद्ध पितामह जरी पूर्वीप्रमाणें ऐश्वर्य संपन्न नव्हता, तो जरी राजकेंद्री होता तरी विजयपुरच्या राजकुलानें कधींहि असल्या अनीतिवर्तनाची उपेक्षा केली नसती. बाकी, नीलवर्णास भावी घटनेची कल्पना आली असती तर राजाच्या शासनदंडाला भिऊन अशा कर्मापासून परावृत्त होणाऱ्या मनुष्यांतला मात्र तो नव्हे. कसेंहि असो, कोणत्या कां विचारानें असेना नीलवर्णानें आपला विचार अमलांत आणला नाहीं. त्यामुळें बिचारी लीला आज तरी मलिनयशा झाली नाहीं. पुढें काय घडतें हें आपण पुढच्या प्रकरणांत पाहूं.

प्रकरण १० वें.

शिवालयांत.

सूर्याचा प्रकाश नाहीसा झाला तरी पण पौत्री लीला अद्याप कां आली नाहीं ह्या चिंतेनें तिचा पितामह व्याप्त झाला. रात्र झाली तसा तो जास्तच घाबरूं लागला. बाहेर येऊन त्यानें पुष्कळ हाका मारल्या पण सर्वीच उत्तर मिळालें नाहीं आतां लीलेच्या शोधास कोणाला पाठवावें ? मंदिरांत जाऊन त्यानें व्यग्र मनानें कशीबशी आरती संपविली; पण आज आरतीला कोणीच कसें आलें नाहीं ! लीलेबरोबर सर्वांनीच वृद्धाचा त्याग केला काय ? मंदिरांतून मठांत आल्यावर त्यानें

पुनः तपास केला पण लीला आली नव्हती. रात्र झाली. शिवालयाच्या भिंतींत व प्रांगणांतील वृक्षांवर वसतिस्थानें बनवून राहिलेला लीलेच्या परिचयाचा व लीलाप्रिय पक्षीगण निस्तब्ध झाला. आपली प्रिय सखी आज अजून घरीं आली नाहीं ह्याची कल्पना त्या पक्षीगणाला असेल काय ? नाहीं; मुळींच नाहीं. त्याला ही बातमी समजली असती तर त्या तशा रात्रीच्या कृष्ण पूर्वार्धांतहि तो सरला लीलच्या तपासास गेल्याविना राहिला नसता ! गांवांतून ऐकूं येणारा मनुष्यशब्दहि हळुहळू नाहींसा झाला. मध्यरात्र होण्यास काय तो दोनच घटका अवकाश होता. वृद्ध मोठ्यानें हाक मारी, " बाळ ! तूं कोठें आहेस ? " पण या त्याच्या प्रश्नाचें कोण उत्तर देणार ? तो दुःख करूं लागला; तिला वाघानें खाल्लें असावें किंवा ती खडकांत पडून मेली असावी, अशी कुशंकाही त्याच्या हृदयास व्यथित करूं लागली. " काय तूं गेलीस ? मी म्हातारा अजून जिवंत ! ईश्वराच्या घरीं न्यायच नाहीं. " तो ईश्वरास दोष देऊं लागला; पण तो पुनः म्हणाला. " छे ! मीच महापातकी ! व्यर्थ त्या विश्वपित्याला दोष देतों. जें नेमलेलें असेल तें चुकणार नाहीं. पण तिच्या पत्रिकेंत ऐश्वर्य, सुख, संपत्ति, संतति आहे. कदाचित् मीच चुकलों असेन. मला आतां ती पुनः केव्हां भेटेल ? बाळ ! तूं कोठें आहेस ? " असें म्हणत तो पुनः पूर्वपदावर आला. मावशीनें त्याला समजावण्याचा किती प्रयत्न केला पण व्यर्थ ! ती अबला; त्यांतही वृद्ध. अशा रात्रीच्या वेळीं ती लीलेल्या तपासास कोठें जाणार ? दिवस उजाडल्यावर वृद्धाच्या हितचिंतकांना लीलेचा शोध करण्यास सांगण्याकरितां ती गांवांत जाणार होती. वृद्धाचा दुःखावेग कमी होईना. तो जास्तच शोकमग्न होऊं लागला. इतक्यांत गांवांतून एक माळी शिवालयाकडे आला. वृद्धाला सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून वृद्ध देहभानरहित झाला. लीला कलंकित झाल्यावर त्यास भेटणार हा विचार मनांत येतांच तो आवेशानें उठून म्हणाला, ' यापेक्षां ती वाघाच्या मुखांत पडती तर बरें झालें असतें. माझी तरवार आणा. मला त्याच्याकडे घेऊन चला. त्याच्या रक्षकांसमक्ष मी त्यास ठार करीन. कौलिन्यनाश झाल्यावर जगून काय करावयाचें ? आमच्या कुलाला कलंक ही कल्पनाहि सहन होत

नाहीं.' वृद्ध बडबड करीत होता. त्याच्या बडबडण्यास कोणीं अडथळा केला नाहीं. वृद्ध जरा शांत झाल्यावर गांवांतून आलेला माळी म्हणाला, 'महाराज! ईश्वर घडवून आणील तें सहन केलेंच पाहिजे. लीलादेवी अद्याप निर्मळ आहे, आणि दांडगाई न केल्यास ती कांहीं काळ तरी निर्मळ राहीलच. शिवदासाला अतिशय वाईट वाटून तो आपलें सर्व कृत्य माझ्या कारभारणीजवळ ओकला. किल्लेदाराचा हेतु काय असावा याबद्दल स्वतःची कल्पनाहि त्यानें सांगितली. पण थोड्याच वेळानें किल्लेदाराचा एक विश्वासु चाकर आमच्या घरीं आला. आणि उद्यां संध्याकाळीं किल्लेदाराला किती हार, गजरे, तुरे पाहिजेत तें त्यानें सांगितलें. माझी कारभारीण तेव्हांच तरकली. किल्ल्यावर उद्यां हारगजऱ्यांचें काय काम आहे असें तिनें त्या नोकरास विचारलें. तो प्रथम मुळींच सांगेना. पण माझ्या घरवालीनें जराशी साखर पेरतांच त्यानें हळुहळु सर्व सांगितलें, त्यावरून दिसून येतें कीं उद्यांच्या मुहूर्तावर लीलादेवीशीं विवाह करण्याचा किल्लेदाराचा विचार आहे. कसेंही करून उद्यांचा मुहूर्त टाळला म्हणजे झालें. मग दुसऱ्या मुहूर्ताला दोन दिवस अवकाश आहे. तोंपर्यंत लीलादेवीच्या सुटकेची तजवीज सहज होईल. लग्न लागलें तर तुमचा व इतरांचा काय उपाय चालणार? तसेंच दांडगाईनें वागून काय होईल? उलट तो लीलादेवीला कदाचित् भ्रष्टहि करील. उद्यांचा प्रसंग युक्तीनें टळल्यास तो दोन दिवस वाट पाहील; जुलमास प्रवृत्त होणार नाहीं. आपल्या प्रिय महाराजांच्या शासनदंडाचें भय त्यालाहि आहेच. लीलादेवी पवित्र असतांनाच तिला आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. माझ्या कारभारणीनें सर्व हकीकत मला सांगितली तेव्हां रामचरण तेथें होता; तो तरवार उपसून किल्ल्याकडे निघाला. वेडा कोठला! तोच मेला असता आणि असें मरूनहि कार्यसिद्धीच्या जागीं कार्यनाशमात्र व्हायचा. मीं त्याची समजूत केली. किसन नाईकाशिवाय अन्य कोणाहि लीलादेवीची मुक्तता करण्याचें सामर्थ्य नाहीं. रामचरणला मीं आतांच त्याच्या गांवीं पाठविलें. माणसांना पंख नाहींत. नाहींतर ता आतां आला असता. उद्यां दुपारीं तो येईल. तो युक्तीनें लीलादेवीस आणील. अविचारवर्तनानें काय फायदा? व्यर्थ कार्यनाशमात्र!'

माळ्याचें अर्थपूर्ण भाषण ऐकून वृद्धाची समजूत झाली. वास्तविक वृद्धानेंहि दुसऱ्याला असाच उपदेश केला असता. पण स्वतःवर प्रसंग आला म्हणजे मनुष्य स्थिरप्रज्ञ रहात नाहीं, हा साधारण नियमच आहे. मानवस्वभाव असा नसता तर मृताच्या आप्तांचें शांतवन करण्याचा प्रसंग दुसऱ्यांना कधीं न येता. दुःखप्रदर्शन, विवेककथासंबोधन इत्यादि प्रकार जगांत अस्तित्वांतच आले नसते; असो.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं किसन आला. त्याला रामचरणानें सर्व हकीकत निवेदन केली होती. तो वृद्धास म्हणाला, ' भगवन् ! मला आशीर्वाद द्या. माझ्या मस्तकावर आपला शुभ हस्त ठेवा. आपल्या प्रसादानें मी लीलादेवीला घेऊन येईन. ती आली नाहीं तर मी मेलों म्हणून समजा. मी तिला कसें आणीन ह्याची काळजी करूं नका. उद्यां सूर्योदयाच्या अगोदर ती आपल्याला भेटेल. कृष्णामाईच्या कृपेनें मी तिला घेऊन येईन. '

वृद्ध स्थिरचित्त झाला होता; त्याचा विवेक आतां जागृत होता. तो किसनला म्हणाला, " पण तिच्याकरतां किती प्राण नाश पावतील ? किती खून होतील ? किसन ! रक्तपात न होईल तर बरें. रक्तपात करूं नको. "

' मी पन्नास लोकांसह किल्ला सहज हस्तगत करीन. ' किसन हंसून म्हणाला, ' पण या कार्याला तशी जरूर नाहीं. किल्लेदार गडबड करील तर तो मेलाच समजा. त्याला मारणेंच न्याय्य होईल.

" लीलेला आणल्यावर आमचें रक्षण कोण करील ? " वृद्धानें प्रश्न केला.

किसन बोलला, " तीच विचाराची गोष्ट आहे. पण, महाराज ! ऐका; मी तुम्हांस स्पष्ट सांगतों. लिलादेवीला आणल्यावर तुम्हांस येथें रहातां येणार नाहीं. मजबरोबर यावें लागेल. कृष्णेच्या पलीकडे किल्लेदाराचें कांहीं चालणार नाहीं. माझे लोक तुमचें रक्षण सहज करतील. मग तुमच्या सोयीनें तुम्हांला विजयपुरास माझ्या धन्याकडे नेईन. आपण माझ्या प्रिय धन्याला पुनर्जीवन दिलें तें मी विसरलों नाहीं. पण थोडे दिवस तुम्हांस माझ्या प्रदेशांत रहावें लागेल; तेथें आपली सर्व व्यवस्था करण्यात

येईल. लीलादेवीला निरोप कळवितां येईल काय ? " त्यानें प्रश्न केला.

जवळ असलेल्या माळ्यानें त्यास ' होय ' ह्मटलें, तेव्हां किसन त्यास ह्मणाला, " काय करावयाचें तें मी सांगतों. पण तुह्मी विश्वासघात तर करणार नाहीं ना ? नाहीं तर मी आपला गप बसतों. "

" छे, छे ! त्यांनीं माझ्या बायकोला व मुलाला भयंकर दुखण्यांतून वांचविलें. मी त्यांच्यासाठीं आगींतहि उडी घालीन. माझी स्त्री फुलांचें हार नेऊन देण्यास किल्ल्यांत जाणार आहे तव्हां ती लीलादेवीस निरोप कळवील. "

" रात्रीं तिसरा प्रहर संपल्याबरोबर एक कोल्हा येऊन ओरडूं लागेल; त्याच्या तिसऱ्या कुईबरोबर तिला तयार व्हाण्यास सांगा. मी आलों आहें हेंहि कळवा. " किसननें सांगितलें.

जगाचे व्यापार नित्याप्रमाणेंच आज चालले होते; पण लीलेला आजचा दिवस किती तरी कंटाळवाणा वाटत होता. समोरच्या महालांत चाललेली गडबड तिला दिसत होती. किल्लेदाराचे नोकर तोरणें बांधीत होते; बैठकी पसरीत होते. पण हें सर्व कशाकरतां याची कल्पना लीलेला होईना. जवळ बसलेल्या त्या स्त्रीलाहि तिनें विचारलें नाहीं. लीला व्यग्रमानस झाली होती. तिच्या मनांतली अनिष्टतेची भीति नाहींशी झाली नव्हती. तिला संकटाचा विचारहि करवत नव्हता. ती मनामध्यें देवाची प्रार्थना करी. मनोरमेनें शिकविलेल्या गाण्यांनीं ती भगवान् बुद्धांसहि आळवूं पाही. त्या मध्यस्थ स्त्रीशीं एक अक्षरहि ती बोलली नाहीं. त्या स्त्रीनें सकाळपासून अनेक वेळां न्हाण्याची, वस्त्रें अलंकार लेण्याची गोष्ट काढली. तिला मोह पडावा ह्मणून तेथें अनेक उंचीं वस्त्रें, नाना दिव्य अलंकार मांडले होते पण ती स्त्री बोलूं लागतांच लीला क्रुद्ध व्याघ्रीप्रमाणें तिजवर चवताळून असे. सकाळपासून अन्नाच्या एका कणासहि लीलेनें स्पर्श केला नव्हता. माळीण पुष्पहार आणून द्यावयास आली असतां त्या स्त्रीच्या विनवणीवरून तिनें लीलेची भेट घेतली, संधि साधून तिनें लीलेला किसन आल्याचें कळविलें. नंतर लीलेनें मोठ्या प्रयासानें स्नान करण्याचें मान्य केलेंसें दाखविलें; माळणीनें बरोबर आणलेलीं कांहीं फळेंहि तिनें खाल्लीं.

संध्याकाळ झाली. वाड्यांत दिवे लागले. समोरचा महाल दीपपंक्तींनीं उज्ज्वल दिसूं लागला. एखाद्या नवरदेवास साजेल असा किल्लेदाराचा पोषाख होता; पण विवाहाची गडबड मात्र नव्हती. हळुहळु सर्व निमंत्रित मंडळी जमली. किल्लेदारानें लीलेला जबरीनें नेल्याबद्दल सर्व-जलदुर्गांत माहिती झाली होती. निमंत्रित मंडळी आपसांत कुजबुजत होती. जणूं आज्ञा मिळतांचक्षणीं त्यांनीं नीलवर्णावर हल्ला केला असता पण आज्ञा करण्यासच तेथें कोणी नव्हतें! किल्लेदारहि त्या भीषण शांततेचा भंग करूं इच्छित नव्हता. सर्व मंडळी जमलीसें पाहून तेथला वृद्ध शास्त्री उठून उभा राहिला. तो ह्मणाला " किल्लेदार नीलवर्ण! तुह्मी त्या अंध वृद्धांच्या पौत्रीशीं विवाह करणार काय? राज्ञीमाता चंद्रावतीच्या नांवानें मी तुह्मांस सांगतों कीं मी या प्रकारास कबूल नाहीं. मी तिच्या पितामहाची भेट घेतली. या गोष्टीस त्याची संमति नाहीं. मला तिची गांठ घेऊं द्या. तिचा रुकार असेल तर त्या वृद्धांकरवीं सर्व पूर्वसंस्कार झाले पाहिजेत. मग मी विवाह लावीन. त्या मुलीला काय तें अगोदर सांगूं द्या."

नीलवर्ण रागानें ओरडला, " तें तुमचें काम नाहीं. त्याबद्दल काय करणें तें मी करीन."

" काय? माझें काम नाहीं?" शास्त्री सभाजनांकडे वळून बोलला, " अशा जबरीनें तुह्मी आपल्या प्रिय कन्यांचे विवाह होऊं द्याल काय?" नाहीं नाहीं अशा अर्थाचा एकच स्पष्ट ध्वनि चहूंकडून आला शास्त्री पुनः ह्मणाला, " मीं विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर मला मिळालें नाहीं. वधू अथवा तिच्या वतीचें येथें कोणी नाहीं. पूर्वविधीहि व्हावयाचे आहेत. सबब मी विवाहमंत्र ह्मणण्याचें नाकारतों. जुलमाचा संबंध नसावा. किल्लेदार! नीलवर्ण! मी वृद्ध आहें; मजमध्यें तुमचा जुलूम दूर करण्याची शक्ति नाहीं; तरी मी ईश्वरास स्मरून सांगतों कीं या बाबतींत तुह्मी कपट व जुलूम आचरीत आहां, यास मी साक्षी आहें. तिच्या पितामहातर्फे मी तिला परत मागतों. तिला माझ्या स्वाधीन करा."

नीलवर्ण अर्धवट तरवार उपसून ह्मणाला, " भटा! गप बस. उद्धटपणानें वागूं नको. तूं माझा न्याय करणार काय?"

नीलवर्ण या वेळीं शुद्धींत नव्हता हेंच खरें. लीलेसंबंधींच्या मोहम-दिरेनें तो उन्मत्त झाला होता. एरवीं त्याच्याप्रमाणेंच दरबारानें नियुक्त केलेल्या पुरोहिताचा अवमान करून त्याजवर शस्त्र उचलण्याचा अविचार तो कधींहि न करता.

तो वर दिलेले उद्गार बोलतांच कांहीं तरुण पुरोहिताजवळ गोळा झाले. तंटा विकोपास न जावा ह्मणून शास्त्री तेथून निघून गेला. त्याजबरोबरच बहुतेक मंडळी गेली. सभागृहांत आतां फक्त किल्लेदाराचे नोकर व आश्रितच होते. तो आपल्या एका सहचरास ह्मणाला, " दैवाच्या विचित्र खेळास आतांपासूनच सुरवात झाली ह्मणावयाची. पण एका यःकश्चित् भटाला भ्यालों असें कोणीं मला म्हणूं नये म्हणून रामगडास जाऊन परवां सायंकाळपर्यंत एका पुरोहितास घेऊन ये. "

आपल्या महालांत जातांना तो त्या मध्यस्थ स्त्रीस ह्मणाला, " आजची वेळ ती निसटली; हरकत नाहीं. परवांचा मुहूर्त मी टळूं देणार नाहीं, त्या वेळीं तिला तयार ठेवा. "

ती स्त्री स्वतःशीं ह्मणाली, " खरेंच ! ह्यांना कांहीं दया नाहीं. करतां येतें तर प्रेताशीं सुद्धां ह्यांनीं लग्न लावलें असतें. मी तिला तयार करीपर्यंत ह्यांनीं धीर धरू नये काय ? आजपर्यंत मीं कितीतरी पोरांची समजूत केली. त्यांनीं प्रथमारंभीं केलेल्या हट्टी वर्तनापुढें लीलेचें वर्तन पहातां कांहींच नव्हे. मी तिला शिकवीन व ती कबूलहि होईल; पण हे धीर धरतील तेव्हां ना ! "

स्वतःशीं त्या स्त्रीचे असे विचार सुरू होते. तिला विनयी लीलेचा स्वभाव बरोबर कळला नाहीं असेंच ह्मटलें पाहिजे.

रात्रीचे दोन प्रहर संपले. पहाऱ्यावरील शिपाई बदलले. ' लीले ! आतां एकच प्रहर ! निजूं नकोस ! ' ती मनाशीं पुटपुटली. जांभया देत शिपाई पहारा करीत होता. सर्व व्यवस्था नीट आहे असें पाहून तो अंगाभोंवतीं कांबळें गुंडाळून तथेंच दरवाजाशीं लवंडला. लीलेजवळची स्त्री निद्रावश होऊन मोठमोठ्यानें केव्हांच घोरूं लागली. लीलेनें दिवा मालवला. ती दरवाजाशीं आली व थोडाहि आवाज होऊं न देतां तिनें दरवाजा उघडला. थोड्या वेळानें-पण हा थोडा वेळ तिला युगासमान वाटला;

किसन येत नाहीं अशीहि शंका तेवढ्यांत तिच्या मनांत उद्भवली — एक कोल्ह्याचा शब्द तिला ऐकूं आला. पुनः दुसरा शब्द झाला; तिचें हृदय धडधड करूं लागलें. तृतीय शृगालशब्द कानीं पडलांच ती परमेश्वराचें स्मरण करून जपून पावलें टाकीत बाहेर पडली. किसन येऊन नेईपर्यंत तिला कोठला धीर ? ती पहा, चंद्रप्रकाशांत एका खडकामागून एक कृष्ण आकृति पुढें आली. किसन लीलेला ह्मणाला, " इतक्यांत बोलूं नको. अजून आपण निभावलों नाहीं; तरी भीतीचें कारण नाहीं. त्यांचे दुसरे दोन सोबती त्यास येऊन मिळाले. तिघेजण लीलेला घेऊन खडकांतून भराभर चालूं लागले. एका गुहेंतून ते किल्ल्याच्या बाहेर पडले, तेव्हां किसन हंसून बोलला, " आतां सगळा किल्ला कां उठेना ! किल्लेदाराच्या डोळ्यांत खूप धूळ फेंकली, व कोणाचाहि नाश करावा लागला नाहीं. "

किसननें स्वतःचा जीव धोक्यांत घालुन आपणास सोडविलें हें मनांत येऊन लीलेचें अंतःकरण कृतज्ञेतनें भरून गेलें. शिवालयापाशीं गेल्यावर लीला आजोबाकडे धावत गेली. पण आजोबा होते कोठें ? वृद्ध अगोदरच कृष्णतीरावर गेला होता. तेथें तो व कांहीं भिल्ल आगटीपाशीं बसले होते. त्याठिकाणीं धांवत जाऊन वृद्धाच्या गळां पडून लीला ह्मणाली, ' आजोबा ! माझें रक्षण करून त्यान मला वांचविलें ! ' तिला जास्त बोलवलें नाहीं. वृद्ध आनंदभरित होऊन ईश्वराचे आभार मानूं लागला. त्या पौत्री पितामहाचें सर्व सामान आणलें होतेंच. सर्व तयारी झाली. किसनच्या नाविकांनीं त्यांचा होडी झपाट्यानें परतीराला नेली. किसन किल्ल्याकडे बोट करून वृद्धास ह्मणाला, ' ते पहा शोध करीत आहेत; मशाली घेऊन खडकांतून फिरत आहेत. पण, महाराज ! आतां आपणांस मुळींच धास्ती नको. '

— —

प्रकरण ११ वें.

विजयपूर.

सावित्री नदीच्या तीरावर वसलेल्या राजनगरी विजयपूरच्या सर्व बाजूंची जमीन उतरती होत गेली आहे. आपल्या कथानकाच्या काळीं ही उतरणीची जमीन धान्यादिकाला प्रसवत नसे; तर तेथें उत्पन्न होणारें गवत जवळच्या छावणींतील जनावरांस आणि राजाच्या गाईंना उपयोगास येई. युद्धकलेच्या दृष्टीनें राजनगरीभोंवतालचा प्रदेश मोकळा ठेवणेंच इष्ट होतें. ह्मणून आसपास खेडा नसल्यानें दृष्टिपथांत कोणताहि व्यत्यय न येतां लांबवरचा प्रदेश नयनगोचर होत असे. सावित्री नदीच्या खोऱ्यांत उत्पन्न होणाऱ्या धान्यावर विजयपूरचा पुरवठा होई. आसमंतात् भागी घोरतम अरण्यश्री नसल्यानें क्रूर पशूंची वसती नव्हती. मात्र वर निर्देश केलेल्या तृणक्षेत्रांत मृगबालकांचे कळप इतस्ततः संचार करीत असत. राजधानीच्या बाहेर असलेला रत्नमंदिर नामक राजप्रासाद व धनिक नागरिकांचे बागबगीचे मनास आल्हाद देत. ह्या उद्यानभूमीच्या पलीकडे विजयपूरचा भव्य किल्ला व त्याखालीं वसलेलें विजयपूर दृग्गोचर होई. कथानकाच्या वेळीं उत्तम स्थितीं असलेलें विजयपूर नाश पावून आज त्याची खूणहि दिसूं नये यावरून सर्वभक्षक भगवान् कालाच्या सपाट्यांतून कोणी बचावत नाहीं ह्मणतात तें मुळींच अयथार्थ नाहीं अशी खात्री पटते.

विजयपूरचें राज्य साऱ्या दक्षिणेंत शक्तिमान. सर्व प्रकारचा व्यापार तेथें चालत असे. राजापासून सामान्य नागरिकापर्यंत सर्व लोक आपल्या नगरीच्या सौंदर्यवर्धनाकडे अत्यंत लक्ष देत असत.

तो पहा, सूर्यनारायण एकदम वर आला. पूर्वेकडील क्षितिजाजवळचे ढग रक्त, शुभ्र, पीत वर्णाचे दिसूं लागले. दिनकराचे नूतन किरण पूर्व मैदानांतील तृणांकुरांवर विराजत होते. मंदिरांच्या शिखरांवर प्रकाश पडून त्यांचे सुवर्ण कळस झळकूं लागले. राजवाड्यांतील नौबती सूर्यो-

दयाबरोबर वाजूं लागल्या. विजयपूरच्या किल्ल्यावरील निशाणाहि सूर्य-देवाच्या आगमनानें आनंदित होऊन त्या प्रभातकालीन थंड आल्हा-दकारक हवेंत वायूबरोबर क्रीडा करीत चमकूं लागलें. सूर्योदयापूर्वी रत्नमंदिर प्रासादांतून बरीच मंडळी निघून पूर्व मैदानावर शिकार खेळण्याच्या इच्छेनें आली होती. मध्यवर्ती मंडळापासून थोड्या अंतरावर दोन्हीं बाजूंनीं चाललेलीं स्वारांचीं पथकें, मध्येंच, आपण फार पुढें चाललों अगर मागें राहिलों ह्मणून आपापल्या अश्वांना सावकाश अगर जलद चालण्याचे इषारे देत; मधेंच शिकार होतां होईल तों मध्यस्थित मंडळाकडे वळवावी या इरा-दानें त्यांतले कांहीं स्वार आणखी थोडे दूर जाऊन सावजांना मध्यप्र-देशाकडे पिटाळीत मृगयेचे पशु पळून जातील ह्मणून हत्तींच्या गळ्यां-तील घंटा काढून ठेवल्या होत्या; त्यामुळें अश्वांच्या पदाघातांनीं होणाऱ्या शब्दाशिवाय दुसरा कसलाहि आवाज तेथें होत नव्हता. स्वारांचे पोषाख व त्यांच्या वाहनांचीं भूषणं मोलवान् होतीं. त्यांच्या शस्त्रास्त्रांवर बाला-र्काचा प्रकाश पडून तीं लखलखीत दिसूं लागलीं. मध्यभागीं सुमारें वीस लोक होते. आणि ते सर्व एका व्यक्तीला मान देण्यास झटत होते. त्यापैकीं कांहीं राजसेवक होते, कांहीं शिकारखान्यावरील अधिकारी होते व दोन्ही पथकांचे दोन नायक होते. त्या एका व्यक्तीच्या सेवेंत ही सर्व मंडळी तत्पर होती. ही व्यक्ति एक स्त्री होती. ती एका उमद्या अश्वावर आरूढ होती. अश्वावरील जीन मालवान् व मऊ असून बसण्यास सुख-दायक होतें. राणी चंद्रावती ती हीच. तिचा पोषाख साधा होता. तिनें मस्तकाला एक पटका बांधला होता. तिच्या उजव्या हाताच्या मनगटावर एक ससाणा ऐटीनें बसला होता. अश्वारोहणाच्या कलेंत तिच्याइतके निपुण फार विरळा. ती नेहमीं शिकारीस निघत नसे; पण आजची उल्हासदायी हवा पाहून ती आली होती. सुमारें पावकोसावर हरिणांचा कळप आहे असें समजल्यावरून मंडळी वेगानें निघाली. पिंजऱ्यांत घालून बरोबर आणलेल्या एका चित्त्यास त्या कळपावर सोडण्यास तिनें परवानगी दिली. चित्ता उड्या मारीत लपत लपत जिनकें न कळत जाववेल तितकें हरि-णांकडे जात होता. हरिणांचा कळप दुसरीकडे जाण्यास निघाला. चित्ता

लपलेला पाहून राणी उद्गारली, ' तो फार भ्याड दिसतो; त्याला बाणानें मारून टाक. '

मृगयाधिकारी ह्मणाला, ' सरकार ! आजपर्यंत कधीं त्यानें भ्याल्याचें चिन्ह दाखविलें नाहीं. आणि यावेळींहि तो तसें करणार नाहीं. '

इतक्यांत चित्त्यानें जवळून जाणाऱ्या एका मृगयुवकाकडे उडी मारली. तो त्या मृगयुवकाला धरणार तों मृगयुवक जणूं मनोवेगानें पळूं लागला. चित्ता त्याचा पाठलाग करूं लागला. क्षणकाल, विजयश्री कोणाच्या बाजूची होणार याची शंका उत्पन्न झाली. मृगयुवक मान ऐटीनें मागें करून जमिनीला पोट लावून पळत होता; आणि चित्ता तर क्षणांत येथें तर क्षणांत तेथें दिसत होता, त्याच्यावर नजर ठरेना. पण अशारीतीनें पंधरा वीस पळें गेल्यावर चित्त्यानें एक मोठी उडी मारून मृगयुवकाचा गळा धरला. मृगयुवक व चित्ता दोघेहि जमिनीवर गडबडले. थोड्या वेळानें चित्त्याला पिंजऱ्यांत घातल्यावर राणी त्याची पाठ थोपटून ह्मणाली, ' शाबास ! खूप केलीस. '

मृगयाधिकाऱ्यानें नम्रतेनें उत्तर दिलें. ' तो पुन: जाण्यास तयार आहे. आपण श्रमला नसला तर त्यास पुन: सोडूं. '

' आह्मांला कधींच शिकारीचा कंटाळा नाहीं. आमच्या पूर्ववयांत कृष्णेच्या पलीकडील तीरावर आपण सकाळपासून अस्तमानापर्यंत शिकार करीत फिरत असूं आणि तुह्मीं आणलेल्या साध्याच अन्नावर निर्वाह करीत असूं. तेच विचार थोड्या वेळापूर्वी आमच्या मनांत आले. आह्मी तो काल अद्याप विसरलों नाहीं. '

मृगयाधिकारी कृतज्ञतेनें ह्मणाला, ' जे आह्मां गरिबांना विसरत नाहींत त्यांचें आमचीं मुलें बाळें देखील बंदे चाकर असतात. '

" बरें, तूं आतां आपल्या जागेवर जा. ही टेंकडी पार झाल्याशिवाय हरिणें सांपडणार नाहींत. " राणीनें उत्तर केलें.

ती सर्व मंडळी त्या कोमल तृणांकुराच्या मैदानांतून आनंदानें चालली होती. राणी टेंकडीच्या माथ्यावर पोंचण्यापूर्वींच त्या मकुतृणक्षेत्रांतून एक पक्षी उडाला. राणीनें आपल्या हातावर असलेल्या ससाण्यास सोडलें. तो केव्हांचा उतावीळ झाला असल्यानें आपल्या भक्ष्यामागें एखाद्या

तीरासारखा निघाला. राणीनेंहि त्याच्या मागोमाग आपला घोडा चालविला. घोडा लवकर चालण्यास गडबड करीत होता तरी ते दोन्ही पक्षी दृष्टीच्या टप्प्यांत रहातील इतकेंच तिनें त्यास चालविलें. एखाद्या वन्य कपोताचा पाठलाग करणें राजप्रासादांतल्या ससाण्याला क्वचित् शक्य असतें, व त्यापेक्षांहि त्या दोघांची झटापट पहाण्यास त्यांजबरोबर धांवावयास चांगलाच स्वार पाहिजे. त्या पक्षांची शेवटची झटापट पहाण्यास राणीनें आपला घोडा भरधांव सोडला. तिनें मागें पाहिलें तों बऱ्याच अंतरावर दोन चार मात्र सेवक दिसले, तरी तिनें घोड्यास थांबविलें नाहीं. या उंचवटय़ावरून त्या उंचवटय़ावर असें ती त्या पक्षांच्या मागोमाग किती तरी फिरली. बराच वेळ झाला, कपोत ससाण्याच्या आटोक्यांत येईना. पण एकदा कपोतानें मागें वळण्याचा प्रयत्न केला तो फसला. थोड्या वेळांत ससाण्यानें त्यास धरलें. ते दोघे जमिनीवर पडले. ससाणा कपोताचे पंख उपटूं लागला.

स्वाराचा पोषाख केलेला एक प्रवासी तेथें येऊन पोंचला. तो ससाण्यास हाक मारूं लागला पण तो येईना. इतक्यांत राणी तेथें आली. एक परकी इसम ससाण्यास बोलावीत आहे असें पाहून ती जरा मोठ्यानें ह्मणाली, " राजपक्षांना अडथळा करणारा तूं कोण आहेस ? अशा रीतीनेंच तूं ससाणे धरीत असतोस वाटतें. "

मुखाचा धाटा सोडून तो इसम ह्मणाला, " आई, मला विसरलीस कीं काय ? मी जयसेन. " असें ह्मणून त्यानें तिला प्रणाम केला.

" काय, जयसेन ! खरोखरच तूं आलास केव्हां ? एकदां तूं मृत्यु पावलास, एकदां तुझी जखम नादुरस्त होऊन तूं कोणच्याशा गांवीं मृत्युपंथोन्मुख होऊन पडला आहेस असें मला सांगण्यांत आलें. " राणी जयसेनास ह्मणाली.

" आई ! मी तुझ्यासमोर खरोखरींच उभा आहे. आणि तूं एकटी भेटलीस यावरून माझे ग्रह उच्चीचे आहेत. पण राज्ञीमातेनें एकटेंच येण्याचें कारण काय ? ते सर्व सुस्त नोकर कोठें आहेत ? "

" जयसेन ! कोणालाहि मजबरोबर येववलें नाहीं. माझ्या मोती-

प्रमाणें चपळ त्यांच्या लढाऊ घोड्यांत एकहि नाहीं. अरे ! तुला हा विसरला नाहीं. ”

खरोखरींच मोती आपल्या शिक्षकास विसरला नव्हता. तो त्याच्या हाताशीं नाक घासूं लागला. एका साध्या घोड्यावर बसलेल्या व्यक्तीकडे पाहून राणीनें हास्यमुद्रेनें विचारलें, “ हे कोण ? ”

“ ते नवे झाले आहेत. ते रामगडचे बौद्ध भिक्षु आहेत. त्यांना आणण्यास मला आज्ञा झाली होती. ” भिक्षुसूर्यतमणीकडे वळून तो ह्मणाला, “ खालीं उत्तरा व ह्या राज्ञीमातेला प्रणाम करा. ”

“ हल्लींच्या काळच्या अत्युत्तम राजपुरुषांपैकीं तूं आहेस. भगवान् बुद्धदेव तुजवर पूर्ण कृपा करो. ” सूर्यमणीनें खालीं उतरून आशिर्वाद दिला.

‘ साधूचा ह्मणून आह्मी आपल्या आशीर्वादाचा स्वीकार करतों. तुह्मी बौद्ध भिक्षु आहां तरी आमच्या येथें या. आह्मी भिन्न धर्मीयांचा द्वेष करीत नाहीं. तुह्मी इतक्या उत्तम तऱ्हेनें इकडची भाषा कशी बोलतां ? ’

‘ भगवान् बुद्धाकरितां मी ही भाषा शिकलों. ’ सूर्यमणीनें उत्तर दिलें.

‘ मोठेंच नवल ! आह्मी ऐकत होतों तसेंच तुह्मी आहां. जयसेन ! आमची आज्ञा होईपर्यंत या पुण्य पुरुषाची तरतूद नीट ठेव. उद्यां सायंकालपर्यंत आमचा मुक्काम रत्नमंदिरांतच आहे. तुझी जखम बरी आहे ना ? ’ राणीनें प्रश्न केला.

‘ या भिक्षूंनीं ती निखालास बरी केली. जरूर पडेल तेव्हां मी राज्ञीमातेच्या सेवेस पुनः हजर आहें. ’ जयसेनानें उत्तर दिलें.

‘ बरें, बरें; त्याबद्दल पुढें पाहूं. पण तोंपर्यंत जपून वाग. माझ्या कानांवर कांहीं दुष्ट वार्ता आल्या आहेत. चंद्रकेतूचे लोक तुजवर संतप्त झाले आहेत. त्यांच्या वाटेस जाऊं नकोस. जास्त बोलण्यास आतां वेळ नाहीं. मजबूरांवर त्यांचें एक पथक आहे. त्यांना तूं टाळून जावें हें बरें. वसंतवनाकडून तूं नगरांत जा. ’

उत्तराची वाट न पहातां तिनें आपला अश्व परत फिरविला. आपल्या मंडळींत गेल्यावर ती स्वतःच्या विजयाचें वर्णन करूं लागली. ‘ तुह्मीं सर्व सुस्त आहां. आजचा मान फक्त आमचा व हिऱ्याचाच आहे. नव्हे कां ? ’ ती सखीण्यास कुरवाळीत ह्मणाली.

मृगयाधिकाऱ्यानें नम्रपणें विचारलें, ' पण, सरकार ! हा मृत कपोत आपण कसा उचलला ? आपली रिकीब कोणीं धरली ? '

' आह्मी मुळींच खालीं उतरलों नाहीं. एका वाटसरानें हा पक्षी उचलून दिला व हिरा माझ्या हातावर येऊन बसला. पुरें, ऊन होत चाललें. ' राज्ञी चंद्रावतीनें ह्मटलें.

राज्ञीच्या आज्ञेप्रमाणें सर्व मंडळी परतली. जयसेन व सूर्यमणिहि अश्वारूढ होऊन आपल्या लोकांसह राणीनें निर्दिष्ट केलेल्या मार्गानें शहरांत गेले.

प्रकरण १२ वें.

पूर्वेतिहास.

परत रत्नमंदिरांत जात असतां राज्ञी चंद्रावतीचें मन विचारांनीं व्याप्त झालें होतें ती स्वतःशीं ह्मणाली, ' आतां तो मला पुनः कधीं दिसणार नाहीं, तो एका दूरच्या गांवीं मरत पडला आहे असें मला सांगितलें अं ! तो मरण पावला तर आनंद मानणारे लोक पुष्कळ आहेत. राजधानीच्या मार्गांतून आतां पुनः रक्तपात न होवो. किती वेळां तरी माझ्या प्रजाजनांनीं क्षुल्लक कारणांवरून राजमार्गांतून रक्ताच्या नद्या वाहविल्या आहेत. त्याच्या आईनें मरतेवळीं त्याला माझ्या स्वाधीन केलें. त्याच्या पित्यानें ' मीं आजपर्यंत इमानानें नोकरी केली ह्मणून ह्यास संभाळा. ' असें समरभूमीवर जखम होऊन प्राणोत्क्रमण होतांना सांगितलें. आणि मींहि आजपर्यंत त्यास तसेंच नाहीं कां वागवलें ? त्याचें खाणें, पिणें, शिक्षण, खेळ, सर्व कांहीं राजकुमाराबरोबर झालें. त्याचा हूडपणा मीं सहन केला. त्याच्या शूर कृत्यांची, एकनिष्ठतेची वार्ता ऐकण्यांत मला आनंद वाटतो. तो भित्रा घातकी झाला ह्मणतात. मी तें खरें मानूं काय ? छे ! त्याच्या मुखावर कपटाची थोडीहि छाया नव्हती. त्यानें चंद्रकेतूला मत्सरबुद्धीनें फसवून मारलें असतें आणि तो आपल्या लोकांस मृत्युमुखांत सोडून पळून गेला असता तर मजकडे वर दृष्टि करून पहाण्यास

तो समर्थ झाला नसता. छे! न्यायसभेंत हा तंटा येण्यापूर्वी त्याच्या मुखानें सर्व हकीकत मला ऐकली पाहिजे. उद्यां रात्रीच्या सभेस मी त्यास बोलावीन. कुमार येण्यास अजून बराच अवधि आहे. मला या बाबतींत कांहीं तजवीज केलीच पाहिजे. ह्याहूनहि मोठमोठ्या संकटांतून व आणीबाणीच्या प्रसंगांतून मी पार झालें आहे. मग एवढ्याशा गोष्टीला कां मी भिईन? तो उद्यां सभेंत आल्यावर दुसऱ्यास राग येणार नाहीं अशा रीतीनें सर्व हकीकत सांगण्यास मी त्यास सूचना करीन.'

ह्या आत्मगत भाषणाच्या योगानें राणीची वृत्ति पुन: नेहमींप्रमाणें आनंदी बनली व ती बरोबरच्या मंडळींशीं बोलत बोलत रत्नमंदिरांत परत गेली. ह्या ठिकाणीं राणीचा व विजयपूरचा थोडासा मागचा इतिहास दिल्यास अप्रासंगिक होणार नाहीं; त्या योगानें राणीची यथार्थ योग्यता वाचकांना कळून येईल.

ज्या कथानकप्रिय अधीर वाचकांना राणीच्या पूर्व इतिहासाशीं व तिच्या गुणपरिचयाशीं आपणांस काय कर्तव्य असें वाटत असेल त्यांनीं खुशाल या भागावरून एकदम उडी मारून पुढील प्रकरण गांठावें. त्यांच्या कथानकाच्या अखंडतेंत भंग होणार नाहीं अशी हमी आह्मी घेतों.

राणी चंद्रावती कांतिनगरच्या राजाची मुलगी. त्यावेळीं विजयपूर व कांतिनगर या दोन्ही राज्यांत सख्य झाला होता. कांतिनगरच्या तत्कालीन राजानें आपली भगिनी चंद्रावती विजयपूरचे राजपुत्रास दिली. राजकन्या चंद्रावती विजयपूरच्या राज्याची स्वामिनी झाली. तिच्या विवाहानें दोन्ही राज्यांचा स्नेहसंबंध दृढ झाला. पूर्वींहि ह्या राजघराण्यांचे विवाहसंबंध झाले होते. त्यामुळें परस्परांचा मत्सर नाहींसा होई; परस्परांचा युद्धप्रसंग टळत असे. तोच फायदा ह्याहि विवाहसंबंधानें झाला. राणी चंद्रावती कधींच पतीस सोडून रहात नसे. तिला लहानपणीं वीरोचित शिक्षण मिळालें होतें. राजकन्यांना अवश्य मानलेल्या ललित कलांतहि ती निपुण होती. राजा दरबारच्या कारभारांत तिचें अनुमत घेतल्याशिवाय रहात नसे. देवानें तिला पुत्ररत्न मात्र दिलें नाहीं. विवाहानंतर वीस वर्षांनीं राजा मृत्यु पावला. आपल्या जेष्ठ पुतण्यास राज्यावर बसवून तो अज्ञान असेपर्यंत चंद्रावतीनें कारभार पहावा असें त्यानें

सांगितलें. प्रिय पतीची अंतकालीन इच्छा चंद्रावतीनें शब्दशः पार पाडली. पतीच्या मृत्यूनंतरच तिच्या स्वतंत्र राजकीय जीविताचा प्रारंभ झाला. तिचा पति युद्धप्रिय होता तरी त्यानें लोकसुधारणेकडे बरेंच लक्ष पुरविलें होतें. त्याच्या प्रत्येक लोकोपयोगी कृत्यांत त्यास राणी चंद्रावतीची मदत होती. ती दानधर्म फार करी. तिला अनाथांविषयीं विशेष कळकळ वाटत असे. राजा पूर्ण पत्नीव्रत होता; चंद्रावतीवर त्याचें अव्यभिचारी प्रेम होतें; सर्वांचा आग्रह असतांहि त्यानें अपत्यप्राप्तीकरतां द्वितीयसंबंध केला नाहीं; त्यामुळें चंद्रावतीचें पूर्वायुष्य अपर्व सुखांत गेलें. ती सुंदर होती तशीच साध्वी होती. दरबारी लोकांत नेहमीं दुफळ्या होत्या, तरी राणीचा हुकूम सर्वजण तत्परतेनें ऐकत. राजपुत्राचें शिक्षण पुरें करण्याचें काम तिनें स्वतः संभाळलें. आठवड्यांतून नियमित दिवशीं तिनें राजकुमारासह सिंहासनावर बसून कारभार पहावा. पतीनें नेमलेला प्रधानपदधारी सरदार प्रथम निष्ठेनें वागला. पण तो नीच व दुष्टांतःकरणाचा होता. राणी व राजकुमार ह्यांच्यांत वितुष्ट पाडण्याचा प्रयत्न त्यानें चालविला. त्यानें लोकांवर जुलूम केला. त्याच्या कागाळ्या तिजकडे वारंवार येऊं लागल्या. तो राणीचेंच नव्हे तर सरदारमंडळाचेंहि ऐकेना. पुष्कळांनीं त्यास पदभ्रष्ट करण्याची सल्ला राणीला दिली. श्रीपूरच्या दुर्गपतीला प्रधानपद देण्याचें तिनें नियुक्त केलें होतें. पण हा तिचा बेत मनांतच राहिला. कारण, प्रधानाला ही बातमी कळून त्यानें श्रीपूरच्या दुर्गपतीचा नाश करविला. सर्व सैन्य त्याच्या ताब्यांत होतें. राणी चंद्रावती आपल्या भाचास कांतिनगराहून बोलावून हें राज्य त्यास अर्पण करणार असा खोटा ग्रह त्यानें राज्यभर पसरविला. त्यानें कुमाराजवळ राष्ट्रसंरक्षणाकरतां चंद्रावतीस ठार करण्याचा, निदान जन्मभर कैदेंत ठेवण्याचा हुकूम मागितला; पण राजकुमारानें तें कबूल केलें नाहीं. कुमार कसलीच आज्ञा देईना. तशी राष्ट्रहिताकरतां असें लोकांस भासवून त्यानें राणीला दूर साठ सत्तर कोसांवर एका किल्ल्यांत बंदोबस्तानें नेऊन ठेवलें. पण त्यामुळें लोकांच्या राणीवरील भक्तीनें व्यक्त स्वरूप धारण केलें. कुमारास मेजवानी करून, मिरवणूक काढून, मोठा उत्सव करून, त्यानें लोकप्रेम संपादण्याचा प्रयत्न

केला. पण त्या समारंभांत पौरजनांनीं त्याला शापवाद दिले, त्याच्यावर धूळ व राख फेंकली, आणि हाच राणीचा छलकर्ता व श्रीपुरच्या दुर्गपतीचा घातक असे स्पष्ट उद्गार त्यांनी काढले. राणीच्या पक्षाच्या लोकांनीं प्रजेच्या ह्या अनुकूल मनोवृत्तीचा फायदा घेऊन उचल केली. प्रधान कुमारास एका उद्यानांत घेऊन गेला होता. कुमाराचा नाश करण्याचा याचा उद्देश नव्हता. पण राणीच्या झालेल्या दुर्दशेनें प्रजेचा तसा समज झाला. त्यांनी एकदम गर्दी केली. प्रधानाला परस्पर उद्यानांतून पळ काढावा लागला. त्यास कोठेंहि आश्रय मिळाला नाहीं; म्हणून तो मालवदेशास जात असतां श्रीपुरच्या दुर्गपतीच्या कोणा नातलगानें त्यास ठार मारून सूड उगविला. प्रधानाच्या ताब्यांतून सुटतांच कुमार राजशेखरानें चंद्रावतीची सुटका केली ती पूर्ववत् कारभार पाहूं लागली. दुसऱ्या एका सरदारास प्रधानपदाचीं वस्त्रें देण्यांत आलीं. पण त्याच्या ढिल्या अंमलानें सरदारांत तट सुरू झाले. परराष्ट्रीयांनीं या गोष्टीचा फायदा घेऊन विजयपुरावर स्वारी केली. खुद्द विजयपुरास वेढा पडला. आंत पुरे दोन हजारहि सैनिक नव्हते. तरी राणीनें सर्वांना उत्तेजन दिलें. नगररक्षणाचें काम तिनें स्वतः अंगीकारलें. भक्कम तटबंदीच्या योगानें तिनें विजयपुरचा बचाव केला एकदा तटबंदीस मोठें खिंडार पडलें; पण राणीनें नागरिकांकडून एका रात्रींत आपल्या समक्ष तटबंदी पूर्ववत् केली. विश्रांति घेण्याबद्दल तिला केलेल्या विनंत्यांचा कांहीं उपयोग झाला नाही. ती तेथून दिवसा किंवा रात्रीं केव्हांहि मुळींच हलली नाहीं. आपल्यामुळें झालेली राज्याची दुरवस्था व ह्या संकटप्रसंगीं राणीनें दाखविलेलें शौर्य, तिची राज्याबद्दलची कळकळ, तिची कार्यतत्परता इत्यादि मनात आणून सर्व सरदार राणीपुढें येऊन प्रणाम करून उभे राहिले राणी त्यांशीं उदारतेनें वागली. मात्र नवीन प्रधान न नेमतां तें काम ती स्वतः करूं लागली. सरदारमंडळाच्या ऐक्यतनें एक महिन्यांतच वीस हजार सैन्य जमा झालें एक वर्ष वेढा कायम होता. केव्हां केव्हां अर्धपोटी असलेले सैनिक निकरावर येत. पण ह्या वीरस्त्रीनें स्वतःच्या उदाहरणानें सर्व व्यवस्था नीट करावी. शेवटीं शत्रुसैन्यें निराश होऊन परत गेलीं. पुढील पाच सात वर्षांत

राज्याचा वसूल जास्त झाला. सरकारची पत वाढली. परराष्ट्रें विजयपूरचे लचके तोडण्यास इकडे पाहिनाशीं झालीं. राजकुमाराच्या युवावस्थेस आरंभ झाला. सिंहासनारूढ होऊन तो स्वतः कारभार पाहूं लागल्यास दोन वर्षे झालीं होतीं. नवीन राजा राज्यांत फिरावयास जाई किंवा समरांत असे तितक्या वेळेपुरतीं, त्याच्या विनवणीवरून राज्ञी चंद्रावती विजयपूरचीं राजसूत्रें स्वहस्तांत घेत असे. सर्व दिशा संकटांनीं आच्छन्न झाल्या असतां, जिनें आपल्या धैर्यानें व कौशल्यानें नाशाप्रत जाणारें राष्ट्र संकटमय अवस्थेतून सुस्थितींत नेलें, पूर्ण स्वतंत्रता व अनियंत्रित अधिकार असतांहि जी धवलचरित्रा राहिली; अशी उदारमनस्क, साध्वी, दयाळु, धार्मिक, पतीच्छासारी रमणी भारतांतील स्त्रीरत्नांत शोभणार नाहीं असें कोण ह्मणेल ? अशी स्त्री कोणत्याहि देशांत कशाहि स्थितींत जन्मास आली तरी ती त्या देशाचें भूषणच होणार !

प्रकरण १३ वें.

राजवाड्यांत.

जयसेन घरीं गेला तेव्हां चुलतीनें त्याचें सप्रेम स्वागत केलें. दुसऱ्या दिवशीं सूर्यमणि व मनोरमा राजाच्या बौद्ध चिताऱ्याच्या घरीं रहावयास गेली. कारण, एक बौद्ध भिक्षु व त्याची सुंदर भगिनी यांस जयसेनानें घरीं जागा दिली असती तर लोकांनीं त्याबद्दल अनेक कुतर्क केले असते. जयसेनास नांवेंहि ठेवलीं असतीं ह्यांत मुळींच संशय नव्हता. संध्याकाळीं राणीकडून त्याला रात्रीच्या सभेला येण्याचें निमंत्रण आलें. त्या आलेल्या सेवकानें स्वसंरक्षणाची तजवीज करून येण्याची सूचना केली. त्याप्रमाणें जयसेन तयारी करून गेला. राज्ञीमाता ह्यावेळीं एका सुंदर छोट्या महालांत कित्येक प्रधानमंत्र्यांसह बसली होती. ह्या महालांत लहानपणीं जयसेन राजकुमाराबरोबर किती तरी वेळां खेळला होता. तेथें असलेल्या गुरुजनांना प्रणाम करून जयसेन, राज्ञीमातेच्या आज्ञेनें एका आसनावर बसला.

प्रथम राज्ञीनें सुरवात केली. ती ह्मणाली, " जयसेन ! येथें सर्व तुझे गुरुजन आहेत. ते तुझ्या वडिलांचे व चुलत्याचे मित्रच आहेत. तर मग तूं चंद्रकेतूला कां व कसें मारलेंस व जलदुर्गास कां राहिलास हें आह्मां सर्वांना सांग. "

जयसेनानें उत्तर केलें, ' जर मजवर एखादा आरोप असेल तर तो मला समजूंद्या ह्मणजे मला उत्तर देण्यास बरें पडेल. अथवा इतक्यांत दोषारोप व्यक्त करण्याची आपली इच्छा नसली तरी जें खरोखरीं घडलें तें आपणां गुरुजनांस व या माझ्या राज्ञीमातेस निवेदन करण्यास मला कोणतीहि हरकत नाहीं. '

राणी प्रेमपूर्ण स्वरानें ह्मणाली, " कांहीं एक लपवूं नकोस. वत्स ! कदाचित् तुझ्या हातुन चूक झाली असली तरी मोकळेपणानें खरें सांग. "

जयसेनानें चंद्रकेतूला कां व कसें मारलें, त्याला मारणें कां भाग पडलें व त्यानंतर काय हकीकत घडली हें वाचकांना माहीत आहेच; ह्मणून येथें आह्मी त्याची द्विरुक्ति करीत नाही. त्यानें ती हकीकत अत्यंत स्पष्ट व सरळ रीतीनें सांगितली. कोणाळाहि त्याच्या निर्दोषत्वाचा संशय उरला नाहीं.

नगररक्षक सेनापति गजसिंह ह्मणाला, ' तूं चंद्रकेतूला तो तुझा प्रतिस्पर्धी होता ह्मणून कपटाचरण करून मारलेंस व तूं विश्वासघातकी झालास असा कित्येकांचा समज आहे. '

राजगुरु देवशर्मन् बोलले, " तूं एका बौद्धस्त्रीला आश्रय दिला आहेस. ती मंत्रविद्येंत मोठी प्रवीण आहे ह्मणतात. "

जयसेनानें आश्चर्यचकित मुद्रेनें त्या दोघांकडे पाहिलें. त्यानें उत्तर दिलें, " माझ्यावर आरोप करणारे कोण आहेत ? त्यांनाच मी ह्याचा जबाब देईन. मी राज्ञीमातेला विनंति करतों कीं, मला तशी संधि मिळावी. मग खरें कोणतें याचा निर्णय होईल. त्या बौद्ध स्त्रीबद्दल तर प्रत्यक्ष राज्ञीमातेनेंच तिची परीक्षा करावी ह्मणजे झालें. ईश्वरसेवेस वाहून घेतलेल्या त्या स्त्रीस मी माझ्या भगिनीप्रमाणें समजतों. "

" हर ! हर ! ते नास्तिकमतवादी ईश्वरभक्त ! ! " देवशर्मन् ओरडले.

जयसेन पुढें ह्मणाला, " जलदुर्गास असतांना ती तेथें एक वृद्ध साधु व त्याची नात यांजकडे रहात असे. तिला मी फार वेळां पाहिलें सुद्धां नाहीं. "

देवशर्मनूनीं तिरस्कारानें विचारलें, " आणि ती अजून तुझ्या घरीं आहे ? "

जयसेनानें शांतपणें उत्तर दिलें, " गुरुमहाराज ! छे असें नाहीं. त्यांची तजवीज होतांच ती व तिचा बंधु दोघे राजाच्या बौद्ध चित्रकाराकडे रहावयास गेलीं राजाज्ञा मिळेपर्यंत तीं तेथेंच रहाणार आहेत. "

मंत्री कन्हदेव ह्मणाला, " तूं आपल्या लोकांना सोडून भित्र्याप्रमाणें प्राणभयानें पळून गेलास असेंहि ह्मणतात. "

' कन्हदेव ! असें ह्मणणाऱ्या लोकांच्या वयोवृद्धतेमुळें त्यांच्या शुभ्र केंसांस मान देऊन मी स्वस्थ बसतों. विचार करा; मी कापुरुष असतों तर चंद्रकेतूला कसें मारलें असतें ? तो कांहीं नेभळा नव्हता. ' जयसेनानें उत्तर दिलें.

गजसिंहानें विचारलें, " चंद्रकेतु तुला काय ह्मणाला ? "

जयसेनानें उत्तर दिलें, ' त्यानें मला रागानें शाप दिला. त्याची अंतकालाची तिरस्कारयुक्त मुद्रा मला नेहमीं दिसत असे. त्यामुळें मला स्वस्थ झोंपहि मिळेना. पण जलदुर्गच्या साधूनें एक मंत्रसिद्ध ताईत दिला तेव्हांपासून मला आतां बरें वाटतें. '

देवशर्मन् उद्गारले, ' काय, मंत्रसिद्ध ताईत ? एका यःकश्चित् बैराग्यापासून ! पाहूं कोठें आहे तो. '

जयसेन आदरपूर्वक ह्मणाला, ' मीं तो अद्याप कोणास दाखविला नाहीं; पण आपल्यासारख्या पूज्य गुरुवर्यास तो दाखवावयास हरकत नाहीं. '

ताईत उघडून कागदांतील आकृतीकडे पहात देवशर्मन् आश्चर्यानें ह्मणाले, " हें एखाद्या सामान्य गोसाव्याचें कृत्य नव्हे. ह्या ताईताच्या योगानें मालकास कसली बाधा होणार नाहीं. हें एका बैराग्यानें दिलें काय ? अशा अज्ञात ठिकाणीं कोण असेल बरें ? "

' तो कोण आहे हें त्यानें मला सांगितलें आहे व तें मी

आपणापासून लपवून ठेऊं इच्छित नाहीं. तो बैरागी नाहीं. राजा विलासराजाच्या वेळेपासून तो एक राजकैदी आहे. राजानें त्याचे डोळे काढविले तेव्हांपासून तो तेथें—"

कन्हदेव व देवशर्मन् एकदम ह्मणाले, "तुझें देव भलें करो! तो प्रसिद्ध राजवैद्य सोमदत्त तर नाहीं ना?"

"होय; तोच तो. राज्ञीमातेला त्याचा वृत्तांत सांगून न्याय मिळवून देण्याचें वचन मीं त्यास दिलें आहे. आणि त्याप्रमाणें, हे मातुश्री! मी आतां विनंति करतों." जयसेनानें उठून राणीच्या चरणांवर मस्तक ठेवलें.

राणी गंभीरपणें ह्मणाली, "मुला! ईश्वरकृपेनें त्यानें तुझा जीव वांचविला. ह्यास्तव, त्याचा अपराध असला तरी आह्मी त्यास क्षमा करूं. त्याच्या ओळखीचे पुष्कळ लोक असतील."

कन्हदेव बोलला, "आणि राजानें त्यास मदिरेच्या धुंदींत अंध केलें; पण त्यानंतर राजा विलासराज पुन: कधींहि शुद्धीवर आले नाहींत."

राणीच्या नेत्रांत दुःखाश्रु उभे राहिले. ती उद्गारली, "जयसेन! त्यानें अंध स्थितींत त्या अज्ञातवासांत चाळीस वर्षें काढलीं आं!"

"होय, अगदीं अंध; आई! त्यास एक नात आहे आणि तीं दोघें परोपकारकृत्यांत दिवस घालवतात." जयसेनानें उत्तर दिलें.

'बरें तर; त्यास आपण बोलावूं. त्याला पूर्ण सन्मानानें इकडे पाठविण्याची आज्ञा उद्यां नीलवर्णास करूं. होईल तितकें लवकर हें आमच्या घराण्याचें पाप आह्मांस क्षालन केलें पाहिजे. कन्हदेव! लक्षांत असूं द्या.' राणी ह्मणाली.

"पण जयसेनाबद्दल काय आज्ञा?" गजसिंहानें प्रश्न केला.

'तुमची खात्री झाली ना? मग आज्ञेची काय जरूर?' राणीनें उलट विचारलें.

"आमची खात्री झाली; पण लोकांची झाली पाहिजे. भाग्यवती! लोकांत रण माजावें अशी कां आपली इच्छा आहे? चंद्रकेतूच्या पक्षाचे लोक गप्प बसणार नाहींत. नुकतेंच आपसांतील यादवीनें राज्य रसातळास जाण्याच्या बेतांत आलें होतें याचा विचार करा. उद्यां दरबार आहे तेथेंच त्याचा निर्णय होऊं द्या. दंगा न होण्याची व्यवस्था मी करीन."

जयसेनाला स्वस्थ रहावेना. तो पुन: प्रणाम करून ह्मणाला, “माझ्या-बद्दल संशय घेण्यास कोणासहि जागा राहूं नये. माते ! आरोपिताचा पूर्वापार हक्क मला द्यावा. आपल्या वजनामुळें मजवर कोणी स्पष्ट आरोप करणार नाहीं; पण अशा दुर्लौकिकांतून, अशा संशयात्मक जिण्यांतून धवल यशानें बाहेर पडण्यास मी वाटेल तें दिव्य करण्याला सिद्ध आहें. मी द्वंद्वही करीन. ईश्वर माझा वाली आहे. तो माझें रक्षण करील.”

राणी सर्वांकडे पाहून बोलली. “छे, छे ! द्वंद्वाची गोष्टहि नको. उगीच रक्तपात न व्हावा अशी आमची इच्छा आहे. तुमच्या मनांत आमच्याविषयीं, तुमच्या राजाविषयीं पूज्यबुद्धि असेल तर द्वंद्व होऊं देऊं नका. त्यामुळें घृतसिंचन केलेल्या अग्नीप्रमाणें परस्पर द्वेषभाव जोरावेल मात्र.”

मंत्री कन्हदेव ह्मणाला, “पण, भगवती ! तें टाळतां येणार नाहीं. उगीच रक्तपात होणार नाहीं, तर एक गंभीर धर्मयुक्त दिव्य होईल, अशी खबरदारी घेतली ह्मणजे झालें. हा ईश्वरी न्याय देणें प्रत्यक्ष राजासहि नाहीं ह्मणतां येणार नाहीं. ही जयसेनाची मागणी ऐकून त्याच्या चुलत्यास अभिमानच वाटेल.”

गजसिंह उद्गारला, “असें निश्चित ठरवूं नये. उद्यां दरबारांतल्या निकालावर अवलंबून रहावें हें बरें. कदाचित् दिव्य करण्याची जरूरहि पडणार नाहीं.”

जयसेनानें राणीस विनंति केली, “मातुश्री ! नाहीं ह्मणूं नका. एखाद्या नीच मनुष्यास सुद्धां हा हक्क असतो. मी त्याचीच याचना करतों.”

“जयसेन ! तूं अजून अशक्त आहेस.” राणीनें त्यास ह्मटलें.

हास्यमुद्रा करून जयसेनानें उत्तर दिलें, “भगवती ! मला शक्ति आली आहे किंवा नाहीं पहा.” सिंहासनाजवळ जाऊन तेथील चांदीच्या दोन मोठाल्या समया समोर ताठ हात करून न कांपतां उचलून तो उभा राहिला.

‘देवी ! तो ह्मणातो तसेंच होऊं दे. तो ताईत व हे बळकट बाहु त्याचें रक्षण करतील.’ देवशर्मन् ह्मणाले.

जयसेनानें ह्मटलें, " माते ! समरभूमीवर जातांना दिला तसा आशिर्वाद मला द्या, मग, माझी काळजी मुळींच नको. ह्या दिव्यांत मी वांचलों तर मजवर विश्वास ठेवा व मी मेलों तर देवानें एक राष्ट्रघातकी मनुष्य कमी केला ह्मणून आनंद माना. "

तिनें आतांच जयसेनाच्या मस्तकावर हात ठेवला आणि त्याला आशिर्वाद दिला. थोड्या वेळानें मंत्रीसभेचें काम संपलें. जयसेनानें कन्हद्देवास सभागृहांतून बाहेर जाण्यास मदत केली. एकेकजण आपापल्या अनुयायांसह चालता झाला. देवशर्मन् पालखींत बसतांना जयसेनास ह्मणाले, ' त्या बौद्ध स्त्रीबद्दल माझी खात्री कर ह्मणजे मी तुझा मित्रच आहें. ती फार सुंदर आहे असें ऐकतों. '

" गुरुवर्य ! उद्यांचा दिवस जाऊं द्या. मी वांचलों तर मी माझ्या वडिलांप्रमाणेंच आहें असें तुम्हांस कळून येईल. " जयसेनानें उत्तर दिलें.

जयसेन आपल्या घोड्याजवळ गेला. त्याचा एक मात्र अनुयायी तेथें उभा होता. इतक्यांत एका भिंतीच्या मागून एका उंच धिप्पाड पुरुषानें उडी मारली व ' चंद्रकेतूनें तुला हें पाठविलें आहे. ' असें ह्मणत जयसेनाकडे कसलीशी फेंक केली. त्या योगानें जयसेन खालीं पडला. त्याचा अंत झाला असेंच सर्वांस वाटलें. मारेकरी कित्येक राजसेवकांच्या अगदीं हातांत सांपडला; पण त्या सर्वांना चकवून तो त्या अंधकारमय शहरांत निघून गेला. राजसेवकांनीं त्याचा पुष्कळ शोध केला पण तो सांपडला नाहीं ! जयसेनानें चिलखत घातलें नसतें तर मारेकऱ्यानें फेंकलेला खंजीर काळजांत घुसला असता; पण आतां त्यास जोराचा धक्का बसण्यापलीकडे जास्त इजा झाली नाहीं. मात्र त्या धक्क्यानें त्याच्या जखमेचे कांहीं टांके तुटले. गजसिंहाच्या एका सेवकानें तो खंजीर उचलला. त्याचें टोंक मोडलें होतें. गजसिंहानें तें शस्त्र तपासलें. तें चंद्रकेतूच्या पक्षांतील सरदार आकुतराय याचें होतें. गजसिंह ह्मणाला, ' तो आतां मला चुकवूं शकणार नाहीं; पण जयसेन ! तुझ्या चिलखताचे व परमेश्वराचे आभार मान. '

राणीला ही बातमी समजली. तिनें जयसेनास बोलावलें. सेवकाबरोबर तो आंत गेला. आतां औपचारिक विधि पाळण्याची जरूर नव्हती.

जयसेनास मारलें असें तिला कोणीं सांगितलें त्यामुळें ती अजून दुःखानें कांपत होती. तिनें विचारलें, ' जयसेन ! तुला इजा झाली नाहीं ना ? '

त्यानें उत्तर केलें, " छे, मुळींच नाहीं. आई, तुझ्या आशिर्वादानें मी नेहमीं सुरक्षित असतों. पहा, आतांच त्याचा प्रत्यय आला ना ? उद्यांचाहि दिवस असाच पार पडेल. ईश्वर माझ्या बाजूस आहे. मी मुळींच भीत नाहीं. आई ! बाहेर गजसिंह वाट पहात आहे. "

" वा: ! मग उत्तम नाहीं तर तुला पोंचविण्यास मीं माझे रक्षक दिले असते. जा बाळ ! देव तुझें रक्षण करो. सकाळच्या आंत सर्व देवळांतून दानधर्म केला जाईल. "

कांतिचंद्राच्या वाड्याशीं आल्यावर गजसिंह ह्मणाला, " उद्यां चांगला सज्ज हो. उगीच भपका नको; पण तयारी मात्र नीट असूं दे. मला वाटलें होतें सर्वत्र शांतता असेल; पण आकुतराय व त्याचे लोक स्वस्थ रहाणार नाहींत. आज घडलेल्या गोष्टी चित्त क्षुब्ध करण्यास पुरेशा आहेत; पण स्वस्थ मनानें झोंप घेऊन हुषार हो. "

सूर्यमणीस निरोप पाठविल्यावरून तो आला. त्यानें जखम पुनः बांधली व सकाळीं आपण येईपर्यंत जयसेनास स्वस्थ निजण्यास सांगून तो परत आपल्या बिऱ्हाडीं गेला.

प्रकरण १४ वें.

द्वंद्व.

दुसऱ्या दिवशीं मोठ्या आग्रहानें वाढलेल्या अनेक उत्तम पदार्थांचें भोजन करून जयसेन आपल्या चुलतीच्या महालांत गेला. त्यानें रात्रीं राजवाड्यांत घडलेला प्रकार तिला सांगितला. तो ऐकून तिला रडूं आलें; पण ती वीरपत्नी होती. महान् संकटप्रसंगीं, परत येण्याची आशा नाहीं अशा वेळीं, तिनें कांतिचंद्रास उत्तेजन देऊन समरास पाठविलें होतें. जयसेन तिला प्राणाहून प्रिय होता पण त्यानें निश्चित केला तोच शहाणपणाचा मार्ग होय हें ती जाणून होती. त्यामुळें मत्सरी

लोकांचीं तोंडें बंद होतील आणि स्वतःच्या व कुलाच्या नांवाला लाग-णारा कलंक नाहींसा होईल हें ती समजून होती. ती ह्मणाली, " जय-सेन ! मला तुझा पूर्ण भरंवसा आहे. आणि आपल्या परमपूज्य राणीनें तुला आशिर्वाद दिला आहे. " तिनें त्याच्या मस्तकावर हात ठेवला व देवाची करुणा भाकली.

तो ह्मणाला, ' काकू ! आज द्वंद्व होऊन दैवाच्या प्रतिकूलतेनें कदाचित् मी पडलों तर— ह्मणून तुला माझी एक विनंति आहे. जलदुर्गास ज्यानें माझा प्राण वांचविला तो विलासराजाच्या वेळीं अंधा करून कैदेंत टाकलेला राजवैद्य सोमदत्त आहे असें मला कळलें आहे. त्याला एक नात आहे. त्या भयंकर रात्रीं तिनेंच माझी शुश्रुषा केली. ती अजून एक अजाण बाला आहे. तिनें मजकरतां जे कष्ट सोसले त्याचें उतराई झालें पाहिजे. त्या अंध वैद्यास आणण्याला सज्ञीमाता लवकरच आज्ञा करणार आहे. तीं दोघें लवकरच येऊन दाखल होतील ती अजाण सुंदर बालिका ह्या अफाट दुष्ट शहरांत एका-किनी असणार. तिला अद्याप जगाचा अनुभव नाहीं—'

जयसेनाला पुढें बोलवेना. त्यानें आपल्या चुलतीकडे एकवार अश्रु-पूर्ण नयनांनीं पाहिलें. त्या पहाण्यांतच पुढला सर्व अर्थ व्यक्त झाला. रात्रीं झोपेंत लीलेचें नांव त्याच्या मुखांतून निघतांना तिनें ऐकलें होतें. लीलादेवीला आपल्या मुलीप्रमाणें वागविण्याचें वचन तिनें जय-सेनास दिलें. तेव्हां जयसेन बोलला, " माझ्या अंतःकरणावर एवढेंच ओझें होतें. मीं तिच्या पितामहाला वचन दिलें होतें. आतां माझ्या जिंदगीची वाटेल ती व्यवस्था करण्यास काका मुखत्यार आहेत. "

' बरें, तूं दरबारांत जाण्यास निघशील तेव्हां मी तुला भेटेन हं ! '

" नको. नको, कदाचित तुझे त्यावेळचे सजल नेत्र व चिंतातुर मुद्रा पाहून माझें मन कचरेल. मला आतां पूर्ण शांतता पाहिजे. नव्हे कां ? " नमस्कार करून त्यानें चुलतीचा सप्रेम निरोप घेतला.

शुभ वेळेला कुलदेवतेचें स्मरण करून तो निघाला सुवर्णमहालाबाहेर प्रत्येक सरदाराचे अनुयायी आपापलें निशाण घेऊन उभे होते. कित्येक हत्ती फार उतावळे झाले होते; कित्येक चीत्कार करीत होते; कित्येक

आपल्या शुंडांनीं क्रीडा करीत होते. आणि दुसरे कित्येक शांतपणें उभे होते. हत्तींचे महात त्यांना शिकविलेल्या गमती त्यांजकडून करवीत जवळ उभे असलेल्या प्रेक्षकांचें रंजन करीत होते. स्वारांचीं चिलखतें, शिरस्त्राणें, भाले, तरवारी सूर्यप्रकाशांत चमकत होत्या. त्यांच्याकडे मनुष्याला पहावेना. नानाजातीय सैनिकगण तेथें होता. त्यांतच भिल्लांचें एक पायदळ पथक तेथें होतें. त्यांचा नेहमींचाच साधा पोषाख होता; पण त्यांच्याकडे प्रेक्षकांचें लक्ष वेधल्याविना रहात नसे. त्यांची शरीरयष्टि तशीच मजबूत होती. तेथून जातांना आपला किसन असेल काय, तो असता तर किती बरें होते, असें जयसेनाच्या मनांत येऊन त्यानें तपास करविला; पण किसन आला नव्हता. तो आपल्या लोकांसह पश्चिमेस गेला होता इतकेंच त्यास कळलें. जयसेन दरबारांत आपल्या आसनावर जाऊन बसला. तो भव्य दिवाणखाना सरदार, राजपुरुष, नागरिक यांनीं गच्च भरला होता. निरनिराळया सेनाविभागांचे नायकहि तेथें होते. मंत्रीमंडळ आपल्या स्वच्छ पोषाखांत विराजत होतें. जयसेनाच्या समोर चंद्रकेतूच्या पक्षांतली मंडळी होती. त्यांतच आकुतराय एका श्रेष्ठ आसनावर स्थित होता. जयसेन आला तेव्हां त्या सर्वांनीं त्याजकडे क्रुद्ध मुद्रेनें पाहिलें व आकुतरायानें तर ऐटीनें मिशास पीळ भरला. गजसिंहानें तंटा करतील अशा संशयास्पद मंडळींत रक्षक उभे केल्यानें दंगा होण्याचा फार थोडा संभव होता. मध्यभागीं एका उंच स्थानीं राजा, राजवंशांतील पुरुष, कुलगुरु व मुख्य प्रधान यांचीं आसनें होतीं. बाजूला राजस्त्रिया व इतर स्त्रिया यांना बसावयाला जागा होती.

थोडया वेळानें राणी चंद्रावती येऊन राजसिंहासनावर विराजमान् झाली. नित्य कारभारास प्रारंभ झाला. कागदपत्रांवर राजमुद्रा वठविण्यांत आल्या. परराष्ट्रांतून आलेल्या दूतांचीं कामें आटपलीं. कामगिरीवरून आलेले सरदार प्रणाम करूं लागले. जयसेनानें जाऊन प्रणाम केला. राज्ञीनें त्याच्या तरवारीस स्पर्श करून ती परत केली. जयसेन परत जागेवर येत असतां चंद्रकेतूच्या मंडळीजवळून त्याला यावें लागलें. तेव्हां ते सर्वजण क्रोधदृष्टीनें त्याजकडे पहात होते. त्यांच्यांत

थोडी हालचालहि झाली; पण जयसेन तिकडे लक्ष न देतां शांतपणानें आपल्या आसनावर, येऊन बसला. जवळच असलेला त्याचा एक मित्रसरदार ह्मणाला, " ते फार वेळ गप्प बसणार नाहींत. चंद्रकेतूच्या मृत्यूचा सूड घेण्यास ते परस्परांशीं बद्धप्रतिज्ञ झाले आहेत; पण जयसेन ! तूं भिऊं नकोस. तुलाहि पुष्कळ मित्र आहेत. "

' भीति ! भीति कशी ती मला मुळींच माहीत नाहीं. थोड्याच वेळांत काय होईल तें पहा. राज्ञीमातेसमक्ष दंगा न होवो ह्मणजे झालें. ' जयसेनानें उत्तर केलें.

अर्जदारांना पुकारतांच आकुतराय उठून ताठ उभा राहिला. तो आपल्या कर्कश स्वरानें सरकारला स्वतः अर्ज देण्याची परवानगी मागूं लागला. राणी मधुर स्वरानें ह्मणाली, ' त्याला येऊन बोलूं द्या. '

एक मंत्री बोलला, ' सरकारशीं त्याला नीट बोलतां येणार नाहीं. त्याचा अर्ज वाचून दाखवूं. तो अर्ज इकडे आण. ' आकुतरायाला तो ह्मणाला.

' तो सरकारला मिळणार नाहीं. कोणी मध्येंच नाहींसा करील. मी फक्त सरकारच्याच हातीं तो देईन. ' असा जबाब देऊन चमत्कारिक मुद्रा करीत तो मिशांवर पीळ देत उभा राहिला.

' त्यालाच येऊं द्या. ' राणी हात पुढें करून ह्मणाली. आकुतरायानें संतोषून प्रणामपूर्वक अर्ज दिला. 'आपणांस आमचा अर्ज मिळाला. आतां आह्मी न्याययाचना करीत आहों. आह्मांस न्याय न मिळाला तर तो आह्मी स्वतः घेऊं. ' तो उद्धटपणें ह्मणाला.

अशा औद्धत्याचा परिणाम दुसऱ्या एखाद्यावेळीं ज्या वटवृक्षावर राज्यद्रोही व खुनी फांशीं देतात तेथें जाण्यांतच झाला असता. कांहीं सेवक त्यास धरण्यास उठलेहि, पण राणीचा आवाज पुनः ऐकूं आला. पक्षपाताचा संशय घेण्यासहि जागा राहूं नये ह्मणून तिनें असाधारण शांतता धारण केली होती. आकुतरायाला धरण्यास धांवलेल्या रक्षकांना थांबवून ती ह्मणाली, " तो आमचा अपमान करूं इच्छित नाहीं. तो अडाणी आहे इतकेंच. त्यास हात लावूं नका. त्याला जागेवर जाऊं द्या. त्याचा अर्ज आतां सुनावला जाईल. "

आकुतरायाच्या दोन तीन सोबत्यांनीं त्याला बळेंच जागेवर नेऊन बसविलें. अर्जांत जयसेनावर चंद्रकेतूच्या वधाचा आरोप असून युद्धांत कातरता केल्याचेंहि ध्वनित केलें होतें. अर्ज ऐकल्यावर राणी ह्मणाली " जयसेनालाच जबाब देऊं द्या. आमच्यासमोर येऊन त्यास खरी हकीकत स्पष्ट सांगूं द्या. "

जयसेन शांत मुद्रेनें सिंहासनासमोर येऊन उभा राहिला. त्यानें सांगितलेली हकीकत वाचकांस माहीत असल्यानें येथें त्याची पुनरुक्ति करण्याची जरूर नाहीं. त्यानें सर्वांना मित्र व बांधव संबोधन आपल्या भाषणास सुरवात केली. आणि ' जर मी दोषी असेन तर मला जिवंत ठेवूं नका. ईश्वरी इच्छेनुसार वागण्यास मी तयार आहें सरकाराकरतां मी कशाहि तऱ्हेनें मेलों तरी काय हरकत ? ' असा त्यानें समारोप केला. त्यानें आपली बाजू इतक्या उत्तम रीतीनें सांगितली कीं, सर्वत्र आनंदोद्गार ऐकूं येऊं लागला. जयसेन निर्दोषी आहे असेंच प्रत्येकास वाटलें; पण चंद्रकेतुपक्षीय सर्व लोक एका मनुष्याप्रमाणें एकदम उभे राहिले. सर्वांनीं यंत्राप्रमाणें एकाक्षणीं तरवारी उपसल्या. एक जण ह्मणाला, ' त्याची जीभ मोठी लबाड आहे. ' आकुतराय बोलला, ' तो महा गोडबोल्या आहे. आपण त्याची जीभच कापून टाकूं. '

गजसिंहानें राणीस उठून जाण्याची विनंति केली. तो ह्मणाला, ' मी या भांडखोरांना पाहून घेतों. कांहीं झालें तरी रात्रीच्या अपराधाबद्दल मी आकुतरायास कैद करीन. '

' वा: ! गजसिंह ! अशानें तर रक्तपातास लागलाच आरंभ होईल. जें टळावें ह्मणून प्रयत्न, त्यासच आमंत्रण दिल्यासारखें होईल. छे ! आह्मी येथेंच बसतों. ' राणीनें उत्तर केलें.

हा सर्व वेळ जयसेन सभांच्याच जागेवर उभा होता. त्याच्यावर चंद्रकेतुपक्षीयाच्या कृत्याचा कांहींहि परिणाम झाला नाहीं. त्याला एका क्षणांत नाहींसा करण्यास कैक तरवारी तयार होत्या. पण भीतीचें अल्पहि चिन्ह त्यानें दर्शविलें नाहीं . तो शांत व गंभीर होता. त्याच्यावर कोणीहि वार केला नाहीं. तो आपल्या खणखणीत स्वरानें ह्मणाला, " बांधवहो ! इकडे लक्ष द्या. मजवर

चंद्रकेतूच्या घाताचा आरोप आहे; पण मी निर्दोषी आहें. मजवर भ्याड-पणाचा आरोप आहे तो तर त्याहून भयंकर. अपमानास्पद जिणें मी योग्य मानीत नाहीं. त्यापेक्षां मला मृत्यु पत्करेल. माझ्या निर्दोषतेची खात्री झाली नसल्यास आपल्या परमपूज्य राजमातेसमक्ष पूर्वापार वहिवाटीस अनुसरून दिव्य होऊं द्या अशी मी विनंति करतों. माझ्यावर आरोप करणारांपैकीं मजशीं सामना करण्यास कोण तयार आहे ? आतांच त्या समोरच्या मैदानांत सर्वसाक्षी प्रभूला माझा न्याय करूं द्या. हा पहा मी तयार आहें. "

" शाबास ! तुला कोणी शत्रु नाहीं. " असा शब्द उत्पन्न झाला. " पण मला शत्रु आहेत. मला काल अगोदर सूचना मिळाली नसती तर मी आपणांसमोर आतां जिवंत उभा नसतों. खुद्द राजवाड्याच्या आंत काल माझा घात होणार होता. मला मारणारा माझ्यासमोर उभा आहे. त्याच्याशीं मरेपर्यंत युद्ध करण्यास मी तयार आहें. " जयसेनानें आकुत-रायाकडे अंगुलिनिर्देश करून झटलें.

" मी त्याजबरोबर लढणार नाहीं. तो मोठा जादुगार आहे. " आकुतराय बोलला.

' तूंच लढलें पाहिजेस. तूंच त्याचा घात करीत होतास असें त्यानें झटलें आहे. पहाहो मंडळी ! ' कमरपट्ट्यांतून एक खंजीर काढून गज-सिंह झणाला, ' हा खंजीर कोणाचा आहे हें सर्वांस माहीत आहे. हें पहा, त्याचें टोंक तुटलें आहे तरी देवदयेनें जयसेन जिवत आहे. '

आकुतराय कांहींसें पुटपुटला.

' आकुतराय ! तुजवर खुनाच्या प्रयत्नाचा आरोप आहे. तूं जय-सेनाशीं सामना करण्याचें नाकारशील तर तूंच भ्याड आहेस. ईश्वर-साक्ष तुला, त्याला किंवा आह्मांला जाब द्यावा लागेल. कारण; आम-च्यांत खुनी माणसें नको आहेत. ' चंद्रकेतुपक्षांतला एक वृद्ध वीर झणाला.

आकुतरायाचा निरुपाय झाला.

' चल, आकुतराय ! भ्यालास काय ? तूं वीर आहेस; वीराप्रमाणें तयार हो. आणि अद्यापहि तूं रेंगाळत असशील तर ह्यानें तरी मला त्वेष

येऊं दे. ' असें म्हणून जयसेनानें आकुतरायास आपल्या तरवारीच्या टोंकानें स्पर्श केला.

दोन घटकेंत समोरच्या मैदानांत सर्व तयारी झाली. लोक आपापल्या जागयावर बसले. जयसेन घोड्यावर स्वार झाला. त्यानें आपली ढाल व तरवार हातांत घेतली. तो प्रेक्षकापुढून जात असतां ' परमेश्वर तुझें रक्षण करो. ' असे उद्गार निघत होते. आकुतरायाहि तयार झाला. त्यानें लगाम खेंचून खेंचून आपल्या घोड्याला इतका त्वेष आणला कीं, तो अगदीं अनावर झाला. त्यानेंच प्रथम सुरवात केली. त्यानें घोड्याला भरधांव जयसेनावर घातलें. त्याच्या मनांतून जयसेनावर गर्दी उड-वावयाची होती; पण अशानें गोंधळून जाण्याइतका कच्चा वीर जयसेन नव्हता. आकुतरायानें पहिला हल्ला प्रेक्षकांच्या जवळ मैदानाच्या एका कोंपऱ्यांत केला; पण जयसेनानें घोड्यास चटकन् वळवून मध्यभागीं नेलें. त्यामुळें मैदानाच्या मध्यें सामना करणें भाग झालें. आकुतरायानें आपली नेहमींची खंजीरवजा आंखूड तरवार घेतली होती. तिच्या सहायानें त्यानें आजवर पुष्कळ विजय मिळविले होते. त्याची ढालहि फार मोठी होती. ती पुढें धरली असतां तो बहुतेक झांकला जाई. ह्या प्रसंगीं जयसेनाला त्याच्या लांब शस्त्रांचा फायदा मिळाला. त्यानें आकु-तरायास जवळ येऊंच दिलें नाहीं. बारंवार बदलणारी जयश्री यथार्थ-तेनें कोण वर्णन करूं शकेल ? प्रत्येक जण दरक्षणीं हल्ला करतांना, मागें परततांना, वळसा घेतांना, पुनः भिडतांना दिसत होता. एकदां जयसेनाची सरशी वाटावी तर दुसऱ्यावेळीं तो परा-जित झालासा दिसावा. दुसऱ्या एखाद्या सशक्त मनुष्याला सुद्धा आकुतरायापुढें टिकाव धरवला नसता; पण जयसेनानें त्याचे सर्व वार कौशल्यानें निष्फळ केले. राजमाता चिंतातुर होऊन आतुरतेनें सर्व प्रकार पहात होती. जयसेन अगदीं हताश झाला होता. इतक्यांत आकुतरा-यानें पुनः चढाई केली, तेव्हां योग्य संधीची वाट पहात असलेल्या जय-सेनानें आपली लांब पण निरुंद तरवार, आकुतरायाचें शिरस्त्राण एका बाजूला कलल्यामुळें कानाखालीं उघड्या दिसलेल्या जागेंत जोरानें खुपसली. तेथून रक्ताचा लोट बाहेर आला आणि तो धिप्पाड वीर धराशायी झाला.

तो पुनः उठला नाहीं. गजसिंह युद्धभूमींत आला. आकुतरायाच्या शरीरावर एक सुवर्णमुद्रिकांनीं भरलेली पिशवी सांपडली व कमरेस दुसऱ्या एका पिशवींत पुष्कळसे कागदपत्र मिळाले. ते सर्व जयसेनाच्या स्वाधीन करून गजसिंह ह्मणाला, " जयसेन ! पराभूत वीराच्या वस्तु तुझ्या आहेत. ह्या घे. हे कागदपत्र स्वतः राज्ञीमातेला नेऊन दे. कदाचित् हा चंद्रकेतूचा महत्वाचा पत्रव्यवहार असेल. चंद्रकेतु स्वामीद्रोही होता हें तुझें ह्मणणें आयतें सिद्ध होईल. "

जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला. जयसेन आपला घोडा नाचवीत सर्वांना प्रणाम करीत चालला. राणीच्या आनंदास पारावार नव्हता. ती आपल्या धर्मपुत्रास भेटण्यास फारच उत्सुक झाली होती ! तो तिला प्रणाम करण्यास गेला असतां तिच्या नेत्रांत आनंदाश्रु उभे राहिले. ती ह्मणाली, " वत्स ! ईश्वरानें सर्व लोकांसमक्ष तुजवरच्या आरोपाचें निरसन केलें आहे; तोच तुला चिरायु करो. "

देवशर्मनूनींहि ' तथास्तु ' ह्मणून पुष्टि दिली.

चंद्रकेतुपक्षाचा वृद्ध सरदार राज्ञीस ह्मणाला, " ईश्वरानें योग्य न्याय केला; त्याचा न्याय आह्मी पत्करतों. " जयसेनास आपली तरवार देऊन तो बोलला, " वीर जयसेन ! मी आमच्या सर्व लोकांच्या वतीनें आपली व राजगादीची क्षमाप्रार्थना करतों. आह्मीं आपल्यावर खोटा आरोप केला याचें आह्मांस वाईट वाटतें. आमचा नायक आपल्या हातून मारला गेला यामुळें आपल्यावर आरोप करावयाला जसें आह्मी तयार झालों तसेंच आतां सहायप्रसंगींहि आह्मीं आपल्यापुढें असूं. आपल्याबद्दलचें आमचें प्रेम, आपल्यावरील आमची निष्ठा एखाद्या योग्य प्रसंगीं दिसून येईल. "

" तुमच्या राजाचें पत्र ऐका. " राणी सर्वांना उद्देशून ह्मणाली. आजच सकाळीं राजाकडून सैनिक आला होता. राजानें पाठविलेल्या पत्रांत मिळेल तितकें सैन्य योग्य सेनानायकासह पाठविण्याबद्दल मजकूर होता. बंडाचा बिमोड झाल्यानें निराश होऊन कांतिनगरचा नरेश युद्धास चालून येत होता व राजसैन्यांतले बरेच सैनिक तापाच्या सांथीनें युद्धास निरु-

पयोगीं झाले होते. पत्र वाचून झाल्यावर राणीनें ह्मटलें, ' सरदार हो ! आम्हीं जयसेनाला या कामगिरीवर पाठविण्याचें ठरविलें तर तें अयोग्य होईल काय ? खचित नाहीं. '

सर्वांनीं ह्या योजनेस संमति दिली. जयसेनाला आधिपति नियत करण्यांत आलें. सर्वांनीं त्याचा जयजयकार केला. त्या जयजयकारांत बाहेरचे सैनिक सामील होऊन त्यानें अंतराल व्यापून टाकलें. जग हें असें आहे ! ज्या जयसेनावर थोड्या वेळापूर्वी खून, द्रोह, कातरता इत्यादि आरोप केले जाऊन जो सर्वांच्या तिरस्कारास पात्र झाला होता तोच जयसेन आतां सर्वत्रांस प्रिय वाटूं लागला; त्याच्या जयजयकारानें लोक दशदिशा कंपित करूं लागले; त्याचीं स्तुतिगीतें ह्मणण्यांस येऊं लागलीं.

जयसेनानें राज्ञीमातेस दिलेल्या कागदपत्रांत कांहीं पत्रें मागधीभाषेंत होतीं, ह्मणून तिनें जयसेनास सूर्यमणीला रात्रीं मंत्रिसभेच्यावेळीं आणण्याची आज्ञा केली. ती ह्मणाली, " आह्मी त्याचा असाच उपयोग करून घेऊं इच्छितों. रामगडच्या दुर्गपतीनें त्याची फार स्तुति केली आहे. पाहूं या. " राज्ञीमातेची आज्ञा घेऊन जयसेन घरीं गेला.

प्रकरण १५ वें.

घरीं.

जयसेनास आपण विजयी झालों ह्यापेक्षां आपण निर्दोषी ठरलों, ह्याचाच विशेष आनंद वाटत होता. त्याला पहातांच त्याच्या चुलतीस कितीतरी आनंद झाला ! सर्व हकिकत समजल्यावर ती ह्मणाली, ' काय ! इतक्या लवकर तूं मला सोडून जाणार ! तूं कांहीं दिवस रहावेंस अशी माझी इच्छा होती; पण तूं राजकार्य केलें पाहिजेस. मग तूं आपलें कर्तव्य करीत असतां मला कां वाईट वाटावें ? बरें, पण राजमाता काय ह्मणाली ? '

' ती मजकरतां रडलीसुद्धां. मी तिच्याजवळ गेलों तेव्हां तिचें अंतःक-

रण आनंदातिशयानें भरून आलें. तिनें मला राजाच्या मदतीला जाण्याची आज्ञा केली, तेव्हां ह्या तुझ्या पुत्राला किती धन्यता वाटली बरें !' तो माझा अत्यंत सन्मान झाला. ती कामगिरी मजकडून नीट बजावली जावो ! ' जयसेनानें उत्तर दिलें.

' जा, बाळ ! राज्ञीमाता आज्ञा करील तिकडे जा आणि आपल्या चुलत्याप्रमाणें यशोधन संपादन कर. ते बौद्ध वैद्यराज तुझी वाट पहात आहेत. ' तिनें ह्मटलें.

जयसेनाला आपल्या महालांतच सूर्यमणि आढळला. चिलखताच्या वजनानें त्यास दुःख वाटत होतें; पण जखम दुखावली नव्हती. जखम तपासून झाल्यावर सूर्यमणि ह्मणाला, " जखमेस इजा झाली नाहीं हें भाग्यच ह्मणावयाचें ! पण तुह्मीं द्वंद्व कां केलें ? बंडखोरांचा कसाहि नाश केला ह्मणून काय हरकत ? त्यांच्याशीं युद्धनियम पाळण्याची जरूर नसते. "

" होय; पण बंडखोरांशीं चंद्रकेतूचा संबंध होता ह्या ह्मणण्यास अजूनाहि लेखी प्रमाण मिळालें नाहीं व तसें आतां सिद्ध झालें तरी मीं त्याला मारलें तेव्हां तो द्रोही ठरला नव्हता. बंडखोर नसलेला कोणताहि इसम एखाद्यानें मारला तर त्याची चौकशी झालीच पाहिजे असा आमच्या राष्ट्राचा नियम आहे. राजासहि ती बंद करतां येत नाहीं. आणि मीं वीरनियम उल्लंघून चंद्रकेतूचा घात केला नाहीं हें सिद्ध करण्यास माजजवळ कोणी साक्षी नव्हता. असो, तुह्मी आज रात्रीं राज्ञीदर्शनास जाण्याची तयारी करा. राज्ञीमाता कांहीं महत्वाच्या बाबतींत तुमची भेट घेऊं इच्छिते. मला तुह्मांला घेऊन येण्याची आज्ञा झाली आहे. "

सूर्यमणीनें प्रश्न केला, " कशाकरतां बोलावलें आहे ? आमच्या रामगडच्या विहारानें कांहीं अपराध केला नाहींना ! विहारावर राज्ञीचा रोष झाला नाहीं ना ? "

जयसेनानें उत्तर दिलें, " आकुतरायाजवळ कांहीं पत्रें सांपडलीं आहेत. त्यापैकीं कित्येक तुमच्या भाषेंत आहेत; निदान तुमच्या लिपींत आहेत. त्या पत्रासंबंधीं कांहीं माहिती कदाचित् देऊं शकाल. "

" तुमचा प्रतिस्पर्धी उंच बळकट व कृष्णवर्ण होता काय ? " या प्रश्नास होकारार्थी उत्तर मिळाल्यावर सूर्यमणि ह्मणाला, " तर मग कांहीं महिन्यांपूर्वी अशा प्रकारचा मनुष्य रामगडास आला होता. तो एका मोठ्या घोड्यावर बसला होता. त्याजबरोबर थोडे लोक होते. तो पहिल्यानें मजकडे आला होता ह्मणून मला तो दिसला; पण त्यानें आणलेल्या पत्रावर कृष्णमूर्तीचें नांव असल्यानें मी त्याला त्याच्याकडे रवाना केलें. "

" सूर्यमणि ! ही फार महत्वाची बातमी तुह्मीं सांगितली. कृष्णमूर्ति व तो ह्या दोघांचें काय खलबत झालें ? " जयसेनानें प्रश्न केला.

' तें मला कोठून माहीत असणार ? चंद्रकेतु व कृष्णमूर्ति यांचें कांहीं कारस्थान चाललें आहे त्यापासून मीं अलिप्त रहावें असें एकदा दुर्गपतीनें ध्वनित केलें होतें; पण कृष्णमूर्ति कांहीं कारस्थान करीत असला तरी तो एकटा काय करूं शकणार ? ' सूर्यमणीनें प्रश्न केला.

जयसेन हंसून ह्मणाला, " सूर्यमणि ! तुह्मी फार देवमार्गी माणसें. तुमच्या राष्ट्रांतून सैन्य आणून मदत करण्याचें कबूल केलें ह्मणजे त्याला द्रव्य मिळेल. "

सूर्यमणि मध्येंच ह्मणाला, " पण सैन्य त्यास कधींच मिळणार नाहीं, ज्या राष्ट्राशीं आमचा स्नेह असतो त्या राज्यांत ढवळाढवळ न करण्याचा आमच्या राजसत्ताधाऱ्यानें पूर्ण निश्चय केला आहे. "

" तरी पण तुह्मी एक वीरराष्ट्र आहां. त्या तुह्मांला महत्वाकांक्षा नसेल हें जरा चमत्कारिक दिसतें. " जयसेन उद्गारला.

" पण त्यामुळें आमचा नाश होईल. आमच्या शहाण्या पुरुषांनीं आमचा मार्ग अगदीं नियमबद्ध केला आहे. आह्मी वेळ आली तर स्वतःचें संरक्षण मात्र करतों. " सूर्यमणीनें उत्तर दिलें.

' होय; कांतिनगरकरांना त्याचा पूर्ण अनुभव आहे; असेंच नव्हे कां ?' जयसेनानें व्यंजकस्वरानें विचारलें. " बरें; तें असो. मी बोलावीन तेव्हां तुह्मी तयार असा. तुमची भगिनी बरी आहे ना ? " जयसेनानें पुढें ह्मटलें.

" ती आपली फार आभारी आहे. ती ह्याला स्थापण्याच्या

विचारांत आहे. आम्हीं सुचवलेल्या सुधारणांबद्दल आमच्या लोकांना संतोष होत आहे. ''

' सूर्यमणि ! सावध असा. नाहीं तर तुमच्या तीव्र लोककल्याणेच्छेनें तुम्ही विजयपूरकरांत असूया उत्पन्न कराल; व एकदां कां ते असूयेनें ग्रस्त झाले म्हणजे कोठवर परिणाम जाईल याची कल्पना करणेंहि शक्य नाहीं. सावधपणें वागा म्हणजे झालें. ' जयसेनानें मित्रत्वाच्या नात्यानें सूचना केली.

सूर्यमणि परत बिऱ्हाडीं गेला. त्यानें झालेली हकीकत मनोरमेला कळविली नाहीं; पण शिराळशेटी मनोराज्याचे त्याचे विचार ढासळले. सावधगिरीनें वागणें अवश्य आहे हें त्यास दिसून आलें.

संध्याकाळीं बागेंतील पुष्करिणीच्या कांठीं एका शुभ्र पाषाणाच्या चबुतऱ्यावर शीतल वायु सेवन करीत जयसेन बसला होता. इतक्यांत किसन येऊन आपल्या तरुण धन्याच्या पायां पडला. तो म्हणाला, ' महाराज ! मी वेळेवर आलों नाहीं. तुम्हीं त्या दुष्टाला कसें मारलें हें मला पहावयास मिळालें नाहीं. मजबरोबर बंदिवान् असल्यानें मला लवकर येतां आलें नाहीं. मला कालच्या मुक्कामावर कळलें कीं, तुम्हांस येऊन एक दोनच दिवस झाले. इतके दिवस तुम्हाला कां लागले ? '

' किसन ! आम्ही निघाल्यावर पांचव्या दिवशीं माझा घोडा अडखळला. तो नीलवर्णानें दिला होता. आम्ही दोघे पडलों. त्यामुळें जखम पुनः नादुरुस्त झाली; आणि त्या बौद्ध भिक्षूनें बरें होई-पर्यंत प्रवास करण्याची मनाई केली. स्थलकोटाहून एक महिनाभर आम्हांस हलतां आलें नाहीं. ' जयसेन सांगूं लागला.

' काय ? माझ्या गांवापासून इतक्या जवळ ? मग मला कां बोलावलें नाहीं ? '

' तुझा तपास केला; पण तूं पश्चिम प्रदेशांत राजकार्यास गेला आहेस म्हणून कोणीं सांगितलें. मग पुनः तुला बोलावणें पाठविलें नाहीं. ' जयसेनानें उत्तर दिलें.

' त्या वृद्ध अंधाची हकीकत तुम्हांस माहीत नाहीं तर मग; कां तो तुमच्याकडे आहे ? ' किसननें प्रश्न केला.

त्याच्या प्रश्नानें दचकून जयसेनानें विचारलें, ' छे ! तो येथें नाहीं. त्याचें कांहींच वर्तमान मला समजलें नाहीं. तो कोठें आहे ? त्याची काय हकीकत आहे ? '

' तुह्मी जलदुर्गास होतां तेव्हांच मी कामगिरीवर गेलों होतों. तुह्मी गेल्याचें मला मागाहून कळलें. नंतर एका सणाकरतां मी घरीं आलों असतां मला त्या वृद्ध साधूचें बोलावणें आलें. मी गेलों. लीलादेवीला नीलवर्णानें किल्ल्यावर धरून नेलें होतें. मी तिला किल्ल्यांतून सोडवून आणलें. त्यावेळीं नीलवर्णास ठार केलें नाहीं याचें मला वाईट वाटतें. ' किसननें सांगितलें.

अमंगल कल्पनांनीं वित्रस्त होऊन जयसेनानें अधीरतेनें प्रश्न केला, ' पण ती सुरक्षित आहे ना ? तिचें निर्मल चारित्र्य पापकलंकानें दूषित झालें नाहीं ना ? '

" ईश्वराची कृपा ! त्यानें तिला पवित्र ठेविलें. मी गेलों त्याच दिवशीं सायंकाळीं नीलवर्णानें तिच्याशीं लग्न करण्याचा प्रयत्न केला. पण पुरोहितानें लग्न लावण्याचें निस्पृहपणें नाकारल्यानें तो समारंभ— समारंभ कसचा ! समारंभाची थट्टाच ती, लांबणीवर पडली. मला वेळ सांपडला व मी माझ्या सोबत्यांच्या मदतीनें वाघाच्या गुहेंतून तिला घेऊन आलों. त्या बाजूनें आमचा पाठलाग करण्याची कोणाची ताकद होती ? "

एक निःश्वासहि न टाकतां चिंतायुक्त मुद्रेनें जयसेनानें विचारलें. ' मग पुढें ? '

' मीं संध्याकाळींच साधूचें बिऱ्हाड होडींत नेऊन ठेवलें होतें. लीलादेवीला रात्रीं आणल्यावर आह्मीं सर्वजण कृष्णेपार झालों. माझ्या एका खेड्यांत त्यांच्या रक्षणार्थ माझे लोक देऊन त्यांस ठेवलें. '

' मग, आतां तीं दोघें तेथें आहेत ना ? '

" छे ! मला त्याचेंच वाईट वाटतें. मी पुनः राजकार्याला गेलों. त्या साधूला तेथें चैन पडेना. नीलवर्णानें त्यांचा तपास काढण्यास दूत पाठविले. एकदां त्यानें स्वतः तपास करण्याचा प्रयत्न केला. पण आह्मीं भिल्लांनीं एकदा नको म्हटल्यावर कृष्णमाता उतरून येण्याची कोणाची छाती आहे ? "

" किसन ! खरेंच, देवाची कृपा. त्यांच्या बचावाबद्दल तुझेसुद्धां आभार मानले पाहिजेत. त्या अनाथ मुलीची बेअब्रू झाली असती तर ! हें नीलवर्णाचें अत्यंत नीच कृत्य होय; पण तिला जबरीनें नेलें त्याबद्दल तुझी खात्री आहे काय ? " जयसेनानें प्रश्न केला

" त्याबद्दल संशय नको. शिवदासानें तिला बुरुजावरून धरून नेले. तेथें ती नेहमींप्रमाणें मौज पहावयास गेली होती. त्या सत्वशील पुरोहितानें हरकत घेतली नसती तर लीलादेवी आज नीलवर्णाच्या अंतःपुरांत असती. निदान मला त्यावेळीं रक्तपात करावा लागता. " किसननें उत्तर दिलें.

जयसेन क्रोधसंतप्त होऊन म्हणाला, " नीलवर्णाच्या ह्या कृत्याची चौकशी राज्ञीमाता करील. "

" इतर गोष्टींबद्दलहि त्यास जाब द्यावा लागेल. " असें म्हणून किसननें कांहीं कागदपत्र जयसेनाच्या हातांत दिलें. तो म्हणाला " हे चंद्रशेखर व नीलवर्ण ह्यांच्या पत्रव्यवहाराचे कागद आहेत. आजपर्यंत त्या मोठ्या वटवृक्षावर लटकलेल्या अनेक स्वामीद्रोही पुरुषांसारखी नीलवर्णाची स्थिति होण्यास ते पुरेसे होवोत ! तुम्हांला राजाच्या मदतीस यावयाचें नसतें तर दरबारकडून नीलवर्णाला येथें बोलावणें बरें होतें. पण आतां तो येथें आल्यास तुम्हांविरुद्ध कट करील, आणि त्या साधूचा तपास लागल्यास तो लीला देवीला पळविण्यास कमी करणार नाहीं. तो आहे तेथेंच चांगला सुरक्षित आहे. महाराज ! मला तुम्हांबरोबर युद्धास येऊंद्या. माझे लोक तुमच्यांबरोबर येण्यास अति उत्सुक झाले आहेत. "

प्रेमानें केलेली ही मागणी जयसेनास अर्थातच नाकबूल करतां आली नाहीं.

प्रकरण १६ वें.

मंत्रीसभा.

रात्रीं जयसेन सूर्यमणीसह कालच्या वेळींच राजवाड्यांत येऊन पोंचला. साधा दरबारी पोषाख करून कमरेला छोटीशी दरबारी तंरवार लटकावून तो आला होता. सूर्यमणीचा पोषाख बौद्ध भिक्षूप्रमाणें नेहमींचाच होता. त्या दोघांच्या पोषाखांत विलक्षण विरोध दिसत होता. भिक्षूच्या तेजस्वी मुद्रेकडे पाहिलें असतां तो थोर घराण्यांतला असावा असें वाटे. जयसेनानें त्यास दरबारचे रीतिरिवाज थोडक्यांत सांगितलें. सभेंत प्रवेश केल्यावरची त्याची प्रथमची वागणूक पाहून राणीस संतोष झाला. तिनें विचारलेल्या कुशल प्रश्नांचीं उत्तरें त्यानें त्याच भाषेंत स्पष्ट दिलेलीं ऐकून राजमातेनें त्यास उत्सुकतेनें प्रश्न केला, ‘ भिक्षु ! तुह्मांला द्राविडीसुद्धां येतें काय ? ’

सूर्यमणीनें नम्रतेनें उत्तर दिलें, ‘ रामगडच्या आमच्या लोकांची तीच भाषा आहे. आह्मी विहारांत तीच भाषा वापरतों. माझ्या भगिनीलाहि ती भाषा येते. त्या भाषेंत आह्मी आमच्या धर्मपुस्तकांचीं भाषांतरें करीत आहोंत. ’

राजगुरु देवशर्मन् नेहमींच्या जागीं बसले होते. ते ह्मणाले, ‘ हर हर ! देवा ! संभाळ. पण, कां हो भिक्षु ! तुमचा धर्म खरा नाहीं ह्मणतात ना ? तुमचीं मतें तर नास्–’

‘ गुरुवर्य ! जरा शांत असा. ’ राणी गंभीर स्वरानें ह्मणाली, ‘ आपण येथें धार्मिक वाद्‌विवादाकरतां जमलों नाहीं. राजकीय कामाकरतां आह्मीं त्यांना पाचारण केलें आहे. आपण स्तब्ध रहावें हें बरें. भिक्षु ! तुमचा धर्म कोणताहि असो. ह्या दरबारांत सर्व मानव समान आहेत. आमचीं कांहीं जरूरीचीं कामें आटपेपर्यंत आपण बसा. नंतर तुमची मदत आह्मांस लागेल. ’

राजगुरु देवशर्मनूच्या शेजारींच फक्त जागा रिकामी होती. एका नास्तिकानें आपल्या शेजारीं बसावें हें अर्थात्‌च त्यांना रुचलें नाहीं. ते होईल तितकी जागा मोकळी सोडून आपल्या शेजाऱ्याला चिकटून बसले.

त्यांनीं तोंडाशीं उपवस्त्र धरलें. आणि अशा रीतीनें भिक्षूच्या सान्निध्याचा दर्शवितां आला तितका तिरस्कार त्यांनीं व्यक्त केला. ह्या योगानें सूर्य-मणि गोंधळांत पडला. पण एका मंत्र्यानें सूर्यमणीची स्थिति जाणून आपली जागा त्यास दिली व आपण देवशर्मन्च्या शेजारीं बसला. त्यामुळें थोडा वेळ शांतता झाली; पण राजगुरूच्या असहिष्णु स्वभावानें केव्हां तिचा भंग होईल हें निश्चित नव्हतें. सैन्याच्या खर्चाक-रतां कोशाधिकाऱ्यांना द्यावयाच्या हुकमावर राणीच्या व प्रधान मंत्र्यांच्या सह्या व्हावयाच्या होत्या. ठिकठिकाणच्या राजपुरुषांना सैन्याच्या रसदीचा बंदोबस्त करण्याच्या आज्ञा द्यावयाच्या होत्या. नेहमींचें वसुलाचें कामकाज, परराष्ट्राचा पत्रव्यवहार व इतर किरकोळ कामें व्हावयास बराच वेळ लागला. सूर्यमणीस जागा दिलेला मंत्री त्याचें काम संपलें तेव्हां जातांना त्यास ह्मणाला, 'मी जातों; पण राज्ञीमाता बोलावीपर्यंत येथेंच असा. मात्र राजगुरूंना संभाळा. राज्ञी-मातेसमक्षहि ते तुमच्याशीं भांडण्यास कमी करणार नाहींत. त्यांना पर-धर्मीयाची मोठी चीड आहे आणि त्यांच्याशीं बोलण्यांत अर्थ नाहीं.'

'पण ते आमच्या धर्माची निंदा करूं लागले तर?' सूर्यमणीनें प्रश्न केला.

'तरीहि, मी सांगतों, तुह्मी बोलूं नका. राज्ञीमातेच्या आज्ञेशिवाय एकहि शब्द उच्चारूं नका.' मंत्र्यानें सांगितलें.

तरी वेळच आल्यास धर्माच्या बाबतींत वादविवाद करण्याचा सूर्यम-णीचा निश्चय पालटला नाहीं. तो बौद्धधर्माचा उपदेशक होता. त्यानें श्रीबुद्धाच्या धर्माचा प्रसार करण्याचें व्रत धारण केलें होतें!

जयसेन सैन्याच्या व्यवस्थेबद्दल निरनिराळ्या सूचना करण्यांत गुंतला होता. त्याला देशाची जी राजकीय स्थिति माहिती नव्हती व जी इतरत्र कळाली नसती ती सर्व समजली. जय-सेनाची मान्यता, सामर्थ्य व कौशल्य पहातां त्याची नेमणूक झाली हें सूर्यमणीस योग्य वाटलें. आपल्याला व आपल्या भगिनीस या शहरांत एकाकी रहावें लागणार हें मनांत येऊन त्यास क्षणभर चिंता वाटली. पण जयसेनावर त्याचा इतका विश्वास होता कीं, तो आपली व्यवस्था केल्या-

शिवाय जाईल हें त्यास संभवनीयच वाटेना. सभेचें नित्याचें काम संपलें. आतां सकाळीं मिळालेल्या कागदांचा विचार व्हावयाचा होता.

किसननें आणलेलीं पत्रें जयसेनानें त्याजकडून राज्ञीस देवविलीं. राज्ञीनें त्याची हकीकत ऐकून त्यास शाबासकी दिली.

नंतर राणी सूर्यमणीस उद्देशून ह्मणाली, ' भिक्षु ! असे इकडे या व तेथें बसा. ' सिंहासनाच्या शेवटच्या पायरीकडे तिनें बोट केलें.

" हर ! हर !! एका नास्तिकाला सिंहासनाच्या पायरीवर बसावयाचा मान ! दोन भाग्यशाली धार्मिक राजांच्या कारकिर्दी मीं पाहिल्या. पण— "

गजसिंह ह्मणाला, " गुरुवर्य ! आपण स्वस्थ बसावें हें उत्तम. त्यानें तेथें बसणें जरूर आहे. इ:पर सरकारला अडथळा होता कामा नये. सरकार काय करूं शकतील हें आपणांस माहीत आहे. भगवतीच्या आज्ञेंत दोष काढूं नका. "

देवशर्मन् कांहीं बोलले नाहींत; पण त्यांना जास्तच क्रोध आल्याचें स्पष्ट दिसत होतें. मागधी भाषेंतलीं पत्रें राणीसमोर निवडून ठेवण्यांत आलीं. सूर्यमणि एकेक पत्र वाचूं लागला. कांहीं किरकोळ पत्रें वाचून झाल्यावर एका पत्रांत चंद्रशेखरास मदत करण्याचें मगधाधीशानें साफ नाकारल्याचा मजकूर होता. त्यामुळें सूर्यमणीस संतोष झाला. त्यानें अशा बातम्या ऐकल्या होत्या; पण राजा व मंत्रीमंडळ यांचा खास खलिता पाहून त्याची पूर्ण खात्री झाली. नंतर चंद्रशेखराच्या वतीनें रामगडचा बौद्ध मठपति कृष्णमूर्ति याशीं झालेला पत्रव्यवहार निघाला. मठाला सवलती देण्याचें व खुद्द कृष्णमूर्तीस एक मोठी रकम देण्याचें त्यांत कबूल केलें होतें. एका पत्रांत कृष्णमूर्तीच्या अटी होत्या. त्या वांचून सूर्यमणीला आश्चर्य वाटलें. त्याच्या अंगावर रोमांच आले. त्या पत्रांत स्वतःला बक्षीस ह्मणून रामगड परगणा व मगधांतून सैन्य आणण्याबद्दल चार लक्ष होन मागितले होते. त्यानें दहा हजार सैन्य मदतीस देण्याचें कबूल केलें होतें. तिसरें एक सर्व अटी मान्य केलेलें, कृष्णमूर्तीस त्वरा करण्याबद्दलचें चंद्रशेखरचें पत्र होतें. त्या पत्रांत चंद्रकेतूचा मित्र आकुतराय याजबरोबर दहा हजार होन पूर्वतयारीसाठीं पाठविल्याचा उल्लेख होता. गुमास्ते-

नाच्या मृत्यूपर्यंतचा पत्रव्यवहार त्या पुडक्यांत होता. उत्तम भाषांतर केल्याबद्दल राणीनें सूर्यमणीचे आभार मानले. अशा श्रेष्ठ व्यक्तीनें आपल्यासारख्या यःकश्चित् भिक्षूचे स्वतः आभार मानल्यामुळें सूर्यमणि गोंधळला यांत आश्चर्य तें काय ?

इतका वेळ राणीच्या मंत्र्यानें इतर पत्रें नीट क्रमवार लावलीं. राणीनें तीं पत्रें ऐकण्याची इच्छा दर्शविली. नीलवर्णाच्या पत्रांतून अत्यंत दुःखद गोष्टी उघडकीस आल्या. त्यानें जलदुर्ग बंडखोरांच्या स्वाधीन करण्याचा बेत केला होता. विजयपूरच्या सैन्याच्या हालचाली त्यानें शत्रूस वारंवार कळविल्या. कृष्णेच्या उताराचें रक्षण करीत असलेल्या आपल्या मातुसभावास दूर करण्याची सल्ला त्यानेंच चंद्रशेखरास दिली होती. अर्थातच ह्या पत्रांना क्रांतिकारकाचीं गेलेलीं उत्तरें त्याच्याजवळ असलीं पाहिजेत याचा मुळींच संशय नव्हता. राजमातेनें आपलें मत प्रकट न करतां मंत्रीमंडळावर याचा निकाल करण्याचें सोंपविलें. जोराच्या वाद्विवादास आरंभ झाला. नीलवर्णानें केलेल्या द्रोहानें, त्यानें चंद्रशेखराला आपल्या नाशाबद्दल दिलेल्या सल्ल्यानें व तसेंच त्यानें लीलादेवीसंबंधीं केलेल्या अत्याचारवर्तनानें जयसेनाचें मन फार उदास झालें होतें, म्हणून तो त्या वादविवादांत न शिरतां सूर्यमणीजवळ येऊन बसला. सुदैवानें तो राजगुरु व सूर्यमणि यांच्यामध्यें बसला हें बरें झालें. नीलवर्णाचें काय करावें हाच मुख्य प्रश्न होता. त्यास एकदम परत बोलवावें कां एखाद्या किल्ल्यावर कैदेंत ठेवावें याचा वाद होता. त्यास कामावरून दूर करावें याबद्दल कोणाचाच मतभेद नव्हता. सर्वानुमतें वीरसिंह नांवाच्या एका सरदाराची नेमणूक जलदुर्गास करावी असा निश्चय झाला.

'आतां आह्मी आमचें मत देतों ' राणी ह्मणाली, ' नीलवर्णाचे वडील फार सन्माननीय होते. नीलवर्णास एखाद्या किल्ल्यावर अगर रामगडांस दुर्गपतीकडे कैद करून पाठवावें अशी आमची इच्छा नाहीं. त्यास येथेंहि आणूं नये. आह्मी पुनः आज्ञा करीपर्यंत त्याला जलदुर्गासच सन्मानानें पण बंदोबस्तानें ठेवावें. '

लागलींच वीरसिंहास बोलावणें पाठविलें वाचकहो ! इतर पत्रांशी आपणास कांहीं जरूर नाहीं. तीं वाचून होईपर्यंत वीरसिंह येऊन

दाखल झाला. त्यानें जलदुर्गच्या किल्लेदारीचा हुकूम घेऊन राज्ञीस प्रणाम केला. राजमाता त्यास ह्मणाली, " तुह्मी जाऊन होईल तितक्या लवकर, सोमदत्त, तेथें तो साधु ह्मणून प्रसिद्ध आहे, तो व त्याची पौत्री हीं कोठें गेलीं याची चौकशी करा व तपास लागतांच त्यांस सन्मानानें आमचेकडे रवाना करा. " ती पुढें ह्मणाली, ' आणि रामगडचा बौद्ध भिक्षु कृष्णमूर्ति अद्याप तेथेंच आहे कीं काय याचा खुलासा कळविण्यास दुर्गपतीला सांगा. '

सूर्यमणि हात जोडून ह्मणाला, " ह्या प्रश्नाचें उत्तर मला देतां येईल. जयसेनाची जखम नादुरुस्त झाली तेव्हां आमचा मुक्काम स्थलकोटास असतांना मला कळलें कीं, कृष्णमूर्ति मगधास गेला. त्याच्या जागीं सध्यां कोणी नाहीं. मगधांतून मठपति येईपर्यंत विहाराची मुखत्यारी देवनाभ नांवाच्या तेथल्याच एका भिक्षूकडे आहे. "

सूर्यमणीचें नम्रतेचें उत्तर ऐकून राणीनें ह्मटलें, " होय भिक्षु ! आपण भाषानिपुण आहां तसेंच उत्तम वैद्यहि आहां; नव्हे ? आह्मीं पुष्कळ नामांकित वैद्य आणविले. पण बालराणी गुणमयी इला आराम वाटत नाहीं. आपण तिची प्रकृति पहाल काय ? अद्याप ती निजली नसेल. "

" मी बुद्धदेवाचा सेवक होण्यापूर्वी वैद्यक व शस्त्रक्रिया शिकलों आहे. भगवती ! बालराणीची प्रकृति सुधारण्यास मी होईल तितकी खटपट करीन. मी आपल्या सेवेस हजर आहें. " सूर्यमणीनें उत्तर दिलें.

" मंत्रीहो ! आह्मी अंतःपुरांत जाऊन येईतों आपणांस स्वस्थ बसावें लागेल याबद्दल आपण रागावणार नाहीं अशी आह्मांस आशा आहे. चला, भिक्षु ! आमच्याबरोबर या. "

आतां मात्र देवशर्मनूचा संतापातिरेक झाला. " हरहर ! देवा ! मी हें काय पहात आहें. एका नास्तिकास विजयपूरच्या दरबारांत सन्मान मिळावा. आणि तो आमच्या धर्माचा उच्छेद करूं पहाणारा, त्याला आतां— " ते बोलूं लागले.

राणी उभी होती. ती ह्मणाली, ' गुरुवर्य ! शांत व्हा. ह्या राजघराण्याच्या धार्मिकतेबद्दल संशय घेतलेला मीं आजच ऐकला. राजसिंहासनाशीं आपलें नातें ओळखा. '

पण राजगुरूंनीं तिकडे लक्ष न देतां बडबड चालवली, ' हा सर्व मंत्रविद्येचा परिणाम. ही वंगदेशची जादुगिरी. ह्याच्याबरोबरची स्त्री मोठी चेटकी आहे असें आपण ऐकलें नाहीं काय ? '

हें अपमानास्पद भाषण ऐकण्यापेक्षां आपण जावें अशी कोणीं सूचना केली तेव्हां राणीनें उत्तर दिलें, ' छे ! एखाद्या मनुष्यास भिऊन आम्ही अद्याप येथून गेलों नाहीं. गुरुवर्य आपली चूक कबूल करीपर्यंत आम्ही येथून हलणार नाहीं. '

राणी पुन: बसली हें पाहून देवशर्मन्च्या लक्षांत आपली चूक आली. ते ह्मणाले, " आवेशांत मजकडून एखादा उद्धट शब्द उच्चारला गेला असेल तर त्याबद्दल मी सिंहासनाची क्षमा मागतों; पण— "

" गुरुराज ! आतां पुन: पण बिण नको. सिंहासनाशीं स्पर्धेनें वागणें योग्य नाहीं. ती पहा, माता पुन: बोलण्याच्या बेतांत आहे. " जवळ बसलेला जयसेन राजगुरूंना ह्मणाला.

राणी देवशर्मन्ना ह्मणाली, " आपण पवित्र माणसें आहां. चूक कबूल केली इतकें पुरे. क्षमा मागण्याचें कारण नाहीं; पण केव्हां केव्हां आपण विकारवश होता. मंत्रीहो ! आतां पुन: तुमची परवानगी घेऊन ह्या देवसेवारत भिक्षूसह आह्मी जातों. आह्मांस फार वेळ लागणार नाहीं. "

बालराणीची प्रकृति पाहून सूर्यमणीनें औषधयोजना करण्याचें कबूल केलें. बालराणीच्या विनंतीवरून दुसऱ्या दिवशीं सकाळीं मनोरमेला घेऊन येण्याचें त्यानें मान्य केलें. परत सभेंत येतांना राणीनें त्यास विचारलें, " जयसेनावर तुमचें प्रेम आहे काय ? त्याच्याविषयीं तुमचें काय मत आहे ? "

" खऱ्या शूराप्रमाणें तो सत्यवचनी, दयाळु व उदारस्वभावी आहे. त्याच्यांत एकहि दुर्गुण वास करीत नाहीं. मला प्रवासांत त्याचा पुष्कळ परिचय झाला. " सूर्यमणीनें सांगितलें.

राणीनें विचारलें, " तुमच्या भगिनीची व त्याची कितपत ओळख आहे ? "

" छे, छे, भगवती ! त्यांचें परस्परांशीं कधीं फारसें भाषणहि

होत नाहीं. आह्मीं मुक्काम केला होता तेथेंहि ती विशेष कामाखेरीज कधीं त्याच्या खोलींत येत नसे. येथें येतांच आह्मीं आपल्या चित्रकाराकडे रहावयास गेलों, आणि हल्लींही तेथेंच आहों. " सूर्यमणीनें उत्तर दिलें.

' ईश्वर तुमचें कल्याण करो ! तुमची बहीण अपूर्व सुंदर आहे असें ऐकल्यापासून— '

राणीला मध्येंच थांबवून सूर्यमणि बोलला, ' भगवती ! ती बुद्धसेवारत आहे व जयसेन उदारचरित आहे. त्याच्या मनांत नीच अमंगल विचार येणें कधींहि संभवनीय नाहीं. आपण त्याच्या मातुश्रीच आहां ह्मणावयाच्या, तेव्हां मी आपणांस एक मात्र कळवितों कीं, त्याच्या स्वप्नांतील उद्गारांवरून, त्याच्या कित्येक वेळच्या भाषणावरून, त्याचें मन ज्या बालिकेनें पहिल्या रात्रीं जलदुर्गास त्याची शुश्रूषा केली तिजकडे गुंतलें आहे असें वाटतें. '

राणी हास्यमुद्रेनें ह्मणाली, ' असें कांहीं असावें असा माझा तर्क होताच. आज दोन दिवसांत जेव्हां जेव्हां तिचें नांव निघतें तेव्हां तेव्हां तो चंचल होतो. पण, भिक्षु ! मजप्रमाणेंच तुह्मीहि ही गोष्ट गुप्त ठेवा. तो गेल्यानंतर आपण याचा विचार करूं. '

' मी आपल्याजवळसुद्धां बोललों नसतों; पण त्याच्यावर आपलें किती प्रेम आहे हें त्यानें मला सांगितलें आहे. मजपेक्षां मनोरमेला कदाचित् जास्त माहिती असेल. कांहीं गुप्तता न ठेवतां सर्व हकीकत आपणांस निवेदन करण्यास मी तिला सांगेन. ' सूर्यमणीनें उत्तर दिलें.

मंत्रीसभेच्या द्वाराशीं आल्यानें त्यांचें भाषण तितकेंच राहिलें. ह्या अवकाशांत जयसेनानें सैन्याच्या तरतुदीची सर्व व्यवस्था करून घेतली. राणीनें सैन्याबरोबर जाणाऱ्या सर्व सरदारांना उद्यां सकाळीं दरबारास येण्याची आज्ञा करण्यास हुकूम केला. विलंब उपयोगाचा नाहीं असें तिचें ह्मणणें होतें.

जयसेन ह्मणाला, ' सरकार ! सर्व तयारी झाली आहे. आपली आज्ञा होईल तर माझ्या मनांतून उद्यां दुपारींच थोड्या अंतरावर जाऊन मुक्काम करावयाचा आहे. कारण, आह्मी महाराजांना जितक्या लवकर जाऊन मिळूं तितकें चांगलें. '

जयसेनाची उत्सुकता व तत्परता पाहून राज्ञीनें त्यास मनांत अनेक धन्यवाद दिले. ती म्हणाली, ' गुरुवर्य ! उद्यां सकाळीं गोरगरिबांना भिक्षा वाटण्याची व ब्राह्मणांना दक्षिणा देण्याची व्यवस्था करण्यांत येईल. आपणहि राजाच्या शत्रूंवर विजय मिळावा म्हणून देवी अंबेची प्रार्थना करा. ते शत्रु आपले आप्तसंबंधीच असावे ना ! ' शेवटचें वाक्य ती स्वतःशीं पुटपुटली.

देवशर्मनूचा कोप अद्याप समूळ शमला नव्हता. ते रागांतच म्हणाले, " माझ्या प्रार्थनांचा व आशीर्वचनांचा काय उपयोग होईल, हें आजच्या प्रसंगानें दिसतेंच आहे. जे इष्टवरसिद्धीची आशा करतात त्यांनीं धर्मगुरूंच्या आज्ञा ऐकल्या पाहिजेत. तरी पण त्या सर्वांतर्यामी जगदंबेची प्रार्थना मी करीन. "

देवशर्मनूचें हें भाषण राणीनें ऐकलें न ऐकल्यासें केलें हेंच बरें झालें.

रीतीप्रमाणें मंत्रीसभेचें काम संपल्यावर राज्ञीमाता अंतर्महालांत गेली. गजसिंहाला दिखाऊ कर्मठपणाची भीति वाटत नसे. तो देवशर्मनूना म्हणाला, " गुरुवर्य ! आज आपण वेडे तर नव्हतां ना बनलां ? किंवा आज शिवप्रसादाचें जास्त ग्रहण झालें होतें ? राज्ञीमातेनें आपली योजना आमच्याकडे केली नाहीं हें भाग्य समजा. "

सूर्यमणीच्या सान्निध्यानें राजगुरुचा मूळचाच चिडखोर मत्सरी स्वभाव आज विकोपास गेला होता. ते कोणाशीं न बोलतां, आपलें उत्तरीय व बाजूला लोळत असलेली शालजोडी, न जाणो कदाचित् कोणाच्या स्पर्शानें विटाळेल म्हणून आवरून घेऊन काठी टेंकीत टेंकीत निघून गेले.

वीरसिंह जयसेनास जलदुर्गाची माहिती विचारीत होता. किसनला विशेष माहिती असल्याचें लक्षांत आणून त्यानें बाहेर असलेल्या त्याला बोलावलें. जलदुर्गच्या नव्या किल्लेदाराचें भाषण ऐकून तो त्यास म्हणाला, ' वीरसिंह ! धबधब्याच्या वरच्या उताराकडे तुम्ही जाऊं नका. स्थलकोटाहून माझ्या गांवीं जा. मी देतों तें पत्र आपण भिमानाईकाला द्या. तो सर्व व्यवस्था करील. तो तुमच्याबरोबर तीनशें लोक घेऊन येईल; म्हणजे

विशेष गडबड न होतां किल्ला तुमच्या हातीं येईल.' थोड्या वेळांत त्यानें आपल्या खर्ड्यावरच्यासारख्या अक्षरानें एक पत्र लिहून वीरसिंहास दिलें.

'किसन! तूं स्वतः जाशील तर चांगलें.' जयसेन बोलला.

किसनच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. "छे! नको." तो ह्मणाला, "माझ्या सांगण्याप्रमाणें किल्लेदार वागतील तर गेल्याबरोबर किल्ला त्यांच्या हातीं येईल. कृष्णामातेच्या शपथ! मी गेलों तर नीलवर्ण माझ्या हातून मारला जाईल, व त्याचें जिणें कितीही निरर्थक असलें तरी तो स्वामीद्रोही आहे; त्याचा न्याय सरकारकडूनच झाला पाहिजे. मला तुमच्याबरोबरच येऊं द्या."

प्रकरण १७ वें.

मनोरमा.

सूर्यमणि घरीं गेला तेव्हां मनोरमा त्याची वाट पहात बसली होती. सूर्यमणीनें सांगितलेला वृत्तांत तिनें लक्षपूर्वक ऐकला. त्यानें देवशर्मन्च्या असहिष्णु स्वभावाचें वर्णन जितक्या सौम्य शब्दानें करवेल तितक्या सौम्यतेनें केलें. तो ह्मणाला, "मनोरमे! आपणां बुद्ध देवाच्या सेवकांशीं चार अन्यधर्मीय वागतात तसेंच राजगुरूचें वर्तन होतें. आपणांस रामगडचे दुर्गपति व आपला सहायकारी जयसेन ह्यांनीं फार लाडावून ठेवलें आहे. ह्या शहरांत कीं, जेथें अनेक धर्मवेडे, कर्मठ व नानापंथांचे अनुयायी आहेत अशा ठिकाणीं आपणांस फार जपून वागलें पाहिजे. तरी आपल्याला भय नाहीं. राजनगरीचा नगररक्षक सेनापति आपला मित्र झाला आहे. तो सज्जन आहे. आणि राजमातेच्या कृपाछत्राखालीं आपणांस कोणाचीहि धास्ती बाळगणें नलगे. राजमातेनें तुला बालराणीच्या भेटीस बोलावलें आहे. तेथें तुझा वेळ आनंदांत जाईल. बरोबर तुझें कशिद्याचें कामहि असूं दे. दरबारचें काम आटोपल्यावर राणीसुद्धां तुजकडे येईल व बहुधा उद्यां सर्व दिवस तुला तेथेंच घालवावा लागेल."

मनोरमा रामगडास नेहमीं दुर्गस्वामिनीकडे जात होती त्यामुळें राणी-कडे जावयाचें होतें तरी ती गोंधळली नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मनोरमा आपल्या बंधूबरोबर राजवाड्यांत जाण्यास तयार झाली. मनोरमा रोजच्यापेक्षां आज मनोरमतर दिसत होती. तिला पहातांच स्वर्गदेवतेचा किंवा वनदेवीचा भास होई. राज्ञीनें त्या बंधुभगिनीचें स्वागत केलें. जयसेन प्रणाम करून ह्मणाला, " आई ! दरबाराची सर्व तयारी होत आली आहे. माझ्या मित्राला मी आणून पोंचवलें. आतां माझें काम नाहीं. मी जातों. दरबार संपल्यावर आज्ञा होईल तर येईन. " राणीच्या अनुज्ञेनें जयसेन दरबारमहालांत गेला.

मनोरमेचें अप्रतिम सौंदर्य पाहून राणी ह्मणाली, " काय हें सौंदर्य ! असें रूप कधीं तरी दिसेल काय ? " राणीनें तिला प्रेमानें हृदयाशीं धरलें, " मुली ! इतरांना मी राणी असलें तरी तुला मी आईच, असें समज. तूं माझ्या कन्येप्रमाणें आहेस. मी तुझें रक्षण करीन. सूर्यमणि ! ही इतकी मोहक कां बरें ? हा गालांचा गुलाबी वर्ण मूळचाच आहे किंवा कामरूप देशाच्या स्त्रियाप्रमाणें कृत्रिम आहे ? छे, छे ! तो पहा, लज्जेनें कमजास्त होत आहे. तो स्वाभाविकच असला पाहिजे. " आनंदभरानें राजमाता मनोरमेचें चुंबन घेऊन हंसत हंसत ह्मणाली.

' ती आमच्या आईप्रमाणें आहे. ' सूर्यमणीनें उत्तर केलें. ' आमची आई कांकणभर जास्तच सुंदर आहे. मनोरमेची कोणीं स्तुति केली कीं, ती गोंधळून जाते. शिवाय, पतिनिधनापासून तिनें बुद्धसेवेस वाहून घेतलें असल्यानें तिच्या सौंदर्याची स्तुति केल्यास तिला आवडत नाहीं. '

' तुमच्या मातुश्री अद्याप आहेत तर ! ' राणीनें ह्मटलें.

' होय; सांसारिक मार्गांत असलेलीं दुसरीं मुलें तिला आहेत. आह्मीं दोघांनीं श्रीबुद्धाच्या सेवेस अर्पण करून घेतलें. ' सूर्यमणीनें उत्तर दिलें.

' तुमची बहीण पुनः विवाह कां करीत नाहीं ? तुमच्या धर्मांत तशी सवड आहे ना ? ' राज्ञीनें पुनः प्रश्न केला.

' होय; तसें करून तिला संसारसुख भोगतां आलें असतें खरें. मगधांत मोठमोठे सावकार, श्रीमंत सरदार तिची इच्छा करीत होते; पण तिला भगवान् बुद्धाची सेवा जास्त प्रिय वाटली. त्यामुळें तिनें संसा-

रसुखाचा त्याग केला, आणि मजकडे रामगडास आली. तेथें आह्मी फार सुखांत होतों. पण कृष्णमूर्तीनें तिचा अपमान केला, तेव्हां दुर्गपतीनें आह्मांस आपल्याकडे पाठविलें. ”

राजमाता आश्चर्यचकित् झाली. ती ह्मणाली, “ तुह्मी थोर माणसें आहां. तुह्मांस कशाची इच्छा नाहीं! आमच्या धर्मगुरूंत अशी निरिच्छता व उद्योगतत्परता दिसेल काय? जों जों ते विद्वान्, जों जों ते श्रेष्ठ अधिकाराचे, तों तों त्यांच्या इच्छा प्रबल होतात; तों तों त्यांना घरदार, शेतीवाडी, हत्तीघोडे एवंच आधिभौतिक संपन्नतेची जास्त हांव सुटते!! पण, सूर्यमणि! तुमच्या समाजांत असे प्रकार नाहींत काय? ”

“ भगवती! कोणत्याहि मानवसमाजांत हे प्रकार थोडे फार असावयाचेच. आमचे धर्मगुरु आहेत त्यांचाहि थाट राजाप्रमाणें असतो व त्यांना तितकाच मानसन्मान असतो. ते धनसंपन्न असतात आणि त्यांनाहि मान, ऐश्वर्य यांची हांव असते; पण आह्मी गरीब सामान्य बुद्धसेवक. जें साधें अन्नवस्त्र यदृच्छेनें मिळतें त्यांतच आह्मी संतुष्ट आहों. भगवान् बुद्ध आमचा योगक्षेम चालवतो; मग आह्मांस कशाला लालसा असावी?” सूर्यमणीनें उत्तर दिलें.

“ आणि ह्मणूनच तुह्मी आह्मांस पूज्य वाटतां. मनोरमे, चल; गुणमयी तुझी वाट पहात असेल. मलाहि दरबारांत गेलें पाहिजे. !” राजमाता मनोरमेस ह्मणाली.

तिनें मनोरमेला दुसऱ्या एका महालांत नेलें. तेथें बालराणी एका सिंहासनावर अधिष्ठित झालेली तिला दिसली. मनोरमेनें राजमाता चंद्रावतीप्रमाणेंच तिला आदरयुक्त प्रणाम केला.

गुणमयी एक सतरा अठरा वर्षांची कृशदेही मुलगी होती. तिच्या गळयांत हिऱ्यामोत्यांचे दागिने होते. तरीहि बहुमोल वस्त्राभूषणांनीं अलंकृत झालेल्या गुणमयीपेक्षां साधीं वस्त्रें परिधान केलेल्या राज्ञी चंद्रावतीकडेच पहाणारांचें लक्ष वेधत असे. मनोरमेचें अमानवी सौंदर्य पाहून गुणमयीला राजमातेपेक्षांहि जास्त आश्चर्य वाटलें. ती अगदीं निस्तब्ध झाली. ती मनोरमेचें स्वागत करण्याचें सुद्धां विसरली, राजमातेनें सुच-

विलें तेव्हां तिच्या लक्षांत आपली चूक आली. ती मनोरमेला ह्मणाली, 'मला कोणी मैत्रीण नाहीं.' तिच्या नेत्रांत अश्रु उभे राहिले, 'सासुबाईंना नाना काळज्या व महत्वाचीं कामें असल्यामुळें त्यांना मजसारख्या अशक्त मुलीजवळ बसावयास कोठून वेळ मिळणार ? मनोरमे ! तूं मला आपली कनिष्ठ भगिनी समज तूं किती ज्ञानी आहेस हें राज्ञीमातेनें मला सांगितलें मला तुझ्यापासून किती तरी शिकता येईल. तूं माझ्याशीं प्रेमानें वाग. मला सोडून दूर राहूं नकोस. तुझ्या बधूंनीं रात्रीं पाठविलेल्या औषधानें मला आज बरें वाटत आहे. मनोरमे ! परत येणें होण्याच्या अगोदर सूर्यमणि मला पहिल्यासारखी करतील तर तिकडून मोठें बक्षीस देण्यांत येईल.'

'सूर्यमणि मुळींच कसूर करणार नाहीं; पण आरोग्य देणें मानवाला शक्य नाहीं. आपली हरकत नसल्यास आह्मीं आपल्याकरतां भगवान बुद्धाची प्रार्थना करूं.' मनोरमा बोलली.

'तुह्मी धर्मपरायण पुण्यशील माणसें. मजकरतां प्रार्थना करा. ईश्वर तुमचें खात्रीनें ऐकेल.' गुणमयीनें उत्तर दिलें.

त्या बसल्या होत्या तेथून दरबार महालांतला सर्व देखावा दिसत होता. दरबारांतलें सरदारमंडळ पाहून गुणमयी आनंदातिशयानें मनोरमेला ह्मणाली, "मनोरमे ! हा देखावा किती भव्य आहे. हा पाहून तुला आनंदाचें भरतें येत नाहीं काय ? आणि हे सर्व तिकडचे सेवक आहेत. त्यांजकरतां लढण्यासाठीं हे जाणार आहेत. ते पहा, तिकडच्या नांवानें जयजयकार करीत आहेत. मलाहि प्रिय पतीबरोबर जाऊन लढाई करावी असें वाटतें. राजमातासुद्धा शक्य असतें तर गेल्या असत्या. त्या नेहमीं पतीबरोबर युद्धभूमीवर असत पतीला सोडून त्या कधीं दूर राहिल्या नाहींत; पण मी काय करणार ? मी अशी अशक्त असल्यानें ते मला बरोबर नेत नाहींत. माझी प्रकृति पहिल्यापासूनच नाजुक आहे. पित्याच्या घरीं असतांना मी अशीच असें येथें आल्यावर मी चांगली होईन असें वाटलें, व त्याप्रमाणें थोडे दिवस झालेंहि. कधीं कधीं मी बरोबर शिकारीस सुद्धा गेलें; पण लवकरच माझी प्रकृति पुनः पूर्वपदावर आली. तिकडचें येणें होईपर्यंत मी जगेन असें

वाटत नाहीं. आणि हें मनांत येऊन मला रडूं येतें. मनोरमे ! तिकडचा स्वभाव फारच उदार व दयाळु आहे, आणि त्यांना मजशिवाय दुसरें प्रीतीचें स्थान नाहीं ! " बोलतां बोलतां तिचे नेत्र सजल झाले. ती आपली मान मनोरमेच्या खांद्यावर टाकून स्फुंदूं लागली. मनोरमा तिचें विश्वासस्थान बनली. गुणमयी पुढें ह्मणाली " कित्येक सरदारपत्न्या मजकडे येतात. माझें दुःख पाहून त्या कळवळतात; पण कोणा एकीशींहि मन मोकळें करून बोलावेसें मला वाटत नाहीं. दरबार संपल्यावर मी तुला माझ्या प्रिय महालांत नेईन. तो महाल सर्वांत उंच असल्यानें सर्व नगर आपल्या पायाशीं आहे असें वाटतें. तेथून यच्चावत् शहराचा संपूर्ण देखावा दिसतो. आणि मनोरमे ! ह्या सर्वांची मालकीण मी आहें. माझे प्रिय पति ह्यांचे स्वामी होत. "

गुणमयीला आज विशेष हुषारी वाटत होती; त्या भरांत तिचे असे विचार सुरू होते. ही उल्हसित वृत्ति उत्तेजक औषधांनीं आली असल्यास त्याचा परिणाम वाईट होईल अशी मनोरमेस धास्ती वाटली.

दरबार संपल्यावर जयसनानें सूर्यमणीची गांठ घेतली. सूर्यमणीनें त्याच्या प्रश्नास उत्तर दिलें, ' बालराणी अति अशक्त आहे, पण काळजी करण्याचें कारण नाहीं. माझ्या ह्मणण्याप्रमाणें व्यवस्था ठेवल्यास त्या थोड्या दिवसांत पूर्ण आरोग्यलाभ पावतील. त्या कधींहि विशेष सशक्त झाल्या नाहींत तरी त्यांचें आयुष्य सुखांत जाईल; पण कुपथ्य झाल्यास काय होईल सांगवत नाहीं. वैद्य व देवऋषि यांचा मात्र त्रास त्यांना न व्हावा. मी त्यांना रोज पहात जाईन आणि मनोरमा त्यांच्या करमणुकीस नित्य येईल. '

" सूर्यमणि ! बरें आहे; मी येतों आतां. मी घरीं जातों. मला आमच्या सैन्यास देवपूरच्या मुक्कामावर सूर्यास्ताच्या आंत जाऊन मिळालें पाहिजे. जपून वागत जा. परमेश्वर तुमचें रक्षण करो. गुरुवर्यांच्या वाटेस जाऊं नका; पण त्यांना टाळूंहि नका. तुह्मी भितां असें त्यास दाखवूं नका. राज्ञीमाता तुमचें संरक्षण करण्यास असल्यावर कोणासहि भिण्याचें कारण नाहीं. रोज तिच्या भेटीस जाण्यास चुकूं नका. बरोबर तुमच्या भगिनीसहि नेत जा. तिच्या सहवासांत बालराणीचा काळ

आनंदांत जाईल. तुह्मी लवकर घरीं आलां तर मला भेटा. मात्र तिसरा प्रहर संपल्याबरोबर मी निघेन; मग मला थांबतां येणार नाहीं. ”

सूर्यमणीनें उत्तर दिलें, “ मी आपला उतराई कसा होऊं ? तुमच्याकरतां आह्मी बुद्धदेवास विनवूं. युद्धप्रसंगीं स्वतःला फार धोक्यांत घालूं नका. क्षुल्लक संकटांना सेनानायकानें स्वतःच तोंड देणें नलगे. मी आपल्या सांगण्याप्रमाणें वागेन. आह्मीं बालराणीची योग्य काळजी घेऊं. मनोरमा एकदां अशीच झाली होती. तिच्याबद्दल आह्मां सर्वांस फार काळजी वाटत असे; पण आतां तुह्मी तिला पहातांच आहां. ”

दुपारीं गुणमयीनें मनोरमेला आपल्या आवडत्या महालांत नेलें. तो महाल उंच व हवाशीर होता. तेथून शहराचा एकून एक भाग दिसत होता. नगराबाहेर असलेला रत्नमंदिर राजप्रासाद, सरदारांचे वाडे व रम्य उद्यानें त्या सर्वोच्च महालांतून दिसून मनास संतोष होई. पलीकडे देवपूरचें मैदान व त्यांत ठिपक्याप्रमाणें दिसत असलेल्या सैनिकांच्या राहुट्या नजरेस पडत होत्या. गुणमयी महालांतील एकेक अपूर्व वस्तु मनोरमेला दाखवीत होती; इतक्यांत राणी चंद्रावती तेथें आली. ती दमली होती आणि चिंतामग्न दिसत होती. चिंतित मनानें तिनें एका पलंगावर आपला देह टाकला. ती ह्मणाली, “ अरेरे ! माझ्या कांतिनगरच्या आप्तांविरुद्ध सैन्य पाठविण्याचा प्रसंग यावा ना ? मुलींनो ! काय हें माझें नशीब ! असा प्रसंग तुह्मांवर अर्धा न येवो ! कांतिनगरकर अविचारी व दुरभिमानी आहेत. आह्मी स्तब्ध राहिल्यास ते विजयपुरावरसुद्धां चढाई करण्यास कमी करणार नाहींत. देवानें रक्तपात होण्याच्या अगोदरच त्यांना शुद्धीवर आणावें. ’

ती थोडा वेळ निस्तब्ध राहिली. नंतर शांतचित्त झाल्यावर ती उठून बसली. ती मनोरमेस ह्मणाली, ‘ मनोरमे ! इतका वेळ मीं तुझ्या बंधूपासून गुणमयीची औषधयोजना समजावून घेतली. नंतर आह्मीं आयुष्यांतल्या पूर्व गोष्टी बोलत होतों. जलदुर्गचा वृद्ध अंध व त्याची पौत्री लीलादेवी यांची हकीकत त्यानें मला सांगितली. तूं तिचें एक चित्र काढलें आहेत असें सूर्यमणि ह्मणत होता. तें सध्यां तुजजवळ आहे काय ? ’

लीलेचें प्रतिमाचित्र घरीं राहिलें असें मनोरमेस वाटलें. तिनें बरोबर

आणलेल्या वस्तु पाहिल्या तों त्यांत तें सांपडलें. तें कन्या लीलेचें हुबे-हुब प्रतिबिंब होतें. त्या निर्दोष बालिकेच्या मोहक चेहऱ्याकडे पहातां-क्षणींच प्रेम उत्पन्न होई. तें चित्र पाहून राज्ञी उद्गारली, ' किती गोड बालिका ही ! '

मनोरमेनें उत्तर दिलें, ' तिचें अंतःकरणहि तसेंच आहे. ' बंधूच्या आज्ञेप्रमाणें तिनें लीलेची सर्व हकीकत राज्ञीमातेस निवेदन केली.

राज्ञीनें उत्तर दिलें, ' मनोरमे ! ती सांपडल्यास मी तिला आपल्या कन्येप्रमाणें वागवीन. '

' सांपडल्यास ? ' मनोरमेनें आश्चर्यानें प्रश्न केला, ' ती तर जलदुर्गास आहे. '

' मनोरमे ! मनुष्याच्या विकारांनीं तेथें सुद्धां सोडलें नाहीं. किल्ले-दार नीलवर्णानें तिला जबरीनें पळविलें; पण किसन नांवाच्या एका भिल्लनाईकानें तिची सुटका केली. ती व तिचा वृद्ध पितामह आतां पृथ्वीतलावर भटकत फिरत आहेत; पण लवकरच त्यांचा तपास लागेल. ' राणी बोलली.

मनोरमेच्या नेत्रासमोर प्रपाताचें दृश्य उभें राहिलें. बुरुजाच्या पाय-थ्यांत मरून पडलेला वाघ, लीलेची विषयीं किल्लेदाराबद्दल भीति, त्यावे-ळची तिची भयान्वित मुद्रा, हीं तिच्या मानसचक्षूंपुढें एकामागून एक दृग्गोचर झालीं.

मनोरमा रोज राजवाड्यांत जाऊन सर्वांस आनंदवीत असे. सूर्यमणी-सारख्या वैद्यविद्याविशारदाच्या परिश्रमानीं बालराणी गुणमयी लवकरच रोगरहित झाली. तिला पूर्वीपेक्षां जास्त शक्ति आली. तिचा पूर्वीचा आळस व थकवा नाहींसा होऊन कशिदा, चित्रकला, आदि ललित-कलांचा तिचा अभ्यास मनोरमेच्या सहायानें पुनः सुरू झाला. पुढची संसारयात्रा सुखावह, आनंदमय होईल अशी आशा तिला उत्पन्न झाली.

———

प्रकरण १८ वें.

नवग्रह.

दुष्ट नीलवर्णाच्या किल्ल्यांतून किसन नाईकानें लीलादेवीची सुटका केल्यावर तो त्यांना आपल्या प्रदेशांत घेऊन गेला हें वाचक विसरले नसतीलच. आपणांस त्या पौत्रीपितामहाचें वर्तमान बराच काळ कळलें नाहीं. तर वाचक ! चला, आपण त्यांच्याकडे जाऊं.

किसननें त्यांना नीलवर्णाच्या अधिकारांतील प्रदेशांत ठेवलें नाहीं हें सर्वांशीं चांगलेंच झालें ह्मणावयाचें. वृद्ध तेथेंच रहाता तर नीलवर्णानें पुनः बळपूर्वक लीलादेवीला नेलें असतें. त्यानें वृद्धाचा नाश करण्यासहि कमी केलें नसतें. कदाचित त्यानें त्या वेळपुरती वृद्धाची औपचारिक क्षमाप्रार्थना केली असती-तो पाषाणहृदयी तसें कधींच न करता ह्मणा-तरी त्याजवर विश्वसून तेथें रहाणें लीलादेवीच्या चारित्र्याला हानिकारकच झालें असतें. तेथें गरीब गांवकऱ्यांशिवाय कोणीहि त्यांचा रक्षणकर्ता नव्हता; आणि किल्लेदाराच्या जुलमी वर्तनाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य तेथल्या एकाहि मनुष्यांत नव्हतं हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे.

लीलादेवी नाहींशी झाल्याचें कळून येतांच तेथें असलेल्या मध्यस्थ स्त्रीनें तें वर्तमान नीलवर्णास कळविलें. मशाली पाजळून तिचा शोध करीत असलेल्या त्यांना आपण पाहिलें आहेच. नीलवर्णानें त्या पहारा करणाऱ्या शिपायाला चाबकानें फोडून काढलें. त्याच्यानें मार सहन करवेना अशी अवस्था झाल्यावर त्याच्या हातापायांत जड शृंखला घालून नीलवर्णानें त्याला अंधारकोठडींत टाकून दिलें. तो पहारेकरी अन्नपाण्याच्या हालांनीं व मिळालेल्या मारानें प्रतिबंधांतच अंत होण्याच्या मार्गास लागला होता; पण विजयपुराहून नवीन किल्लेदार आल्यामुळें बिचाऱ्याची पुढें मुक्तता झाली. पहारेकऱ्याला शिक्षा केल्यावर नीलवर्ण आपल्या कांहीं नोकरांसह गांवांत गेला, व वृद्धाशीं गांवांतल्या ज्या ज्या व्यक्तींचा संबंध होता त्यांना त्यांना मार देऊन, त्यांचा छळ करून त्यानें लीलेची माहिती विचारली. शिवालयावर

स्वारी करून त्यानें मठाचा ध्वंस करण्यासहि कमी केलें नाहीं. लीला जेथें जेथें लपली असण्याचा संभव होता त्या त्या ठिकाणीं त्यानें स्वतः तपास केला; पण व्यर्थ ! शेवटीं त्यास कळून आलें कीं, किसन त्यांना आपल्या गांवीं घेऊन गेला. भिल्ल नाविकांनाहि त्यानें छळलें असतें; पण तसें करण्यास त्याला धैर्य होईना. किल्ल्यांतील शिबंदीहि त्याजवर खुष होती असें नाहीं, ह्मणून तो किल्ल्यावर शहाणपणानें निमूट परत गेला. किसनला शासन करण्यास कोणी तयार झाला असता तर नीलवर्णानें त्या शासकाला काय पाहिजे तें दिलें असतें. किसन त्याच्या अधिकाराबाहेर असल्यानें स्वस्थ बसण्यावांचून त्यास गत्यंतर नव्हतें. किसननें राजकैद्याला पळविलें अशीहि तक्रार त्याला दरबारकडे करतां येईना. कारण, त्यामुळें त्याचेंच जुलमी कृत्य उघडकीस आलें असतें.

वृद्धाच्या मित्रांनीं सर्व कच्ची हकीकत लिहून विजयपुरास दरबारला कळविण्याचें निश्चित केलें; पण हा त्यांचा निश्चय एकदम झाला नाहीं. कारण, दरबारला अर्ज पोंचला तर न्याय मिळावयाचा खरा; पण जर मध्यें कांहीं विघ्न झालें तर तक्रार करणाऱ्या अर्जदारांची पूर्वींहूनहि वाईट स्थिति होण्याचा विशेष संभव. पुष्कळ भवति न भवति झाल्यावर शिबंदीचे लोक, पुरोहित, व गांवांतले प्रमुख गृहस्थ ह्या सर्वांनीं मिळून गांवच्या मुखियामार्फत एक अर्ज पाठविला. वीरसिंहाला दरबारानें हुकूम दिला त्यानंतर दोन तीन दिवसांनींच मुखिया विजयपुरास पोंचला. राज्ञी चंद्रावतीला सर्व हकीकत पूर्वींच ज्ञात झाली असल्यानें तिनें मुखियाला सदयतेनें उत्तर दिलें कीं, दरबारानें पाठविलेल्या नवीन किल्लेदाराकडून सर्व हकीकतीचा विश्वसनीय खलिता येतांच ह्या प्रकरणाचा आह्मी योग्य न्याय करूं.

एकंदरींत असें खरें कीं, कन्या लीला व तिचा असहाय पितामह जलदुर्गासच रहाता तर भयंकर घटना घडली असती. लीलादेवीला जलदुर्ग बेटांत लपविण्याचा प्रयत्न झाला असता तर ती नीलवर्णाच्या हातीं सांपडून कलंकित झाली असती; आणि किल्ल्यावरील शिबंदीच्या सहायानें तिचें रक्षण करण्याचा विचार ठरला असता तर निष्कारण रक्तपात होता. किसनला किल्ल्यावरील भिल्ल सैनिकांची खात्री होती तरी त्यास

शिबंदींतील अन्य जातीय लोकांचा विशेष भरंवसा नव्हता. कदाचित् ते नीलवर्णास सहाय्य झाले असते.

किसननें मठांतलें सर्व सामान घेतलें असल्यामुळें त्या पौत्रीपितामहाला नव्या घरीं थोडीहि गैरसोय झाली नाहीं. किसननें आपल्या ताब्यांतल्या एका गांवीं एका जुन्या शिवमंदिरांत त्या पौत्रीपितामहाची रहाण्यांची व्यवस्था करून दिली, व त्यांच्या रक्षणाचा बंदोबस्त केला. वृद्ध वास्तविक कोण हें किसनला माहीत नव्हतें; जयसेनानें वृद्धाला दिलेलें वचन भंग करून तें किसनला सांगितलें नव्हतें. पण लीलादेवीसंबंधीं जयसेनाच्या मानसाची अस्पष्ट कल्पना त्याला झाली होती म्हणून तो त्यांना विजयपुरास नेणार होता; पण तत्पूर्वी द्युमत्सेनाच्या सहाय्यकांचा माग लावणें जरूर होतें आणि जयसेनाच्या पथकांतील पळालेल्या सैनिकांचा तपास लावणें तितकेंच अवश्यक होतें. आपला अधिकारी विजयपुरास पोंचला असेल या समजुतीनें तो वरील कामें करण्यास निघाला; पण त्याचवेळीं जयसेन साठ कोसांच्या अंतरावर स्थलकोटास आजारी होता हें वाचकांना माहीत आहेच. आपल्या कामांत कांहीं यश मिळालें म्हणजे घरीं येऊन वृद्धाला विजयपुरास् घेऊन जावें असा किसनचा विचार होता; पण दैवघटना अन्य प्रकारची होती.

एके दिवशीं संध्यासमयीं वृद्ध आन्हिक कर्म आटोपून मंदिराच्या अग्रभागीं किसनच्या मदतनिसाशीं बोलत बसला होता; इतक्यांत जलदुर्गाहून कोणी दोन स्त्रिया आल्याचें त्यास समजलें. तो लीलेला सावध असण्याची सूचना करणार तोंच त्या स्त्रिया येऊन दाखल झाल्या. त्यांनीं वृद्धाला नम्रतापूर्वक प्रणाम केला. त्यांपैकीं एक स्त्री बोलली, 'महाराज ! नीलवर्णांनीं एक पत्र देऊन आम्हांस तें आपल्या चरणीं सादर करण्याची आज्ञा केली. त्यांची आपणांस एक विनंती आहे.'

वृद्ध मनांत दचकला. त्याच्या हृदयांत प्रथमारंभीं जी भीति उद्भवली ती खरी होते असें त्यास वाटलें. "हरहर ! ! त्या दुष्टाकडून मला काय पत्र यावयाचें ? तुम्ही येथून चालत्या व्हा. मी तें पत्र घेणार नाहीं." तो म्हणाला.

ती स्त्री डोळ्यांत पाणी आणून बोलली, "भगवन् ! त्यांना पश्चात्ताप

झाला आहे. आपण केवल ती आज्ञा पूर्ण करण्यास ते तयार आहेत." हें वाक्य उच्चारतांना त्या स्त्रीनें आपला स्वर अनुतापपूर्ण दर्शविला. जणूं ती किल्लेदाराच्या मनःस्थितीचें प्रतिबिंब होती.

दुसरी स्त्री ह्मणाली, " महाराज ! ते अगदीं अस्थिपंजर बनले आहेत. लीलादेवीच्या विरहानें ते झुरणीस लागले आहेत. ती प्राप्त न झाल्यास ते प्राणत्यागाहि करतील ती त्याजवर कृपादृष्टि करणार नाहीं काय ? नीलवर्ण मोठ्या समारंभानें विवाहसोहळा करतील."

पुनः प्रथम स्त्री ह्मणाली, " आपली तशी इच्छा असल्यास ते ह्या आपल्या रक्षणकर्त्याच्या गांवींहि येतील. ते पाहिजे तर बरोबर एकहि सैनिक आणणार नाहींत. येथें येऊन ते लीलादेवीच्या दास्यांत आनंदानें आजन्म रहातील. ते तिला स्त्रीधन ह्मणून पन्नास हजार सुवर्णमुद्रिका द्यावयास तयार आहेत आणि कपडे तर इतके देतील कीं, ते एका मोठ्या हत्तीलाहि नेतां येणार नाहींत. महाराज ! आपण हें पत्र वाचून पहा ह्मणजे माझें वचन सत्य कीं असत्य तें कळेल."

" लीलेलाच तें वाचूं द्या." वृद्ध बोलला, " तिलाच पसंत करूं द्या. मी कांहीं बोलत नाहीं. माझ्या दृष्टीनें संपत्ति व वैभव कवडीमोल असलें तरी कदाचित् तिला तीं अभिलापणीय वाटतील. लीले ! बाळ ! " त्यानें हांक मारली.

ती आली तेव्हां वृद्ध तिला ह्मणाला, " लीले ! तें पत्र घे; तें नीलवर्णानें पाठविलें आहे. त्याचें उत्तर ह्या त्याच्या दूतींनीं प्रत्यक्ष तुझ्याच मुखानें ऐकावें हें बरें. वाच पाहूं."

पत्रांतील अक्षर खुद्द नीलवर्णाचें होतें. तें पत्र लिहिण्याचा भार त्यानें आपल्या कारकुनावर सोंपवला नव्हता हें स्पष्ट व्यक्त होत होतें. नीलवर्णाचें हस्ताक्षर, लहानपणीं विशेष न केल्यानें यथातथाच होतें. तसेंच त्यानें कित्येक अक्षरें खालीं होतीं व अशुद्धतेच्या चुका तर असंख्य केल्या होत्या. त्या स्त्रियांनीं सांगितलेला सर्व मजकूर त्या पत्रांत होता. पुष्कळ शब्दावडंबर माजवीत मिथ्या प्रशंसेचें लाघव करण्याचा प्रयत्न त्यांत केला होता.

कन्या लीलेनें तें पत्र कसेंबसें संपविलें. पत्र वाचून होतांच तिच्या

अश्रूंचे पूर लोटूं लागले. ती स्फुंदत ह्मणाली, " आजोबा ! हें पाठवून तुमची हेळना करावयापूर्वी त्यानें थोडातरी विचार करावयाचा होता. त्याच्याच जुलमामुळें आपल्याला तेथून पळून जाऊन भणंग व्हावें लागलें, हें त्यानें मनांत आणावयास पाहिजे होतें आणि ह्या ख्या, मी सर्वांशीं त्यांच्या ताब्यांत असतांहि आपल्या कार्यांत भग्नमनोरथ झाल्या; तेव्हां मी आतां बंधमुक्त असतांना आपल्या दूतकर्माचा काय परिणाम होईल ह्याचें अनुमान त्यांनीं करावयास पाहिजे होतें. तरी पण बाई ! तुमच्याकडे दोष नाहीं. तुह्मी तुमचा व्यवसाय करीत होता व आहां ! त्यानें तुह्मांला पुनः द्रव्यानें भारलें असेल. असो; तुह्मी तुमचा सन्माननीय (!) धंदा खुशाल पुढें चालवा. आतां माझें उत्तर ऐका आणि तेंच कायमचें व शेवटचें ह्मणून समजा. जा; तुमच्या धन्याला सांगा कीं माझा पूर्वनिश्चय अजून कायम आहे. संपत्ति मला मोह पाडूं शकणार नाहीं. भीति मला कार्यानुकूल करणार नाहीं. मी स्वीकृत निश्चयापासून कधीं पराङ्मुख होणार नाहीं. मी कधीं त्याच्या हातीं लागणार नाहीं अशा ठिकाणीं ह्मी आहों व अतःपर मी माझ्या प्रिय आजोबासारखी संन्यासव्रतधारिणी होईन. त्यांना परमेशाचें बोलावणें येईपर्यंत मी त्यांजबरोबर राहून त्यांच्या सुखदुःखांत सहाय्य होईन. बाई ! आपण जा व पुनश्च आह्मांला त्रास देण्यास येऊं नका. "

' हें कां तुझें उत्तर ? ' खोट्या प्रेमाचा आविर्भाव आणून ती स्त्री किंचित तिरस्कारानें ह्मणाली, ' मुली ! बाळ ! मीं तुझ्याकरतां जी अकल्पनीय योजना घडवून आणली; जें वैभव तुला सुकर केलें, त्याचा असा अव्हेर तूं करावास काय ? '

' मीं माझें उत्तर दिलें. ' ती गंभीरपणें उद्गारली. तिच्या मुद्रेवर शांततेचीं चिन्हें दिसत होतीं. ती आपल्या प्रिय पितामहाजवळ त्यांच्या रुद्राक्षमालेंतील स्फटिकमण्यांशीं शून्यमनानें खेळत बसली.

' आणि बाई ! तुह्मी कृष्णा उतरून कशा आलां ? ' किसनचा मदतनीस रामनाईक यानें प्रश्न केला.

दुसऱ्या स्त्रीनें उद्दाम स्वरानें उत्तर केलें, ' तुला काय त्याची पंचाईत ?'

माझी स्वामिनी भिल्लांशीं शब्दव्यवहार करीत नाहीं. '

' असें काय ? न करो बिचारी; पण मला तर कांहीं हरकत नाहीं ! आणि मला वाटतें तिचें मुंडण करून कुंभाराच्या घोड्यावरून तिची मिरवणूक काढली ह्मणजे ती आह्मां भिल्लांशीं न बोलण्याचें विसरून जाईल. मी येथला मुख्य अधिकारी आहें व अपराध्यांना आमच्या रानटी रिवाजाप्रमाणें शिक्षा करण्यास मी पूर्ण मुखत्यार आहें. ' रामनाईक ह्मणाला.

हें भाषण ऐकून त्या स्त्रिया फार भेदरल्या. त्या वेळची त्यांची केंविलवाणी स्थिति पाहून कोणालाहि हंसूं लोटलें असतें. मदतीची आशा नाहीं असें पाहून वृद्धास साष्टांग प्रणिपात करून त्यांनीं दीनवाणीनें करुणा भाकली, ' देव ! कृपा करा. आह्मी गरीब पोटार्थी स्त्रिया. जलदुर्गास त्यानें आह्मांला कराल करणीनें भयाक्रांत केलें व येथेंहि आमचीं शंभर वर्षें भरलीं. भगवन् ! दया करा. आह्मांस सोडवा. आह्मी मुकाट्यानें चालत्या होतों. '

" अद्याप तुह्मीं माझ्या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं. बाई ! तुह्मी अलीकडे कशा आलां ? " रामनाईकानें पुनः विचारलें.

" नीलवर्णानें आह्मांस खालच्या उतारानें पाठविलें व आह्मीं रामगडच्या यात्रेकरू आहों असें 'सांगितलें. नंतर आह्मी पुष्कळ फेरा घेऊन येथें आलों. किल्ल्याजवळच्या उतारानें नाविक आह्मांस येऊं देईना. " त्यांनीं भीत भीत पण सरळपणें निवेदन केलें.

' ठीक तर मग ! आमचे लोक बेइमान झाले नाहींत. खालच्या उताराचीहि व्यवस्था आह्मांस करावी लागेल. वरच्या उतारानें तुह्मीं आला नाहीं तेव्हां तुह्मांस तिकडूनच पाठविण्यांत येईल. परत गेल्यावर तुह्मी दानधर्म करा कारण कांहीं शोभा न होता तुह्मांस परत येतां आलें. आणि ध्यानांत ठेवा कीं, पुनः कधीं तुह्मी किंवा किल्लेदाराचे दुसरे लोक येथें आलां तर तुमचे नाक कान कापून गळ्यांत बांधीन. '

' आणि आमच्या धन्याला कांहींच प्रत्युत्तर नाहीं काय ? ' दुसऱ्या स्त्रीनें जरा धिटाईनें प्रश्न केला. ती लीलेकडे वळून ह्मणाली, ' आणि मीनाक्षी ! तुझा काय निरोप ? '

रामनाईक ओरडला, ' चूप, निलाजरे ! चालती हो. माझ्या आज्ञे-

रामनाईकानें उत्तर केलें, ' बाई ! लीलादेवी ! माझें वृद्ध मनुष्याचें ऐक. मी ब्राह्मण नाहीं खरा; पण तुझ्या नशिबीं संन्यासिनीच्या वस्त्रांपेक्षां जास्त चांगल्या वस्तु आहेत असें मी खात्रीनें सांगतों. प्रथमारंभीं कदाचित् थोडे कष्ट होतील. आमच्या गांवचा जोशी ज्योतिषविद्येंत निपुण आहे. त्याला उद्यां बोलावूं काय ? '

' नको, नको; ' लीला शांतपणें बोलली, ' आजोबांना त्यांच्या मार्गापासून परावृत्त करणें शक्य नाहीं व तुमच्या जोशाचें भविष्यकथन जर त्यांच्या मार्गास विघ्नकारी असेल तर माझ्या मनाला व्यर्थ त्रास होईल; नको. भविष्यत् भवितव्य असेल तें होवो. माझा मार्ग, अल्पकाल वा चिरकाल, कंटकमय असो कीं पुष्पाच्छादित असो, मी तो श्रद्धेनें व विश्वासानें आजोबांच्या संगतींत आक्रमीन. '

प्रकरण १९ वें.

चक्रतीर्थ.

दुसऱ्या दिवशीं गांवांतले लोक नित्याप्रमाणें धर्मकथा ऐकण्यास आले. धर्मकथा कथन झाल्यावर वृद्ध लोकांना उद्देशून ह्मणाला, ' मित्रहो ! तुह्मीं मला आजपर्यंत प्रेमानें वागवून घेतलें आणि विश्वनियामकाची तशी योजना असती तर मीं तुमच्या सहवासांत आजन्म कालक्षेप केला असता; पण मानवाचा बेत त्या जगन्नियंत्याची इच्छा नव्हे. माझें अंतःकरण मला सूचना करतें, नव्हे, हृदयस्थ परमात्मा मला बजावतो कीं, रे वृद्धा ! तूं परमात्मा पहाण्याची इच्छा करतोस; पण त्या मार्गांत अद्याप तुझी विशेष गति झाली नाहीं. त्या विशिष्ट अवस्थेहून तूं फार दूर आहेस. तूं स्वतःला साधु—वीतरागी—ह्मणवितोस, कित्येक तुला पुण्यात्मा ह्मणतात; पण तूं अजून खरा मुमुक्षुहि बनला नाहींस. कोणत्याहि संप्रदायानें तूं अजून दीक्षित झाला नाहींस किंवा मोक्षमार्गाचें ज्ञान होण्याकरतां तूं अद्याप गुरु केला नाहींस; आणि परमार्थ मार्गांत ती गोष्ट अत्यंत अवश्यक आहे. तूं आजपर्यंत सुखांत आयुष्य घालविलेंस.

कधींहि व्रताचरणें केलीं नाहींस. केवळ तुझ्या सत्कृत्यांनीं व धर्मबुद्धी-मुळेंच परमेश्वरानें आजवर तुझें रक्षण केलें. तुझी मुक्तता परमेश्वराचा कृपाप्रसाद होय व तुझ्या मोक्षमार्गांत ही प्रथम पायरी समज. परमार्थाचें ज्ञान झालेल्या. परमेश्वराच्या अगम्य व अलौकिक राज्यांत प्रवेश केलेल्या एखाद्या महानुभावाचा शोध कर. तो आढळेपर्यंत स्वस्थ बसूं नकोस. विलंब करूं नको विलंब करूं नको असा अंतर्ज्योतीचा सारखा रव माझ्या कर्णांवर आदळत आहे. तूं वृद्ध आहेस व दिवसेंदिवस गलित-शक्ति होत आहेस. विलंब करशील तर हा उत्तम मानवजन्म व परमे-श्वरानें तुला दिलेली ही अपूर्व संधि तूं गमावून बसशील. मृत्यु तुला पाचारण करील तेव्हां, ही भविष्यवाणी समजूनहि तूं विन्मुख रहाशील तर, तुला चित्रगुप्तास काय जबाब देतां येईल ? आणि तूं हा अपार दुस्तरणीय भवसागर कसा तरून जाशील ? ह्मणून मित्रहो ! ह्या देव-वाणीनें माझें हृदय रात्रंदिवस कंपित होत आहे. ही भविष्यसूचना मिळाल्यामुळें मला स्वस्थ रहावत नाहीं. मला शांति प्राप्त करून घेतली पाहिजे मला स्पष्ट झालेल्या मार्गानें परमार्थपथ चोखाळला पाहिजे. मर-णानंतर यमराजापुढें मला निर्भय मनानें उभे रहातां आलें पाहिजे.

माझ्या वयाला आज सुमारें ऐंशी वर्षें होतं आलीं. इतका काळ मीं केवळ आळसांत व सुस्तींत घालवला. मी बंदिवान होतों, स्वतंत्रमानस नव्हतों असें मला सांगतां येईल खरें. पण आतां तर मी बंधमुक्त झालों आहे ना ? करतां, परमार्थप्राप्तीची वेळ निघून जाण्यापूर्वीं एक क्षणहि न घाल-वतां मीं प्रयत्न केला पाहिजे; ह्मणून अंतःस्फूर्तीच्या आज्ञेनुसार, विलंब न लावतां, मी महानुभावाच्या शोधास जातों. विलंब होऊन मी काल-मुखीं निमालों तर माझा जन्म फुकट गेलासें होईल. ”

सर्व श्रोत्यांना अतिशय दुःख वाटलें. वृद्धाच्या भावी विरहाची कल्पना मनांत येऊन त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. वृद्ध तेथें रहावयास आल्यापासून त्या लोकांचा धर्मसंबंधीं फार फायदा झाला होता. ते ह्मणूं लागले, ‘ भगवन् ! तुह्मी येथेंच रहा. देव तुमच्यावर दया करील. तुह्मी आह्मांला उत्तम मार्गानें नेत आहां. असा मार्ग आह्मांस आजपर्यंत कोणीं दाखविला नाहीं. परमेश्वर तुमचा हेतू पूर्ण करील. तुह्मी जाऊं नका. ’

पण वृद्धानें ह्याचा अंदाज पूर्वींच केला होता. लीलादेवीच्या हिता-करतां त्याला तेथून जाणें अवश्य वाटलें खरें; तरी त्याचा मुख्य हेतु, आपण सिद्धस्थितीस पोंचावें, परमेश्वरस्वरूप आपणांस मिळावें हा होता. त्यानें जलदुर्गच्या किल्लेदारांना एखाद्या पुण्यक्षेत्रीं राहूं देण्याची विनंति केली होती पण व्यर्थ ! तशी परवानगी देणें किल्लेदाराच्या अधिकारांतलें नव्हतें. आणि नीलवर्ण तर एकदां वृद्धाचा अपमान करून त्याला अनेक दुरुत्तरें बोलला; पण वृद्ध आतां स्वतंत्र झाला होता—कशाहिरीतीनें होवो ! परमेश्वरानें हें सारें आपल्यासाठींच घडवून आणलें असें त्याच्या मनास वाटूं लागलें व लीलेला किल्ल्यावर नेलेलें कळलें तेव्हां अविचारानें ईश्वरास दूषण दिल्याबद्दल त्यास आतां पश्चात्ताप झाला.

वृद्धाचा निश्चय पालटला नाहीं. त्यानें ती संध्याकाळ लोकांना औषधें, ताईत इत्यादि देण्यांत घालवली. शेवटीं त्यानें सर्वांना आशिर्वाद दिले व त्यांचा प्रेमपूर्वक निरोप घेतला.

दुसऱ्या दिवशीं वृद्ध व लीला चक्रतीर्थास मार्गस्थ झाली.

चक्रतीर्थ एका लहानशा संस्थानिकाच्या ताब्यांत होतें. यावेळीं चक्र-तीर्थ क्षेत्रीं एक मोठा मेळा भरावयाचा होता. ही आपली मंडळीं चक्र-तीर्थापासून चार पांच मुक्कामावर असतांना एक विशेष प्रकार आढळून आला. तो असा—ठिकठिकाणीं चक्रतीर्थ क्षेत्राचे लोक भेटत. ते यात्रे-करू उतरण्याच्या आपण केलेल्या व्यवस्थेचें रसभरित वर्णन करीत. शेवटच्या मुक्कामावर त्यांच्या झुंडीच्याझुंडी यात्रेकऱ्यांना त्रासवीत असत. चक्रतीर्थ क्षेत्राच्या लोकांना हा मेळा एक महापर्वणीच झाला होता ज्या कोणाच्या घरीं गाईचा गोठाहि रिकामा असेल त्यानें तो स्वच्छ करावा व त्याचें वर्णन करून यात्रेकरूंना तो राजमंदिर भासवावा; पण वृद्धाची व्यवस्था अगोदरच झाली होती. त्याला भिल्लांच्या जोशानें एक पत्र दिलें होतें. त्याचा एक दूरचा नातलग चक्रतीर्थक्षेत्रीं पुराणिक होता. भिल्लसेवक वृद्धाला चक्रतीर्थास पोंचवून परत गेले. वृद्धानेंच त्यांना परत पाठ-विलें. वृद्ध व लीला नित्यक्रमाप्रमाणें रोज रस्त्यांनीं गीतें गात फिरत असत; त्यांना पाहून लोक आपसांत म्हणत, ' कांहो ! हा वृद्ध संन्यासी कोण ? अरे ! ह्या मुलीनेंसुद्धां संन्यासिनीचा वेष धारण केला आहे !

ती काय सुंदर गीत म्हणते !' वृद्धाची कीर्ति अगोदरच पसरली होती. कोणी म्हणत, 'अहं ! हाच तो. आपल्या ग्रामाध्यक्षाच्या घरांतला ब्रह्मराक्षस ह्यानेंच मुक्त केला ! त्या विशाखदत्त सावकाराच्या जन्माचा सोबती झालेला रोग ह्यानें दोनच दिवसांत बरा केला ! त्या रामनाथाच्या स्त्रीचें भूत ह्यानेंच काढलें !' अशा कितीतरी गप्पा लोक आपसांत बोलत. वृद्धाची विद्वत्ता पाहून तेथें जमलेले विद्वान् लोक आश्चर्य करीत.

एके दिवशीं दुपारीं नित्याप्रमाणें विद्वत्परिषद् भरली असतां सभापतीनें वृद्धाला प्रवचन सांगण्याची आज्ञा केली. परमेशस्तवनानंतर वृद्धानें व्यासपीठावर आरोहण केलें. श्रीमत् भगवद्गीतेंतील:—

अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥
अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥
तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।
भवंति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥

ह्या श्लोकांवर वृद्ध प्रवचन सांगूं लागला. तसलें प्रवचन त्या परिषदेच्या कोणत्याहि अधिवेशनांत ऐकूं आलें नव्हतें. खरोखरच वृद्ध अंतःस्फूर्तीनें विवरण करीत होता. त्याचें प्रवचन जसें विद्वानांस मान्य तसेंच सामान्य जनांस बोधप्रद वाटलें. मोठ्या शब्दांच्या अवडंबरानें त्याच्या प्रवचनाला काठिण्य आलें नव्हतें. सामान्य जनांना समजेल अशा उत्तम रीतीनें त्यानें विषय स्पष्ट करून सांगितला. विद्वज्जनांनाहि तें प्रवचन बहुमोल वाटलें. परमेश्वराच्या प्रेमस्वरूपाचें वर्णन करतांना त्याची वाक्सरिता अस्खलित धांवूं लागली. त्याच्या प्रवचनांत कळकळ, भक्ति, प्रेम, श्रद्धा, हीं मूर्तिमंत अवतरलीं होतीं. विद्वानाचें प्रवचन म्हणजे त्यांत घटमठ, सर्परज्जु, सुवर्णालंकार, इत्यादि ठरीव दृष्टांताची, विद्वत्तेच्या प्रदर्शनाची, गुह्यगोपनाची रेलचेल असावयाची. तें सामान्य जनांस प्रायः दुर्बोध व्हावयाचें; पण वृद्धाच्या विवेचन सरणीचा प्रकारच निराळा. मुक्ति कशी मिळेल, परमार्थाचा लाभ कसा होईल, परमेश्वर कसा दिसेल, याचें सरळ साधें विवेचन त्यानें केलें. त्याच्या प्रवचनांत गौप्यगोपन नव्हतें, कीं शब्दावडंबर नव्हतें. परमेश्वरचरणीं

नम्रता, त्याच्यावर प्रेम, भूतमात्रावर दया, परोपकार, धार्मिकतेच्या दंभाचें अप्रयोजन व थोडीशी विद्वत्ता अंगीं आल्यानें उत्पन्न होणाऱ्या ' अहं ' स्वभावाची अनवश्यकता, ह्यांचें स्पष्ट प्रतिपादन त्यानें केलें. त्या प्रवचनामध्यें सर्वत्र धन्योद्गार ऐकूं येऊं लागला. सर्वांस वृद्धाची योग्यता स्पष्ट दिसून आली.

दुसऱ्याच दिवशीं हेमपुरीच्या श्रीनित्यानंद स्वामींनीं वृद्धास अद्वैत धर्माची दीक्षा दिली. अन्य अनेक पंथांच्या महात्म्यांची इच्छा त्यानें आपल्या सांप्रदायांत प्रविष्ट व्हावें अशी होती; पण वृद्धानें श्रीशंकराचार्यांच्या अद्वैतमताचाच स्वीकार केला. वृद्धानें विजयपुरास जाऊन पौत्रीची व्यवस्था करण्याचा मानस दर्शविल्यानें त्यास संन्यासदीक्षा मात्र दिली नाहीं. श्रीनित्यानंद स्वामींनीं त्यास पुढें संन्यास देण्याचें ठरविलें.

एके दिवशीं वृद्ध घरीं स्वस्थ बसला असतां, तो उतरला होता त्या पुराणिकाचा जेष्ठ चिरंजीव तेथें आला. पुराणिकाचा मिष्टभाषणी युवक वृद्धाशीं संभाषण करूं लागला. मधून मधून त्यानें मधुर भाषा पद्धतीनें वृद्धाची स्तुति करावी. वृद्धास स्वभावतः वास्तव स्तुतीचाहि कंटाळा होता. मग ह्या लाघवी ब्राह्मणपुत्राच्या अवास्तव स्तुतीनें त्यास किती त्रास झाला असेल बरें ? त्यांतूनहि वृद्ध आतां यतिधर्म आचरीत होता.

अयथार्थ स्तुतीचाहि मर्यादातिक्रम झाल्याचें पाहून वृद्ध बोलला, ' युवका ! मी प्रत्यक्ष श्रीकृष्ण असतों तरीहि तुला ह्याहून जास्त स्तुति करतां आली नसती. जरा विचार करून भाषण करावें हें चांगलें. तुला स्तुतिस्तोत्र गावयाची इच्छा झाली असेल तर मंदिरांत जाऊन सर्वश्रेष्ठ परमेश्वरास कां आळवीत नाहींस ? '

' पण गुरुमहाराज मज पामराची इच्छा पूर्ण करतील. गुरुवर्यांनीं मध्यस्ती केल्याशिवाय माझ्या स्तुतिप्रार्थनेचा कांहीं उपयोग होणार नाहीं. ' युवकानें लघळपणें झटलें.'

" तुझ्या भाषणांतल्या दोन गोष्टी मला पसंत नाहींत. एक, मला तूं गुरुवर्य झटलेंस—ती पदवी फक्त महात्म्यांनाच लावतां येते— व दुसरें, तुझी इच्छा मला विदित नसल्यानें मी तुला सहाय्य करण्यास असमर्थ आहें. "

" पण, देव ! आपण मनांत आणल्यास सहाय्य करूं शकाल. आपलें सहाय्य न मिळाल्यास मी वेडा होईन. " ब्राह्मणपुत्र म्हणाला.

" परमेश्वर तुझें रक्षण करो ! वेडा कां होतोस. बाबा ! तुला संपत्ति पाहिजे असेल तर उद्योग कर. उद्योगानें तुझा हेतु शीघ्र सफल होईल. आतां तूं तरुण असल्यानें तुझें मन कोठें इतरत्र धांवत असेल तर तूं मांत्रिकाकडे जा. तुला उपायकथन करण्याच्या मिषानें ते तुझें असेल तें द्रव्य उपटतील. येथें अशा गोष्टी काढल्यास तर मी तुला शत्रु समजेन. " वृद्धानें उत्तर दिलें.

' छे, छे ! धर्मपुरुष ! असें ह्मणूं नका. ' युवक लोटांगण घालून ह्मणाला, ' आपण येथें एकटेच आहों. मला भीति वाटते तरीपण मी लपवून ठेवीत नाहीं. महाराज ! कन्या लीलेच्या सहजसुंदर कृतिनीं मला मोहित केलें आहे.' तिजवांचून मी जगणार नाहीं. देव ! कृपा करून मला कृतार्थ बनवा. मी आपली पदधूलि वंदन करतों. आपण वाचादत्त व्हा; ह्मणजे मी आपल्याबरोबर पृथ्वीच्या दुसऱ्या टोंकापर्यंत-सुद्धां येईन ! "

वृद्ध त्रस्त झालासा दिसला. तो ह्मणाला, " युवका ! एका सर्वसंगपरित्यागी यतिधर्मावलंबी मनुष्याच्या एका बालिकेची इच्छा करतोस ! तूं स्वतःशीं तिच्या कुलाची व योग्यतेची तुलना केलीस होय ? अथवा तुजकडे तरी काय दोष ? तरुणा ! असा अविचारानें अंध होऊं नकोस. ' ऊठ, तूं तिजजवळ ही गोष्ट काढलीस काय ? "

" छे, छे ! मी इतका मूर्ख नाहीं. आपली परवानगी मिळाल्यावर पहातां येईल. " पुराणिकपुत्रानें उत्तर दिलें.

" असें कांहीं करूं नको. तुझ्यासारख्या शास्त्रीश्रेष्ठाच्या जेष्ठ व विद्वान् चिरंजिवाला ती एका दरिद्री यतीची कन्या सहधर्मिणी शोभणार नाहीं. असो; हें सर्व विसरून जा. आपण पुनः पहिल्यासारखे स्नेही बनूं. " वृद्ध त्यास गौरवून ह्मणाला.

ब्राह्मणयुवक मनांत कष्टी होऊन तेथून चालता झाला.

प्रकरण २० वें.

संकट व मुक्तता.

वृद्धाचे गुरु श्रीनित्यानंद स्वामींनीं आपल्या नवीन शिष्यास—परंपरासांप्रदायानें शिष्य, पण वृद्ध कित्येक बाबींत गुरूहून श्रेष्ठ होता—हेमपुरीस बोलावलें. विजयपुरास जाऊन पौत्रीची व्यवस्था करण्याचा आपला मानस त्यानें गुरु नित्यानंदाना कळविला होताच. हेमपुरीहून विजयपूर दहा बारा मुक्कामांवर होतें. नित्यानंदाबरोबर प्रवासाची सर्व व्यवस्था होती, ह्मणून वृद्ध पौत्री लीलेसह कांहीं त्रास न होतां हेमपुरीस जाऊन पोंचला. विजयपुरच्या राजपुरुषांपैकीं कित्येक नरेशांच्या समाधी हेमपुरीस होत्या. श्रीनित्यानंदाचा मठ तेथें जवळच होता. विजयपुरास जाण्याची व्यवस्था होईपर्यंत वृद्ध गुरूंच्या मठांत राहिला होता. तो नेहमींप्रमाणें संध्याकाळीं गांवांतून देवाचीं गीतें गात फिरत असे.

एके दिवशीं असाच परत येत असतां, वृद्धाच्या मनांत काय विचार आला कोण जाणे, तो लीलेला ' राजपुरुषांच्या छत्र्यांकडे चल. ' असें ह्मणाला. तेथल्या सेवकानें त्या दोघांना सर्व समाधी एकामागून एक दाखविल्या. प्रत्येक समाधीला वृद्धानें नम्रपणें प्रणाम केला. शेवटीं सेवकानें राजा विलास राजाची छत्री दाखविली. तेथें पोंचतांच वृद्ध गुडघे टेंकून खालीं बसला व स्फुंदूं लागला. त्याचें मन अस्वस्थ झालें; तो हतबुद्धाप्रमाणें बसला. बालिका लीला घाबरली. आजोबांना काय झालें हेंच तिला समजेना. त्याचें ज्ञान होतें तर ती धांवत जाऊन मठांतून औषध घेऊन आली असती. तिच्या हातावर सर्व भार टाकून तो ह्मणाला, ' नीलवर्णाच्या अकल्याणाचे उद्गार माझ्या मुखांतून निघाले तेव्हांचे तुझे उद्गार मी विसरलों नाहीं. बाळ ! ही आपल्यासमोर एका राजपुरुषाची समाधि आहे. त्यानें मला किती दुःख दिलें याची कल्पनाहि तुला करतां येणार नाहीं. त्याचें नुसतें स्मरण झाल्यानेंहि माझी पशुबुद्धि जागृत होते. सर्व सुविचार पार लटपटतात. तरी हे परमेश्वरा ! मी तुझी प्रार्थना

करतों कीं, तूं मला ह्या राजपुरुषाला, माझ्या स्वामीला क्षमा करण्याचें सामर्थ्य दे. देव ! त्यानें हजारों लोकांचें केलेलें कल्याण लक्षांत घेऊन तूं त्याजवर कृपा केली असशीलच. हे परलोकवासी नरेशा ! ईश्वर तुजवर दया करो व तुला शांतिपद प्राप्त होवो ! '

" आजोबा ! हे महाराज तुमचे कोण होते ? " लीलेनें आश्चर्यमुद्रेनें प्रश्न केला.

' ते माझे कोण होते ? बाळ ! आज मी तुला माझी सर्व हकीकत सांगेन. विलासराज माझा मित्र व धनी असून मजवर त्याचें फार प्रेम होतें. मला आतां सुद्धां माझ्या प्रिय धन्याबरोबर येथेंच वास्तव्य करावेंसें वाटतें. देवा ! ह्या कन्येच्या रूपानेंच तूं मला क्षमेचा श्रेष्ठ सद्गुण, ब्राह्मण्याची एक पायरी शिकविलीस म्हणावयाचें. ' वृद्ध उद्गारला.

राजपुरुषांच्या समाधिस्थानाच्या पश्चिम दिशेला एक सुंदरसें सरोवर होतें. ते शरदृतूचे दिवस असल्यानें सरोवर जलपूर्ण होतें. त्यांत असलेलीं सूर्यकमलें संध्यासमय होऊं लागल्यामुळें आपलें स्वरूप आकुंचित करूं लागलीं होतीं. पूर्व दिशेस रोहिणीपति दृग्गोचर होऊं लागल्यानें कुमुदिनी त्याचें स्वागत करण्यास तत्पर झाल्या. निशाकालीन मंद वायु तेथें असलेल्या अनेकविध पुष्पांच्या संगतीनें सुगंधित होऊन सर्वत्र विचरूं लागला. त्या आल्हादजनक संध्याकाळीं वृद्धानें आपलें आह्निक कर्म आटोपून किती वेळतरी लीलेला पूर्वचरितांतील अनेक गोष्टी सांगितल्या. आपले आजोबा कोण हें लीलेला आतां कळलें. भगवान् चंद्रमा बराच वर आलेला पाहून तीं दोघें मठांत परतलीं.

कांतिनगरकराचा पराभव करून राजा विजयपुरास परत जात आहे अशी बातमी आल्यानें वृद्ध जाण्यास अधिर झाला. वृद्धाच्या मनांतून पूर्वीप्रमाणेंच अप्रसिद्ध रीतीनें प्रवास करावयाचा होता; पण स्वामी नित्यानंदांनीं हेमपुरीच्या अधिकाऱ्याकडून त्यांच्याबरोबर बळेंच संरक्षक देवविले, आणि वृद्ध व त्याची पौत्री यांजकरतां मेणा दिला. मार्गानें वृद्ध लीलेला म्हणाला, " वत्से ! मानसन्मानानें आपण पूर्वस्थिति विसरत चाललों; नित्यक्रमाचा त्याग आपण करतां कामा नये. "

" तुह्मी आज्ञा कराल तेव्हां देवगीतें गाण्यास मी सिद्ध आहें. " लीलेनें उत्तर दिलें.

पांच सहा दिवस कांहीं नवलविशेष न घडतां त्यांचा प्रवास झाला. सहाव्या दिवशीं संध्याकाळीं मुक्कामाच्या गांवीं वृद्ध नित्यक्रमाप्रमाणें रस्त्यानें देवगीतें गात फिरत होता. ह्यावेळीं तो गांवाच्या अगदीं बाजूला असलेल्या रस्त्यांत होता. लीला त्याला ह्मणाली, " आजोबा ! मला कसलेंसेंच वाटतें. ह्या बाजूला लोकांची वस्तिहि दिसत नाहीं. चला. आपण घरीं जाऊं. "

वृद्धानें उत्तर दिलें, " बाळ ! आपल्याला कसलें भय ? काषायवेषी मला वृद्धाला व माझ्या सेवा करणाऱ्या तुला गरीब मुलीला कोण काय करणार ? "

तो बोलत होता इतक्यांत समोरून दहा पंधरा लोक एक मेणा घेऊन येतांना दिसले. ते ' नवरीला रस्ता द्या, नवरीला रस्ता द्या. ' असें मोठ्यानें ह्मणत होते. ती भिल्लांची कसली एखादी मिरवणूक असेल असें वाटून तीं दोघें बाजूला झालीं. पण ते लोक नेमके ह्यांच्यापुढें थांबले. लीलेच्या तोंडावर हात देऊन एकजणानें तिला उचललें. दुसऱ्या एकानें तिच्या आजाच्या डोक्यांत एक सोटा लगावला, त्यामुळें वृद्ध मूर्छित होऊन पडला. लीलेला मेण्यांत घालून ते लोक एका मार्गानें निघून गेले. हा सर्व प्रकार कल्पना करतां येणार नाहीं इतक्या थोड्या वेळांत अगदीं गडबड न होतां घडून आला. रोजच्याप्रमाणें गांवाचे दरवाजे यथाकालीं बंद झाले.

लीला ह्या प्रकारानें अगदीं भांबावून गेली. तोंडाला घातलेल्या बोळ्यानें तिचा जीव व्याकुळ झाला. तिच्या शरीराभोंवतीं कांबळा गुंडाळला असल्यानें तिला हातपाय हलवतां येत नव्हता. जलदुर्गास शिवदासानें तिला किल्ल्यावर नेलें त्याचें स्मरण तिला झालें. त्यावेळीं अवयवचालन व श्वासोच्छ्वास तरी करतां येत होता. ह्या स्मृतीबरोबरच तिला कल्पना आली कीं, आपलें हें स्थलांतर आपल्या पुरातन शत्रूनेंच केलें नसेल ना ? चक्रतीर्थापासून त्याचे दूत आपल्या पाळतीवर असतील अशीहि शंका तिच्या मनांत उद्भवली. ते तिला कोठें नेत होते बरें ? मेण्याचा दरवाजा बंद असून त्याच्यावर एक जाड कांबळा टाकला

असल्यानें तिला कांहीं दिसत नव्हतें. आज आकाशांत मेघ उत्पन्न झाले होते व लीलेच्या वियोगानेंच जणू ते किंचित् अश्रुवर्षाव करीत होते. अद्याप चंद्रमा उदय पावला नव्हता ह्मणून मेण्याच्या अंतर्भागाप्रमाणेंच बाहेरहि तिमिरदानव अप्रतिबंध सत्तेनें आपला अधिकार गाजवीत होता. मध्यरात्रीपर्यंत ते लोक एकसारखे जोरानें चालले. भारवाहक बदलण्यासदेखील ते थांबत नव्हते, तर जरूरीप्रमाणें परस्परांना वाहककार्यापासून चालतां चालतां सोडवीत. तिला वारंवार धक्के बसत असल्यानें ते वाहक नसावे असा तर्क तिनें केला. मेण्याच्या बाजूचे धक्के बसून बसून तिचें अंग दुखूं लागलें. तिला ह्यांतून सुटण्यांचा एकहि उपाय दिसेना. एकदाचे ते थांबले त्यांनीं मेणा खालीं ठेवला. जवळच वहाणाऱ्या जलप्रवाहाचा झरझर शब्द तिच्या कांनीं आला. मेण्याचें दार उघडलें. तिचें तोंड मोकळें करून एक इसम म्हणाला, " बाई! तुला तहान लागली असेल. हें पाणी घे; पण जर तूं ओरडण्याचा प्रयत्न करशील तर काय होईल तें मला सांगतां येत नाहीं. "

" मी कोठें आलें ? माझ्या आजोबांना तुह्मीं काय केलें ? " तिनें अस्पष्ट स्वरानें त्या मनुष्याला प्रश्न केला.

" त्यांची चिंता करूं नकोस, ते सुरक्षित आहेत; पण जास्त प्रश्न विचारूं नकोस मला उत्तरें देण्याचा, हुकूम नाहीं. सर्व तुला लवकरच कळेल. तुला दुःख होणार नाहीं. तुझ्या केंसासहि इजा करण्याची आमची इच्छा नाहीं; पण तूं मुकाट्यानें रहा; नाहीं तर हे माझे सोबती तुला आपल्या भाल्यांनीं ठार करून चालते होतील. "

पाणी प्याल्यावर लीलेला जरा हुषारी आली. पुनः तिचें तोंड बंद करण्यांत आलें नाहीं. थोड्याशा अंतरावर ते लोक परस्परांशीं बोलत तंबाखू ओढीत बसले होते. केव्हां केव्हां चिलमींतून निघणाऱ्या ज्वालेनें जवळ वहात असलेलें प्रवाहाचें पाणी चमकत असे. पुनः तो मघांचा मनुष्य येऊन लीलेला ह्मणाला, ' दिवस उगवला ह्मणजे मी बाजरीचीं कणसें भाजून देईन. पांच सात दिवस दुसरें कांहीं खाण्यास मिळण्याचा संभव नाहीं. तूं गडबड करणार नाहींस तर तुला कांहीं वेळ मोकळें फिरतां येईल. '

लीलेनें उत्तर दिलें नाहीं. पाणी गोटांत गेल्यानें तिला हुषारी आली तसें आपल्या प्रस्तुत अवस्थेचें यथार्थ ज्ञान होऊन तिला दुःख वाटूं लागलें. ती हतबुद्ध झाली नव्हती; पण इतक्या पुष्कळ रांकट व चपळ मनुष्यांच्या तावडींतून निसटून जाण्याचा नुसता विचारहि मनांत आणणें वेडेपणा होता. ती आपल्या मुक्ततेचा भार ईश्वरावर सोंपवून स्वस्थ बसली. आश्चर्याची गोष्ट ही कीं, यत्किंचित् आधार नसतांहि तिला आपल्या मुक्ततेचा विश्वास वाटत होता व क्षणोक्षणीं, वास्तविक तो कमी व्हावयाचा तो उलटा दृढ होत होता. तिच्या कानाशीं जणूं ध्वनि होत होता, ' भिऊं नको; मी सर्वरक्षक तुजबरोबर आहें. '

थोड्या वेळानें त्या लोकांनीं पुन: मेणा उचलला. आतां त्यांचा वेग पहिल्यासारखा राहिला नाहीं. कित्येकजण खांदे चोळवटले म्हणून कुरकुरूं लागले. तिचा मेणा खालीं ठेवला जाईल काय असें तिच्या मनांत आलें. प्रभातकाल झाला. पावसाचे थेंब क्वचित् येत होते. कांहींवेळानें मेणा पुन: जमिनीवर टेंकला असें तिला वाटलें व तें खरेंहि होतें. मेण्याचें दार उघडण्यांत येऊन तिला बाहेर काढलें व जवळच्या एका ओसाड झोंपडींत तिला ठेवण्यांत आलें; पण तिचे हातपाय मात्र मोकळे केले नाहींत.

चला, वाचक ! आपण वृद्धाचा समाचार घेऊं. सोट्याच्या आघातानें तो बेशुद्ध पडलेला आपण पाहिलाच आहे. गांवाचा दरवाजा बंद झाला तरी अद्याप वृद्ध व त्याची पौत्री न आल्यानें त्यांच्या लोकांना काळजी वाटूं लागली. गांवच्या राजपुरुषाकडे जाऊन त्यांनीं तपास केला. राजपुरुषानें वृद्धाच्या तपासास लोक पाठविले; पण त्याचा तपास लागेना, कीं कोणी बातमी सांगेना. सर्वजण घाबरून गेले. ते प्रत्येक रस्त्यानें हिंडत असतां त्यांना कोणाचें विवळणें ऐकूं आलें. ते चट्कन् मशाल घेऊन धांवले. पहातात तों तो वृद्धच होता. त्यांनीं त्याला उचलून बिऱ्हाडीं नेलें. अनेक उपाययोजना झाल्यावर वृद्धाचें शरीर चैतन्ययुक्त दिसूं लागलें.

आपल्या गांवीं एका पुण्य पुरुषाचा घात होऊन त्याच्या मुलीला पळवून नेण्यांत आलें हेंच प्रथम कोणास खरें वाटेना. हेमपुरीहून आलेल्या

राजसेवकांनीं गांवकऱ्यांच्या मदतीनें पुष्कळ तपास केला; पण व्यर्थ ! लीलेचा शोध लागला नाहीं. काय करणार ? पावसाची बुरबुर येत असतां अशा प्रकाशहीन रात्रीं मनुष्याहून उंच असलेल्या पिकांतून कोठें शोध करणार ? सकाळपर्यंत वाट पाहण्याशिवाय इलाज नव्हता.

आणि सकाळीं वृद्ध सचैतन्य झाला. त्याचें शांतवन कोण करूं शकणार ? लीला कोठें आहे ? या प्रश्नाचें उत्तर कोण देऊं शकणार ? तिला कोणीं व कां नेलें याचा तर्क कोणासहि होईना. दागिन्याकरतां ह्मणावें तर त्या विरागी वृद्धाच्या पौत्रीच्या अंगावर दागिने मुळींच नव्हते. सकाळीं थोडासा सुगावा लागला. शेतांतील उभ्या पिकाचीं ताटें मोडून पडलेलीं दिसत होतीं. हा माग शेजारच्या गांवापर्यंत दिसला. लीलेला नेणारे लोक त्या गांवांतून पुढें गेले असतील; पण पुढें तपास कोण करणार ? त्या गांवच्या अधिकाऱ्याला एवढी काय जरूर ? वरिष्ठाचा हुकूम आल्यावांचून तो शेजारच्या ग्रामाधिकाऱ्याचें थोडेंच ऐकणार ? तशांतून बक्षिसाची लालूच असती तर त्यानें कदाचित ऐकलें असतें; पण त्याला कोण पारितोषिक देणार ?

वृद्ध संज्ञावान् झाल्यावर एकसारखा लीलेला हांका मारीत होता. तो मधून मधून अनावर होत असे. स्वतः तिच्या तपासास जाण्याकरतां तो उठून उभा राही तेव्हां त्याचें निवारण करणें महा दुर्घट होई. तो बडबडत होता, ' मला लीलेकडे न्या. मला तिला भेटवा ! मला विजयपुरास न्या. राणी चंद्रावतीच्या चरणांशीं मला घेऊन चला ! ती माझें बाळ मला देईल. ती माझा न्याय करील. अरे जयसेन ! तिनें तुझी शुश्रुषा केली. जा; तिची सुटका कर. ती मला आणून दे. मी तुला आशीर्वाद देईन.

सूर्यास्ताच्या सुमारास तो स्थिरचित्त झाला. त्याच्या कानांवर कांहीं आवाज येऊन त्यानें तपास करण्यास सांगितलें. खरोखरच त्याच्या कल्पनेप्रमाणें कांहीं भिल्ल आले होते. बरोबरचा मेणा त्यांनीं खालीं ठेवला. लीला दार उघडून धांवत आजोबाकडे गेली. ती सद्गदित स्वरानें ह्मणाली ' आजोबा ! ईश्वर आपला रक्षणकर्ता आहे. त्यानें पुनः माझी सुटका केली. तुमच्या पुण्याईनें मी पुनः निष्कलंक परत आलें. ' तिच्या नेत्रां-

तून आनंदाश्रु वाहूं लागले. वृद्धहि दुःसह निराशेचें परिवर्तन असीम आनंदांत झाल्यानें मूक बनला.

लीलेची हकीकत विशेष नव्हती. तिला झोंपडींत ठेवून दोन इसम तिच्या पहाऱ्यास राहिले व बाकीचे चहूंकडे नाहींसें झालें. सर्व दिवस अशा रीतीनें घालवून रात्र झाल्यावर आपल्या मार्गानें जाण्याचा त्यांचा विचार होता. एका धनगराच्या पोरानें हे लोक जातांना पहांटेच्यावेळीं मेंढवाड्यांतून पाहिलें. जिज्ञासाबुद्धीनें ते कोणीकडे जातात हें तो लक्ष लावून पाहूं लागला. त्या लोकांनीं मेणा उतरून झोंपडींत कायसें ठेवलें हें त्यास दिसलें; पण काय ठेवलें हें त्यास समजलें नाहीं. बरोबरचे बहुतेक लोक चहूंकडे गेलेले पाहून त्या पोरास त्यांचा संशय आला. लढाई संपल्यामुळें परत आपल्या गांवीं जाणारे कांहीं भिल्ल सैनिक त्या रात्रीं त्याच्या गांवात उतरले होते. त्याला भिल्ल-सैनिकांच्या स्वभावाची माहिती होती. तो त्यांच्या नाईकाकडे गेला व त्यानें त्या लोकांची बातमी सांगितली. दरवडेखोरांनीं झोंपडींत लुटीचा माल ठेवला असावा असा आपला तर्क असल्याचें त्यानें भिल्ल नाईकास कळविलें.

भिल्ल नाईकानें—तो किसनच्या सैन्यांतलाच होता—दरवडेखोरांवर लागलींच चाल करून जाण्याचा निश्चय केला. त्या मुलानें भिल्ल सैनिकांना उंच उंच शेतांतून कोणास न कळत झोंपडीजवळ नेलें. त्यांनीं झोंपडीवर एकदम हल्ला केला. त्यांनीं एका रक्षकाला ठार केलें व दुसऱ्यासहि भयंकर जखमा झाल्या. झोंपडींत असलेल्या लीलेला कित्येक सैनिकांनीं ओळखलें. तत्क्षणीं तिला बंधमुक्त करण्यांत आलें. त्या दुसऱ्या रक्षकाला भिल्ल नाईकानें माहिती विचारली. " नीलवर्णानें आम्हांस ही कामगिरी सांगितली. चक्रतीर्थापासून आम्ही संधि पहात होतों. तो आम्हांला पांचशें सुवर्णमुद्रिका देणार होता, व आमचे सर्व गुन्हे माफ व्हावयाचे होते. " इतकें बोलून तो आसन्न झालेला इसम मृत झाला. लीलेच्या मुखानें सर्व हकीकत कळतांच ते तिला घेऊन तिच्या आजाकडे आले. ती हकीकत आपणांस माहीत आहेच..

भिल्लसैनिक परत जाईनात. ते म्हणाले, " आम्ही तुम्हांला सोडून जाऊं

तर न जाणो पुनः एखादें संकट तुमच्यावर येईल आणि मग किसन-नाईक आह्मांला क्षमा करणार नाहीं. ” दुसऱ्या दिवशीं वृद्ध व लीला यांसह भिल्लसैनिक विजयपुरास निघाले. वृद्धानें हेमपुरीहून बरोबर आलेल्या राजसेवकांना तेथूनच परत केलें. विजयपुरास जातांना मार्गांत वृद्धानें भिल्ल सैनिकांपासून युद्धवार्ता ऐकली. जयसेन व किसन ह्यांनीं आपल्या लोकांसह कांतिनगरकराचा कसा पराभव केला, त्यांचे हत्ती कसे काबीज केले, किसनानें कांतिनगराधिपाचें निशाण कसें हिरावून आणलें व हें त्याचें शौर्य ऐकून राजानें समरभूमीवरच त्याला सरदार कसें बनवलें इत्यादि हकीकत ऐकून वृद्धाला आनंद झाला. आणि लीला! कांहीं काल विलीन झालेली उच्च आकांक्षा ह्या युद्धकथांनीं तिच्या मनांत पुन्हा अधिकार करूं लागली.

वृद्ध विजयपुरास पोंचला त्याच दिवशीं राजा नगरप्रवेश करणार होता. हजारों स्वार येत होते शेंकडों नगरवासी आपल्या मित्रांना भेटण्यास शहराबाहेर जात होते. भगवीं वस्त्रें परिधान केलेल्या पौत्रीपितामहाकडे कोणाचेंहि लक्ष गेलें नाहीं. त्यांनी शहरच्या द्वारांत प्रवेश करतांच परमेश्वराचे आभार मानले. पितामहाच्या मुद्रेवर पूर्वस्मृतीनें आनंद झळकूं लागला. राजनगरीच्या प्रथम दर्शनानें लीला स्तिमित झाली. तिनें आजपर्यंत असलें वैभव कधींहि पाहिलें नव्हतें. तीं दोघें राजरस्त्यावर एका बाजूस उभें राहून गीतें ह्मणूं लागलीं. जाणारे येणारे प्रेक्षक त्यांना सामान्य जन समजून कांहीं देत. हळुहळू नौबतीचा आवाज कानीं येऊं लागला. थोड्या वेळानें राजरस्त्यावर, प्रासादांतून, वातायनांतून, प्रासादशिखरावर उभे असलेले पौरजन स्वागतपूर्वक आपआपलीं उत्तरीयें हलवूं लागले. राजप्रवेशाकरतां नागरिकांनीं आपली प्रियनगरी अपूर्वरीतीनें शृंगारली होती. राजनगरी आज लंकाधीशाच्या नगरीची स्पर्धा करतांना दिसत होती.

प्रथम कित्येक गजराज आले. त्यांच्या गळ्यांतल्या असंख्य घंटा व पृष्ठभागावरील नौबती वगैरे अनेक रणवाद्यें यांचा एकच आवाज होत होता; पण तिकडे प्रेक्षकांचें विशेष लक्ष जात नव्हतें. मुख्य मिरवणूक थोड्याच वेळांत वृद्धासमोर आली. राजानें अमोल हिऱ्यांचा

मुकुट धारण केला होता. तो वरचेवर प्रसन्न मुखानें नागरिकांचे प्रणाम घेत बरोबरच्या सरदारांशीं बोलत होता. त्याच्याशेजारीं जयसेन इतर अधिकाऱ्यांसह होता. त्यांतच किसननाईक—आतां सरदार किसननाईक—आपल्या नव्या पोषाखांत झळकत होता. राजाचें लक्ष ह्या काषायवस्त्रधारी पौत्रीपितामहावर जाऊन त्यानें जयसेनास तीं कोण आहेत याचा तपास करण्यास सांगितलें.

जयसेनानें त्यांच्याकडे नजर फेंकून राजास विनंति केली, 'राजन्! हाच तो राजवैद्य सोमदत्त.'

ह्याचवेळीं वृद्ध पुढें आला व राजाच्या अश्वापुढें आडवा पडून 'न्याय, न्याय' ओरडूं लागला.

'त्यांना घेऊन ये.' राजानें जयसेनास आज्ञा केली.

जयसेन त्या पूज्य वृद्धाकडे गेला. त्यानें त्या प्राणदात्या बालिकेकडे कृतज्ञबुद्धीनें पाहिलें. तिनें सलज्ज होऊन अधोवदन केलें. जयसेन ह्मणाला, 'आपली अशी गांठ पडावी काय? असो; आतां काळजी नको. सर्व आनंदमय होईल.

प्रकरण २१ वें.

राजप्रवेश.

आज विजयादशमी. विजयी झालेल्या राजा राजशेखराचा नगरप्रवेश-समारंभ फक्त प्रेक्षणीयच होता असें नाहीं, तर आतां कांहीं काळ कांतिनगर व विजयपूर ह्यांच्या परस्पर वैरभावास गचाडी मिळून सर्वत्र शांतता वास करील अशी त्यामुळें खात्री झाली होती. राजा राजशेखर कुमार चंद्रशेखराचें बंड मोडण्याकरतां आज एक वर्ष समरभूमीवर होता. बंडाचा नाश झाल्यावर कांतिनगराधीशानें प्रत्यक्ष तंट्यास सुरवात केली; पण जयसेनाच्या चुलत्यानें कांतिनगरकराचा पराजय केला. त्या लढाईत कांतिनगरकराचा फार नाश झाला ह्मणून तेथल्या राजानें समेट केल्यामुळें आज मोठ्या समारंभानें राजा राजशेखर नगरप्रवेश करीत होता. इतके

दिवस बाहेर गेलेल्या आपल्या प्रिय राजाचें स्वागत करण्यास उत्सुक झालेल्या प्रजाजनांचे उत्साहानें त्या समारंभांत विशेषच भर पडली होती. सर्व नगर श्रृंगारून, रस्त्यांवर कमानी लावून, तोरणें उभारून, अखिल नगरवासी उत्तम पोषाख करून राजाचें स्वागत करण्यास तयार झाले होते; पण केवळ ह्या समारंभाच्या भपक्यानें प्रजाजनांस आनंद वाटत नव्हता, तर अतःपर शांततेनें आपले व्यवसाय करण्यास सांपडतील ह्मणून त्यांना विशेष आनंद होत होता. ज्यांचीं मनें द्विधा झालीं होतीं; ज्यांच्या राजनिष्ठेंत भंग होण्याचा संभव होता त्यांनींच आतां आपली राजभक्ति दाखविण्याची पराकाष्ठा केली. विजयपुरास कोणी शत्रु न राहिल्यानें पुष्कळ काळपर्यंत चिरवांच्छित शांतता अनुभवण्यास सांपडेल यांत संदेह नव्हता; आणि हीच गोष्ट प्रजाजनांस विशेष आनंदवीत होती.

जयसेनानें कांतिनगरकराशीं झालेल्या युद्धांत सर्वांस आपल्या अप्रतिम युद्धकौशल्याचा परिचय दिला. कांतिचंद्रानें त्याचें प्रेमपूर्ण स्वागत केलें. राज्ञी चंद्रावतीसमक्ष झालेल्या द्वंद्वयुद्धांत आपला पुतण्या विजयी होऊन पूर्ण निर्दोषी ठरल्यामुळें कांतिचंद्रास फार संतोष झाला. चंद्रकेतूशीं झालेल्या चकमकीपासून त्याचा हूडपणा पार नाहींसा झाला होता. नुकत्याच झालेल्या युद्धात जयसेनाचें शौर्य सर्वांस दिसून आलें होतें. सैन्याच्या डाव्या बाजूचा अधिपति त्यास नेमलें होतें. त्या बाजूवर शत्रूच्या असंख्य वीरांनीं अनेक हल्ले चढविले. पुष्कळ सरदार व सेनानी धारातीर्थी पतन पावले. युद्धांतून पळून गेलेल्या कित्येक लोकांनीं सैन्याचा मोड झाल्याचें राजास सांगितलें. राजा युद्धभूमीपासून पंधरा कोस मागें होता. एक सबंद दिवस राजा चिंतामग्न होता. शेवटीं कांतिचंद्राचा खलिता घेऊन स्वतः जयसेन आला. त्याच्या मुखानें युद्धवार्ता ऐकल्यावर राजास आपल्या विजयाची खात्री वाटली. जयसेनानें केलेल्या अभुत पराक्रमानेंच राजाचा जय झाला होता. कांतिचंद्रानें त्या खलित्यांत किसनच्या पराक्रमाचें वर्णन केलें होतें. चंद्रकेतुपक्षीय लोक आपल्या नव्या नायकाच्या—जयसेनाच्या—आधिपत्याखालीं दुसऱ्या सैनिकांशीं कशी स्पर्धा करीत होते तोहि वृत्तांत त्यांत होता. तत्काल समरभूमीवर दरबार भरवून राजानें विजयप्राप्तीबद्दल ईशस्तुति

केली. त्यानें कित्येक लोकांना तेथेंच पारितोषिकें दिलीं. त्याचवेळीं किसन सरदार झाला; पण पारितोषिकदानाचा मुख्य समारंभ विजयपुरास राजाच्या नगरप्रवेशाचे दिवशीं व्हावयाचा होता. राजा आपल्या विजयाच्या स्मारकवस्तूंसह आज नगरप्रवेश करीत असलेला आपण पहात आहों.

त्या वृद्धाला वाटेंतून दूर केल्यावर मिरवणुक पुढें निघाली. तरुण राजाच्या कानांत ' न्याय, न्याय ' हे त्या अंध वृद्धाचे शब्द गुणगुणत होते. जयसेनानें राजास त्याची हकीकत पूर्वींच सांगितली होती. ती ऐकून राजास वाईट वाटलें होतें; पण आतां तर त्याजपुढें विलासराजानें निष्कारण छळलेला पुरुष उभा होता. अकारण छळाचें पातक राजघराण्यावर होतें. त्या पातकाचें क्षालन आज सूर्यास्तापूर्वीं करण्याचा राजानें निश्चय केला. राजाच्या बरोबर सेनापति कांतिचंद्र होता. त्यांच्या मागून विजयी सैन्याचे अधिकारी येत होते. त्या मिरवणुकींतील सरदारांच्या पोषाखांवरून, शस्त्रांवरून सूर्याचें प्रकाशकिरण परावर्तित होत होतें. घरोघर उभारलेलीं आनंदसूचक तोरणें व शोभेकरतां मधून मधून सोडलेलीं महावस्त्रें उज्ज्वल दिसत होतीं. समोर नीलवर्ण आकाशाच्या मध्यभागीं श्वेत राजप्रासादाचा सुवर्णकळस झळकत होता. हा सर्व देखावा प्रेक्षकांस आपल्या ठायीं विलीन करण्यास समर्थ होता.

आणि लीला ! तिनें यावज्जीव असें वैभव पाहिलें नव्हतें. ती मूक बनली. मिरवणुकीच्या अग्रभागीं असलेले गजराज नगरद्वारांतून आंत येतांच तिच्या मुखावर रक्तिमा आला. ' महाराज आले, महाराज आले ' असा एकच गोंगाट झाला व सर्व जन राजा येतांच त्यास प्रणाम करूं लागले. त्यावेळीं तिचें लक्ष राजाकडे नव्हतें. ती राजाबरोबर असणाऱ्या दुसऱ्याच एका वीरपुरुषाचा विचार करीत होती. तो वीरपुरुष आपलें स्मरण करीत असेल काय ? तो आपल्याकडे पाहील काय ? अशा अनेक कल्पना त्या अल्प अवकाशांत तिच्या मनांत उद्भवल्या. तिचें हृदय अस्वस्थ झालें. ती नीट श्वासोच्छ्वास करण्यासहि असमर्थ झाली. विजय-मिरवणूक तिजसमोरून जात असतां तिला इच्छित मूर्ति दिसली. जयसेन चुलत्याशेजारीं त्याजबरोबर व

इतरांबरोबर बोलत चालला होता. त्याचा सुवर्णयुक्त पोषाख प्रकाशमय झाल्यानें त्याजकडे पहावत नव्हतें हजारों याचक रस्त्याच्या दुतर्फा तारस्वरानें याचना करीत होते. त्यांच्या तारस्वरांत व मिरवणुकीच्या गर्दीत वृद्धाचा बारीक आवाज काणास एकूं जाणार ? जयसेन त्यांना न पहाता पुढें गेला असता; पण त्या वृद्धानें कर्कश रीतीनें ओरडून राजपथांत लोटांगण घातलें. त्यामुळें राजाचा घोडा बिचकला. राजसेवकांनीं त्याला उचलून बाजूस ठेवलें असतें; पण जयसेनाच्या तात्कालिक वर्तनानें तसें झालें नाहीं. • त्यानें राजास काय सांगितलें तें लीलेला ऐकूं आलें नाही; मात्र ' त्यांना घेऊन ये ' हे राजाचे शब्द तिनें ऐकले.

राजाची मिरवणूक अंबिकेच्या देवालयाकडे देवीच्या दर्शनास गेली. त्या अवकाशांत जयसेनानें ह्या पौत्रीपितामहाला राजवाड्यांत नेलें व एका राजसेवकास त्यांची व्यवस्था करण्यास सांगितलें. त्याला स्वत: थांबणें शक्य नव्हतें ह्मणून तो परत फिरून मिरवणुकींत येऊन मिळाला व आपल्या चुलत्याबरोबर चालूं लागला.

" त्या वृद्धाबरोबर ती मुलगी कोण होती ? माझ्या घोड्याखालीं ती बहुतेक सांपडली होती. मी इतका सुंदर चेहरा आजवर पाहिला नाहीं. " कांतिचंद्रानें हंसत विचारलें

" ती त्या वृद्धाची नात आहे. जलदुर्गास त्या रात्रीं तिनेंच माझी शुश्रुषा केली. काका ! त्यांची हकीकत दु:खपूर्ण आहे. " जयसेनानें उत्तर दिलें.

" होय; मी त्यावेळीं लहान होतों. तुझ्या आजाबरोबर कधीं कधीं दरबारांत जात असे. तरीपण राजवैद्य सोमदत्त याला अंध करून जलदुर्गास पाठविलें तें मला अद्याप पूर्ण स्मरत आहे. त्यावेळीं सर्व नागरिकांना दु:ख वाटलें. कारण, तो विद्वान होता इतकेंच नाहीं, तर तो फार धार्मिक होता. पुष्कळांच्या आतां सुद्धां तो ध्यानांत येईल. त्याचें नांव उच्चारलें जाईल तेव्हां दरबारांत सर्वत्र आश्चर्य वाटेल. कारण, सर्व त्याला विसरले आहेत. त्याला जलदुर्गास पाठविल्यावर तो लवकरच मरण पावला, असा सार्वत्रिक समज आहे. पण तूं महाराजांना सर्व हकीकत सांगितली आहेस ना ? " कांतिचंद्रानें प्रश्न केला.

" त्या वृद्धानें मला सांगितलेली एकूनएक गोष्ट मीं महाराजांना कळविली. परमेश्वरकृपेनें त्यानेंच माझा जीव वांचविला हेंहि मीं त्यांना सांगितलें. "

" मग महाराज काय ह्मणाले ? " कांतिचंद्रानें उत्सुकतेनें प्रश्न केला.

' काका ! त्यांच्या डोळ्यांत आंसवें उभीं राहिलीं. सज्जन पुरुषाचा शाप आमच्या घराण्यावर अगर प्रजाजनांवर चिरकाल न राहो असे उद्गार त्यांनीं काढले, व त्या वृद्धाचा तपास करण्यास आज्ञा केली. ते ह्मणाले, ' जयसेन ! तो वृद्ध पुण्यपुरुष आह्मांस क्षमा करील तर आह्मी त्याची संपत्ति त्यास परत देऊं; इतकेंच नाहीं तर आणखी आस्त त्यास अर्पण करूं ' आणि काका ! महाराज त्याप्रमाणें करतीलहि. आजच्या मंगलप्रसंगीं एका दुःखी जीवाला संतोष होईल. '

प्रकरण २२ वें.

अन्यायपरिमार्जन.

राजसेवकानें लीला व तिचा आजा यांस एका निराळ्या महालांत नेऊन त्यांची व्यवस्था लावली.

' आपण कोठें आहों बरें ? ' वृद्ध अर्धवट मनाशीं अर्धवट लीलेला उद्देशून ह्मणाला.

लीलेनें आपल्या आजाच्या गळ्यास मिठी मारून ह्मटलें, ' आजोबा ! आपण राजमंदिरांत आहों. आपले दुर्दिन संपले याबद्दल परमेश्वराचे आभार माना. आपणांस अखेरीस आश्रयास जागा मिळाली. '

" अखेरीस तर खरेंच ! मला नेत्रविहिन करून जलदुर्गास पाठविल्यास आज चाळीस वर्षें झालीं. मी तें विसरलों असें तुला वाटतें काय ? " .

" आजोबा ! " वृद्धाच्या मुखावर हात देऊन लीला ह्मणाली, ' हेमपुरीस विलासराजाच्या समाधीपाशीं तुह्मीं मला सांगितलें ना कीं, तुह्मीं त्यास पूर्ण क्षमा केली ह्मणून. "

" मुली ! माझी चूक झाली, राजशेखर ! मला क्षमा कर. तूं माझें सप्रेम स्वागत केलें असून माझ्या मनांत तुझ्या पूर्वजाबद्दल दुष्ट विचार यावे आं ! लीले ! मी आंत येतांच मला गुलाबपुष्पांचा मधुर वास आला. येथील खिडकींतून पलीकडे अंतःपुराचें द्वार दिसत असेल. पूर्वकालीं मला राजवाड्यांत रहाण्याचा प्रसंग येई तेव्हां मी ह्याच महालांत रहात असें. " वृद्ध ह्मणाला

" होय, आजोबा ! अद्याप तोच देखावा आहे. कशांतहि बदल झाला नाहीं. आणि हें समोरचें उद्यान मनाला आनंद देतें. " लीलेनें उत्तर केलें.

" पण, बाळ ! हा सुवर्णपिंजर आहे. आपण जलदुर्गास स्वेच्छेनें वागत होतों. " ह्या भाषणावर लीला कांहीं बोलूं लागली तेव्हां तिला थांबवून वृद्ध बोलला, " लीले ! तुला हें विश्रांतिस्थान प्रिय वाटतें तसें मला वाटत नाहीं असा कां तुझा समज आहे ? लवकरच तुला असा एखादा प्रिय बाग व चाकरनोकर मिळतील व तूं गरिबांचा समाचार घेण्यास समर्थ होशील. "

" पुरे, आजोबा ! " ती लडिवाळपणें ह्मणाली. " तुह्मी मला जणूं राजकन्याच बनवीत आहां व धनिककन्यांना योग्य अशा आकांक्षा मजपुढें ठेवतां. पण मी एक गरीब मुलगी आहें. तुह्मां सर्वसंगपरित्यागी आजोबांची मी नाहीं काय ? "

" हो, बाळ ! तंच माझें सर्वस्व आहेस. " वृद्ध सद्गदित स्वरानें बोलला, " साऱ्या विजयपुरांत तुजसारखी गुणसंपन्न कन्या मिळणार नाहीं. "

तीं दोघें बोलत असतां त्यांच्या महालाचा दरवाजा थोडासा उघडला. एक मनुष्य आपल्या बरोबरच्या व्यक्तीस ह्मणाला, ' येथें कोणी परके आले आहेत. मनोरमे ! चल, आपण दुसरीकडे बसूं. "

लीला चटकन् उठली. सोप्यांतून परत जात असलेल्या दोन आकृति तिला दिसल्या. तिनें हाक मारली, " मनोरमे ! ताई ! मी तुझी लीला; इकडे ये; आह्मी एकटींच आहों. "

मनोरमा आश्चर्ययुक्त झाली. पाचारण करणारी बाला लीलाच होय अशी खात्री होऊन ती परत आली. दोघी एकमेकींना प्रेमभरें भेटल्या.

तीं सगळीं आंत आल्यावर वृद्ध सूर्यमणीला ह्मणाला. " सूर्यमणि ! बसा. आपण पुन: भेटलों ही परमेश्वराची कृपाच ह्मटलें पाहिजे कारण, आह्मां-वर कमी संकटें आलीं नाहींत. "

मनोरमेंत विशेष फरक झाला नव्हता. येथें आल्यापासून ती जास्त मनोहर दिसूं लागली. जलदुर्गास पाहिलेल्या सौंदर्यापेक्षां जास्त रमणीयता तिच्या ठायीं दिसत होती. तिच्या भेटीनें कन्या लीलेला अत्यानंद झाला. ती मनोरमेला मिठी मारून ह्मणाली, "ताई ! सर्व संकटांतुन मुक्त होऊन पुन: तुझी माझी भेट झाली मला नेहमीं तुझें स्मरण होत असे. तुह्मी येथें आनंदांत आहां ना ? "

' होय, लीले ! आह्मांस कोणत्याहि गोष्टीची कमतरता नाहीं. नीलव-र्णानें छळ केल्यामुळं तुह्मी तेथून गेलां हें समजलें तेव्हां मला फार दु:ख झालें. तुह्मी थेट येथें याल असा राज्ञीमातेचा अजमास होता ' मनोरमा सांगूं लागली.

' पण, ताई ! तूं नेहमीं राज्ञीमातेजवळ असतेस काय ? '

' मी रोज तिला भेटतें; पण तिच्या आज्ञेवरून माझा काळ विशेषत: बालराणीच्या सहवासांत जातो. सूर्यमणीनें तिला औषध देऊन बरें केलें. राज्ञीमाता तर तिला नेहमी ह्मणते कीं, राजाला आपली पूर्वीची पत्नी मुळींच आळखूं येणार नाहीं. ती तुजविषयीं नेहमीं प्रश्न विचारते अद्याप तूं तिला भटली नाहीं ह्मणतेस तर, चल, आपण राजमातेकडे जाऊं. तुझ्यावांचून गेल्यास राज्ञीमाता मला रागें भरेल. '

' मला कपडे बदलूं दे. भिकाऱ्याच्या वेषानें राणीकडे जाणें चांगलें नाहीं. ' लीला बोलली.

' वा: ! उलट ह्याच वेषांत तूं तिला अधिक प्रिय वाटशील. पहा हो आजोबा ! तुमच्यासमक्ष मी लीलेला घेऊन जातें. तरी पण भाऊ तुमच्या-जवळ जामीन ठेवला आहे. ' मनोरमा वृद्धाला थट्टेनें ह्मणाली.

राजवाड्याच्या निरनिराळ्या भागांतून जाण्यांत लीलेला नाविन्य वाटत होतें; आणि राजसेवक मानोरमेला प्रत्येक स्थलीं देत असलेला आत्यंतिक सन्मान पाहून तिला अचंबा वाटला यांत नवल काय ? त्या राज्ञीमातेच्या महालांत पोंचल्या, तेव्हां राज्ञीमाता ह्मणाली, " ये,

मनोरमे ! ये; पण हें तुजबरोबर कोण आहे ? " लीलेकडे पाहून तिनें प्रश्न केला.

" भगवती ! आपण नेहमीं बोलत असूं तीच ही लीला. ती हा साधु-वेष काढून ठेवणार होती. पण ह्या वेषांत ती भेटली असतां आपणांस विशेष प्रिय वाटेल म्हणून तिला तशीच घेऊन आलें. ' मनोरमेनें उत्तर दिलें.

' तूं बरोबर केलेंस. ये, मुली ! आह्मी तुझें व तुझ्या अजोबाचें स्वागत करतों. ' राणीनें ह्मटलें.

राणीबद्दल पूर्वी लीलेची काय कल्पना होती हें सांगतां येत नाहीं. कांहीं तरी भव्य पण भीतिप्रद अशी तिची कल्पना असावी. सर्व लोक जिचीं स्तुतिस्तोत्रें गातात, सर्व राज्यावर जी अधिकार चालवते अशी पण साधीं वस्त्रें परिधान केलेली शांत स्त्री पाहून लीलेला धीर आला व तिनें राणीच्या चरणांवर मस्तक ठेवलें.

राणीनें तिला उठविलें, ती ह्मणाली, ' अशा भिकार वेषांतहि ही किती सुंदर दिसत आहे. पण, मुली ! तूं ईश्वरसेवेस वाहून घेतलें नाहींस ना ? '

' नाहीं, आई ! आजोबांनीं चक्रतीर्थ क्षेत्रीं वानप्रस्थाश्रमाची दीक्षा घेतली तेव्हां मी आजन्म वैराग्यव्रत घेणार होतें; पण तेथल्या एका साध्वीनें मला तसें करूं दिलें नाहीं. '

'मुली ! तिचें करणें रास्त होतें. अशीं व्रतें फक्त गतधवांना अथवा ब्रह्मचारिणींनाच योग्य आहेत. पण तूं दोन्हींपैकीं एकहि नव्हेस. '

नंतर, नीलवर्णानें आपला कसा छळ केला; त्याच्या ताब्यांतून कशी सुटका झाली, तेव्हांपासून काय काय संकटें येऊन तीं कशीं निवारण झालीं, चक्रतीर्थास आजोबांचा कसा सन्मान झाला व आपण येथें कसें येऊन पोंचलों इत्यादि हकीकत लीलेनें राज्ञीमातेस स्पष्ट करून सांगितली.

राणी म्हणाली, ' बाळ ! आतां तुम्हांस कसली चिंता नको. तुह्मी राजाचे पाहुणे आहां. नीलवर्णाला नुकतेंच येथें आणलें आहे. त्याच्या चौकशीच्या वेळीं कदाचित् तुला दरबारांत जावें लागेल. सभागृहांत राजासमोर तूं घाबरूं नको. '

लीला विनीत दृष्टीनें बोलली, " आई ! मी एक गरीब बालिका आहें.

पण आजपर्यंतचें माझें चरित्र किंचित् कलंकित नाहीं. मग मीं महाराजासमोर कां भ्यावें ? पण मीं. नीलवर्णास पूर्ण क्षमा केली आहे. त्याजविरुद्ध आतां माझी तक्रार नाहीं. कारण आम्हीं सर्व भार परमेश्वरावर घातला आहे, तोच त्याचा न्याय करील. किसननें माझी सुटका केली नसती तर मी आज एक कलंकिनी असतें. पण मला आज आपल्या समोर उजळ माथ्यानें वागतां येत आहे ही त्या कृपासागराचीच कृपा आहे ! भगवती ! मी इतक्या धाष्ट्यानें बोलतें याची क्षमा करा. पण आपण माता आहां व मी बालक आपल्या विचारांना दाबण्यास असमर्थ आहें. मला राजदरबारचे आचार माहीत नाहींत. पण आजपर्यंत माझें आयुष्य एकांतवासांत गेलें असल्यानं माझें भाषण आपणांस उद्धत वाटेल. "

" लीले ! तुला लज्जित होण्याचें कारण नाहीं. तुझा निर्भिडपणा उलट तुला शोभाच देतो. तूं मला कन्येप्रमाणें आहेस. तूं आपल्या छळकास क्षमा केली असलीस तरी राजाला तसें करतां येत नाहीं. नीलवर्णाच्या दुष्ट कृत्यांकडे दुर्लक्ष करणें आमच्या राज्यांतल्या मानवसंघाला अहितकर होईल. " इतक्यांत राजा राजमंदिरांत आल्याची नौबत वाजूं लागली, तेव्हां राणीनें मनोरमा व लीला याना रजा दिली.

थोड्या वेळानें दरबार भरला. वृद्धाला दरबारांत नेण्यास दोन सेवक आले. त्याच्या आग्रहावरून लीला साधीं वस्त्रें नेसून त्याजबरोबर गेली. एका वृद्ध मनुष्याला एक कन्या सिंहासनाच्या पायऱ्याकडे नेतांना पाहून सर्व लोकांना आश्चर्य वाटलें. सर्वांनीं त्या काषायवेषी वृद्धास उत्थान दिलें. वृद्ध राजाला प्रणाम करणार तोंच राजानें त्यास तशी संधि न देतां आपणच नमन केलें. हा विपरीत प्रकार पाहून सभाजन जास्तच आश्चर्यमग्न झालें. इतक्यांत राजानें बोलण्यास आरंभ केला, " सरदार व सभ्य जन हो ! आजच्या आनंद प्रसंगीं निष्कारण झालेला एक अन्याय दूर करून न्याय देण्याकरत आम्हीं ह्या वृद्धास मुद्दाम पाचारण केलें. आह्मांस सरदार जयसेनाकडून ह्या पूज्य विभूतीची हकीकत पूर्वींच समजली आहे. त्याप्रमाणें आह्मी येथें येतांच ह्यांचा तपास करण्याचा निश्चय केला. पण काय

चमत्कार ! ईश्वरी इच्छेनें, आह्मीं नगरप्रवेश करतांच, नगरद्वाराशीं ह्यांचें दर्शन झालें. हे व यांची पौत्री राजपथाच्या बाजूस उभी होती. ह्यांनीं तेथेंच रस्त्यांत आमच्यापुढें लोटांगण घातलें. त्या परमन्यायी जगच्चालकानेंच अनेक संकटांनंतर ह्यांची पाठवणी इकडे केली. हे आतां पूर्वीचे राजकैदी नव्हत. चक्रतीर्थाच्या विद्वत् सभेनें या विभूतीचा सन्मान केला आहे. आह्मी त्यांचा आशीर्वाद घेतों व इतरांनींहि तसेंच करावें. आमचे पूर्वज राजा विलासराज—ईश्वर त्यांना शांति देवो— ह्यांनीं राजवैद्य सोमदत्ताला क्रोधांधतेनें नेत्रहीन करून कैदेंत टाकलें. तीच ही विभूति ! आज अन्नपाणी ग्रहण करण्यापूर्वी अन्यायपरिमार्जन करून विजयपुरच्या राजकुलाचा कलंक दूर करण्याचा निश्चय आह्मीं ह्यांना पहातांच मनाशीं ठरविला. त्या अन्वयें आह्मी या पूज्य विभूतीची निष्कारण शिक्षा रद्द करतों. आज सतत चाळीस वर्षें ह्यांनीं जो अकारण छळ सोसला त्याबद्दल आमच्या पूर्वजांच्या वतीनें आह्मी यांची क्षमा प्रार्थना करतों; व ह्या पातकापासून आह्मांस व आमच्या प्रजाजनास दयामय प्रभूनें मुक्त करावें अशी ह्यांनीं जगदीशाची प्रार्थना करावी असें आह्मी ह्यांना विनवितों. पूर्वीची ह्यांची जहागीर व संपत्ति आह्मी परत देतों एवढेंच नाहीं तर रामनगरचा परगणा आह्मी ह्यांना अर्पण करतों. ”

सर्व जणांनीं धन्योद्गारांनीं या गोष्टीस संमति दर्शविली.

“ लीले ! बाळ ! मला सांवरून धर. ईश्वरानें आपणांस सुखाचा दिवस दाखविला ! ” लीलेच्या आधारानें उभा राहून वृद्ध ह्मणाला, “ महाराज ! मी काय बोलूं ? मी बोलण्यास असमर्थ आहें. माझें अंतःकरण कृतज्ञतेनें अगदीं भरून गेलें आहे. आह्मी हेमपुरीस असतां राजसमाधीचें दर्शन घेण्यास मी गेलों. राजा विलासराजाच्या छत्रीजवळ जातांच माझें हृदय द्वेष व तिरस्कार ह्यांनीं व्याप्त झालें. पण परमेश्वरानें या मुलीकरवीं माझी कानउघाडणी केली. लागलींच मी तेथें बसलों. माझ्या विकारांवर जय मिळविला व प्रार्थना झाल्यावर नम्रतापूर्वक प्रणाम करून. मीं ह्मटलें—महाराज ! आपण केलेल्या दुष्ट छळाच्या पातकांतून मी आपणांस मुक्त करतों. ईश्वर आपल्याला क्षमा करो. ”

नंतर राजा राजशेखरानें एक उंची पोषाख वृद्धास अर्पण केला व

त्याच्या गळ्यांत एक बहुमोल मोत्यांचा हार घातला. वृद्धानें विनंति केल्यावरून राजानें त्यास जाण्यास परवानगी दिली. लीलेनें आपल्या आजास परत महालांत नेलें.

इतका वेळ तिनें आपली चित्तवृत्ति आवरून धरली होती; पण मनोरमा दृष्टीस पडतांच तिच्या खांद्यावर मान टाकून ती अविरलतेनें आनंदाश्रु ढाळूं लागली. आजाचा सन्मान झाल्यानें तिला संतोष झाला; पण जी मुख्य गोष्ट तिला दिसली ती ही कीं, जयसेन व त्याच्या जवळचा वृद्ध सरदार, तो जयसेनाचा चुलता असावा असा तर्क तिनें केला. या दोघांचें लक्ष सर्व वेळ तिजकडे लागलें होतें. वृद्धाचा सन्मान झाल्यानें सर्वांपेक्षां त्यांना जास्त आनंद झाल्याचें तिला दिसलें.

दुपारीं कांतिचंद्र जयसेनासह आपल्या पुतण्याच्या प्राणदानाबद्दल वृद्धाचे आभार मानण्यास आला होता; पण तेव्हां लीला उघडपणें आपल्या इष्ट मूर्तीकडे पाहूं शकली नाहीं.

प्रकरण २३ वें.

:o::

चौकशी.

विजयपुरांत आतां एकच गडबड दिसत होती. राजवाड्याच्या पुढल्या मैदानांत समरांतून आलेल्या विजयी सैन्याचा तळ होता. राजा समरभूमीवर असतांना विजयपूर शांत भासत असे. दुसऱ्या दिवशीं दरबारांत कोणास काय पारितोषिक द्यावयाचें, कोणाचा कसा सन्मान करावयाचा, याचा विचार राजानें मंत्रीमंडळासह केला. पण ह्या सर्व कामांपेक्षां एका महत्वाच्या कामाचा निर्णय दुसऱ्या दिवशीं व्हावयाचा होता. राज्ञी म्हणाली, ' राजशेखर ! पहिल्यानें नीलवर्णाचा निर्णय कर. सत्य सर्वांना कळावें हें रास्त. आपल्याला योग्य न्याय मिळतो अशी खात्री प्रजाजनांना वाटली पाहिजे. मीच त्याचा न्याय करणार होतें पण तूं तो करावा, असें मला वाटलें. मोठी दुःखदायक गोष्ट आहे; पण न्याय झालाच पाहिजे. '

' जरूर व तोहि निःपक्षपातानें. पण आई ! तुह्मींच कां केला नाहीं ? मीं तुमची कोणती गोष्ट अमान्य केली ? तुमच्याकडे सर्व अधिकार होतेच. असो; तुमच्या आज्ञेप्रमाणें कां होईना, मी न्याय करीन. गजसिंह ! नीलवर्ण दुष्टकर्मा असला तरी त्याची तजवीज नीट असूं द्या. त्याचे वडील एक वंदनीय सरदार होते. ' राजा गजसिंहास ह्मणाला.

दुसऱ्या दिवशीं नेमल्या वेळीं राजा राजशेखर सभेंत येऊन सिंहासनावर विराजमान झाला. त्यानें आज पीतवर्णाचा रेशमी पोषाख केला होता. त्याच्या मस्तकावर एक लहानसा मुकुट होता व गळ्यांत एक मौक्तिक हार होता. त्याच्यापुढें एक छोटी तरवार आडवी ठेवली होती. राजा वयानें जयसेनाइतकाच होता; पण त्याच्याहून नाजूक होता. तो जयसेनाइतका गौरवर्ण नव्हता. त्याच्या दोहोंबाजूंस मंत्री सदस्य बसले होते. राजसिंहासनाच्या समोर असलेल्या जागेंत नेहमींप्रमाणें सरदार व सभ्य जन बसले होते. त्यांतच पण सिंहासनाच्या जवळ वृद्ध सोमदत्त बसला होता. आज त्याची मार्ग दर्शिका लीला त्याच्याजवळ नव्हती. ती सिंहासनाच्या डाव्या बाजूस स्त्रियांकरतां असलेल्या जागेंत राणी चंद्रावती, मनोरमा. इत्यादि स्त्रियांत बसली होती. आपण दरबारमहाल पूर्वीच पाहिला आहे. द्वंद्वाच्या दिवसाप्रमाणें आज मधून मधून राजपुरुष मात्र उभे केले नव्हते. आणि आज विजयी वीरांना त्यांच्या पराक्रमाबद्दल पारितोषिक दानाचा मंगल समारंभ असल्यामुळें सभागृहाचे स्तंभ, भिंती इत्यादि पुष्पगुच्छांनीं, लतावेलींनीं मंडित करण्यांत आल्या होत्या.

कांहीं प्राथमिक कृत्यें झाल्यावर राजा सर्वांना उद्देशून ह्मणाला " सभासद ! सरदार नीलवर्ण, जलदुर्गचा माजी किल्लेदार, याला आह्मीं येथें आणलें आहे. आजच्या आनंदप्रसंगीं हें दुःखदायक काम करावें लागत आहे; पण त्यास इलाज नाहीं. त्याजवर स्वामीद्रोहासारखा भयंकर आरोप लेखी पुराव्यांनीं सिद्ध होऊं पहात आहे, ह्मणून राज्याच्या हिताकरितां आह्मांस त्याची चौकशी लांबणीवर टाकतां येत नाहीं. त्याच्या चौकशीचें सोंग करून त्याच्या शत्रूंनीं त्याचा नाश केला असें कोणास ह्मणतां येऊं नये ह्मणून न्यायसभा तुह्मां सर्वांसमक्ष त्याची चौकशी करील. "

राजाज्ञा झाल्यावर रक्षक नीलवर्णास घेऊन आले. तो आल्याचें रीती-प्रमाणें जाहीर होतांच नीलवर्णानें राजाला आदरपूर्वक प्रणाम केला; पण तो स्वीकारण्यांत आला नाहीं. सभेंतल्या एकाहि अन्य मनुष्यास नीलवर्णानें नमन केलें नाहीं. त्यानें सर्वत्र ऐटीनें पाहिलें मात्र. त्याला पहातांच लीलेचें हृदय अस्थिर झालें; पण तें भीतीनें नव्हे.

न्यायमंत्री सभाजनांस उद्देशून ह्मणाला, "नीलवर्णानें महाराजांचा व राज्याचा द्रोह केला आहे. द्वंद्वांत मृत्यु पावलेल्या आकूतरायाजवळ हीं पत्रें सांपडलीं. हीं कुमार चंद्रशेखरास चंद्रकेतूमार्फत पाठविण्यांत आलीं होतीं. नीलवर्ण! हीं पत्रें तुझीं आहेत कीं नाहींत?" त्यानें नीलवर्णास प्रश्न केला.

नीलवर्णाला तीं पत्रें हातांत मिळालीं नाहींत. एका राजपुरुषानें तीं त्याच्याजवळ नेलीं व उलट सुलट करून दाखविलीं. नंतर न्यायमंत्री तीं पत्रें एकामागून एक वाचूं लागला.

नीलवर्ण काय उत्तर देणार? तीं सर्व पत्रें त्याचींच होतीं. प्रत्येक पत्रावर त्याचा शिक्का होता व तो त्याच्या हातांत असलेल्या मुद्रिकेवरच्या ठशाशीं बरोबर मिळत होता. नीलवर्णाला तीं पत्रें ऐकण्याचा कंटाळा आला. तो कांहींसा औद्धत्यानें व्यंगस्वरानें ह्मणाला, 'मंत्रीवर! कशाला उगीच श्रम घेतां? तीं पत्रें माझींच आहेत; मी नाकारीत नाहीं.'

'तर मग मी तीं महाराजांना वाचून दाखवितों.' मंत्र्यानें उत्तर दिलें. हातांत असलेलें पत्र सर्वांस ऐकूं जाईल अशा मोठ्या स्वरानें तो वाचूं लागला. रामगडचा बौद्ध भिक्षु कृष्णमूर्ति ह्यानें सर्व अटी कबूल केल्या आहेत. तो मगधांतून लोक आणण्यास तयार आहे. द्युमत्सेनाला एक दोन मोठे जय मिळाले ह्मणजे आपण त्याजकडून येणाऱ्या कोणाहि नायकाच्या स्वाधीन जलदुर्गाचा किल्ला करूं व स्वत: त्याच्याबरोबर काम करूं. एका सैन्यविभागानें कांतिचंद्राचे सैन्याचा नाश करावा ह्मणजे त्याला विजयपुरास लवकर जातां येईल व तेथें गेल्यावर राणी चंद्रावतीला ठार करून नगर व खजिना सहज हस्तगत करतां येईल. दुसऱ्या विभागानें राजाचा पाठलाग करून त्याला कैद करावें किंवा ठार मारावें ह्मणजे विजयपूर आपलेंच. असा मजकूर त्या पत्रांत होता.

न्यायमंत्र्यानें सर्व पत्रें वाचलीं. तेव्हां सभेंत एकच आवाज ऐकूं येऊं लागला, ' त्याला ठार करा. दुष्टाला मरणाचीच शिक्षा दिली पाहिजे ! ! '

पण नीलवर्ण सर्वांकडे पाहून तिरस्कारानें उद्गारला, ' मूर्खांनो ! चंद्रकं तुम्ममाणंच युमत्सेनाचा घात झाला नसतां तर हें सर्व घडून आलें असतें. तुह्मांसाहि हें समजत नाहीं असें नाहीं. मीं जें केलें तें केलें. माझ्या भवितव्याप्रमाणें घडून आलें. त्या बौद्ध भिक्षूनें काय सहाय्य केलें व काय करण्याचा त्याचा विचार होता हें समजण्याची इच्छा तुह्मांस असेल तर त्याचीं पत्रें ऐका. त्या शूरवीरानें आमच्यासाठीं युद्ध केलें असतें. नाहीं तर तो त्याचा दुसरा सोबती ! तो विजयपुरास आला आहे ह्मणतात. भित्रा कोणीकडचा ! '

न्यायमंत्र्यानें सांगितलें, ' तो आपणांसमक्ष ह्या पत्रांत जें जें लिहिलें आहे तें तें कबूल करीत आहे व तें घडवून आणण्याची त्याची तयारी होती, हेंहि तो नाकबूल जात नाहीं. महाराज ! अशा अपराधाला देहांत शासनाशिवाय शिक्षा नाहीं. ' तो राजाकडे वळून म्हणाला.

राजा बोलण्यास आरंभ करणार व त्यानें निर्णय दिल्यावर शिक्षा अमलांत येण्यास अवकाश लागणार नाहीं हें मनांत आणून जयसेनानें विनंति केली, ' महाराज ! आपल्यापाशीं मी कृपायाचना करतों. मी जलदुर्गास मरणोन्मुख असतांना यानें माझी फार काळजी घेतली. यानें मला आश्रय दिला माझी शुश्रूषा केली माझ्या रोगपरिहाराचे उपाय योजले. महाराज ! आपणही याच्याबरोबर बालपणीं क्रीडा केली आहे. याच्या वडिलांची सेवा लक्षांत घेऊन आपण याजवर दया करा. '

नीलवर्णानें एकहि शब्द उच्चारला नाहीं. मात्र पूर्वीप्रमाणें छातीवर हात आडवे ठेवून तुच्छतादर्शक मुद्रेनें त्यानें एकदां न्यायमंत्र्याकडे, एकदां राजाकडे व एकदां आपल्या बंधूकडे पाहिलें.

राजा किंचित् काळ विचार करून ह्मणाला. " नीलवर्ण ! खरें पहातां, तुला देहदंडच केला पाहिजे. तू विजयपूरच्या राज्ञीमातेला—परमेश्वर तिला चिरायु करो—कंठस्नान घालणार होतास; तसेंच आह्मांला व ह्या तुझ्याबद्दल प्रार्थना करणाऱ्या बंधूला ठार करण्याचा तुझा विचार होता.

त्या न्यायी सर्व सत्ताधीश प्रभूच्या कृपेनें तुझे प्रयत्न व्यर्थ झाले. त्यापासून थोडीहि फलश्रुति झाली नाहीं. तुझ्या स्वर्गवासी पित्याच्या एकनिष्ठेकडे लक्ष देऊन, परमेश्वराच्या आज्ञेनें, या तत्स्वरूपी मानवसमाजाचे आह्मी सेवक आहों, तुला प्राणदान देतों. कारण. त्या विश्वचालकानें सर्व युद्धांत त्याच्या सेवकाचें रक्षण केलें आणि युद्धांत जयी झाल्यानें राष्ट्रभर होणाऱ्या आनंदोत्सवप्रसंगीं प्रथम दिवशींच आह्मीं एका जीवाच्या नाशास कारण व्हावें अशी आमची इच्छा नाहीं. पण तूं कुलकलंक झालास ! तुझी पदवी व जिंदगी आह्मी जप्त करतों. तूं अतःपर येथें रहातां कामा नये. आणि हें पक्कें लक्षांत ठेव कीं, जर कोणत्याहि सबबीनें तूं पुनः ह्या राज्यांत प्रवेश केलास तर न्यायमंत्र्यांनीं आतां घोषणा केलेल्या शिक्षेस तूं स्वतःस पात्र करशील. गजसिंह ! ह्या मनुष्याला घेऊन जा व विलंब न लावतां हद्दपार करा. ”

नीलवर्ण आपल्या जागेवर उभा होता. तो अविकार्य मुद्रेनें बोलला, ‘ राजा ! तूं म्हणतोस त्याप्रमाणें मी जातों. आणि अपमान करून घेण्यास पुनः येणार पण नाहीं. मात्र जाण्यापूर्वीं मी न्याय मागतों तेवढा दे. एखाद्या जीवाला सुद्धां तो तूं दिला पाहिजेस. अखिल भारतांतल्या कोणत्याहि दंडधारकाला तो नाहीं म्हणतां यावयाचा नाहीं. तूं माझें धन, मान, यश, सर्व काहीं हरण केलेस; खुशाल कर. पण माझी सहचारिणी मला परत दे. ’ तो वृद्ध सामदत्ताकडे बोट करून म्हणाला, ‘ त्या जलदुर्गाच्या राजकेयाची पौत्री धर्मानें माझी आहे; व धर्माच्या जोरावर मी तिची मागणी करतों. ती मला दे म्हणजे माझ्यामागें माझें शापवचन ठेवून मी तुझ्या राज्यांतून चालता होईन. ’

पहिल्यापेक्षांहि सभागृहांत जास्त गोंगाट झाला, “ तो दयेस पात्र नाहीं. तो त्या पूज्य वृद्धाचा अपमान करीत आहे. त्याला मृत्यूच योग्य ! ”

सभागृहांत थोडीशी शांतता झाल्यावर राजा म्हणाला:—

“ खरें असो, खोटें असो, त्याच्या मागण्याचा न्याय झाला पाहिजे. ” राजानें सामदत्तास प्रश्न केला, “ हे पूज्य वृद्धा ! हें खरें काय ? सांग. अथवा त्या कन्येलाच सांगूं दे. ”

राजानें तिला बोलावलें व ती येऊन आपल्या पितामहाजवळ उभी राहिली. राजा तिला ह्मणाला, " मुली ! भिऊं नको. परमेश्वरास स्मरून ह्या विजयपूरच्या सिंहासनापुढें, कोणतीहि शंका न बाळगतां तूं सत्य-कथन कर. "

वृद्ध तिला उद्देशून बोलला, " बाळ ! लाजूं नको. आपल्या राजाला उत्तर दे. तूं पवित्र आहेस व पवित्रांना कोणासहि भिण्याचें कारण नाहीं."

" मुली ! भीति सोड. आह्मी तुझे हितकर्ते आहों. त्यानें तुला पत्नी ह्मटलें आहे. तुझें निष्कलंकत्व सिद्ध करण्यास त्याच्या आव्हानास तूंच उत्तर दिलें पाहिजेस. बोल. भिऊं नको " राजानें आश्वासन दिलें.

नीलवर्णाच्या भयंकर अनपेक्षित उद्गारांनी लीला लज्जेनें व क्रोधानें कापूं लागली. तिचें हृदय अस्थिर झालें, व तिच्या क्रोधयुक्त नेत्रांतून जलबिंदु पडूं लागले. तिला त्यावेळी मृत्यु श्रेयस्कर वाटला. पण ह्मणून या घोर संकटानें तिचें धैर्य कमी झालें नाहीं. आजोबांची आज्ञा व राजाचें आश्वासन ऐकून तिला उत्तेजन आलें अजूनहि नेत्रांतून स्रवणारे जलबिंदु पुसून तिनें ईश्वराचें स्मरण केलें. स्वतःला अननुभूत अशी तिची शांत मुद्रा पाहून सर्व सभा स्तब्ध झाली स्त्रियांच्या जागेंतून ऐकूं आलेल्या राज्ञी चंद्रावतीच्या धीरवाक्यानें तिचें धैर्य द्विगुणित झालें. तिनें सभेंत एकवार चहूंकडे दृष्टिक्षेप केला. जयसेनाची क्षुब्ध मुद्रा तिला दिसली. समोर तिच्याकडे तिरस्कारपूर्वक पहात नीलवर्ण उभा होता. त्याच्या चेहऱ्यावर राक्षसी आनंद झळकत होता; पण त्यामुळें ती किंचितहि धैर्य-भ्रष्ट झाली नाहीं.

ती राजाकडे पाहून स्थिरभावानें ह्मणाली, ' महाराज ! परमेश्वरास स्मरून, आपणा त्याच्या प्रतिनिधीसमक्ष, ह्या सर्व सभासदांना साक्षी ठेवून, मी सत्य कथन करतें कीं, मी त्याची पत्नी नाहीं व ह्याला पुरावाहि आहे. ते जलदुर्गचे वृद्ध पुरोहित बसले आहेत; त्यांना विचारा. '

राजाज्ञेप्रमाणें ते पुरोहित पुढें आले. ते ह्मणाले, " महाराज नीलवर्णानें एके दिवशीं सायंकाळीं मला ह्या कन्येशीं त्याचा विवाह लावण्यास बोलावलें. मला तें चमत्कारिक वाटलें. मी किल्ल्यावर गेलों तो तेथें कुशा-लाचा पत्ता नव्हता. ही मुलगी एका स्त्रीच्या ताब्यांत बुरुजाकडे होती.

हे तिचे पितामह तेथें नव्हते. मी नीलवर्णास खुलासा विचारला, पण तो सांगेना. त्यानें उलट माझा अपमान केला. त्या विवाहविधीच्या थट्टेनें मी संतापानें तेथून निघून गेलों. राजन् ! विवाह झाला नाहीं. तो असत्य बोलत आहे. "

" तोच असत्य ! " नीलवर्ण क्रोधानें ओरडला. " तोच असत्य आहे. आणि ती आतां निर्लज्जपणें येथें निष्कलंकतेचें प्रदर्शन करण्यास उभी राहिली आहे. तीच स्वत: किल्ल्यावर मजकडे आली, आणि ह्या तिच्या म्हाताऱ्या आजाच्या अब्रूचें रक्षण करण्याकरितां मीं तिचा अंगीकार केला. ह्या भटानें नाहीं म्हटल्यावर मीं पूर्वींच रामगढाहून बोलावलेल्या एका पुरोहितानें आमचा विवाह लावला. "

ह्या घोर वाणीनें सभा चकित झाली. पुरोहिताच्या वचनानें लीलेच्या पावित्र्याबद्दल दृढ झालेला ग्रह कित्येकांच्या मनांतून नाहींसा होऊं लागला. नीलवर्णानें द्रोहाचा अपराध कबूल करतांना असत्य कथा केली नव्हती यामुळें त्याचें हें वचन खरें असूं शकेल असें त्यांना वाटलें. पण लीलेचा क्रोध आतां परमावधीस पोंचला. संकटाच्या घोरतेबरोबर तिचें धैर्यहि वाढूं लागलें.

" तो म्हणतो—मी निर्लज्ज; आपण होऊन त्याजकडे गेलें. तो पलीकडे त्याचा नोकर शिवदास उभा आहे; त्याला येऊन सांगूं द्या. " तिनें उत्तर केलें.

नीलवर्णाकडून त्यास कांहीं त्रास होणार नाहीं असें राजाचें अभयवचन मिळाल्यावर शिवदास सांगूं लागला, ' महाराज ! त्यांनीं मला लीलाबाईला आणण्याची आज्ञा अनेक वेळां केली. पण मला ती मुलीप्रमाणें प्रिय वाटत असल्यानें मी नाकारीत असें. एके दिवशीं त्यांनीं दुसऱ्या दोन नोकरांना तीच आज्ञा केली व त्यांनीं नकार दर्शविला तेव्हां त्यांना स्वहस्तानें ठार केलें, आणि त्यांचीं प्रेतें तटावरून खालीं खडकांत टाकलीं. अद्याप तीं तेथें सांपडतील. त्या नोकरांचीं प्रेतें समोर असतांच त्यांनीं मला बोलावलें व पुनः आज्ञा केली. मी भ्यालों ! परमेश्वर मला क्षमा करो. प्राणाच्या भयानें मी ती आज्ञा शिरसावंद्य केली. मी तिच्या शोधास गेलों. ती मला

बुरुजावर दिसली. लीलादेवीला पकडून मीं तिला वर नेलें व एका पलंगा-वर ठेवलें तेव्हां ती मूर्च्छित होती. महाराज ! मीं चूक केली. मला शिक्षा करा. त्या दुसऱ्या नोकरांच्या स्थितीनें घाबरून मी गुन्ह्यास प्रवृत्त झालों. »

‘ जणूं काय आज्ञाभंगाबद्दल माझ्या दासांना शासन करण्यास मी मुखत्यार नाहीं. एका भिकारड्या दासाच्या शब्दावर कोण विश्वास ठेवील ? मी सांगतों तो खोटें बोलतो. ती त्याच्याबरोबर आनंदानें वर आली. ’ नीलवर्णानें पुनः म्हटलें.

‘ जास्त साक्षीची जरूर दिसत नाहीं. आमची खात्री पटली. ’ राजा म्हणाला.

‘ पण, राजा ! तूं अधर्म करीत आहेस. त्या भिकारड्या नोकराचे शब्द खरे मानलेस तरी तिचा माझा विवाह झाला हें त्यामुळें खोटें होत नाहीं. अधर्म करूं नकोस. माझी पत्नी मला दे. ’ नीलवर्णानें जोरानें म्हटलें.

राजा विचारमग्न झाला. त्यानें प्रश्न केला, ‘ मुली ! ह्यावर तुझा काय पुरावा ? तूं निष्पाप आहेस ही आमची खात्री आहे; पण न्यायाच्या कार्यांत दोष दिसतां कामा नये. ’

आणि लीला काय उत्तर देणार ? किसननें त्याचरात्रीं तिची सुटका केली म्हणून सांगितलें तरी त्यामुळें नीलवर्णाचें म्हणणें खोटें कसें ठरणार ? ती सचिंत झाली. ह्याला एकच उपाय होता. तो हा कीं, भिल्लांच्या गांवीं नीलवर्णानें वृद्धास पाठविलेलें पत्र दाखल करणें होय. पण पत्र लीलेजवळ नव्हतं.

ती राजाला अवकाश देण्याची प्रार्थना करणार इतक्यांत सरदार किसन नाईक उभा राहून बोलला, “ सरकार ! हें पत्र पहा. ह्याच्या वरील मिती ध्यानांत घ्या. नीलवर्णानें हें पत्र माझ्या गांवीं वृद्धाला पाठ-विलें. ह्या पत्रावर त्याचा शिक्का आहे व अक्षरहि त्याचेंच आहे. महा-राज ! लीलादेवी त्याची विवाहित स्त्री, असें तो म्हणतो तर या पत्रांत लग्नाची विनंति पुनः कशाला ? हें पत्र रामनाईकानें मजकडे पाठविलें. त्याची निर्लज्जता आतांतरी सर्वांस स्पष्ट कळून येवो. त्यानेंच वृद्ध सोम-दत्त हेमपुरीहून इकडे येतांना लीलेला पुनः पळविलें होतें. पण माझ्या लोकांनीं मार्गांतून तिची सुटका केली. ”

सर्वांची मुखें प्रफुल्ल झालीं. सर्वांना अत्यानंद झाला. तरी नीलवर्ण पुन: निर्लज्जपणें म्हणाला, ' न्यायाची आणखी एक मार्ग आहे. तिच्या वतीनें कोण योद्धा माझ्याशीं युद्ध करण्यास सिद्ध आहे ? सत्याचा जय होईल ! दिव्याच्यायोगें न्यायनिर्णय करणें फार चांगलें. इतर पद्धतींत दोष आहेत. मानव मोहाला बळी पडून, परमेश्वरास साक्षी ठवनहि, जीवितभय नसल्यानें हवें तें असत्य कथन करतो. मी पुन: सांगतों कीं, ती माझी आहे. '

पुष्कळ वीरयुवक त्याच्याशीं युद्ध करण्यास सिद्ध झाले. त्यांत जयसेन होता; तो नीलवर्णास म्हणाला, " त्या देवकन्येनें माझे प्राण वांचवले आहेत. तिच्या संकटकाळीं मी तिला सहाय्य न करणें कृतघ्नपणा होईल. नीलवर्ण ! जरी तूं मला आश्रय दिला होतास तरी मला तिच्या वतीचा योद्धा म्हणून कबूल करण्यास तुझा हरकत नसावी. "

राजा संतप्त होऊन बोलला, " वीर वीरांशींच युद्ध करतात. नीलवर्ण ! तूं द्रोह केलास. वीरव्रतापासून तूं च्युत झालास. जा चालता हो. देवकृपेनें तुला पश्चात्ताप होवो. त्या कन्येला केसरी योद्ध्याची जरूर नाहीं. देवानें तिला व तिच्या पितामहाला अनेक संकटांतून निभावलें हेंच त्यांचें दिव्य. मजसिंह ! ह्या अधमाला घेऊन जा व सांगितल्याप्रमाणें तावडतोब व्यवस्था करा. "

नीलवर्ण तरी खिन्न झाला नाहीं. मात्र जातांना तो उद्गारला, " हरकत नाहीं. देहांत प्राण आहे तोंपर्यंत मी तिच्या प्राप्तीची आशा सोडणार नाहीं. "

नंतर निरनिराळ्या विजयी वीरांना पारितोषिकें देण्यांत येऊन दरबार विसर्जन झाला, व लीला आजोबासह त्यांना दिलेल्या महालांत परत गेली. तिच्या मनांत किती तरी विचार उत्पन्न झाले, ' तर मग ती चिरस्मरणीय रात्र ते विसरले नाहींत ! मजकरतां आपला प्राणहि अर्पण करण्यास ते तयार झाले ! त्यांच्या चरणांवर मस्तक ठेऊन जर मला त्यांना सांगतां येईल कीं— व लीला दुसरें काय सांगणार ? अतःपर ती तिच्या स्वतःची स्वामिनी नाहीं हेंच.

वृद्ध सोमदत्त तिला म्हणाला, ' बाळ ! आजच्या दिवसाची स्मृति

असूं दे. माझें प्रपंचांतील कार्य संपलें. मी लवकरच संन्यासदीक्षा घेईन; पण तुझ्या वैभवसुखाचा उदय आज झाला आहे. परमेश्वर तुला योग्य वर देवो. तुला इच्छित वरप्राप्ति होवो.

प्रकरण २४ वें.

मगधांत.

राजा राजशेखराला, तो विजयी झाला ह्मणून अनेक राष्ट्रांकडून अभिनंदनपर खलिते आले. मगधाधीशानेंहि एक खलिता पाठविला होता. तो वाचून दाखविण्याचें काम बौद्ध भिक्षु सूर्यमणीकडे आलें. कुमार चंद्रशेखराच्या बंडाचा ध्वंस होऊन बंडखोरांचा नायनाट झाल्याबद्दल त्या पत्रांत राजाचें अभिनंदन केलें होतें. विजयपुरास अतःपर चिरकाल शांतिलाभ होवो व मगधाधीशाच्या दोस्त राजाचें वैभव वृद्धि पावो अशी सदिच्छा त्या पत्रांत प्रदर्शित केली होती. पत्राच्या शेवटीं विजयपुराधिपतीस बौद्ध भिक्षु सूर्यमणि व त्याची भगिनी यांजबद्दल विनंति होती ती अशी:—

आह्मांस असें जाहीर करण्यांत आलें आहे कीं, कोणीएक सूर्यमणि नांवाचा बौद्ध भिक्षु व त्याची भगिनी मनोरमा ह्यांनीं आपल्या राज्यांतील बंडखोरांशीं संगनमत करून त्यांना मगधांतून लोक व शस्त्रसामुग्री पुरविण्यासाठीं ह्मणून पुष्कळ पैसा घतला, अशा आरोपावरून त्यांस आपण प्रतिबंधांत ठेवलें आहे. हें त्यांचें कृत्य आपणां स्नेही राष्ट्रांच्या स्नेहसंबंधास अत्यंत घातक आहे आणि आमच्या स्नेही नृपालानें त्यांना प्रतिबंधांत ठेवलें हें रास्तच होय. पण तीं मगधाधिपाची प्रजाजन आहेत. सूर्यमणि व मनोरमा बौद्धांचें यतिधर्मी मठवासी आहेत. त्यांच्याविरुद्ध कांहीं धर्मसंबंधीं आरोप आहेत. यास्तव त्यांना इकडे लवकर पाठविण्यांत यावें.

घरीं गेल्यावर सूर्यमणीनें मनोरमेला वरील मजकूर सांगितला. तिच्या नेत्रांत अश्रु उत्पन्न झाले; पण ती हतधैर्य बनली नाहीं. ती ह्मणाली, 'शासनपीठ स्वस्थ रहाणार नाहीं हें निश्चित होतेंच. त्याची आज्ञा आपण जरूर शिरोधार्य केली पाहिजे. भाऊ! भगवान् बुद्धाची इच्छा असल्यास आपण आत्मसमर्पणहि करूं.'

' मनोरमे ! मला भीति वाटत नाहीं. आपण मगधास जावें अशी प्रथमपासून माझी मनीषा होती. पण अडचण काय ती तुझीच होती. आतां आपण दोघेंहि जाऊं. भगवानाचे अगम्य मार्ग कोणास समजूं शकणार ! एरवीं आपणांस कृष्णमतींचें कारस्थान कळलें असतें काय ? माझ्यावरच्या आरोपाविषयीं मला मुळींच भीति वाटत नाहीं. आपण आपल्या कर्तव्यांत त्रुटि केली नाही. मनोरमे ! भय कसलें ? आपण जाऊंच. ' सूर्यमणीनें उत्तर दिलें.

थोड्या दिवसांनीं विजयपूरच्या वकिलाबरोबर मनोरमा व सूर्यमणि ह्यांना दरबारनें पाठविलें. त्यांच्या जाण्यानें वृद्ध सामदत्त व लीला तसेंच बालराणी गुणमयी ह्यांना अतिशय वाईट वाटलें. पण सुज्ञ मनोरमेनें सर्वांचें समाधान करून निरोप घेतला.

शारदीय दिवस होते. प्रावृटाच्या आदिअंताची मेघगर्जना व विद्युत्प्रभा आगामी सात महिने लुप्त झाली होती. भूदेवीनें सुंदर स्वरूप केलें होतें वनांतील वृक्ष व लतावेली चार महिने भरपूर जीवन मिळाल्यानें टवटवीत दिसत होत्या. भूपृष्ठावर ठिकठिकाणीं हिरवीं पिवळीं शेतें आनंदानें सगर्व डुलत होतीं मधून मधून गहूं हरबरा इत्यादि रब्बीच्या पिकांकरतां राखून ठेवलेलीं क्षेत्रें भूदेवीच्या नवीन सौंदर्याला कृष्णतिलकाप्रमाणें शोभत होतीं.

यथाकालीं मगधाच्या राजनगरींत पोंचल्यावर विजयपूरचा वकील राजदरबारीं गेला. मगधेश्वरानें सूर्यमणि व मनोरमा ह्यांना बौद्ध विहारांत पाठविलें त्यांना विहार पूर्वीप्रमाणेंच शांत व सुव्यवस्थित भासला. पण विहारांतील भिक्षूंचे आपसांत परस्पराशीं तंटे होते. ते एकमेकांचा द्वेष करीत. ज्या सद्गुणांमुळं एकदां बहुतेक भारतवर्षांत भगवान् बुद्धाच्या धर्माचा प्रसार झाला होता व बौद्ध धर्मानें सनातन धर्माहून जास्त अनुयायी मिळविले होते त्या सद्गुणांचा विहारांतील सांप्रतच्या भिक्षूंत पूर्णांशानें अभाव होता. मठपति भदंत भिक्षूंचे तंटे मिटविण्याचा प्रयत्न करीत. पण तंट्यांचें मूळ कारण मानवाचे विकार भिक्षूंत प्रबलतेनें वास करीत असल्यानें असले कितीहि तंटे मिटविले तरी काय उपयोग ! संधि मिळतांच भिक्षु एकमेकांचा नाश करण्यास उद्युक्त होत. ह्यांत, बौद्ध विहारांतील कलिदेव कृष्णमूर्ति दक्षिणेंतून आल्यापासून

ह्या अंतस्थ कलहांना जणूं ऊत आला होता. बऱ्याच भिक्षूंनीं सूर्यमणि व मनोरमा ह्या पाखंड्यांना विजयपुरीहून मगधाधीशामार्फत मागविण्याचा आग्रह महंतांना केला. शासनपीठाच्या अध्यक्षानें मत दिलें कीं, त्यांना बोलावून त्यांची चौकशी झाल्याशिवाय मठाची अब्रू सुरक्षित रहाणार नाहीं व त्यामुळें दूरदेशीं असल्यानें मुख्य मठाची विशेष देखरेख असणें कठीण अशा मठांना शिस्त लागणार नाहीं. कृष्णमूर्तीनें विहारांतल्या कित्येक उपदेशप्रसंगीं सूर्यमणीच्या काल्पनिक स्वधर्मत्यागाचें, अन्य धर्मीयांशीं असलेल्या त्या बंधुभगिनीच्या साहचर्याचें, मनोरमेच्या पिशाचविद्येचें खूप भपकेदार रंगांत चित्र रेखाटावें ! आणि ह्या असत्य कथामंदिरेनें त्याच्या श्रोत्यांनीं इतकें संक्षुब्ध व्हावें कीं, ते बुद्धमंदिरांतच ओरडूं लागत, ' त्या अधमांचा नाश करा; त्या धर्मभ्रष्टांना मृत्यूची शिक्षा पाहिजे. '

मठपति महंत सूर्यमणीची-योग्यता जाणून होते. त्याची उपदेश करण्याची शैली, अन्य भाषांवरील त्याचें प्रभुत्व, धर्मग्रंथांचें अन्य भाषांत भाषांतर करण्यासंबंधीं त्याचे श्रम, व त्यांचा उपयोग, हीं सर्व त्यांस ज्ञात होतीं. ते नेहमीं सूर्यमणीचा कैवार घेत. पण आपणांस व्यवहारांत दिसून येतें कीं, अधिकारपदारूढांना त्यांच्या वजनदार उपाधिकाऱ्यांच्या मतास अनुसरून कित्येक प्रसंगीं न्याय गोष्टींतहि अन्यायवर्तन करावें लागतें, तसाच प्रकार मठपति महंतांचा झाला. मगधाधीशामार्फत त्या बंधुभगिनीला त्यांनीं बोलावणें केलें. त्या आज्ञेनुसार तीं आलीं. कित्येकांचीं कल्पना होती कीं, तीं दोघें परधर्माचा स्वीकार करून मठपति महंतांची सत्ता झुगारून देतील व मगधांत येण्याचेंच नाकारतील. पण त्यांच्या आगमनानें, महंतांची अवज्ञा करण्याचा त्यांचा मानस नाहीं, निदान इतकी विहारांतील भिक्षूंची खात्री झाली.

लवकरच मगधाधीशानें आपली मंत्री सभा बोलावली. मंत्रीसभा बोलावण्याचें कारण त्यानें सभासदांना निवेदन केलें. सभागृहांत मगधराज, त्याचे मंत्रीमंडळ, मठपति महंत, शासनपीठाध्यक्ष, सूर्यमणि, व विजयपूरचा वकील इतके लोक होते. एका मंत्र्यानें विजयपूर नरेशाचें पत्र वाचलें. पत्र वाचून झाल्यावर मगधराज बोलला, " विजयपूरकरांच्या

पत्रांत बौद्ध धर्माचा विख्यात सेवक कृष्णमूर्ति याजवर भयंकर आरोप केले आहेत, त्याअर्थी त्याला जरूर बोलावलें पाहिजे. महंताच्या आग्रहावरून आह्मीं सूर्यमणीला बोलावलें, त्याप्रमाणें तो हजर आहे. त्याचा न्याय शासनपीठ करील, तें आमचें काम नव्हे. सूर्यमणि ! कृष्णमूर्ति येईपर्यंत तूं रामगडाहून कां पळालास व शासनसभेच्या आज्ञापत्रिकेचें उल्लंघन कां केलेंस सांग पाहूं. ”

“ महाराज ! मी स्वेच्छाधारी नव्हतों, हें विजयपूरकराच्या खलित्यावरून आपणांस समजलेंच आहे. माझ्या सहाधिकाऱ्यानें शासनसभेची आज्ञापत्रिका मला दिली तसा इकडे येण्याच्या तयारीस मी लागलों तों राज्ञी चंद्रावतीच्या हुकमावरून रामगडच्या दुर्गपतीनें मला अटक केली, व जलदुर्गास पाठविलें. तेथून आम्हां बंधुभगिनीस विजयपुरास नेण्यांत आलें. राजा युद्धाहून परत येईपर्यंत आह्मांस राजपुरुषांच्या नजरेखालीं ठेवलें होतें. राजमाता आमचा निर्णय करीना. दैवचमत्कारानें एक आकस्मिक प्रकार घडून आला. दरबारला कांहीं कागदपत्रें मिळालीं व त्यावरून दिसून आलें कीं, अपराधकर्ता मी नसून माझा अधिकारबंधु होता. त्याचा कांहीं पत्रव्यवहार स्वतंत्र होता व कांहीं जलदुर्गचा किल्लेदार नीलवर्ण याजमार्फत होता. किल्लेदार नीलवर्णाची नुकतीच चौकशी होऊन तो अपराधी ठरला व त्यास देहांत शिक्षा सांगण्यांत आली. ”

“ सूर्यमणि ! त्याचा शिरच्छेद करण्यांत आला काय ? ” मगधराजानें अहेतुक प्रश्न केला.

“ नाहीं, राजन् ! त्याचा मावसभाऊ जयसेन यानें विनंती केल्यामुळें राजानें त्याला प्राणदान दिलें; मात्र त्याला हद्दपार करण्यांत आलें. आणि तो श्री काशीस गेला ह्मणतात. ” सूर्यमणीनें इतर पुष्कळ हकीकत सांगितली. पण ती वाचकांस माहीत असल्यानें आह्मी ती पुनः येथें देत नाहीं.

“ सूर्यमणि ! तूं म्हणतोस ते कागदपत्र कोठें आहेत ? आणि ते मगधराजासमोर आले तरी त्यांच्या सप्रमाणतेची खात्री काय ? ” शासनपीठाध्यक्षानें तीक्ष्णतेनें प्रश्न केला. कारण तो कृष्णमूर्तीचा स्नेही होता.

“ धर्मज्ञ ! महत्वाच्या कागदाची काळजी कशी घ्यावी हें आह्मां विजयपूरकरांना समजतें. ते कागद आकुतरायाच्या मृतदेहावर सांपडले

त्याबरोबर ते राजमातेकडे नेण्यांत आले. प्रत्येक पत्रावर राजमातेचा शिक्कामोर्तब असून तिची स्वतःची सही आहे. नंतर तीं पत्रें एका पेटींत मोहोरबंद करून ठेवलीं होतीं. महाराजांच्या आगमनानंतर त्यांनीं तीं पाहून प्रत्येकावर आपला शिक्का केला. महाराजांचा मोर्तब सर्वांच्या परिचयाचा आहेच. " विजयपूरच्या वकिलानें सांगितलें.

शासनपीठाध्यक्षानें तिरस्कार युक्त मुद्रा केली.

ह्यावेळीं कृष्णमूर्ति सभागृहांत येऊन दाखल झाला. प्रथमदर्शनीच त्याची व सूर्यमणीची दृष्टादृष्ट झाली. पहिल्याच्या नेत्रांत प्रखर द्वेष दृग्गोचर होत होता. सूर्यमणीच्या दर्शनानें त्याच्या भुवया आकुंचन पावल्या. सूर्यमणीचे नेत्र नित्याप्रमाणें निश्चल होते. त्याच्या मुद्रेवर यत्किंचित् दुष्ट विकार दिसत नव्हते. उलट त्याचे सत्वगुणदर्शक नेत्र प्रेक्षकाच्या मनावर अनुकूल संस्कार मुद्रित करीत.

सभागृहांत येतांच कृष्णमूर्तीनें मठपति महंताला व शासनपीठाध्यक्षाला प्रणाम केला. नंतर सर्वत्र नजर फेंकून तो मगधराजाला ह्मणाला, " राजेश्वर ! मला कां पाचारण केलें ? धर्मपीठाच्या अधिकारांतील गोष्टींची चौकशी करण्याचा अधिकार राजाच्या मंत्रीसभेला दिला जाईल अशी कल्पनाहि मला नव्हती. अशा अधिकारपरिवर्तनाला माझा विरोध आहे. "

" कृष्णमूर्ति ! धर्मपीठाच्या अधिकारांत अव्यापारेषुव्यापार करण्याची आमची इच्छा नाहीं. आह्मी चौकशी करीत असलेला प्रश्न राजकारणाचा आहे. विजयपूरचा खलिता ऐकल्यावर तुला तो कळून येईल. त्याला तें पत्र वाचून दाखवा. " राजानें मंत्र्याला आज्ञा केली.

कृष्णमूर्तीनें तें पत्र ऐकलें. सूर्यमणीनें सांगितलेली हकीकत त्याला कळविण्यांत आली. त्याची भीति अनिवार्य झाली. क्षोभामुळें तो कापूं लागला. तो आपला हात चोळूं लागला व ही त्याची कृति शरीरावरील वस्त्रांतूनहि दिसून येत होती.

मगधराज ह्मणाला, ' मंत्रीश्रेष्ठ हो ! सभेच्या मुख्य कार्याला आतांच आरंभ व्हावयाचा आहे. अति सावधतेनें ह्या प्रकरणाचा निर्णय करण्याची विशेष जरूरी असल्याचें आह्मी आपणांस स्मरण देतों. खलित्यांत निर्देश केलेले कागदपत्र विजयपूरच्या वकिलांनीं आतां सादर करावे. '

" ह हजार आहेत, महाराज !" वकील मोहोरबंद पुडकें पुढें करून म्हणाला, " पण तत्पूर्वी माझी इतकीच विनंति आहे कीं, आपण त्याच्या मोहोरा नीट तपासाव्या, म्हणजे मागाहून शंका नको."

राजा पत्रांचें पुडकें घेऊन म्हणाला, ' वकिलाच्या वचनावर अविश्वास करण्याचें कारण दिसत नाहीं. आमची खात्री झाली. तुम्ही आपली खात्री करून घ्या.

सर्वांनीं तपासून झाल्यावर तें पुडकें उघडण्यांत आलें.

वकील बोलला, " महाराज ! एकंदर पत्रें बेचाळीस आहेत. जरूर तीं ठेवून बाकीचीं आम्हांस परत करावीं व ठेवलेल्या पत्रांबद्दल आमच्या महाराजांना खलिता द्यावा. "

कृष्णमूर्ति एकदम उभा राहून ओरडला. " तीं पत्रें विचारांत घेण्याला मी हरकत करतों. धर्मपीठाच्या स्वाधीन तीं करावीं म्हणजे त्यांचा खरे-खोटेपणा पाहिला जाऊन सत्यान्वेषणाला अवश्य तेवढीं पत्रें धर्मपीठ सिंहासनास सादर करील कारण मी धर्मपीठाचा सेवक आहें व धर्म-पीठाच्या सेवकाची चौकशी करण्याचा अधिकार राजसभेला नाहीं. "

" कृष्णमूर्ति ! धर्मपीठाचे अधिकार आम्हीं घेतले नाहींत हें तुला पूर्वीच सांगितलें आहे. धार्मिक अपराधाव्यतिरिक्त अपराधांची चौकशी करण्याचा पूर्ण अधिकार राजसभेला आहे आणि आमच्या स्नेही राष्ट्राविरुद्ध तसले अपराध करणाराला, ते आमच्या राज्यात करण्यांत आले नाहींत या सबबीवर आम्ही सोडणार नाहीं. " मगधराजानें जोरानें सांगितलें.

यावर कृष्णमूर्ति कांहीं बोलला पण त्याच्या बडबडीकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं.

तीं पत्रें वाचण्यास आरंभ झाला. प्रथम पत्र उघडतांच मगधराज म्हणाला, ' पत्र वाचून झाल्यावर आपण प्रत्येक पत्र नीट तपासा म्हणजे सत्यासत्यतेचा भ्रम रहावयास नको. "

कृष्णमूर्तीचें मोठें हस्ताक्षर सर्वांनीं तेव्हांच ओळखलें पत्रांतील मजकूर देऊन आम्ही वाचकांना कंटाळवीत नाहीं. कुमार चंद्रशेखर कृष्णमूर्तीला सैन्यांतला एक अधिपति करील, मगधांतून आणाव-याच्या प्रत्येक हजार सैनिकांबद्दल त्याला दहा सहस्र मुद्रिका

मिळतील असें सुमत्सेनाचें पत्र आलें होतें. त्याचा उल्लेख करून कृष्ण-मूर्तीनें मगधांतून आणावयाच्या सैनिकांबद्दल मिळणारें वेतन फार थोडें तरी तें कुमाराकरतां कबूल केलें होतें. विजयपूर हस्तगत झाल्यावर लुटीचा हिस्सा ठरला नव्हता तो ठरवावा अशी विनंति केली होती. सैन्याच्या कायम खर्चासाठीं रामगड परगणा मागितला होता. मगधाचा वर्तमान नेभळा दंडधारी व त्याचें हीनबुद्धि प्रधानमंडळ युद्धांत भाग घेणार नाहीं, म्हणून सैनिक आणावयास कृष्णमूर्तीला स्वतः मगधास जावें लागेल इत्यादि लिहून सहा महिन्यांत कुमार आज्ञा करील तेथें आपले सैनिक आणण्याचें कृष्णमूर्तीनें वचन दिलें होतें. कुमाराचा जय होवो अशी इच्छा प्रदर्शवून पत्र पुरें केलें होतें. पत्राच्या शेवटीं कृष्ण-मूर्तीची सही होती.

" अशीं आणखीं पत्रें आहेत कां ? " शासनपीठाध्यक्षानें जवळ बसलेल्या कृष्णमूर्तीस हळूच प्रश्न केला; " तसें असेल तर तूं नाश पावलास म्हणावयाचा. " तो म्हणाला.

" त्यांना वाटेल तें वाचूं द्या. मी आपली खातरजमा करीन. " कृष्ण-मूर्तीनें उत्तर दिलें.

होय ! आणखी कितीतरी तसलीं पत्रें होतीं. त्या सर्वांशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं. कुमारानें कृष्णमूर्तीच्या अटी कबूल केल्या होत्या. मागधी सैन्य कुमाराला येऊन मिळतांच कृष्णमूर्तीला रामगड परगण्याची सनद देण्याचें ठरलें होतें. दुसरीं कित्येक पत्रें नीलवर्णानें चंद्रकेतूला लिहिलीं होतीं, व त्यांतल्या कांहींत, रामगडच्या एका गुप्त बागेंत कृष्ण-मूर्तीनें केलेल्या मजलसींतील नाचरंग, खानपेय, इत्यादींचें वर्णन लिहिलें होतें. त्यांत असेंहि लिहिलें होतें कीं, कृष्णमूर्ति बौद्ध भिक्षुक खरा पण मोठा रंगेल गडी. कृष्णमूर्तीनें नीलवर्णास विहारांत नेऊन एकदां मनोरमेचे दर्शन करविल्याचा उल्लेख त्यांत होता. व दोस्त कृष्ण-मूर्ति तिला आपल्याबरोबर सैन्यांत आणणार असल्याचें कळविलें होतें. मनोरमेचें वर्णन त्यांत असें होतें कीं, तिच्यासारखी रूपसुंदर पृथ्वीवर मिळ-णार नाहीं इतकेंच नव्हे तर स्वर्गांतील उर्वशी, मेनका, आदि श्रेष्ठ देवांगनाहि सुंदरी मनोरमेला पाहून आपल्या सौंदर्याविषयीं हतगर्व

होतील. दुसरा पुष्कळ अनिर्वाच्य मजकूर त्या पत्रांतून होता. वैशाखानं-तरचें एकहि पत्र नव्हतें व हें रास्तच होय. कारण त्यापुढें लवकरच बंडाचा मोड झाला व बंडाच्या उत्पादकांची वाताहत झाली

" कृष्णमूर्ति ! तुझें कांहींच उत्तर नाहीं कां ? " शासनपीठाध्यक्षाने पुनः पण अधीरतेनें प्रश्न केला, ' तुझीं पत्रेंच तुला दोषी ठरवीत आहेत. असलीं पत्रें लिहिण्यापेक्षां तुझे हात जळले असते तर बरें होतें. '

कृष्णमूर्तीनें उत्तर दिलें नाहीं.

पत्रें वाचून संपल्यावर तो उभा राहिला. सूक्ष्म रीतीनें पहाणारास त्याचे ओंठ रक्तहीन झालेले दिसले असते. त्याचा कृष्णवर्ण भस्मवत् झाला. तो बोलतांना अडखळूं लागला तरी त्यानें बरेंच अवसान आणलें होतें. तो निश्चिंत असल्याची पेट करीत मोठ्यानें म्हणाला, ' मी हल्लीं न्यायासनासमोर उभा नाहीं. नाहीं तर, महाराज ! माझा जबाब तितकाच तीक्ष्ण झाला असता. माझीं म्हणून दाखविण्यांत आलेलीं पत्रें सूर्य-मणीचें दौरात्म्य विशद करतात. त्याचा प्रयत्न फसला तेव्हां तो पळून गेला. त्याला अटक करण्यांत आली, हें सर्व थोतांड आहे ' शासनपीठा-ध्यक्षापुढें असलेलें पत्र उचलून तो म्हणाला, ' हस्ताक्षरासंबंधीं विचाराल तर सर्व पत्रें ह्या पत्राप्रमाणेंच बनावट आहेत. सूर्यमणीची सुंदर भगिनी निपुण लेखक आहे. ती वाटेल त्या अक्षरासारखें अक्षर काढील. तिनें माझ्या अक्षराची केलेली नक्कल पाहून मला आश्चर्य वाटत नाहीं. पण, राजे-श्वर ! मी हल्लीं आरोपी नाहीं व त्या निर्लज्ज बंधुभगिनीचा निर्णय शासन-सभा करीपर्यंत कोणालाच ह्या प्रकरणावर मत देण्याचा अधिकार नाहीं. '

" ठीक आहे. शासनसभा कांहीं निर्णय करो; पण हे कागदपत्र तुज-विरुद्ध इतका पुरावा करीत आहेत कीं, आह्मी तुला येथून परत जाऊं देण्यास तयार नाहीं. सूर्यमणि व त्याची भगिनी ह्यांच्या चौकशीची वेळ येईपर्यंत तुला याच ठिकाणीं रहावें लागेल. महंत ! शासनसभेची चौकशी कधीं आहे ? " राजानें विचारलें.

" येत्या शुक्रवारीं. " शासनपीठाध्यक्षानें उत्तर दिलें, " पण, राजेश्वर ! भगवान् बुद्धाच्या एका सेवकाला बंदी करण्यांत चुकी होत आहे. मी कृष्णमूर्तीस जामीन रहाण्यास तयार आहें. "

" अशक्य ! अशक्य ! तरी महंतांचें मत विचारूं. " मगधराजानें म्हटलें.

पण मठपति महंत कबूल झाले नाहींत. कृष्णमूर्तीच्या सदोषत्वाबद्दल त्यांची पूर्ण खात्री झाली.

सभेचें काम संपलें. भिक्षु कृष्णमूर्ति बंदिवान झाला.

बंदिशाळेंत त्याचे काय विचार चालले होते ? बनावट पत्रें म्हणून म्हटल्यानें कोण फसणार ? सूर्यमणि अप्रसिद्ध भिक्षु असला तरी इतक्या भक्कम पुराव्यावर कोण अविश्वास करणार ? बौद्ध मठांत असलेले कृष्णमूर्तीचे हस्तलेख पत्रांच्या अक्षरांशीं ततोतंत जुळल्याशिवाय कसे रहातील ? कृष्णमूर्तीचा सर्व भरंवसा त्या बंधुभगिनींची अप्रसिद्धता व आपली बौद्ध धर्माची कामगिरी यांवर होता. त्यांचा नाश हाच त्याच्या सुरक्षिततेचा मार्ग होता. पण स्वकृत्यांचा परिस्फोट, विजयपूरनरेशाचें पत्र वगैरेंनीं कृष्णमूर्तीची बाजू पुष्कळ सामर्थ्यहीन झाली होती. त्यामुळें त्याच्या चिंताग्रस्त मनानें, आजपर्यंत त्यानें केलेला अनेकांचा भयानक छळ, कठोर दंड, जाळून मारण्याच्या दिलेल्या शिक्षा, त्याच्या डोळ्यापुढें उभ्या केल्या व तो भयभीत झाला.

असल्या भयानक दंडापासून मुक्तता शक्य होती कां ? तो एका गवाक्षाजवळ गेला. त्यानें त्याचे लांकडी गज जोरानें हालविले; पण तेथून जमीन चाळीस हात खोल होती व भिंत नीट उभी होती, पाय देण्यासही तिला कोठें जागा नव्हती. त्याचें हृदय कंपित झालें व तो मागें परतला. इतक्यांत त्याचा एक चाकर आला. कृष्णमूर्तीची आशा उत्तेजित झाली.

कृष्णमूर्ति बंदिवान होता तरी वजनदार भिक्षु असल्यानें राजानें त्याला बंदिवानाचे सर्व नियम लावले नव्हते. फक्त त्याला तेथून जाण्याची मोकळीक नव्हती. कृष्णमूर्तीनें चाकरास विचारलें, " तूं भीमकर्म्यास भेटलास कां ? "

" होय, महाराज ! ते गंगातीरावर आपली वाट पहात आहेत. आपली आज्ञा काय ती कळावी अशी त्यांची नम्र विनंति आहे. " चाकरानें उत्तर दिलें.

शुक्रवारीं रात्रीं राजप्रासादाच्या पार्श्व उद्यानाच्या दक्षिण घाटावर नौका तयार ठेव व सूर्योदयापर्यंत मी आलों नाहीं तर मी मेलों ह्मणून समज ह्मणावें. पण कोणाला संशय न येईल असें काम करण्यास सांग. कृष्णमूर्तीनें त्याला ह्मटलें.

प्रकरण २५ वें.

शासनपीठ.

चौकशीचा दिवस उगवला. कृष्णमूर्तीला एकाएकीं बंदिवान केलेलें एकून राजनगरींत मोठी चळवळ उडाली. त्याचा निर्णय होण्याचा एकच मार्ग होता व तो शासनपीठाकडून सूर्यमणीची चौकशी हा होय. कृष्णमूर्तीला ज्याप्रमाणें बरेच स्नेही होते. तसे सूर्यमणि व मनोरमा यांच्या परिचयाचे कित्येक भिक्षु व भिक्षुणी होत्या. पण कृष्णमूर्तीचे स्नेही शासनसभेंत होते व हा फायदा त्या बंधुभगिनींला नव्हता इतकी सुंदर व पवित्र दिसणारी भगवान् बुद्धाची कन्या पिशाचविद्येच्या आरोपावरून आज धार्मिक न्यायासनासमोर उभी केली जावी काय ? असा प्रश्न कित्येकांच्या मनांत उभा राहिला. धर्मसंबंधीं प्रकारणांत राजानें हात घातला हें वाईट झालें असें कित्येक ह्मणूं लागले. कित्येक ह्मणत कीं, कृष्णमूर्तीनें गुन्हा कबूल केला; शिक्षा सांगण्याकरतां शासनपीठापुढें त्याला आतां आणण्यांत येईल. दुसरे कित्येक, सूर्यमणि व मनोरमा ह्यांनींच अपराध स्वीकार केला, असें ह्मणत. एकंदरींत प्रत्येकजण आपापल्या कल्पनेप्रमाणें तर्क करीत होता. विहाराच्या पुढील मैदान सामान्य जनसमूहानें गच्च भरून गेलें; त्यांतून मार्ग काढीत राजपुरुष कृष्णमूर्तीला घेऊन आले. कृष्णमूर्ति पूर्वीप्रमाणेंच निष्काळजी मुद्रेनें सर्वांकडे तुच्छतापूर्वक पाहत चालला होता. शासनपीठाच्या मंदिरांत गेल्यावर राजपुरुषांनीं त्याला सभेच्या सेवक भिक्षूंच्या ताब्यांत दिलें. विहारांतील भिक्षूंनीं त्या बंधुभगिनीला आणलें. त्यांच्या सौम्य मुद्रा पाहून लोक कळवळूं लागले. मंदिरांत मध्यभागीं शासनपीठाध्यक्षाकरतां

एक उंच आसन ठेवलें होतें व त्याच्या दोन्ही बाजूंस इतर अधिकाऱ्यांना आसनें मांडलीं होतीं. समोर आरोपितांकरतां जागा होती व पलीकडे प्रेक्षक बसले होते. बाहेर स्वच्छ सूर्यप्रकाश पडला होता व त्याचा उजेड मंदिराच्या संगमरवरी भिंतींवर पडून सर्व प्रभामय झालें होतें.

शासनसंभेच्या कार्यास सुरवात झाल्यावर सभाध्यक्ष उभा राहिला. तो ह्मणाला. ' पवित्र बौद्ध धर्मीय ! रामगडच्या बौद्ध मठांतील मठपतीचें दुर्वर्तन ऐकून आह्मांस सखेदाश्चर्य वाटलें. रामगडचा विहार मूळचा अत्यंत परिश्रमानें स्थापलेला व दक्षिण भारतांतील सर्वांत प्राचीन मठ. आज अनेक वर्षे परधर्मी राज्यांत मठपतींच्या अविरततेनें मठ कायम टिकून शेंकडों लोक सद्धर्मच्युत न होतां भगवान् बुद्धाचे अनुयायी राहिले. पण गेल्या कित्येक महिन्यापूर्वी दुःखद्प्रकार घडून आला. महंतांनीं कृष्णमूर्तीला तेथें पाठविलें. त्यानें आविष्कृत केलेल्या दोषारोपांवरून आह्मीं सूर्यमर्णला येथें बोलावलें; पण आज्ञापत्रिकेचें उल्लंघन करून तो आपल्या भगिनीसह विजयपुरास पळून गेला, व मगधधीशानें मागणी करीपर्यंत तेथेंच राहिला. '

' पवित्र भिक्षूंनो ! त्याजवर ठेवले जाणारे आरोप कितपत स्थापित होतात हें तुह्मी ठरवा. आरोपी बंधुभगिनी आपल्यावरील दोषांचें निरसन करतील तें ऐकल्यावर आपण भगवान् बुद्धास स्मरून न्यायनिर्णय द्या. कृष्णमूर्ति ! तुह्मांस असलेली माहिती या न्यायप्रवीण भिक्षूंपुढें सांगा. '

कृष्णमूर्तीनें आपल्या भाषणाच्या आरंभीं चीन, तिबेट, काश्मीर, लंका, इत्यादि देशांत स्वतः केलेल्या बौद्धधर्माच्या सेवेची स्मृति न्यायाधिकाऱ्यांना दिली. आपल्या भाषणाच्या प्रथम उज्ज्वल भागानें त्यांच्यावर इष्ट परिणाम झाला असें दिसल्यावर तो पुढें ह्मणाला, ' मी भगवान् बुद्धाचा एक नम्र सेवक असून त्याचा मार्ग अनुसरण्याचा प्रयत्न करीत आहे. ह्या नाना देशांतून धर्माचें कार्य करून आल्यावर मला विश्रांति पाहिजे होती. पण मला रामगडास मठपति नेमण्यांत आलें आणि कर्तव्य समजून मी ही महंतांची आज्ञा परिपालन करण्यास उद्युक्त झालों. गुरूजन हो ! मी रामगडास जाऊन पहातों तों तो विहार अवलोकन करून मला खेद वाटला. त्याला बौद्धमठ ह्मणण्यापेक्षां

परधर्मीयांचें मंदिर ह्मणणेंच जास्त शोभेल. माझ्या सहाधिकाऱ्यानें पवित्र बौद्धधर्माचा बहुतेक त्याग केला होता. यथाकालीं बुद्धदेवाची सेवा व धर्मोपदेश कधींच होत नसे. माझा सहाधिकारी अन्य धर्माचें परिशीलन करण्यांत गर्क होता. अन्य धर्माचें अवगाहन करण्यांत सर्व काळ घालवणें बुद्धिभ्रंशकर आहे हें आपण जाणतच आहां. मीं त्यास अनेक वेळां तसें सुचविलें. त्याच्यासारखा हुषार सेवक बौद्ध धर्माला नाहींसा व्हावा याचें मला वाईट वाटलें. पण त्यानें मला उत्तर द्यावें कीं, परधर्माचें अध्ययन करण्याचा उद्देश तद्धर्मीयांच्या कोटिक्रमाचें खंडण करतां यावें एवढाच आहे. आपला पाखंडपणा झांकून ठेवण्यास किती योग्य उत्तर हें ! किती सरळ स्वभाव ! धर्माची कोण कळकळ ! पण, न्यायदेव ! हा कपट प्रयोग, आपली स्वधर्मच्युति जाहीर होऊन देहदंड भोगावा लागूं नये ह्मणून होता हें सांगितलें पाहिजे काय ? माझ्या विनवण्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तो मला बुद्धिपुरस्सर टाळूं लागला. रामगडच्या बौद्धांत त्याजविषयीं द्वेषभाव उत्पन्न झाला. तो निवारण करणें अशक्य झालें. ते भोळे बौद्ध त्या धर्मविध्वंसकाचा द्वेष करूं लागले तर त्यांना आवरून धरण्यास कोण समर्थ होणार ! ह्मणून, महाराज ! मीं शासनपीठाकडे विनंति केली व त्याप्रमाणें सूर्यमणीला अनुशासन पत्रिका आली.

" पण ह्या अवधींत माझी मानसिक शक्ति हळुहळू नष्ट होण्याच्या पंथास लागली. मनोरमेला पहातांच मी गोंधळून जाई. मला एक प्रकारची भीति वाटे व मी कंपित होई. भगवान बुद्धाची सेवा करण्याचेंहि सामर्थ्य मला उरलें नाहीं. माझी विचारशक्ति लुप्त झाली. खाद्यपेयादि सेवन करणें मला अशक्य होत चाललें. मला कळत होतें कीं मनोरमा आपल्या मोहिनीविद्येनें माझा नाश व्हावा ह्मणून मजवर प्रयोग करीत आहे. पण मला त्याचा प्रतिकार करवत नव्हता. बुद्धदेवानेंच माझें रक्षण केलें. मी अनुशासन पत्रिका दिली त्या दिवशीं रात्रीं ती भावासह विहारांतून निघून परधर्मी दुर्गपतीच्या घरीं गेली. त्यानें एकदम त्यांना जलदुर्गास पाठविलें व तेथून विजयपुरास त्यांची रवानगी झाली. मी अनायासें मोहप्रयोगांतून मुक्त झालों. माझ्या मनावर अधिकार करणारी

अदृश्य शक्ति अंतर्धान पावली व मी ही सर्व हकीकत कळविण्याकरितां येथें आलों. गुरुजन ! माझी हकीकत संपली. मी त्या दोघां बंधुभगिनींवर बौद्ध विहारांत पिशाचविद्या व पाखंडमतप्रसार केल्याचा आरोप करतों. आपण न्यायसभेच्या सभासदांनीं निःपक्षपात न्याय देऊन बौद्धधर्माचा हा कलंक नाहींसा करावा. मी त्यांच्या पिशाचविद्येचीं अनेक उदाहरणें देऊं शकेन; पण तसें करण्यांत निष्कारण कालापव्यय होईल. ”

शासनपीठाच्या अधिपतीनें प्रश्न केला, ह्या आरोपांच्या सत्यतेच्या पुष्टीकरणार्थ काणी साक्षी आहेत काय ? ”

“ रामगडास साक्षी पुष्कळ मिळतील; पण ते येईपर्यंत थांबण्यांत अर्थ नाहीं. मी मठपति स्वतः दोषारोप करीत आहें साक्षीची जरूर नाहीं असें मला वाटतें. ” कृष्णमूर्तीनें उत्तर दिलें.

“ सूर्यमणि ! स्वपक्षसमर्थनार्थ तुझें काय ह्मणणें आहे सांग. ” अधिपतीनें आज्ञा केली.

“ आह्मी निरपराधी आहों. आमच्यावर परधर्मप्रसाराचा आरोप आहे. त्याबद्दल माझी इतकीच विनंति आहे कीं, मीं केलेलीं धर्मग्रंथांची भाषांतरें रामगडाहून आणवावीं, ह्मणजे इतर आरोपांचें निरसन होईल. ” सूर्यमणिनें उत्तर दिलें.

इतक्यांत एक कृष्णवर्णाचा वृद्ध मनुष्य कित्येक मनुष्यांसह येऊन सभेंत हजर झाला. त्यानें अधिपतीला प्रणाम करून विनंति केली, “ महाराज ! आम्हांस न्याय मिळावा. आमचे मठपति सूर्यमणि राजकैदी झाले तेव्हां त्यांनीं कित्येक लिखित ग्रंथ आमच्या स्वाधीन केले. सूर्यमणि विजयपुराहून इकडे येण्यास निघाल्याचें समजतांच कदाचित् त्यांनीं दिलेल्या ग्रंथांची जरूरी शासनसभेपुढें लागेल ह्मणून आह्मी ते ग्रंथ घेऊन ताबडतोब निघालों ते आतांच येऊन दाखल झालों. रात्रंदिवस आह्मीं प्रवास केला. उशीर होईल या भीतीनें आह्मीं मार्गानें अनवश्यक वेळ घालविला नाहीं. भगवान् बुद्धानें आम्हांस वेळेवर आणलें हे किती उपकार !”

“ वृद्ध मनुष्या ! तूं कोण आहेस ? येथें अनाहुतरीतीनें येण्यांत तूं स्वतःवर केवढें संकट ओढवून घेतलेंस याची कल्पना तुला आहे काय ? ” अधिपतीनें विचारलें.

' महाराज ! मला बोलूं द्या. माझें ह्मणणें सिद्ध करण्यास अनेक लोक तयार आहेत. ' वृद्ध देवनाभानें उत्तर दिलें.

' कृष्णमूर्ति कर्कशस्वरानें ओरडून ह्मणाला, ' ही लुच्चेगिरी आहे. हा सर्व कट आहे. मी ह्याला हरकत घेतों. '

' आह्मी त्याचा निर्णय करूं. कृष्णमूर्ति ! कोणी साक्षी नाहीं तूं ह्मणालास. भगवान् बुद्धाच्या कृपेनें हा वृद्ध इसम येथें अवतरला. ह्याच्यावर विश्वास ठेवण्यास हरकत दिसत नाहीं. हा तेथला उपमठपति आहे व तूं आल्यावर कांहींकाळ मठपतिपण होता. त्याचें बोलणें संपल्यावर तुझें काय तें उत्तर दे. ' रामगडास पाठविलेल्या नवीन मठपतीचें देवनाभानें दिलेलें पत्र पहात एक न्यायाधिकारी भिक्षु ह्मणाला.

देवनाभानें सांगितली ती हकीकत आपणांस माहीत आहेच. नंतर त्यानें बरोबर आणलेल्या ग्रंथांतील निवडक उतारे न्यायसभेच्या सदस्यांना वाचून दाखवून समजावून सांगण्यांत आले. तेव्हां अधिपति कृष्णमूर्तीस बोलला, ' कृष्णमूर्ति ! हाच जर परधर्मप्रसार ह्मणत असशील तर तूं स्वस्थ राहिला असतास तर तें श्रेयस्कर झालें असतें. '

देवनाभ पुनः बोलूं लागला, ' महाराज ! मला देवी मनोरमेच्यावतीनें थोडें बोलावयाचें आहे. ' ' त्यानें कृष्णमूर्तीचें कृष्णकृत्य निवेदन केलें, कृष्णमूर्तीनें मनोरमेला पळवून नेण्याकरतां कांहीं बदमाष कसे जमा केले, एका बौद्ध कोष्ट्याला त्यांच्यांतल्या एका इसमानें ती हकीकत सांगितली, आपण पंचवीस तरुण बरोबर घेऊन देवी मनोरमेच्या रक्षणास धांवलों तेव्हां तिची काय अवस्था दिसली, त्या बंधुभगिनीला आपण किल्ल्यावर कसें पोंचवलें, गांवातले लोक ' कृष्णमूर्ति श्रीमंत दिसतो. तो द्रव्य कोठलें आणतो ' असें विचारीत, इत्यादि हकीकत त्यानें निर्भय मनानें स्पष्ट सांगितली. तो पुढें ह्मणाला, ' महाराज ! त्यावेळीं या सज्जन बंधुभगिनीनें आह्मांला परावृत्त केलें नसतें तर आह्मीं कृष्णमूर्तीचा तपास करून त्यास ठार केलें असतें. आह्मीं गरीब, शांततेनें रहाणारे लोक आहों तरी वेळ आली असतां दुष्ट कृत्यांचा प्रतिकार करण्यास कचरत नाहीं. दुर्गपतीनें ह्या दोघांना राजकैदी केल्यानें आमचा नाइलाज झाला. नाहीं तर आमच्या तरुणांना बरोबर देऊन मीं त्यांना इकडे पाठविलें असतें. '

सूर्यमणि व मनोरमा दुर्गपतीकडे आश्रयास कां गेलीं ? ' एका सभासदानें प्रश्न केला.

देवनाभानें उत्तर दिलें, ' महाराज ! आज्ञापत्रिका मिळाल्यावर इकडे येण्याच्या तयारीस सूर्यमणि लागले. पण मनोरमेचा झालेला छळ लक्षांत घेऊन रात्रीकरतां मीं त्यांस किल्ल्यावर नेलें. कारण कृष्णमूर्ति दुष्टांच्या सहाय्यानें भयंकर घटना करून देवी मनोरचा अवमान करता. कदाचित् त्यानें देवीला नाहींसें केलें असतें. आम्हीं त्यांचें रक्षण करण्याचें ठरवलें असतें तर विनाकारण रक्तपात झाला असता व रक्तपात न व्हावा अशी आम्हांला ह्या बंधुभगिनीची सक्त आज्ञा होती. '

' कन्ये ! आह्मांला तुझ्या अपमानाची हकीकत आजपर्यंत कां कळविली नाहींस ? कितीहि उद्वेगजनक असो, असल्या अपराधाची चौकशी आह्मांला जरूर केली पाहिजे. ' सभाध्यक्ष मनोरमेला ह्मणाला.

' महाराज ! ' मनोरमेनें नम्रपणें सुरवात केली, ' या वृद्ध उपमठपत्नीच्या मुखानें ही हकीकत बाहेर पडली नसती तर मीं तिचा उच्चार कधींहि केला नसता. कारण भगवान् बुद्धावर माझा अचल विश्वास आहे व मी निष्कलंक बचावलें. आपण आज्ञा करतां ह्मणून आतां मी निरुपायानें सांगतें. ' कृष्णमूर्तीचें रामगडास आगमन झाल्यापासून त्याची वर्तणूक, त्याची चंचलता, त्याचें विषयीं अवलोकन, इत्यादि हकीकत सांगून तिनें त्या दिवशींचें इत्थंभूत वर्तमान कथन केलें. हकीकत सांगतांना ती शांतचित्त होती. तिनें निर्भयपणें सर्व हकीकत सांगितली पण नंतर तिचें धैर्य गळालें. ती मटकन खालीं बसली. ती स्फुंदूं लागली. तिच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. शेवटीं, दुसऱ्या एका कुमारीच्या आश्रयानें उभें राहून तिनें अधिपतीला विनंति केली, ' महाराज ! भगवान् बुद्धाची कन्या, निष्कारण छळ केलेली स्त्री या नात्यानें मी विनवणी करतें कीं मी अंतर्बाह्य निष्कलंक आहें. मी निरपराधी आहें. आपणांस तसें वाटत नसलें तर मला अग्नीला समर्पण करा. पण त्या दुष्ट मनुष्याच्या कारस्थानाला मी पुन: बळी पडेन असें मात्र करूं नका. '

अधिपतीनें कृष्णमूर्तीस प्रश्न केला पण त्यानें उत्तर दिलें नाहीं. तो प्रेतवत् झाला. त्याला सर्व शून्य भासूं लागलें.

न्यायसभेच्या सभासद भिक्षूंनीं बराच वेळ विचार करून सभापतीला निर्णय कळविला; त्यानें निर्णयघोषणा केली. ' भिक्षु सूर्यमाणि व कन्ये मनोरमे ! तुह्मी निर्दोष आहांत. तुमच्यावर करण्यांत आलेल्या सर्व आरोपांतून आह्मी तुह्मांला मुक्त करतों. आणि कृष्णमूर्ति ! तूं पवित्र बौद्ध धर्माचा सेवक ! तुझें हस्ताक्षर तूं द्रोही, इंद्रियासक्त ह्मणून सांगत आहे ! तूं मनोरमचा अपमान केलास. मगधराजाकडून आलेलें कागदपत्र आह्मीं तपासून पाहिलें. ते आह्मी सत्य मानतों. तूं मगधाधिपालाहि संकटांनीं व्याप्त करण्याचा प्रयत्न केलास. आह्मीं तुला घोर अपराधी ठरवितों. तुझ्या असल्या वर्तनानें तूं बौद्ध धर्माला कलंक लावलास ! आह्मी तुला जीवितदंडाची शिक्षा देतों. पण मगधराजाचा तूं अपराध केला आहेस, त्या अपराधाची चौकशी राजेश्वर करणार आहे ह्मणून आह्मी तुझी शिक्षा अमलांत आणण्याचें तहकूब करतों. ' शासनपीठाध्यक्षानें राजपुरुषांना कृष्णमूर्तीस घेऊन जाण्याची आज्ञा केली.

बंदिवान कृष्णमूर्तीनें एकहि शद्ब उच्चारला नाहीं. न्यायाच्या कार्यी काळ्या पाषाणाहूनहि कठोरहृदय होणाऱ्या त्या न्यायाधिपति भिक्षूंना कृपाप्रार्थना करण्याचा उपयोग नाहीं हें तो जाणत होता. राजपुरुष त्याला नेत असता तो परभाषेंत कायसें बोलला तें कोणास समजलें नाहीं. एका क्षणापूर्वी घोर अपराधांनीं दूषित झालेल्या त्या पवित्र बधुभगिनींचा आनंद आह्मी कसा वर्णन करणार ? संकटवेळा टळली आतां त्यांचें धैर्य कमी होऊन, आजवर झालेल्या श्रमाचा व दगदगीचा परिणाम त्याच्यावर होऊन तीं काहींशीं भ्रमितचित्त झालीं. इतर भिक्षुबांधवांनीं त्यांना विहारांत नेलें.

रात्रीं एक भिक्षु कृष्णमूर्तीकरतां अन्नपाणी घेऊन बंदिशाळेंत गेला असतां कृष्णमूर्तीनें त्याला बोलण्याच्या नादांत लावून त्याच्यावर अचानक हल्ला केला, व विकट हास्य करीत त्याला जमिनीवर पाडलें. त्याच्याच वस्त्रांनीं त्याचे हातपाय बांधून कृष्णमूर्तीनें त्याच्या तोंडांत बोळा दिला व ' यत्किंचित् हललास तर मेलास ह्मणून समज ' कृष्णमूर्तीनें खंजीर (भीमकर्म्याकडून आलेल्या नोकरानें हा खंजीर कृष्णमूर्तीस दिला होता.) दाखवून ह्मटलें भिक्षूनें त्याची विनवणी करून प्राणया-

याचना केली. कृष्णमूर्ति स्वतःशींच ह्मणाला, " छे ! हा मार्ग सुरक्षित नव्हे; असेंच केलें पाहिजे. " भिक्षूच्या छातीवर बसून कृष्णमूर्तीनें खंजीर उगारला. पण भिक्षूनें फारच दयाप्रार्थना केल्यामुळें तो ह्मणाला, ' गप रहा तर मग; मी तुला मारीत नाहीं. ' कृष्णमूर्तीनें भिक्षूचीं वस्त्रें परिधान केलीं. आपल्या वस्त्रानें त्याला एका स्तंभाशीं बांधून कृष्णमूर्ति बोलला, " वाः ! तुझा वेष मला कसा छान दिसतो. कोणी मला ओळखणार नाहीं. सकाळपर्यंत असाच रहा. सकाळीं तुझी मुक्तता झाल्यावर तूं विहारांत गेलास ह्मणजे सूर्यमणीला माझा निरोप सांग कीं तीं बंधुभगिनी जेथें जेथें जातील तेथें तेथें मी समंधाप्रमाणें त्यांचा पिच्छा पुरवीन. त्याचा नाश होईल व ती, आपल्या पावित्र्याचा तोरा मिळवणारी त्याची भगिनी, हतगर्व होऊन द्रव्याकरतां शरीरविक्रय करणाऱ्या क्षुद्र वारयोषितेपेक्षांहि हीन अवस्थेस पोंचेल असें मी करीन; तोंपर्यंत त्यांना कधीं विसरणार नाहीं. "

भिक्षूचा पोषाख घातलेला कृष्णमूर्ति प्रकोष्ठद्वार बंद करून तेथून निघाला. त्याला अन्न नेणाऱ्या भिक्षूइतकाच तो आकारमानानें असल्यामुळें प्रहरींना त्याचा संशय आला नाहीं. त्याला कोणीहि हटकलें नाहीं. गंगाकिनाऱ्यावर राजप्रासादाच्या पार्श्वोद्यानांतील दक्षिण घाटावर भीमकर्मा नौकेसह तयार होता. कृष्णमूर्ति येतांच नौका प्रयागाच्या रोखानें झपाट्यानें चालूं झाली.

प्रकरण २६ वें.

आनंदगिरि.

प्रभातकाल झाला. बंदिशाळेंत गेलेल्या भिक्षुकडे बुद्धमंदिरांतील दीपप्रज्वलनाचें काम होतें. प्रातःपूजेच्या वेळीं मंदिरात एकहि दीप लागला नाहीं. तपास करतां, भिक्षु कोठें आढळेना. बंदिशाळेंतून भिक्षु परत आलेला कोणीं पाहिला नव्हता. ह्मणून भिक्षूचा तपास करण्यास दोन सेवक गेले. कृष्णमूर्तीच्या बंदिस्थानाचा दरवाजा बंद होता, तो उघडून

पाहिलें तों क्षिशु खांबाशीं बांधलेला असून कृष्णमर्ति नाहीं. त्यास बंध-मुक्त करून विहारांत नेलें. त्याची हकीकत ऐकून सर्व आश्चर्यमग्न झाले. पण कृष्णमूर्ति कोठें गेला असावा ह्याचा तर्क कोणासहि झाला नाहीं. कसा होणार ? न्यायसभेंतून जातांना त्यानें परभाषेंत उच्चारलेले शब्द त्याच्या नोकरांखेरीज कोणासहि समजले नव्हते !

आजच मठपति महंतांनीं सूर्यमणीचा सन्मान करून त्याला दक्षिण भारतांतील अवशिष्ट बौद्ध मठांचा शास्ता नेमलें. दक्षिण भारतांतून बहुतांशीं अस्तंगत झालेल्या बौद्ध धर्माचा उद्धार सूर्यमणीच्या द्वारें होण्याची आशा मठपती महंतांना उत्पन्न झाली. ती आशा सफल कां झाली नाहीं, सफल न होण्याला कोणतीं कारणें घडलीं याचें विवेचन आम्ही करीत नाहीं व तसें करण्याचें हें स्थळहि नव्हे, शांतस्वभावी सूर्यमणीला वैभव व बाह्य देखावा ह्यांचा स्वाभाविक कंटाळा होता. तो पूर्वीप्रमाणें अप्रसिद्ध मठपति ह्मणून भगवान् बुद्धाचें यशोवर्धन करण्यास वांछीत होता. पण त्यानें बौद्धधर्माचें हें कार्य न स्वीकारल्यास, दुसरा कोणी तें करण्यास पात्र नसल्यानें बौद्धधर्म दक्षिणेंतून अगदींच लुप्त होईल असें त्यास स्वत: मठपति महंतांनीं सांगून अत्याग्रह केल्यामुळें तो आजच्या सन्मानीकरणास कबूल झाला. मनोरमेला बंधूच्या सन्मानानानें आनंद वाटला. आतां आपणांस छिन्न बौद्धधर्माच्या उद्धाराचा अंशत: प्रयत्न करतां येईल या विचारानें तिला समाधान झालें.

अधिकारदानप्रसंगीं राजप्रतिनिधि हजर होता. सूर्यमणीचा सन्मान करण्याकरतां मगधराजानें अनेक वस्तु पाठविल्या होत्या. कांहीं काळ मगधाधिपाचा वकील विजयपुरास पाठवितां येत नव्हता ह्मणून तोंपर्यंत सूर्यमणीनेंच तें कार्य करावें अशी राजाची विनंति होती. सूर्यमणीनें महंताज्ञेनें ह्या राजाज्ञेचा स्वीकार केला. लवकरच होणाऱ्या एका बौद्ध-उत्सवापर्यंत त्यांनीं रहावें अशी मठपतीची इच्छा होती; पण राजवकिलाचें कार्य स्वीकारल्यामुळें व विजयपूरचा वकील तितके दिवस रहात नसल्यानें सूर्यमणि त्याजबरोबर विजयपुरास गेला. मनोरमा आपल्या बंधूबरोबर गेली हें निराळें सांगण्याची जरूर नाहींच. चला, वाचक ! आपणहि त्यांजबरोबर जाऊं. परदेशांत किती दिवस रहावयाचें ?

विजयपुरास पोंचल्यावर जयसेनानें त्यांचें सानंद स्वागत केलें. राजाहि त्यांच्या पुनरागमनानें संतुष्ट झाला. सूर्यमणि जयसेनाबरोबर वृद्ध सोमदत्ताला भेटावयास गेला. नमस्कार करून तो म्हणाला, आजोबा मगधांतल्या दिव्य प्रसंगांतून सुरक्षित निभावून आह्मी पुनः तुमच्या दर्शनास आलों.

'यें, बाबा ! मला कडकडून भेट. मी पुनः तुम्हांला भेटेन अशी आशा नव्हती. तुह्मी सुखानें ईश्वरसेवा व लोककल्याण करा. पण मला सर्व हकीकत कशी घडली तें सांग पाहूं.' वृद्ध सोमदत्तानें म्हटलें.

सूर्यमणीनें हकीकत सांगितली. कृष्णमूर्ति पळून गेला हें वृद्धास बरें न वाटून तो म्हणाला, 'पण तो दुष्ट कदाचित् येथें तुमच्यावर संकटपरंपरा आणील !'

" पण आजोबा ! भगवान बुद्धानें शासनसभेच्या भयंकर दिव्यांतून नाहीं कां आह्मांस निभावलें ? तोच ह्यापुढें आमचें रक्षण करील." सूर्यमणि उद्गारला.

" ईश्वराची लीला किती अगम्य, पहा ! त्यानें दुष्टांचा कसा निःपात केला ! त्यांच्यापैकीं प्रत्येकाला त्यानें शासन केलें. आणि ह्या शांत बुद्धसेवकाचा कलंक दूर करून त्यास पूर्वींप्रमाणें सुखी केलें." वृद्ध सोमदत्त ह्मणाला.

" आजोबा ! हे सूर्यमणि दक्षिण भागांतील बौद्ध मठाचे शास्ते झाले आहेत व मगधराजानें त्यांना कांहीं काल आपल्या दरबारीं वकील नियुक्त केलें आहे." जयसेनानें वृद्ध सोमदत्ताला सांगितलें.

वृद्धाला संतोष झाला. त्याच्या मुद्रेवर स्मित दिसूं लागलें. संध्यासमय झालेला लक्षांत आणून तो सूर्यमणीस निरोप देऊन नित्यकर्मास गेला. तो आतांशा आपला बहुतेक काळ परमार्थचिंतनांत घालवीत असे. त्याची इच्छा पूर्ण झाल्यानें, संन्यासदीक्षा घेऊन हेमपुरीस श्री नित्यानंदाच्या सहवासांत ईश्वरध्यानांत शेष आयुष्य घालवावें असा त्याचा विचार होता. पण लीलेचा विवाह होईपर्यंत त्यानें आपला बेत अमलांत आणूं नये असें राज्ञीमातेनें सांगितल्यामुळें त्यानें अद्याप आपल्या इच्छेचें अनुसरण केलें नव्हतें.

लीला व मनोरमा ह्यांचा आनंद काय सांगावा ? लीला आपल्या विशाल नेत्रांनीं अनिमिषपणें मनोरमेचें दर्शनसुख घेत होती, जणुं पापण्या मिटल्या तर दर्शनसुखांत तितकेंच अंतर होईल ! पण छे ! नुसत्या दर्शनानें तिची तृप्ति होईना. तिनें मनोरमेच्या गळ्याला एकदम मिठी मारली. मनोरमा मगधांत जाऊन आली पण तेवढ्या अवकाशांत लीलेंत कितीतरी बदल झाला. जयसेनाशीं विवाह होण्याचें ठरल्यामुळें ती सुखी झाली होती. ती मनोरमेला ह्मणाली, " ताई ! तूं अप्राप्य ह्मणून सांगत असलेली वस्तु शेवटीं मला मिळाली. ती वस्तु आतां माझी झाली. ताई ! मजवर त्यांचें प्रेम आहे. राज्ञीमातेच्या महालांत मी एके दिवशीं एकटी असतां ते मला भेटले. त्यांनीं मजशीं आपल्या प्रेमाचा उच्चार केला; मी गोंधळलें, मला उत्तर देतां आलें नाहीं. पण ते त्यांचें शब्द माझ्या कानांत सारखे घुमत आहेत. " लीला एकसारखी बोलत होती. परस्परांशीं आनंदकथा करीत असतां त्यांचा किती वेळ गेला हें त्यांना समजलें नाहीं. अखेर, राज्ञीमातेचा निरोप आल्यामुळें त्या तिजकडे गेल्या.

सूर्यमणीला राजवकिलाचें काम करावें लागत असे तरी त्यानें आपलें खरें कर्म, बुद्धसेवा व परोपकार, ह्याकडे कधीं दुर्लक्ष केलें नाहीं. कित्येक आंतर्राष्ट्रीय महत्वाचे प्रश्न परस्परांच्या अविश्वासानें आजपर्यंत अनिर्णीत राहिले होते त्यांचा निकाल उभय राष्ट्रांना भूषणास्पद करण्यांत आला. आणि हें सर्व कर्तृत्व सूर्यमणीचें ! तो मागधी असे त्यानें ज्याप्रमाणें मगधराजानें त्याजवर विश्वास ठेवला तसेंच त्याच्या सात्विक वर्तनानें विजयपुराधिपति त्याला परकीय समजत नव्हता. तो आपलें नुकसान करणार नाहीं असा विश्वास असल्यामुळें सर्व प्रश्नांचा निकाल करण्यास राजानें त्यास आज्ञा दिली. वैभव प्राप्त झालें तरी तीं बंधुभगिनी आपलें विहित कर्तव्य विसरलीं नाहींत. त्यांनीं तेथल्या बौद्धांना नेहमीं धर्मकथा सांगाव्या, बुद्धचरित्रावर प्रवचनें करावीं, त्यांना नीति व धर्म यांचें ज्ञान करून द्यावें. सूर्यमणि परधर्मनिंदा न करतां धर्मतत्वें सांगत असे; तीं सर्वधर्मीयांना सारखींच पटत. त्याच्या उपदेशानें तेथले बौद्ध सुचरित झाले. आणि पुनः प्रबळ झालेल्या भारत-

धर्मातून जरी कोणी बौद्ध बनला नाहीं तरी भारतधर्मीयांच्या वर्तनावर त्याच्या उपदेशाचा व तदनुसार आचरणाचा अप्रत्यक्ष परिणाम झाला नाहीं असें ह्मणण्याची आमची तयारी नाहीं. सज्जनाच्या सहवासानें दुर्जनसुद्धां सज्जन, साधु होतो मग मूळच्याच साधुसंगतिप्रिय सदाचरणाभिलाषी विजयपूरकर भारतीयांना सूर्यमणीपासून, तो परधर्मी होता एवढ्यां करतांच, किंचित्सुद्धां फायदा झाला नाहीं असें असहिष्णु देवशर्मन् सूर्यमणीचे परम मित्र बनल्यावरहि आह्मी कसें ह्मणं ?

वृद्ध, सोमदत्त संन्यस्त झाल्यावांचून जास्त दिवस रहाण्यास कबूल होईना. त्याला सर्वसंगपरित्यागाची अत्यंतिक इच्छा झाली. वास्तविक हल्लीं त्याचें वर्तन सर्वसंगपरित्यक्ताप्रमाणेंच होतें फक्त लीलेचा एक मात्र प्रेमपाश त्याला होता; पण तोहि झुगारून दिल्यावांचून आपण खरे त्यागी होत नाहीं अशी त्याची भावना झाली होती. वृद्धावस्थेला उचित असा संन्यासाश्रम स्वीकारण्यास उगीच विलंब तरी कां करावा असा प्रश्न तो करीत असे. पूर्वकालीन आर्यांप्रमाणें संसाराचा व्याप आटोपता घेऊन, संसाराच्या मोहपाशांतून स्वतःला हळूहळू सोडवून, वृद्धावस्थेला आरंभ होतांच मनुष्यानें वनसेवन करावें. ती रीत फार चांगली; तिच्यामुळें मानवाला निर्वेध रीतीनें ईश्वरविषयक ज्ञान संपादतां येतें, त्याप्रमाणेंच त्याच्याहून तरुण अशा कर्त्या पुरुषास आपली कर्तबगारी दाखविण्याला या विश्वरंगभूमीवर अवसर सांपडतो आणि त्याच्यापुढेंहि मानवाचें खरें ध्येय दृश्यमान राहून तो केवळ जडात्मवादी होत नाहीं; योग्य वेळ प्राप्त होतांच सुखलालसा उरली नसल्यानें तो पूर्वपिढीप्रमाणें आपलें आश्रमकर्तव्य करण्यास आनंदानें सिद्ध होतो; असें त्याचें मत होतें. या मतानें कधींच अनिष्ट स्थिति उद्भवणार नाहीं असें निश्चयानें सांगणें शक्य नाहीं. कारण, कोणत्याहि नियमाचा अतिरेक त्याच्या नाशास कारण असतो. तरी इतकेंमात्र निश्चित कीं, असली देशस्थिती इतर अवस्थांहून बरीच कल्याणप्रद होईल. असो.

वृद्ध सोमदत्ताच्या सतत आग्रहानें लीलादेवी व जयसेन यांचा विवाह लवकरच सुमुहूर्तानें झाला, व त्याचवेळीं स्वामी नित्यानंदांना बोलावून वृद्ध सोमदत्त— अतःपर यति आत्मानंद— संन्यासधर्मांत प्रविष्ट झाला.

कन्येच्या पक्षाला प्रत्यक्ष विजयपूरचा राजा व वगैरकडे सेनापति कांति-चंद्र व राज्ञीमाता अशी मंडळी असल्यावर विवाहोत्सवाच्या थाटाचें वर्णन कोण करणार ? कितीहि वर्णन करूं ह्मटलें तरी तें अपुरेंच होणार ! मग, वाचकांच्या कल्पनाशक्तीला स्वैरसंचार करण्यास परवानगी देऊन आह्मी त्या कार्यापासून परावृत्त झालों तर काय हरकत ? वाचक ! झालें; कन्या लीलेचा इतक्या दिवसांचा मनोरथ सिद्ध झाला. जयसेन दुसऱ्या कोणाचा नसून आता पूर्ण तिचाच. आपल्या पुतण्याच्या वधूला वागवितांना कांतिचंद्राची अपत्यहीन पत्नी सासवांचा अनादिसिद्ध हक्क गाजवील अशी कल्पनाहि करावयास नको.

लीलादेवीच्या विवाहाचा मंगलोत्सव नगरभर सुरू असतां मनोरमा नित्याप्रमाणें बालराणी गुणमयीजवळ तिला करमणूक करीत बसली होती. त्या दोघी प्रासादशिखराच्या त्या सर्वोच्च महालांत बसून परस्पर कथा-वार्ता करीत होत्या. भगवान् सूर्यनारायण पश्चिमद्वारानें आपलें अल्पतेज-किरण– महालात विस्तरीत होता. पश्चिमबाजूच्या एका वातायनाजवळ त्या दोघी अन्य धर्मावलंबिनी स्त्रिया जेष्ठा कनिष्ठा भगिनीप्रमाणें एकाच बिस्तृत मंचकावर बसल्या होत्या. मनोरमा स्वतः काढलेल्या ' वनश्री ' च्या चित्रांतील एका वनपुष्पास रंग भरीत होती. तोंच त्या चित्राकडे पहात असलेल्या गुणमयीच्या नेत्रांतून दोन ऊष्ण बिंदु त्या वनपुष्पावर पडले. मनोरमा हस्तातील चित्र बाजूस सारून त्या स्फुंदणाऱ्या युवतीचे नेत्र पुसूं लागली. तिनें तिला कारण विचारलें पण व्यर्थ ! दुःखाचा प्रथम वेग ओसरल्यावर गुणमयी करुणायुक्त मुद्रेनें ह्मणाली, " मनोरमे ! त्यांचें प्रेम मजवर नाहीं. ह्या विस्तीर्ण राज्याचे ते स्वामी. त्यांना मी प्रिय वाटत नाहीं. ताई ! त्यांनीं आपलें अंतःकरण तुला समर्पण केलें आहे. पण ते ज्ञानी आहेत. तुजकरतां स्वतः नाश पावतील. पण मुखानें तसा उच्चार कालत्रयीं करणार नाहींत. मनोरमे ! मी अद्याप अजाण बालिका आहें. मी सौंदर्यशालिनी नाहीं किंवा नाना कला-संपन्नही नाहीं. तुझ्या कलानैपुण्यानें, तुझ्या रूपसौंदर्यानें, राज्ञीपदाची अधिकारिणी होण्यास तूंच योग्य आहस. त्याच्यासारख्या सुशिक्षित ज्ञानी राजपुरुषाला, या विस्तीर्ण राज्याचा अधिकार चालवितांना,

आनंद देण्याचें सामर्थ्य तुझ्याच ठायीं आहे. मनोरमे ! माझें ऐक; नाहीं ह्मणूं नको. तुला ' माझी ' असें ह्मणावयाची संधि मला दे. ह्मणजे त्यांच्या सहवासप्रेमांत-आपण दोघी सहोदरा भगिनीप्रमाणें आनंदानें कालक्रमणा करूं. मनोरमे ! ' नेत्रांत पुनः आलेले अश्रु पुसून ती ह्मणाली, " ऐकतेस ना ? त्यांना तुझीं स्वप्नें पडतात. रात्रीं स्वप्नांत प्रेम-कथा करतांना ते तुझेंच नांव उच्चारतात. ह्यात किमपि असत्य नाहीं. मी तुला खोटें सांगत नाहीं; त्यांचें आयुष्य सुखांत जाण्यास तुझी किती आवश्यकता आहे हें मला पूर्ण कळतें. एकदा प्रेमपूर्वक सांग कीं तूं कबूल करतेस ह्मणजे मला समाधान होईल. बोल; कबूल ना ? '

बालराणीचें चुंबन घेऊन मनोरमा प्रेमानें ह्मणाली, " छे, गुणमयी ! तें होणार नाहीं. अशक्य शक्यसृष्टींत उदय पावणार नाहीं व पावूंपण नये. मी श्रीबुद्धास आत्मसमर्पण केलें आहे. आजन्म भगवान् बुद्धाची सेवा करण्याचें व्रत मीं संकल्पिलें आहे. मीं त्या व्रताची दीक्षा घेतली आहे. असा विचारहि मनांत आणणें अनुचित आहे. आह्मी येथून दुसरीकडे गेल्यावर तुझ्या पतीला सांप्रतची विस्मृति होईल, व तूं सुखानें भावी युवराजासह त्यांना आनंदवशील. ' गुणमयी पुनः कांहीं बोल-णार असें पाहून ती पुढें ह्मणाली, ' गुणमयी ! वत्से ! मजवर तुझें प्रेम असेल तर पुनः ह्याचा उच्चारहि करूं नको. माझ्या मार्गांत प्रलोभनरूपी विघ्न आणूं नको. हें घे व हें या प्रसंगाची माझी स्मृति ह्मणन ठेव. ' तिनें वनपुष्पाचें तें अर्धचित्रित चित्र गुणमयीला तसेंच दिलें व पुनः प्रेमानें तिचें चुंबन घेऊन ती घरीं जाण्यास निघाली. क्षितिजावर अस-लेल्या अर्ध सूर्य बिंबाच्या कोमल प्रकाशानें त्या खिन्नमुद्रा बालराणीचें रेशमी जरतारी वस्त्र उज्ज्वल दिसत होतें.

कथानकांतल्या व्यक्तींचें अवलोकन ह्या वेळीं केले असतां आपणांस प्रत्येक व्यक्ति आनंदगिरीवर आनंदोपभोग करीत असलेलीच दिसेल. राज्ञीमाता चंद्रावती आपल्या वरील राज्यभाराची जबाबदारी कमी झाल्यामुळें ईशचिंतनांत काळ बालर्वात कमाराच्या आनंदमय राज्याच्या गिरिशिखरावर आनंदसेवन करीत आहे. जयसेन व लीलादेवी सर्व संकटें दूर होऊन परस्पर मीलन झाल्यानें वैभवयुक्त संसारगिरीवर आनंदोपभोग घेत

आहेत. यति आत्मानंद इच्छित जीविताशा पूर्ण झाल्यानें आपल्या इच्छेप्रमाणें स्वयं आनंदरूप बनले. सूर्यमणि व मनोरमा मगधाच्या शासनपीठाकडून निर्दोषी ठरून दुष्ट कृष्णमूर्तीच्या दौरात्म्यापासून बचाव झाल्यानें आनंदानें स्वकार्यतत्पर झालीं आहेत. आरोग्यसंपन्ना गुणमयी पतीच्या सहवास सुखांत भावी बालकाच्या कल्पनाजन्य आनंदांत मग्न आहे. सरदार किसन नाईक आदि इतर व्यक्तिहि त्यांच्या योग्यतेनुरूप प्राप्त झालेल्या वैभवाच्या सुखशैलावर आनंद सेवीत आहेत. आणि नीलवर्ण ! होय; त्याचाहि विचार केला पाहिजे. नीलवर्ण हद्दपार झाला पण जीवितधन बचावल्यावर श्रीकाशीस गेला: हें आपण ऐकलेंच आहे. शिक्षेच्या प्रायश्चितानें पापक्षालन होतें; ह्मणून तो धूतपाप होऊन त्याच्या योग्यतेनुसार आनंदसेवन करीत असेल अशी आपण आशा करूं या. पण कृष्णमर्ति ! शिक्षेपासून तो भीतीनें पळाला ह्मणून आपण त्याचा तिरस्कार करतां कामा नये. पापक्षालनाचा आणखीहि उपाय आहे. पश्चात्तापहि मानवाचे पापाचा नाश करतो, मानवाला पापमुक्त करतो. अनुतापानें पाप दग्ध होऊन कृष्णमूर्तिहि बौद्ध भिक्षूला उचित असा आनंद उपभोगीत असेल असें आपण इच्छूं.

प्रकरण २७ वें.

कांतिनगर.

पुस्तकाचें नांव राणी चंद्रावती असून कथानकांत राज्ञीच्या वृत्तांताचें चित्र प्रामुख्यानें दिलेलें नाहीं असें पाहून वाचकांच्या मनात रोष उत्पन्न होईल. आह्मीं नीलवर्ण व कृष्णमूर्ति अशा दुष्टांचेंहि अभिष्टचिंतन केलें ह्मणून ते आमच्यावर रागावतील. ह्या साठीं आह्मीं वाचकांचा एतद्विषयक रोष पुस्तकाच्या पुढील भागांत नाहींसा करण्याचा विचार केला आहे. पण तत्पूर्वीं आह्मांस वाचकांना इतकेंच विनवावयाचें कीं आतांपर्यंत कथन केलला भागच पुरे झाला. दुष्टांचा नाशच झाला पाहिजे

अशीं हिंसाबुद्धि धारण करणें जरी मानवस्वभावाचा स्वाभाविक धर्म असला तरी मानवानं मानवधर्माहून श्रेष्ठ गुणांचा अवलंब करण्याचा प्रयत्न करावा. दुष्टांचा नाश होईल; पण त्याचवेळीं कदाचित् दुष्टांचाहि वियोग आपणांस लाभेल. शत्रुनाश पहावयाची इच्छा असली तर त्याचवेळी प्रियवियोगहि सहन केला पाहिजे. भारतीय युद्धांत देवप्रिय पांडुपुत्रांना सुद्धां तो सोसावा लागला. रात्र आणि दिन यांच्या चक्राप्रमाणच सुख व दुःख यांचेंहि चक्र आहे; ह्याहि चक्राचें आवर्तन होत असल्यानें सुखामागून दुःख व दुःखामागून सुख अशी घटना असते ह्मणतात. पण आह्मी म्हणतों कीं सुखदुःख परस्परसंमिश्र आहे. या विश्वसंसारांत सुखदुःख कधीं निर्भेळ स्वरूपांत अनुभवण्यास मिळणार नाहीं. पूर्वीचा काळ जाऊन सध्यां आपणांस अश्रुतपूर्व स्वास्थ्य प्राप्त झालें आहे, पण त्याबरोबरच कदाचित् प्राचीन धैर्यादि गुण लुप्त होऊन मानसिक धैर्य अवनतावस्थस जात असेल; त्याचें पूर्वीचें मनौदार्य कमी होत असेल. पूर्वीची अल्पमूल्यता जाऊन तेथें बहुमूल्यता येत आहे. नाना कलांचें ज्ञान होऊन मानवाचीं ऐहिक सुखें वृद्धिंगत होतील पण त्याच वेळीं जीवनकलह उग्रतरस्वरूपी होण्याचा संभव आहे म्हणूनच ज्ञाते त्या निर्विकार सत्×चित्×आनंदाचा शोध करून सुखी होतात. सारांश, या जगांत सुखदुःख संमिश्र आहे. म्हणून दुष्टनाश व राज्ञीचें अभिमानावह शेष चरित्र अवलोकन करतांना दुःख सोसण्याची तयारी असूं द्या.

जयसेन व लीलादेवी यांच्या विवाहाच्या मंगलप्रसंगीं आपण सर्व व्यक्तींना सुखशैलावर पाहिलें म्हणून त्या सर्व व्यक्ति चिंतारहित होत्या असें मात्र नव्हे. राणी चंद्रावती कांतिनगरच्या राजघराण्यातली होती हें मागें सांगितलेंच आहे. राजा राजशेखरानें पराभूत केल्यावर कांतिनगरचा भूपति स्वनगराला परत गेला. पराजयाच्या अपमानदुःखानें दुःखित होऊन तो लवकरच गतप्राण झाला. त्याचा पुत्र अल्पवयी असल्यानें राज्यभार वहाण्यास समर्थ नव्हता. ह्याच वेळीं कांतिनगरावर एक संकट येऊं पहात होतें. मालव देशच्या प्रतापी नृपालाचा नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेशावर स्वामित्व करण्याचा विशेष हेतु होता, व सध्यां कांतिनगर अनाथ

पाहून त्यानें त्यावर चढाई करण्याचा विचार कृतींत आणण्याचा उद्योग आरंभला. कांतिनगरच्या कित्येक सरदारांनीं मालवनृपतीला आपण होऊन पाचारण केलें. अशावेळीं कांतिनगरची राज्यनौका चालविण्यास कोणीतरी कुशल कर्णधार पाहिजे होता. राणी चंद्रावतीवांचून अन्य कोण समर्थ कर्णधार सांपडणार? कांतिनगरच्या शहाण्या प्रजाजनांनीं व सरदारमंडळाच्या बऱ्याच मोठ्या अंशानें राणीस विनंतिपर पत्रें पाठविलीं. मृतराजानेंहि आपली तशी इच्छा दर्शविली होती. तिला येण्याचें निमंत्रण त्यांनीं आग्रहपूर्वक केलें. विवाहाच्या आनंदप्रसंगीं राज्ञीला चिंतामग्न करण्यास हेंच कारण झालें होतें. कांतिनगर व विजयपूर ह्यांत मृतराजाच्या अविचारानें जरी नुकतेंच युद्ध झालें होतें, तरी कांतिनगरचें राज्य मालवेशासारख्या परकीयानें घेतलेलें तिला मुकाट्यानें कसें बघवेल? राजशेखराची संमति मिळवून राणी चंद्रावती कांतिनगराच्या सहाय्यास निघाली. राज्ञीमातेचा रक्षक ह्मणून राजानें जयसनास कांहीं सैन्यानिशीं तिच्याबरोबर पाठविलें. अर्थात् लीलाहि राणीबरोबर गेली. मनोरमेनें कांहीं दिवस तरी राजशेखराच्या नजरेआड होण्याच्या हेतूनें कीं काय, सूर्यमणीला विनंति केली; मात्र तिनें आपला हेतु व्यक्त केला नाहीं. कांतिनगराकडे बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनाला क्षेत्र सांपडेल ह्या आशेनें सूर्यमणीनें भगिनीच्या विनंतीचा आदर केला व राणीच्या अनुमतीनें तोहि भगिनीसह तिजबरोबर निघाला.

राणी चंद्रावतीनें कांतिनगरास जातांना मार्गांत कोठें मुक्काम केले, ती कोणत्या मार्गानें गेली याची हकीकत वाचकांस कंटाळवाणी होईल ह्मणून ती आह्मी येथें देत नाहीं. सकाळच्या थंड सुखकारक हवेंत ती प्रवास करीत असे. मुक्कामाच्या जागेवर सुंदर आंबराईंत तिच्याकरतां सर्व व्यवस्था अगोदरच करण्यांत येत असे. हिमकाल संपून वसंताला आरंभ झाला असल्यानें सूर्याचा प्रखर ताप भासत नव्हता किंवा थंडीच्या कडाक्यानें मनुष्याला प्रवास त्रासदायक वाटत नव्हता. राणी कधीं मेण्यांत व कधीं हत्तीवर बसत असे पण बहुधा ती आपल्या प्रिय अश्वावर आरूढ होऊन प्रवास करी व मुक्कामाला जातांना तिच्या चिरपरिचयाच्या ह्या मार्गांतील जवळ एखाद्या साधुपुरुषाचें किंवा पुण्यभूमीचें दर्शन ती केव्हां

केव्हां घेऊन येई. जयसेन पुढच्या मुक्कामाची तजवीज करण्यास पुढें जात असे आणि कधीं तो राणीच्या बरोबर असला तरी बरोबरच्या सैन्याची व्यवस्था व ठिकठिकाणचा बंदोबस्त करण्यांत त्याचा वेळ जाई; ह्या कारणानें नवपरिणिता वधू लीलादेवीला जयसेनाच्या सहवासांत रात्रंदिवस प्रेमकथा करण्यास सापडत नव्हत्या. तरी एकंदरींत हा प्रवास तिला अभिनव आनंदप्रद वाटला. कांतिनगरच्या ज्या कित्येक बातम्या जयसेनाला समजल्या, त्यामुळें राज्ञीमातेनें येथूनच परतावें असें त्यास वाटूं लागलें; व त्याप्रमाणें त्यानें एकदां राणीला तसें सुचविलेंहि. पण राज्ञीनें त्याला उत्तर दिलें, " वत्सा ! काय ? मी भित्री प्राणभयानें परत गेलें असें जगाला दाखवूं ? छे ! किती कां संकटमय स्थिति असेना ? विजयपुराला मी यापेक्षांहि जास्त दुरवस्थेंतून बचावलें नाहीं कां ? विजयपुराप्रमाणें कांतिनगरहि माझेंच आहे. मग मीं का भ्यावें ? "

ह्या उत्तरानें जयसेन स्तब्ध झाला. परमेश्वराची इच्छा असेल तें होवो. आपण राज्ञीमातेला सोडून कधीं जाऊं नये असा निश्चय त्यानें ठरविला.

एका मुक्कामीं, उल्हासकारी कौमुदीमय निशाकालीं, नदीतीरावर तरंगलीला पहावयास राणी मनोरमा व लीला ह्यांना घेऊन गेली होती. जयसेन त्यांजबरोबर होता. राणी मनोरमेशीं बोलत होती. आपणाला निर्बंधपणें गोष्टी करतां याव्यात व प्रिय पतीशी प्रेमकथा करण्यास मिळाव्यात, कोणत्याहि हेतूनें असो, युवराज्ञी लीला जयसेनासह कांहीं दूर गेली. तिला हा प्रवास अपूर्व सुखदायी वाटत होता. ती ह्मणाली, " नाथ ! आपल्या सहवासानें सुखी होण्याचे व आपल्याला सुखी करण्याचे माझे मनोरथ होते. पण ही गाय घटना मला स्तंभित करते. आपला दयामय स्वभाव व मजवरचें आपलें प्रेम मला मूक करतें. "

" प्रिये ! छे, त्या चिरस्मरणीय रात्रीं तूं ज्या प्रेमानें माझी सेवा केलीस त्या प्रेमानें मला नित्यशः जास्त उत्तेजन येत आहे. तुझें प्रेम मला मिळालें नव्हतें तेव्हां मी त्याच्या पिपासेनें तृषाक्रांत झालों होतों व आतां तें मिळाल्यावर मला जास्तच प्रिय वाटत आहे. वर्षाकालांतील जलप्रवाहाप्रमाणें दिवसेंदिवस त्याची वृद्धिच होत आहे. ह्मणून ह्या सुखपूर्णतेचा यथेच्छ उपभोग घे. कारण न जाणो ! सुखस्थितीच्या मागून दुःखानुभवहि करावा लागेल. "

"नाथ ! आपण असें कां बोलतां ?" लीलेनें भयान्वित मुद्रेनें प्रश्न केला. अशा आनंदप्रसंगीं आपल्याच प्रिय पतीच्या मुखांतून अनिष्ट भविष्यवाणी निघावी हें तिला शुभ वाटलें नाहीं व त्यामुळें ती बालिकास्वभावी युवती भीतियुक्त झाली यांत नवल कोणतें ?

जयसेनानें उत्तर दिलें, " मातेच्या मुखाकडे पहा. बालपणापासून परिचित असलेल्या प्रिय स्थानांचें अवलोकन करतांना ती एखाद्या आशाळभूत मनुष्याप्रमाणें त्यांचें आकंठ पान करते. जणुं हें दृश्य पुनः दिसणार नाहीं असेंच भविष्यसूचन कोणी तिला करीत आहे अशा मुद्रेनें ती पहात असते. एका स्थानाचा त्याग करून ती अन्य मुक्कामास जाऊं लागली म्हणजे पूर्वीप्रमाणें आनंदोद्गार काढीत नाहीं. तिचे नयन साश्रु होतात; तिचें मुखमंडल खिन्न होतें. हें इतरांना दिसून येत नाहीं खरें, पण मी बाल्यकाळापासून तिच्या सान्निध्याला असल्यामुळें मला हें सर्व समजतें. कित्येक वेळां सत्यतेच्या आधारावांचून मानवाची मनःस्थिति अशुभ भविष्यसूचक उदासीन होते तसाहि प्रकार असेल. राज्ञीमातेच्या बाबतींत परमेश्वर तसेंच करो ! आपण कांतिनगरास गेल्यावर निष्ठेचें शाब्दिक प्रदर्शन पुष्कळ लोक करतील; पण ज्यांच्या सहाय्यावर विसंबून रहातां येईल असे लोक त्यांत अत्यंत अल्प. लीले ! राज्ञीमातेनें आजवर जे अनंत उपकार मजवर केले ते मनांत आले म्हणजे तिच्याकरतां प्राणत्याग करण्याचीहि इच्छा बलवत्तर होते. आणि त्यासाठीं प्रसंगीं मला तुला मुकावें लागलें तरी मी तुझा देखील त्याग करीन."

"नाथ ! मी पण आपलाच मार्ग स्वीकारीन. पतिसमवेत मृत्यु पतिहीन जीवनाहून श्रेयस्कर आहे. आपल्या व राज्ञीमातेच्या आश्रयाखेरीज त्या दुष्ट नराधमापासून माझा बचाव कोण करील ? त्याचे शेवटचे शब्द मला अद्याप भीतीनें कंप उत्पन्न करतात." तिचें शरीर ह्या नुसत्या स्मरणानेंच घर्मयुक्त झालें.

योग्य शब्दांनीं लीलेचें समाधान करून राज्ञीमातेनें हाक मारल्यामुळें तो तिच्यासह राणीकडे गेला.

कांतिनगर विजयपुराप्रमाणें भव्य नसल्यानें मनुष्याच्या मनांत त्याच्या दर्शनाभें गंभीर आश्चर्यभाव उदय पावत नसे. शहराच्या तटबंदीपेक्षां

उंच मस्तक करून नवीन प्रकाशाकडे अवलोकन करणाऱ्या श्रीमानां-च्या प्रासादांची विशेष गर्दी ह्या राजनगरींत नव्हती किंवा असल्या प्रासादमस्तकांहून आपलीं शिखरें उंच करून स्वतःचें श्रेष्ठत्व दर्शवणारीं देवमंदिरेंहि येथें विशेष नव्हतीं. विजयपुरच्या मानानें ही राजनगरी स्तब्ध व शांत भासत असे. पण, ह्मणून येथें कांहींच प्रेक्षणीय नव्हतें किंवा या नगरीला अभिमानास्पद अशा कांहींच अलौकिक वस्तु येथें नव्हत्या असें मात्र नव्हे. नागरिकांच्या रंजनाकरतां राजघराण्यानें तयार केलेलें उपवन येथें होतें. तें विस्तीर्ण व रमणीय उपवन ' नंदनवन ' या नावानें प्रसिद्ध होतें; तें त्या नामाभिधानास सार्थ पात्र होतें. त्या उपवनांत अनेक जलमंदिरें होतीं, अनेक लताकुंज होते. तेथें कृत्रिम शैल होता; त्यांतून एक जलपूर्ण सरिता निघाली होती; व त्या मनुष्यनिर्मित सरितेंत विहार करण्याकरतां लहानलहान क्रीडानौका ठेवल्या होत्या. त्या नंदनवनाचे कित्येक भाग एकाच काळीं निरनिराळ्या ऋतूंचा अनुभव घेतां यावा असे बनवले होते; व त्याप्रमाणें त्या त्या भागांना वसंतोद्यान, ग्रीष्मोद्यान, अशीं नांवें होतीं. राजप्रासाद विजयपुरच्या राजप्रासादाप्रमाणें भव्य व विस्तीर्ण नव्हता तरी त्या प्रासादांतले कित्येक महाल अतिशय खर्च करून तयार केले होते. तसें सौंदर्य विजयपुरास क्वचितच नजरेस येई असा अपरिमित द्रव्यव्यय करणें कांतिनगरच्या राजकुलाला त्याच्या ताब्यांत असलेल्या रत्नांच्या खाणींमुळें शक्य होतें.

राज्ञी चंद्रावतीनें स्वतः राज्यभार धारण केला. तिनें कारभार हातीं घेतांच कांतिनगरच्या सिंहासनाशीं एकनिष्ठनें वागावें असा उपदेश करून, दयाळुत्वानें द्रोहास प्रवृत्त झालेल्यांनासुद्धा क्षमा केली. तिनें सर्व सरदा-रांना समतेनें वागविण्याचें धोरण ठेवलें. त्यामुळें मालवेशाला बो-लावण्यास अनुमति देणाऱ्या कित्येक सरळस्वभावी सरदारांनाहि पश्चात्ताप झाला. कांतिनगरचा राज्यशकट सुव्यवस्थित रीतीनें चालूं लागला. असे पांच सात महिने गेले. पण राणीच्या न्यायप्रिय वर्तनानें आत्महितैषी मंडळींना अडचण झाली. प्रजेवर जुलूम करून आपला स्वार्थ साधणें त्यांना अशक्य झालें, ह्याचवेळीं त्यांना एक कारण मिळालें. कांतिनगरचा दुर्गपति मालवराजाशीं पत्रव्यवहार करतांना आढळून आला.

राणी वस्तुतः एक नादान स्त्री आहे; ती स्वतःच्या मूठभर प्रिय पुरुषांखेरीज कोणासहि सन्मान देत नाहीं; राज्यांतील लोक जरी तिजविरुद्ध स्वतःच्या बळावर शस्त्र उपसण्यास विजयपुरकराच्या भीतीनें तयार नाहींत तरी ते अत्यंत असंतुष्ट आहेत. अशा तऱ्हेचा मजकूर त्यानें मालवनृपतीला कळविला होता. रीतीप्रमाणें सरदारमंळासमोर त्याची चौकशी होऊन त्याचा वध करण्यांत आला. पण हा न्यायनिर्णय राणीनेंच केला असा गैरसमज करून घेऊन स्वार्थपरायण मंडळीबरोबर कित्येक सरळ पण भोळे सरदार अंतःकरणांतून तिचा द्वेष करूं लागले. बाह्यतः शांतता झालेली पाहून तिनें मालवेश्वराला संदेश पाठविला. मालवेश कांतिनगरच्या बालराजाच्या हितकर्ता ह्मणून येत असेल तर सन्माननीय अतिथि ह्मणून कांतिनगर मालवाधिपतीचा सत्कार करील, पण मालवराज जर अन्य हेतूनें प्रेरित होऊन येण्याचा उपक्रम करील तर तसेंहि आदरातिथ्य करण्याची कांतिनगरची पूर्ण तयारी आहे असा तो संदेश होता. पण मालवेश्वराला कांतिनगरच्या प्रतारक सरदांकडून व स्वतःच्या चारांमार्फत अंतःस्थिति कळल्यानें तो येतच होता. मात्र त्यानें राणीला फसविण्याकरतां एक लाघवयुक्त उत्तर पाठविलें, पण त्याचा सत्य हेतु राज्ञीस अविदित राहिला नाहीं.

क्रमशः कांतिनगरचें राजकीय नभोमंडल घनाच्छन्न होऊं लागलें. लवकरच होणाऱ्या अपरिहार्य युद्धाची तयारी राणीनें शक्य तितक्या झपाट्यानें चालवली. तिनें तटबंदीची पहाणी करून शहर कित्येक महिने शत्रूंस हार जाणार नाहीं अशी तयारी केली व जयसेनाच्या आग्रहावरून विजयपुरास सैन्याची मागणी केली.

प्रकरण २८ वें.

माळवेश्वराची छावणी.

आज कित्येक महिने कांतिनगरास होत असलेली घडामोड मालवेश्वर काळजीपूर्वक अवलोकन करीत होता. कांतिनगरच्या स्वार्थलंपट

सरदारांनीं आग्रहयुक्त आमंत्रण केलें नसतें तर नर्मदेच्या दक्षिणेस स्वामित्व करण्याच्या आपल्या इच्छेस त्यानें ह्याचवेळीं दृश्य स्वरूप दिलें असतें कीं काय ह्याचा दृढ संशय आहे. राणी चंद्रावतीच्या अश्रांत परिश्रमांनीं व तिच्या कार्यतत्परतेनें बहुतेक सरदार कांतिनगरचें रक्षण करण्याच्या कामीं मनःपूर्वक तिचे एकनिष्ठ सहाय्यकारी झालेले पाहून रणसंग्राम घोर होणार. अल्प दिनतींत कांतिनगर हस्तगत होत नाहीं, राणीला विजयपुरचें सहाय्य मिळाल्यास कदाचित् ह्यावेळीं आपला हेतु सफलहि होणार नाहीं असें त्याला वाटलें. पण परत जाण्यानें होणारी मानहानि त्यास नको होती. त्याच्याबरोबर मालवसेनेचा उत्तमांश होता. त्याच्या पराक्रमी पित्याच्या वेळचे अनेक युद्धें पाहिलेले वीर पराक्रमलालसा व कांतिनगरची संपत्ति यांनीं आकर्षित होऊन त्याजबरोबर आले होते. ह्मणून तो कांतिनगरावर चाल करून येत होता.

ह्यावेळीं दोन परकीय पुरुषांनीं त्याच्या सेनेंत प्रवेश केला. त्यांच्यावर मालवेश्वराची बरीच भिस्त होती. एका शिकारीच्या प्रसंगीं त्याला दाक्षिण देशचा एक क्षत्रिय भेटला. त्या क्षत्रियास दाक्षिणेंतील देशाची विशेष माहिती होती असें दिसलें. विजयपुरच्या राज्यांत त्याचे पूर्वज पिढ्यानुपिढ्या सेवा करीत आले होते, पण शत्रूंनीं त्याच्याविरुद्ध कपटकारस्थान करून त्याला हांकून दिल्यामुळें त्यानें मालवेश्वराच्या सेवेस स्वतःला अर्पण केलें असें तो ह्मणाला, मालवेश्वरानें त्याची एकांत भेट घेतली, त्यावेळीं नीलवर्णानें— तो दाक्षिणी क्षत्रिय नीलवर्णच होता— दक्षिणेंतील राज्यांची अंतःस्थिति, त्यांचीं सैन्यें, कांतिनगरचें दुर्भेद्यत्व सविस्तर कथन केलें. राणी चंद्रावती अबला असली तरी प्रसिद्ध रणपटु वीर हताश होतील, ते संकटांनीं गांगरून जातील, पण राणी गलितधैर्य व्हावयाची नाहीं; तिचा उत्साह अशाच वेळीं द्विगुणित होतो; अबला ह्मणून तिला तुच्छ करून चालावयाचें नाहीं; हेंहि त्यानें स्पष्ट सांगितलें. शेवटीं तिला राजकुमाराला घेऊन बलशाली विजयपुरास न जातां येईल व ती कांतिनगरास अडकेल अशी योजना करण्याची सविनय सूचना त्यानें केली.

मालवेश्वरानें संशयांतःकरणानें विचारलें, “ आणि वीरा ! आमच्या सेवेस रहाण्यांत तुझा काय उद्देश सांग पाहूं. ”

"सूड !" नीलवर्णानें उत्तर दिलें, "कशाचा तें मात्र मला विचारूं नका. यथावकाश त्याचेंहि ज्ञान तुह्मांस होईल ह्मणून महाराज ! वाटल्यास या क्षुद्र असिबलाचा स्वीकार करा, नाहीं तर मला रजा द्या. महाप्रतापी मालवेश्वराच्या सेवेंत आपण प्रवेश करावा व ते आज्ञापितील तेथें आपला असिपराक्रम दाखवावा ही माझी अनेक दिवसांची महत्वाकांक्षा आहे. आणि आतां माझ्या शत्रूचा सूड घेण्याचा प्रसंग अनायासें आला असतां तो मी घालवीन काय ? माझे ग्रह आपल्या सेवेंत प्रविष्ट होण्याइतके उच्च नसतील तर मी दुसरीकडे दैवाची परीक्षा पाहीन. मी क्षात्रधर्मी क्षत्रिय आहें; युद्धाशिवाय दुसरा व्यवसाय मी जाणीत नाहीं."

मालवेश्वरानें त्याला कांहींच निश्चित न सांगतां त्यावेळेस निरोप दिला. तो गेल्यावर मालवराज आपल्या सेनापतीस ह्मणाला, 'असे लोक युद्धसमयीं अवश्य असावे, नव्हे ? या मनुष्यासंबंधीं तुमचें काय मत आहे ?'

'त्याची मुद्रा कपटी व घातकी आहे. पण त्याच्यापासून आपलें किमपि नुकसान नाहीं. त्याला आपला खाजगी द्वेष उगवावयाचा आहे असें दिसतें, व तोंपर्यंत तो आपल्याशीं कृतघ्न होणार नाहीं. त्याला छोटेंसें आधिपत्य देण्यास हरकत नाहीं. अखिल सेनेंत त्याच्यासारखें ह्या प्रदेशाचें ज्ञान एकासहि नाहीं. निदान या बाबतींत त्याचा चांगला उपयोग होईल.' सेनापतीनें उत्तर दिलें.

सेनापतीच्या ह्या अभिप्रायाचा परिणाम मालवेश्वरानें नीलवर्णास सैन्यांत एका अल्प अधिकारावर नियत करण्यांत झाला.

ह्यानंतर थोड्या दिवसांनीं बऱ्याच अनुयायांसह, मालवेश्वराच्या सैन्यांत एका मागधी सरदाराचें आगमन झालें. मालवेशावर त्याच्या ऐटदार क्षात्र आकृतीचा अनुकूल ठसा उठला. मालवेश्वरानें त्याचें स्वागत केलें व आनंदयुक्त होऊन त्यालाहि सैन्यांत एक अधिकार दिला.

हा मागधी सरदार मालवेश्वराच्या शिबिरांतून बाहेर पडत असतां मालवसैन्यांतला एक अधिकारी त्याजजवळ आला, व ह्मणाला. "आपण परिचयाचे दिसतां. रामगडचा बौद्ध मठ व कुमाराचें कारस्थान विसरलां काय ?' त्यानें एकदम प्रश्न केला.

'छे ! नीळवर्ण !' सरदारानें उत्तर दिलें, 'मी विसरलों नाहीं. पण

तूं इकडे कोणीकडे ? मला वाटलें होतें कीं, तूं नेहमीं स्तुतिपाठ करीत असलेल्या देवीचा-सुंदरी लीलेचा-मोह तुला युद्धव्यवसायाहून जास्त पडला असेल. '

' ह्या युद्धांत तुला आकर्षण करणाऱ्या कारणामेंच मला पण आणलें. कांतिनगरांत आपल्या दोघांच्या वांछित रमणी आहेत. छे ! नाकबूल जाऊं नको. त्या अनाथ झाल्या ह्मणजे आपण त्यांचें हरण सहज करूं. तुझी मनोरमा तेथें आहे व तिच्या प्राप्तीकरतां तूं वीर-वृत्ति धारण केलीस ह्यांत आश्चर्य नाहीं. '

' मित्रा ! तं योग्य तर्क केलास. ' कृष्णमर्तीनें उत्तर दिलें.' मागधी सरदार भिक्षु कृष्णपर्ति होता हें वाचकांनी जाणलें असेलच, ' तोच माझा उद्देश आहे. तिजवांचन मला जीवित नीरस वाटतें व अंतीं, कदाचित माझ्या अनन्यभक्तीचा अंगीकार होईल. आणि न झाला तरी पण त्याचा विचार पुढें करूं. मला भिक्षुवृत्तीची आवड नाहीं. मला युद्ध व क्षात्रतेज हींच जास्त मोहित करतात. पण राणी युद्ध करील कां ! ' त्यानें प्रश्न केला.

' मानवी शक्तीचा निरुपाय होईपर्यंत ती युद्धापासून परावृत्त होणार नाहीं. रणशूरहि भयाकुल होतील पण निर्वाणींच्या प्रसंगीं ती हतधैर्य होत नाहीं. सर्व लोक जर निष्ठेनें वागतील तर या नाजूक मालवीयांपैकीं निदान अर्धेतरी तीं कायमचे निजवील. आह्मी दक्षिणी कंटक आहों व त्यांत कांतिनगरकर सर्व श्रेष्ठ आहेत. कांतिनगरचा किल्ला बांधण्यांत तुझ्या कित्येक देशबांधवाचें कौशल्य खर्च झालें आहे. ' नीलवर्ण ह्मणाला.

" मग त्यांच्यापैकींच कोणी किल्ला घेण्यास पाहिजे. किल्ल्याच्या नाजूक जागा दुसऱ्या कोणास कळणार ? आणि माझें ज्ञान नष्ट झालें नसेल तर ह्या अगाध सैन्यानें जें होणार नाहीं तें मी करूं शकेन. "

" तरी, कृष्णमर्ति ! सावधानता ठेवण्याची मी सूचना करतों. कांति-नगर सामान्य नव्हे. परमेश्वर आपणांस सिद्धकाम करो ! वेळेवर आपण परस्परांस सहाय्य करूं. पण तोंपर्यंत आपली भेट क्वचितच होईल, कदा-चित होणारहि नाहीं; कारण मी सैन्याच्या अग्रभागीं आहे. "

' मी मालवेश्वराबरोबर सैन्यमध्यांत आहे. नीलवर्ण ! जरूर तेव्हां मी मदतीस हजर आहें. तं गुह्यस्फोट करणार नाहींस तर मीही वाच्यता न करण्याची खबरदारी घेईन. आपले मनोरथ सिद्ध व्हावे अशी दृढ इच्छा असली तरी आपल्या इच्छितांना हंसणारें ह्या मालवसैन्यांत अनेक सांपडतील. आणि मालवेश्वर स्त्रीअपहारकांना, मग त्या स्त्रिया शत्रूच्या कां असेनात, न्यायनिष्ठुरतेनें शासन करतो. अशा कृत्यांना त्याचा सक्त निषेध आहे ह्मणतात. '

' धर्मशास्त्राच्या जोरावर निदान मलातरी आपली पत्नी हक्कानें मागतां येईल. ' नीलवर्ण ऐटीनें ह्मणाला.

' केव्हां ? ती दुसऱ्याची झाल्यावर ! ' कृष्णमूर्ति तिरस्कारपूर्वक हंसून ह्मणाला, " माझ्यासारखा तूं ह्या बाबतींत विशेष कडक नाहींस ह्मणा. पण असो. परस्परांच्या कार्यांत आपण नसती उठाठेव करूं नये हें चांगलें. '

त्यानें नीलवर्णाचा निरोप घेतला.

मालवेश्वराच्या सैन्याला कांतिनगरावर चाल करून येण्यास अवकाश देऊन आपण खुद्द कांतिनगरास जाऊं व तेथली व्यवस्था कशी आहे तें पाहूं.

विजयपुराहून अद्याप मदत कां येत नाहीं अशी राणीला चिंता वाटत होती. विजयपुरकरांनीं मदतीला सैन्य पाठवलें नव्हतं असें नाहीं पण त्या सैन्याचा अधिकारी शांत व विचारी होता. केव्हां केव्हां त्याच्या शांतपणाचा व विचाराचा अतिरेक होई; तो इतका कीं, धैर्यानें साहस केलें असतां हटकून विजय मिळावयाचा, तेव्हां तो आपला साधकबाधक प्रमाणें पहाण्यांत मग्न असावयाचा. विजयपुरकरांनीं मुद्दामच असा अधिकारी पाठवला होता. कारण, कांतिनगर मालवेशानें घेतल्यास, विजयपुरानें युद्धांत निष्कारण भाग घेतला अशा सबबीनें मालवराज विजयपुरावर स्वारी करावयाचा. नुकत्याच झालेल्या अंतस्थ कलहाग्नीनें क्षीणशक्ति झालेल्या विजयपुराधिपतीस प्रतापी मालवेश्वराशीं दोन हात करण्याची इच्छा नव्हती.

कांतिनगरास असतांना, संकटकालाचें चिन्ह न दिसल्यानें बौद्धमठशास्ता सूर्यमणि ह्यानें आसपासच्या प्रदेशांत प्रवास करण्यास राणीची

आज्ञा घेतली. ब्राह्मणधर्माच्या वर्चस्वांतून जे काय अवशिष्ट बौद्ध राहिले असतील त्यांना पुन: धर्माचें उज्ज्वल ज्ञान देऊन बौद्धधर्मरत ठेवावें व झाल्यास धर्मप्रसार करावा असा विचार त्याच्या मनांत प्रामुख्यानें वसत होता. पण आपल्या विचारांना अनुकूल परिस्थिति न दिसल्यानें तो खिन्न होऊन परत आला. लवकरच विजयपुरास जावें असा विचार त्यानें केला. पण मालवेश्वराच्या सैन्यानें विजयपूरचा मार्ग स्वाधीन करून घेतल्यानें त्याला आपला बेत रहित करावा लागला. ह्मणून आगामी युद्धांत भिक्षुवृत्तीचा त्याग न करतां आपल्या उपकारकर्त्या राणीला शक्य तें सहाय करण्याचा संकल्प त्यानें केला. एक मोठा वाडा रिकामा करून त्या ठिकाणीं जखमी व आजारी लोकांकरतां औषधोपचार करण्याची योजना त्यानें केली. जखमा दुरुस्त करण्यास लागणारें सामान व रुग्णांच्या उपयोगाच्या इतर साहित्याचा प्रचंड संग्रह त्यानें केला. त्याच्या या कृत्याकडे सैनिकांचें लक्ष होतें. आपल्याकडे दुर्लक्ष न होतां योग्य काळजी घेतली जाईल या विश्वासानें त्यांचा उत्साह वृद्धिंगत झाला.

राणीच्या दैनिक क्रमांत विशेष फरक झाला नव्हता. ती नेहमींप्रमाणें दरबारांत जात असे, अर्जदारांच्या तक्रारी ऐके, व न्यायनिर्णय करी. ती मनोरमा व लीला यांजबरोबर मनोरंजनांत वेळ घालवी. पण मधून-मधून विशेषतः रात्रीं ती तटावर प्रहरींच्या स्थानांवर जात असे. संकट जसजसें जवळ येऊं लागलें तशी तिच्या असीम उत्साहास भरती येऊं लागली व ह्या तिच्या वर्तनाचा सैनिकांवर इष्ट परिणाम झाला.

हळुहळू मालवेश्वराचें सैन्य दृग्गोचर होऊं लागलें. त्यांच्या टोळ्या पहाणी करण्याकरतां किल्ल्याच्या सभोंवतीं फिरत असत. किल्ल्याच्या दक्षिण, उत्तर, पश्चिम बाजूंस मालवेश्वरानें सैन्याचे विभाग नेमून तिकडून किल्ल्यांतल्या लोकांचें दळणवळण बंद केलें. पूर्व बाजू हळुहळू शत्रु व्यापूं लागला. जयसेनाला विजयपुरास पाठवावें असें कोणीं राणीला सुचवलें. पण अशा संकटसमयीं विश्वासार्ह असलेला एक दलांतील नायक दूर करण्याचें तिला पसंत वाटलें नाहीं. शत्रुसैन्यानें अद्याप पूर्व दिशा संपूर्ण व्यापली नव्हती. विजयपूरचें सैन्य कांतिनगराजवळ आलें. पूर्वेकडून आंत जातां येण्याचा संभव आहे असें समजल्यावरून तो विज-

यपूरचा शांतस्वभावी सरदार मालवसैन्याला डावें घालून पूर्व दिशेस उतरला व मोठ्या धैर्यानें रात्रीच्या अंधारांत तो किल्ल्याकडे निघाला. पण मालवेश्वराच्या सैन्यानें त्यास मधेंच गांठलें. युद्धास सुरवात झाली. विजयपूरचा सेनानायक सरदार मालवसैन्यांतून किल्ल्यांत जाऊं शकला नाहीं. सूर्योदयाच्या सुमारास विजयपूरचें सैन्य मागें परतलें. झालें! शत्रूंनीं पूर्व बाजूहि संपूर्ण व्यापली. किल्ल्याच्या वेढ्यास आरंभ झाला. शत्रुसैन्यांतून पलीकडे जाणें बाहेरच्या व आंतल्या लोकांस अशक्य झालें.

कधीं कधीं सूर्यमणि जयसेनाबरोबर तटावर जात असे. त्यावेळीं सूर्यमणि आपल्या सामर्थ्याप्रमाणें अनेक उपयुक्त सूचना करी. एकदां ते असेच किल्ल्याच्या तटावर असतांना मालवेश्वराचा एक सरदार किल्ल्याच्या बुरुजाजवळ अगदीं बाणाच्या टप्प्यांत आला. त्याचा अपूर्व बांधा पाहून जयसेन आश्चर्यान्वित झाला. त्यानें सूर्यमणीचें लक्ष त्याजकडे वेधलें. त्याचा चेहरा सूर्यमणीला दिसला नाहीं तरी त्याच्या एकंदर ऐटीवरून तो कृष्णमूर्तीच असावा अशी त्याची कल्पना झाली. पण त्यानें ही आपली शंका कोणाजवळ, प्रत्यक्ष मनोरमेला सुद्धां सांगितली नाहीं.

कृष्णमूर्तीकडे तटाला सुरुंगानें खिंड पाडण्याचें काम मालवेश्वरानें दिलें होतें; पण किल्ल्यावरील सैनिकांच्या अचुक निशाणानें व किल्ला ज्या भूमीवर होता त्या भूमीच्या काठिण्यानें कृष्णमूर्तीच्या सैनिकांना तें काम अशक्य झालें. मालवसेनेच्या या हताश अवस्थेनें व राणीच्या धीरवचनांनी किल्ल्यांतले सैनिक क्रमशः प्राप्तधैर्य झाले. मनोरमा व सूर्यमणि यांजकडून जखमी व आजारी सैनिकांच्या होत असलेल्या शुश्रूषेनें सैनिकगण संतुष्ट होता.

वेढ्यास दोन महिने झाले शत्रूंचा इलाज चालेना. प्रत्यहीं होणाऱ्या चकमकीत मालवेशाचीच विशेष हानि होई. मालवेश्वराला एक नवीनच चिंता उत्पन्न झाली होती. त्याच्या सैन्याची रसद संपत आली असून फार तर एकच महिना पुरण्याइतकी होती. बाहेरून सामुग्री आणावयाची पण विजयपूरच्या सैन्यानें आसपासचा प्रदेश उध्वस्त करून ठेवला होता व मालवसैन्याच्या टोळ्या क्वचित कोठून सामुग्री आणीत तर बाहेर

असलेल्या विजयपूरच्या सैन्यानें त्यांच्यावर हल्ला करून ती सामुग्री लुटून न्यावी. पण ही आपली चिंता मालवेश्वरानें कोणाला कळूं दिली नाहीं. त्यानें वेढ्याचें काम पूर्ववत् सुरू ठेवलें होतें.

प्रकरण २९ वें.

संग्राम

कित्येक दिवस शत्रु अगदीं स्वस्थ होता. खरोखरच कां मालवेश्वर वेढा उठवून परत जाण्याच्या विचारांत होता? राणीला शत्रूच्या अक्रियतेचा कांहींच बोध होईना. नेहमीप्रमाणें एके रात्री ती व जयसेन आपल्या बरोबरच्या सैनिकांसह तटावर आली होती. एकाएकीं बाहेरच्या बाजूनें खालून पुढील शब्द ऐकूं आले, ' शूर कांतिनगरकरांनो! अतःपर व्यर्थ प्राणनाश करूं नका. तुम्हीं आपली शिकस्त केलीत; जास्त रक्तपातास कारण होऊं नका. तुम्ही उभे असलेल्या तटाखालीं पांच सुरुंग पुरले आहेत. त्यांना बत्ती देतांच राजराजेश्वराच्या सैन्याला आंत येण्यासारखा विस्तृत मार्ग तयार होईल. विचार करा. शरणागत झाल्यावांचून तुमचे प्राण वांचणार नाहींत. '

पुनः सर्वत्र मध्यरात्रीची गंभीर शांतता झाली. त्या गर्द अंधकारांत कोणी मनुष्याकृति दिसेना. परमेश्वरानेंच हें भविष्यसूचन केलें; त्याच्या इच्छेविरुद्ध कसें जातां येईल? या विचारानें तेथें असलेले सैनिक हताश झाले. ते भयानें व्याकुल होऊन आपसांत कुजबुजूं लागले. पण त्या अमानुष वाणीनें राणी उत्तेजित झाली. ती म्हणाली, ' विजयश्री आपणासच माळ घालण्याच्या विचारांत आहे. आपण अद्याप अक्षतशरीर आहों. असें असतां काल्पनिक भीतीनें शस्त्रन्यास करून भीरु अबलांप्रमाणें प्राणरक्षणाकरतां शत्रूंना शरण जावें काय? हातांत शस्त्र आहे तोंपर्यंत आपल्या कुटुंबीयांचें व प्रिय जनांचें रक्षण करण्याचें आपण सोडून द्यावें काय? मालव सैन्यासारख्या पशुकोटीच्या दयेवर त्यांना विसंबाल तर तुमचीं मुलेंबाळें तुम्हांस खात्रीनें धन्यवाद देणार नाहींत. मी एक अबला

आहें व माझ्यांत तितकी शक्तिहि नाहीं; पण प्राण असेपर्यंत मी येथून हलणार नाहीं. वाटेल तें होवो. सर्वसमर्थ प्रभूवर अचल विश्वास ठेवला म्हणजे तो या घोर संकटांतून आपणास तारील. ही देववाणी नसून शत्रूचें कपट आहे. जा; आपल्या लोकांना बोलवा. अवकाश आहे तोंच ह्या आसन्न संकटाचा प्रतिकार करूं. '

राणीच्या उत्साही भाषणानें उत्तेजित होऊन सैनिक म्हणाले, ' तुम्हांला सोडून आम्ही पळून जाणार नाहीं. प्रभुइच्छा तशीच असली तर आम्ही प्राणहि अर्पूं—पण शत्रूला आत्मसमर्पण करणार नाहीं. '

ह्या अकल्पनीय संकटानें कांतिनगरांत बरीच चळवळ उडाली. दोन सुरुंग ओळखून काढून टाकण्यांत आले तों प्रभात झाली ही बातमी मालवराजाला कळली. मालवेश्वराच्या शिबिरांत कृष्णमूर्ति होता; तो म्हणाला, " राजेश्वर ! बाकीचे सुरुंग शत्रूला सांपडले नाहींत तोंपर्यंत प्रयत्नाची वेळ आहे. मग कितीही प्रयत्न केले तरी व्यर्थ होतील. महाराज ! सुरुंग उडवून आपण आज्ञा कराल तर मी किल्ल्यावर हल्ला चढवतों. "

" शाबास ! क्षत्रियाला साजेल असें तुझें भाषण आहे. किल्ला पडला कीं राजाच्या द्रव्यागारांतील बहुमोल रत्नें व असंख्य सुवर्णमुद्रा यांचा चौथा अंश तुझा. "

' माझें रत्न निराळ्या जातीचें आहे. मी तें सोडूं इच्छीत नाहीं. आज्ञा ? ' कृष्णमूर्तीनें आतुरतेनें परवानगी विचारली.

" आज्ञा. ईश्वर तुला विजयी करो. " मालवेश उद्गारला.

अर्ध घटकेच्या अवकाशांत तटाच्या पायथ्याशीं दोन धूम्रस्थाणु उत्पन्न झाले. तटाचा तेवढा भाग वर उभ्या असलेल्या अनेक सैनिकांसह आकाशांत उंच उडाला. तो तटाचा अंश आंतल्या खंदकांत पडला व शत्रुसैन्याला किल्ल्यांत शिरण्यास तात्पुरता मार्ग बनला.

ह्या भयानक प्रकारानें सैनिकांचें धैर्य गडबडलें. ते पळण्यास वाट शोधूं लागले. किल्ल्याचीं दारें बंद होतीं. राणी मोठ्यानें बोलली, " सैनिक ! तुम्ही कोठें जाणार ? पलीकडच्या मैदानांत शत्रूंच्या तरवारी तुमची वाट पहात आहेत. दुर्लौकिक न व्हावा म्हणून तरी परत

फिरा व जगाच्या अंतापर्यंत दाक्षिणी योध्यांचें नांव अजरामर करा. मी यःकश्चित् स्त्री शत्रुसैन्याच्या ह्या घाल्यानें डगत नाहीं. माझ्याबरोबर छिन्न तटाशीं चला. मारले गेलां तर कीर्ति प्राप्त होईल. एरवीं भावी पिढीच्या तिरस्कारास पात्र व्हाल. ”

सैनिक व सेनापति आपल्या प्रिय राणीसह संग्रामस्थलीं उत्साहानें प्राप्त झाले. जयसेनानें व्यर्थ विनंति केली; राणी रणस्थानापासून मागें जाण्यास कबूल झाली नाहीं मालवसैन्य आक्रमण करून येईपर्यंत बराच वेळ सांपडला. त्या अवकाशांत किल्ल्यांतील सैनिकांना आश्रयाची थोडी तजवीज करतां आली. जयसेनानें राणीच्या रक्षणाची तजवीज करण्यांत कसूर केली नाहीं. तो राणीला ह्मणाला, “ आई ! मालवेश्वर आपलें निवडक सैन्य पाठवीत आहे; पण मी एकालाहि पुढें येऊं देणार नाहीं. ”

मालवसैन्याला वेळ लागण्याचें कारण युद्धकुशल मालववीरांत मतभेद झाला. अधिकांश नायक ह्मणत होते कीं, असल्या लहान खिंडींतुन कांतिनगर घेऊं पहाणें ह्मणजे आपण होऊन कालमुखांत प्रवेश करण्यासारखें आहे. व्यर्थ प्राणनाशमात्र होईल. वृद्ध वीरांच्या ह्या मतामुळें क्षणभर हल्ला करण्याचा निश्चय पालटतो असें दिसलें तेव्हां कृष्णमूर्ति भीमस्वरानें ह्मणाला, “ माझ्या पंचवीस लोकांसह मी ती जागा सर करतों. देहरक्षणाची इच्छा करणाऱ्या नामर्द मालवीयांना खुशाल मागाहून येऊं द्या. जणूं काय तटाला पडणाऱ्या खिंडी राजरस्त्याप्रमाणें असाव्या ! ”

वस्तुतः कृष्णमूर्तीला मालवसैन्याच्या नसता वेळ देऊन माशा मारीत बसण्यानें कंटाळा आला होता. मालवीयांना सोडून जाण्याचेंहि त्याच्या मनांत आलें. पण कांतिनगरांत असलेली मनोरमा— छे, तिचा मोह अधम कृष्णमूर्तीला सोडवेना. आंतरिक दुःसह यातनांपेक्षां तिच्या प्राप्तीचा उद्योग करतांना आलेलें मरणहि पतकरलें.

एकदाची मालवेश्वरानें युद्धास अनुज्ञा दिली. असंख्य मालवसैन्य त्या निर्वृक्ष मैदानांतुन तटाकडे जाऊं लागलें. तें तटावर, बुरुजावर, उभ्या असलेल्या सैनिकांवर शरवर्षाव करूं लागले. राणीच्या प्रोत्साहनानें आज

सैनिकांनीं अतुल पराक्रम चालवला. त्यांच्या संतत शरधारांनीं मालवेश्वराचें सैन्य पटापट गतप्राण होऊं लागलें. मालवसैन्य पराकाष्ठेचें धैर्य दाखवीत होतें. मालववीर आपल्या बांधवांच्या मृत देहांवरून पुढें जाऊं लागले. पण त्यांचें धैर्य, त्यांचा उत्साह, आज कांतिनगरकरांपुढें लुप्ततेज झाला. त्यांनीं प्राणाचीहि पर्वा न करतां युद्ध चालवलें; पण तटावरून सुटणाऱ्या बाणांच्या टप्प्यांत जाणारा एकही वीर इच्छित स्थानीं जाऊन पोंचूं शकला नाहीं. त्यांचा उत्साहभंग झाला. ते मागें परतले. तटावरील वीरांनीं जयनाद केला. आजचा दिवस आपलाच, या विचारानें ते आनंदित झाले. इतक्यांत एकाएकीं तटाच्या खिडीपाशीं पंचवीस लोक दिसून आले. त्या लोकांनीं आपल्या तरवारी उपसून तेथें उभ्या असलेल्या सैनिकांना कापण्याचा सपाटा चालविला. त्यांचा नायक कृष्णमूर्ति पलाशपुष्पाप्रमाणें शत्रुरक्तानें लोहितवर्ण झाला. तो विजयोत्साहानें उन्मत्त होऊन आंत शिरण्याचा प्रयत्न करूं लागला. आतां सिंहनाद करण्याची मालवसैन्याची पाळी आली. मालवसैनिकांनीं आनंदानें जयशब्द केला व ते कशासहि न जुमानतां कृष्णमूर्तीच्या मदतीस धांवले.

तटाचा भंग होऊन बनलेल्या मार्गानें आंत शिरण्यास मालवसैनिक अग्रेसर झाले; पण त्यांच्यांत शिस्त राहिली नाहीं. तटावरून व समोरून होणाऱ्या शरवर्षावानें ते पटापट मरूं लागले. परत फिरण्यास वाव नव्हता. मागून येणारा सैन्यप्रवाह पुढें काय घटना होत आहे याची कल्पना न होतां, सारखा सुरू होता. त्यामुळें मालवेश्वराच्या सैन्याला अन्य मार्ग राहिला नाहीं. पहिल्या वीरांची जागा मागून येणारे दुसरे वीर घेत व पहिल्यांची गति पावत. पुन्हा एकवार कृष्णमूर्तीनें आंत शिरण्याचा प्रयत्न केला. तो आपल्यासमोरील शत्रुसैन्यास भराभर मारूं लागला. जयसेनानें त्याचें शौर्य पाहून त्यास स्वतःशीं युद्ध करण्यास हाक मारली; पण इतक्यांत तटावरून आलेला एक तीर मर्मस्थानीं लागून कृष्णमूर्ति खालीं पडला. मालवसैन्य तिकडे लक्ष न देतां लढतच होतें. इतरांप्रमाणें कृष्णमूर्तीचें शरीरहि सैनिकांच्या पदतलीं तुडविलें गेलें. सूर्यास्ताचा समय झाला तरी कांतिनगरच्या शूर सैनिकांवर मालवेश्वराच्या अमर्याद सैन्याला जय मिळाला

नाहीं. किल्ल्यांत त्यांचा प्रवेश झाला नाहीं. मालवसैन्य परत फिरलें. राणीच्या शूर सैनिकांनीं पुन: सिंहनाद केला.

रात्र झाली; जयसेन स्वकीय मृतवीरांची अंत्यव्यवस्था करीत होता. त्यास त्या मृतांतून एक करुणारव ऐकू आला. तो तपास करून पहातो तों ज्याच्या असीम शौर्यानें तो आश्चर्यचकित झाला होता तोच हा वीर. जयसेनानें कृष्णमूर्तीसाठीं मेणा आणण्यास सेवकांना आज्ञा केली, तेव्हां कृष्णमूर्ती खोल स्वरानें ह्मणाला, ' नको, मी वांचत नाहीं. बौद्ध भिक्षु सूर्यमणीला लवकर बोलवा. ' त्याला पुन: ग्लानि आली.

सूर्यमणीशीं या वीराचा काय संबंध असावा असा प्रश्न जयसेनाच्या मनांत उद्भवला; पण ती वेळ विचार करण्याची नव्हती. मृत्युपंथास लागलेल्या एका मानवाची अंतकालची इच्छा पूर्ण करणें कर्तव्य समजून त्यानें सूर्यमणीस बोलावलें.

सूर्यमणीनें प्रथमदर्शनींच कृष्णमूर्तीला ओळखलें. पण त्या शांतचित्त भिक्षूच्या हृदयांत शत्रुदर्शनानें मानवी अंत:करणांत सहज जन्म पावणारा विकार उद्भवला नाहीं. तो कृष्णमूर्तीच्या जखमांची व्यवस्था करण्यास लागणार तोंच दिवसभर प्राणांतिक नरकयातना भोगलेला कृष्णमूर्ति ह्मणाला, ' बंधु ! तुझ्या उपकाराचा उपयोग होणार नाहीं. माझा मृत्यु मला स्पष्ट दिसत आहे. तुला बोलावण्याचें कारण माझें न्यायान्यायोपार्जित द्रव्य बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनास खर्च व्हावें व तुमची बंधुभगिनींची क्षमा मिळावी. मला थोडें पाणी द्या. '

पाण्याचा घोट घेऊन तो ह्मणाला, ' मी सांगतों तसें पत्र लिही. मालवेश्वराच्या नगरींतील सत्यचंद्र नांवाच्या धनपतीला पत्र दिलें ह्मणजे तो माझी सर्व ठेव पत्रवाहकाच्या स्वाधीन करील. '

त्यानें सांगितल्याप्रमाणें पत्र लिहिण्यांत आलें. कृष्णमूर्तीनें त्यावर आपली सही केली. सूर्यमणि व जयसेन ह्यांच्या साक्षी होऊन पत्र पुरें झालें. वर मठपति महंतांचें नांव लिहिण्यांत आलें. कृष्णमूर्तीनें स्वहस्तानें तें पत्र सूर्यमणीस दिलें नंतर पुन: थोडें पाणी पिऊन तो बोलला, ' बंधु ! मीं तुला अनंत यातना दिल्या, तुझा निष्कारण छळ केला, त्याबद्दल मला प्रेमळांत:करणानें क्षमा कर. तुझ्या भगिनीला येथें येऊं दे. तिच्या मुखानें

क्षमावचन ऐकलें म्हणजे मला सुखानें मृत्यु येईल. '

सूर्यमणीनें त्याला म्हटलें, " कृष्णमूर्ति ! भगवान् बुद्ध तुला क्षमा करो. मीं तुजविषयीं कधींहि दुष्ट बुद्धि धारण केली नाहीं. तूं अनुतापयुक्त झाला आहेस. तुला निर्वाणपद मिळो. ही पहा मनोरमा आली. '

कृष्णमूर्तीनें विनंति केली तेव्हांच सूर्यमणीच्या अनुमतीनें जयसेनानें मनोरमेला बोलावूं पाठविलें होतें. कृष्णमूर्तीला आतां बोलतां येत नव्हतें. तो फक्त ' देवी ' इतकेंच उच्चारला व आपल्या नेत्रांनीं तिजकडे करुणादृष्टीनें पाहूं लागला. सूर्यमणीनें तिला थोडक्यांत सर्व हकीकत सांगितली तेव्हां ती कृष्णमूर्तीला उद्देशून म्हणाली, " बंधु ! तुला पश्चात्ताप झाला आहे. आतां तुला कसली भीति नसूं दे. पण केवळ माझ्या मुखानेंच ऐकण्याची तुझी इच्छा असेल तर ऐक. तं केलेल्या अवमानछळाबद्दल मी तुला पूर्ण क्षमा करतें. तुला निर्वाणलाभ होवो. "

मनोरमेच्या भाषणांतील ' क्षमा करतें ' शब्द ऐकून कृष्णमूर्ति संतुष्ट झालासा दिसला. तो दुःखवेदना शांतपणें सहन करीत होता. किंचित् अवकाशानें त्याचें देहावसान झालें. जयसेनाच्या परवानगीनें सूर्यमणीनें बौद्धाला उचित असे त्याचे अंत्य संस्कार केले.

राणीनें स्वतःच्या देखरेखीखालीं तो तटाचा भाग रात्रीतून पुनः पूर्ववत् केला. ती, सर्व रात्र, एकदाहि तेथून हलली नाहीं. लीलेनें तिला खाणेंपिणें आदि तेथेंच आणून दिलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मालवेश्वराकडून एक दूत आला. मृतांना मूठमाती देण्याकरतां दोन दिवस युद्ध बंद ठेवावें अशी प्रतापी मालवेश्वराची विनंति होती. उदारमनस्क राज्ञीनें ती विनंति थोर अंतःकरणानें मान्य केली.

चंद्रावती ! पण ह्या दोन दिवसांत – तुझ्या उदारतेनें प्राप्त झालेल्या ह्या दोनच दिवसांत– कोण भयंकर घटना घडून आली ! जें कार्य पराक्रमानें, मनुष्यबलानें झालें नाहीं, मालवेश्वरासारखा बलशाली भूपति तुझ्या बुद्धिबलकौशल्यामुळें जें साध्य करूं शकला नाहीं, जें सरलतेनें घडून आलें नाहीं, तें द्रव्यलोभानें, अधिकारलालसेनें शक्य झालें, घडून आलें. आणि तें ह्या दोन दिवसांच्या शांतिकालांतच !

पण राणीला प्रत्यक्ष विधात्यानें या घटनेची पूर्व सूचना दिली असती तरी तिनें मालवेश्वराच्या विनंतीचा अव्हेर केला नसता. मानवीप्रयत्नांनींच तिनें कांतिनगरचें भवितव्य टाळण्याचा यत्न केला असता. तिच्यासारखी धीरोदात्तता मानवांत सहज प्राप्य नव्हे !

प्रकरण ३० वें.

कांतिनगरचें पतन.

शांतिकालांतील एक दिवस गेला. रात्रीं तटावर नेहमींप्रमाणें सैनिक कार्यतत्पर होते. रात्रीच्या अंधकारांत तटाखालून कांहीं चालत आहे अशी दृढ शंका आल्यानें वर उभा असलेला एक शिलेदार दोरानें खालीं उतरला व त्या चल वस्तूकडे गेला. प्रथम, ती एखादी बकरी असावीसें त्याला वाटलें. तो पुढें झाला तसें त्या वस्तूनें मनुष्यरूप धारण केलें. ती व्यक्ति ताठ उभी राहिली व एकेक पाऊल मागें सरत शिलेदाराला हातानें खूण करूं लागली. शिलेदार स्वभावानें धीट असल्यामुळें ही व्यक्ति कोण व आपणांस कां बोलावते याचा निर्णय करण्याचा विचार त्यानें ठरविला. त्याच्या मनांत भूतपिशाचाची कल्पना आली नाहीं व कल्पना येती तरी भूतपिशाचांना भिणारा तो नव्हता. तो जितका पुढें जाई तितकी ती व्यक्ति मागें सरत असे. तटापासून बरेंच दूर गेल्यावर ती अज्ञात व्यक्ति थांबली. आतां जास्त पुढें जावें कीं न जावें ह्या विचारानें शिलेदार स्तब्ध उभा राहिला. कारण पाठलाग केला असतां ती अज्ञात व्यक्ति हातांत सांपडण्याचा संभव नव्हता. आतांपर्यंतच्या पदसंचालनावरून ती व्यक्ति चपल असल्याचें दिसून येत होतें. येथूनच त्या व्यक्तीला शस्त्राघात करावा तर त्यानें आपलें धनु बरोबर आणलें नव्हतें. आणि ती व्यक्ति कोण हें समजल्याशिवाय परत जाणें त्यास मानहानिकर वाटलें. इतक्यांत त्या अज्ञात व्यक्तीनें हाक मारली, ' शूरसिंह ! '

आपल्या नांवानें हाक मारणारी ही व्यक्ति कोण ? आपल्या परिचयाचा कोणी पुरुष शत्रुसैन्यांत नाहीं; मग ह्या व्यक्तीनें आपलें नांव घेऊन

कशी हाक मारली ? ही व्यक्ति आपणास सांगणार तरी काय ? आपल्याला कशाकरतां बोलावीत आहे ? आपल्या हिताचें काय सांगणार ? पण आपल्या हिताचा संबंध असल्याखेरीज इतक्या दूर कशास बोलावील ? खरोखरच आपल्या हिताची गोष्ट ही व्यक्ति सांगेल काय ? असे अनेक विचार अप्राप्तमनोरथ शिलेदाराच्या मनांत उत्पन्न झाले.

शिलेदार शूरसिंह हा जात्या शूर पण सुखासीन होता; त्यामुळें जयसेनानें नेमून दिलेलें काम त्याजकडून योग्य तितक्या तत्परतेनें होत नसे. त्याला कामाचा कंटाळा होता झणून तो स्वकर्तव्यांत पुष्कळदां हयगय करी. ह्या त्याच्या कार्यप्रतिकूलस्वभावानें जयसेनास त्याला वारंवार बोलण्याचे प्रसंग येत. पण एका अल्पवयी परकीयानें हाताखालच्या लोकांसमक्ष आपला अपमान करावा हें त्या मानी प्रौढवयस्क कांतिनगरकराला रुचत नसे. आपल्या दोषाचा त्याग करून अपमानाचा प्रसंगच न येईल असें बर्तन ठेवण्याऐवजीं हळुहळू तो जयसेनाचा द्वेष करूं लागला. राणीच्या सुयंत्र कारभारांत स्वःच्या दोषांनीं शूरसिंहाला उच्चाधिकारप्राप्ति झाली नाहीं. पूर्वीच्या दुर्गाधिकाऱ्याला देहांतशासन झालें त्यावेळीं शूरसिंहाऐवजीं दुसऱ्या एका योग्य मनुष्याला दुर्गाधिकार देण्यांत आला. शूरसिंहाच्या द्रव्यतृष्णेची तृप्ति होण्यास मार्ग राहिला नाहीं. आपला द्रव्यलोभ व अधिकारलालसा— दुर्गाधिकाराची प्राप्ति—राणीच्या कारकिर्दीत तशीच रहाणार हें त्यास स्पष्ट दिसून आलें. तरी पण तो आपली मनोगत इच्छा कधीं कोणाजवळ उघड करीत नसे.

वर सांगितलेल्या विचारांनीं त्याच्या मनांत गर्दी केली असतां त्या व्यक्तीनें पुनः हाक मारली, 'शूरसिंह ! अहो दुर्गाधिकारी !'

काय ? आपल्या अंतःकरणपटाच्या अगदीं गुप्त स्थणांत दडवून ठेवलेली आपली इच्छा ह्या व्यक्तीस ज्ञात आहे ! त्यानें दुर्गाधिकारी हाक मारली नव्हे काय ? तर या आपल्या हितकर्त्या व्यक्तीस जरूर भेटलेंच पाहिजे. असा विचार करून तो त्या व्यक्तीजवळ गेला.

'या, दुर्गाधिकारी !' ती व्यक्ति पुनः ह्मणाली.

'मी दुर्गाधिकारी नाहीं. तुमचा गैरसमज झालेला दिसतो.' शूरसिंहानें उत्तर दिलें.

'मी चुकलों नाहीं. तुम्ही दुर्गाधिकारी नसाल; पण म्हणून कधींच होणार नाहीं काय ? ' त्या व्यक्तीनें मुद्दाम प्रश्न केला.

' राणी आपल्या विजयपुरीं मंत्र्यासह कारभार पहात आहे तोंपर्यंत तरी ती आशा नको. ' शूरसिंह कष्टी मनानें बोलला.

' उपाय आहे. ' त्या व्यक्तीनें म्हटलें.

' काय उपाय ? ' शूरसिंहानें प्रश्न केला.

' स्वतःचा प्रयत्न. ' उत्तर मिळालें.

' हें तर सर्व जाणतात. पण प्रयत्न कोणत्या दिशेनें ? ' शूरसिंहानें प्रश्न केला.

' मालवेश्वराचें सैन्य आंत घेऊन. '

' काय ? मी कांतिनगरचा नाश करूं ? छे ! इतका नीच मी नाहीं. मला दुर्गाधिकार नको. ' शूरसिंहानें उत्तर केलें.

' शूरसिंह ! तुम्ही सूज्ञ आहां. विचार करा, त्यांत कांतिनगरचा नाश होत नाहीं. '

' मालवेश्वर काय कांतिनगर कायम ठेवील ? त्याला या राज्याची आशा नाहीं ? तर तो येथें कशाला आला ? ' शूरसिंहानें विचारलें.

' होय. मालवेश्वर कांतिनगरचें राज्य कायम ठेवील; त्याला हें राज्य घ्यावयाचें नाहीं. त्याचा हेतु नर्मदेच्या दक्षिणेकडील थोडासा प्रदेश स्वतःस मिळविण्याचा आहे. '

' तो त्यास हल्लींच मिळाला आहे. मग तो आणखी पुढें कशाला आला ? ' शूरसिंहानें प्रश्न केला.

' कांतिनगरची संमति मिळावी म्हणून. भविष्यत्कालीं परस्पर राष्ट्रांत युद्धाचा दावानल पेटूं नये अशी मालवराजाची सदिच्छा आहे. तुम्हीच पहांना त्या प्रदेशांत नेहमीं किती अस्वस्थता असते. कांतिनगरला संभाळतां येत नाहीं असा प्रदेश तुमच्या ताब्यांत असण्यांत अर्थ तरी कोणता ? या आशयाचा संदेश मालवेश्वरानें राणीला आजच पाठविला; पण ती कबूल करणार नाहीं. "

' कां ? ' शूरसिंहानें विचारलें.

' कारण तीच विजयपुरीं स्त्रीचार मंत्री. '

' काय ? तो स्त्रीचोरहि आहे ! ' द्वेषभाव जागृत होऊन शूरसिंह ह्मणाला.

' होय; तो स्त्रीचोर ! त्याची प्रिया लीला— पण ह्मणावें संभाळून अस. '

' ती आपली कोण ? आपण नीलवर्ण काय ? ' शूरसिंहानें एकदम विचारलें.

' होय. मी नीलवर्ण ! जयसेनाचा कट्टा वैरी. शूरसिंह ! इकडे पहा. किल्ला मालवेश्वराच्या स्वाधीन केला तर तुह्मी दुर्गाधिकारी बनाल. '

' पण मी किल्ल्याचा स्वामी नाहीं. '

' तर तुह्मांस स्वहिताची इच्छा नाहीं असें ह्मणाना ! मग तुह्मांस आजन्म जयसेनाचें दास्य करावें लागलें तर त्यांत आश्चर्य काय ?' नीलवर्ण निंदाव्यंजक स्वरानें ह्मणाला.

' काय ? मी जयसेनाचा दास ! कालत्रयींहि नाहीं. नीलवर्ण ! तुह्मी सांगाल तसें वागण्यास मी तयार आहें. पण तें शक्यमात्र असलें पाहिजे. ' पशुभाव प्रबल होऊन शूरसिंह जोरानें ह्मणाला.

' इच्छा असल्यावर जगांत अशक्य काय आहे ? दुर्गाच्या द्वाररक्षकाचें काम तुमच्याकडे आलें कीं मला सूचना करा. '

' पहिला द्वाररक्षक आजारी झाल्यानें आजपासून मलाच तेथें नेमलें आहे. ' शूरसिंहानें उत्तर दिलें.

' झालें तर. नशिबानें हात दिला ह्मणावयाचा. आयती चालून आलेली संधि कां दवडतां ? तो दुष्ट कदाचित् लवकरच तुमच्या जागीं दुसऱ्यास नेमील. मग बसा रडत. नाही तर, तुह्मी सांगाल तेव्हां मी आपले लोक घेऊन तयार असेन. द्वार मुक्त करून आह्मांस आंत घ्या. बाकीचें कार्य विजयी मालवेश्वराचें सैन्य करील. राजराजेश्वराच्या कार्यास तुह्मीं मदत केली असें समजल्यावर मालवराज तुमची इच्छा एक क्षणहि अपूर्ण राहूं देणार नाहीं. आणि तसाच हा नीलवर्णहि स्वकार्यीं सहाय्य करणाऱ्या मित्राला विसरणार नाहीं. '

शूरसिंहाच्या मनांत सदसत्शक्तींचें तुमुल युद्ध सुरू झालें. मालवेश्वराचें सैन्य आंत घेऊन कांतिनगर परवश करावें हें त्यास पसंत होईना.

त्यापेक्षां स्वतःची हीनावस्था पतकरली असा विचार त्याच्या मनांत अधिकार करूं लागतो तोंच जयमेनाचा द्वेष त्याच्या हृदयांत प्रबल होई. द्रव्यप्राप्तीची आशाहि त्याजवर आपला परिणाम करीत होती.

त्याचें मन द्विधा झालेलें जाणुन नीलवर्ण पुनः ह्मणाला, ' शूरसिंह ! विचार कसला ? विचारमग्न रहावयाचें असेल तर हातांत कांकणें कां धारण कराना ? मालवेश्वर दुर्बल नाहीं. पण कांतिनगरकरांचा व्यर्थ रक्तपात न व्हावा अशी त्याची सात्विक इच्छा आहे. '

' मी भीत नाहीं; पण कांतिनगरच्या भविष्यत स्थितीचें मनन करीत होतों. '

' शूरसिंह ! मी तुह्मांस प्रथमच सांगितलें ना कीं, मालवेश्वर कांतिनगरचा अभिलाष करीत नाहीं. तरी आपला हेतु सिद्धीस नेल्यावांचून मालवराज कदापि सोडणार नाहीं. मग तुह्मीं आपल्या वैऱ्याचा सूड उगवून स्वार्थ का साधूं नये ? त्यात कांतिनगरकरांचा नाश नाहीं. उलट, भावी युद्धकांडांत पतन पावणाऱ्या अनेक स्वबांधवांना प्राणदान दिल्याचें श्रेय तुह्मांस मिळेल. '

शूरसिंहाच्या सरळ पण अधिकारकांक्षी मनावर ह्या कुटिल उपदेशाचा इष्ट परिणाम झाला. ' विचार करून सांगतों; उद्यां रात्रीं आपण या. ' तो ह्मणाला.

आतांच उत्तर दे ह्मटल्यास कदाचित् हा शूर कांतिनगरकर एकदम विरुद्ध होईल ह्मणून, व आपल्या भेदनीतीचें कार्य व्यर्थ जाणार नाहीं ह्या खात्रीनें नीलवर्णानें त्याचें ह्मणणें मान्य केलें. परस्परांना प्रेमपूर्वक आलिंगन देऊन दोघे वीर स्वस्थानाकडे चालते झाले.

दुसऱ्या दिवशीं रात्रीं पूर्वसंकेताप्रमाणें त्यांची भेट झाली. स्वार्थबुद्धीनें शूरसिंहाच्या मनावर पूर्ण अधिकार केला. तो नीलवर्णाच्या कारस्थानास बळी पडला. तिसऱ्या दिवशीं उत्तररात्रीं नगरद्वार उघडण्याचें वचन त्यानें नीलवर्णास दिलें.

सकाळीं नीलवर्ण मालवेश्वराच्या शिबिरांत गेला. शूरसिंहाची माहिती कशी झाली, त्याची कशी गांठ घातली, व त्यानें काय वचन दिलें इत्यादि हकीकत त्यानें मालवेशाला नम्रपणें निवेदन केली. मात्र त्यानें

आपला हेतु गुप्त ठेवला. नीलवर्ण विजयपूरकर ह्मणून प्रथमपासूनच त्याजवर मालवनृपतीचा अविश्वास होता. आजच्या कृत्यांत काहीं तरी कपट असावें असें त्यास वाटून त्यानें आपल्या कुशल सेनापतीस पाचारण केलें. सेनापति हरिहर आला. त्याच्या सल्ल्यानें मालवराजानें नीलवर्णाची विनंति मान्य केली. नीलवर्णाला हजार सैनिक देण्याचें त्यानें कबूल केलें. मात्र बरोबर एक मालवेश्वराचा सेनानायक देण्याचें त्यानें निश्चित केलें.

शांतिकालाची मुदत संपली तर युद्धास आरंभ कां होत नाहीं याचा कांहींच तर्क कांतिनगरकरांना होईना. जयसेनानें किती वेळां तरी राणीला स्वतःच्या बचावाकरतां पळून जाण्याची विनवणी केली. तो शत्रुसैन्यांतून तिला पार करण्यास तयार होता. त्यानें तशी तजवीज केली होती. पण राणीचें एकच उत्तर! विजयपुराइतकेंच कांतिनगर तिला प्रिय. ती कांतिनगरच्या प्रिय प्रजाजनांस संकटांत टाकून जाण्यास कबूल होईना. एके दिवशीं सूर्योदयाला चार घटका अवकाश असतां राजवाड्यापुढें मोठा गोंगाट सुरू झालेला ऐकू आला. काय प्रकार आहे याची कल्पना कोणासहि होईना. मुक्तद्वारानें प्रवेश करतांच नीलवर्ण काहीं लोकांनिशीं राजप्रासादाकडे गेला. जाण्यापूर्वी शूरसिंहास ठार करण्यास मात्र तो विसरला नाहीं. बिचाऱ्या शूरसिंहाची दुर्गाधिकाराची आशा योग्य सफळ झाली ह्मणावयाची! कृतघ्न घातक्याना दुसरें काय मिळणार? असो.

नीलवर्णाच्या मनांत मालवेश्वरासंबंधानें निष्ठा नव्हती. तो आपलें कार्य साधावें ह्याकरतांच केवळ मालवराजाच्या सेनेंत प्रविष्ट झाला होता. नगरांत प्रवेश होतांच नगर माळवेश्वराच्या पूर्ण अधीन व्हावें असा प्रयत्न न करतां तो वर सांगितल्याप्रमाणें इष्ट हेतूच्या सिद्धीसाठीं राजप्रासादाकडे गेला. मालवेश्वराचा जय होवो, पराजय होवो, नीलवर्णाला त्याचें सुखदुःख नव्हतें. पण सेनापति हरिहरानें असें कांहीं होईल असा अजमास पूर्वीच केला होता. ह्मणून कांतिनगर हस्तगत होण्याची ही अमोल संधि व्यर्थ न जावी या उद्देशानें स्वतः तोच छद्मवेशानें सेनानायक बनला होता. तत्काळ त्यानें तटावर, बुरूजावर, नगरीच्या निरनिराळ्या द्वारांवर आपला अधिकार स्थापित करण्यास लोक पाठविले.

नीलवर्णानें कांहीं अडथळा न होतां राजप्रासादांत प्रवेश केला. तो कोण, काय करतो हें रक्षकांना समजण्यापूर्वींच त्यानें त्यांचा नाश केला. उन्मत्त नीलवर्ण जास्तच उन्मत्त होऊन अंत:पुरांत प्रवेशला. त्यानें अनेक स्थळें शोधली पण लीला आढळून आली नाहीं. शेवटीं, त्यानें एका महालांत प्रवेश केला. तें राणीचें निद्रामंदिर होतें. राणी नित्यक्रमाप्रमाणें तटावरून जाऊन येऊन विश्रांति घेण्याकरतां नुकतीच मंचकावर निद्रित झाली होती. निद्रेपूर्वी आज तिच्या मनांत 'ह्या क्लेशकर अवस्थेंतून कधीं मुक्तता होईल कोण जाणे' असा विचार आला होता. राणी दृष्टीस पडतांच तो नरपशु मंचकाकडे धांवला. त्यानें असि धारण केलेला हात उंच केला. त्यामुळें असीचा आघात होऊन अंतरालांतील बिलोरी झुंबर शतखंड झालें. भंग पावलेलें तें झुंबर आपल्या मंचकावर त्या शतखंडांचा वर्षाव करीत भूमीवर सशब्द आदळलें. जणूं तें अचेतन झुंबरही चैतन्ययुक्त होऊन त्या मानवजातिकलंक नीलवर्णाला 'असल्या घोर कृत्यापासून परावृत्त हो' ह्मणत होतें. त्या शतखंडांच्या निनादानें राणी जागृत झाली. ती अशस्त्र होती. संकट संमुख पाहून विश्वासघात झाल्याचें तिला कळून आलें तरी ती स्थिरचित्त होती. ती उभी राहिली. तिच्या मुखांतून निघालेल्या एका शब्दानें, तिच्या नुसत्या दर्शनानें आजपर्यंत अनेक वेळां असंख्य क्षुब्ध जनसमूह शांत झाला होता. आतां सुद्धां तोच प्रकार घडून आला. नीलवर्णाबरोबरच्या मालवसैनिकांच्या हृदयांत राणीच्या स्थिरमुद्रादर्शनानें पूज्यभाव उत्पन्न झाला. ते पाषाणवत् झाले. निजकार्याचें भान ते विसरले. पण दुष्ट नीलवर्ण नरपिशाच ! त्यानें दु:शब्द बोलून राणीच्या– स्त्रीच्या– हृदयावर तरवारीचा वार केला. राणी भूमीवर पडली. त्यानें पुन: शस्त्र वर उचललें. तो नरराक्षस राणीच्या मृत देहावर आणखी आघात करणार, इतक्यांत निकटस्थ महालांतून आलेल्या लीलेवर त्याची दृष्टि गेली. ती हा प्रकार पाहून स्तंभित झाली होती. तो तिजकडे धांवला व तिला दोन्हीं हातांनीं उचलून तो एका द्वारानें तेथून अदृश्य झाला.

ज्ञानशून्य मालवसैनिक परतणार तों दरवाजा रुद्ध ! नगर मालवसैन्यांनें ताब्यांत घेतलें तेव्हां निरुपाय झालेला जयसेन निदान राणीचा

बचाव करावा या इच्छेनें प्रासादाकडे धांवला. पण तो राणीच्या शयनमंदिरापाशीं येण्यापूर्वीच दुष्ट नीलवर्ण आपलें नीचकर्म संपवून तेथून नाहींसा झाला होता. क्रोधान्ध जयसेनानें त्या मालववीरांना एका क्षणांत परधामास पाठविलें. राणी मृत झालेली पाहून त्यांपैकीं एकजणाला, हें कृत्य कोणीं केलें, असा प्रश्न त्यानें विचारला. " एक परकीय वीर. त्याचें नांव नीलवर्ण. तो हें कृत्य करून एका सुंदर तरुणीला घेऊन पळाला. " इतकेच शब्द त्या सैनिकाला बोलतां आले.

राणीचा मृत देह तसाच वस्त्राच्छादित करून तो नीलवर्णाच्या शोधास गेला. मूर्च्छित लीलेला खांद्यावर टाकून पळत असलेला नीलवर्ण त्यास दिसला. जयसेनानें त्याला हाक मारली पण तो थांबला नाहीं. जयसेन द्रुत वेगानें जाऊन त्यास आडवा झाला. निरुपाय पाहून लीलेला खालीं ठेऊन नीलवर्ण जयसेनावर धांवला. भाषणास अवकाश नव्हता. " स्त्रीघातक्या ! हें घे बक्षीस ! " म्हणून जयसेनानें एक जोराचा वार केला. नराधम नीलवर्ण जीवनशून्य झाला. पण ह्याचवेळीं कोणी सैनिक मागून येत होते. त्यांतल्या एकानें धांवून जयसेनाला वार केला. जयसेन जखमी होऊन खालीं पडला. तो संज्ञाशून्य झाला.

प्रकरण ३५ वें.

उपसंहार.

तो मालवसैनिक आणखी वार करणार इतक्यांत मागून येणारा त्याचा नायक म्हणाला, " वा: ! आहत वीराला वार करणारा तूं मोठाच शूरवीर दिसतोस. अशानें राजराजेश्वराची उत्तम यशवृद्धि करशील ! "

नायकाच्या भाषणानें सैनिक लाजला. सेनापति हरिहर—तो सेनानायक मालवेश्वराचा सेनापति हरिहरच होता—कांतिनगर पूर्णपणें स्वाधीन करून घेऊन प्रासादांत आला होता. त्याच्यासमोर अचेतन नीलवर्णाला पाहून तो मनाशीं म्हणाला, " योग्य प्रायश्चित्त ! " जवळच पडलेल्या मूर्च्छित युवतीला व संज्ञाशून्य जयसेनाला पाहून त्यानें सर्व प्रकार

कल्पनेनें जाणला. त्यानें त्या दोघां स्त्रीपुरुषांना उचलून दुसरीकडे नेव-विलें. सूर्यमणि व मनोरमा येऊन त्यांच्या सेवेस तत्पर झालीं.

नगरांत शांतता झाली. ठिकठिकाणीं मालवसैनिक पहारा करूं लागले. कांतिनगरकर मालवेश्वराच्या सेनापतीला शरणागत झाले. त्यांनीं पराभूतता स्वीकारली. सर्वत्र स्थिरस्थावर झाल्यावर जयसेनास ठेवलें होतें तेथें सेनापति हरिहर पुनः गेला लीला सावध झाली होती; तिला तो ह्मणाला, " मी हरिहर मालवेश्वरांचा सेनापति आहे. आह्मीं कांतिनगर ताब्यांत घेतलें आहे. स्त्रियांशीं व आहत वीरांशीं कसें वागावें हें आह्मांस अवगत आहे. पण राणी चंद्रावती कोठें दिसली नाहीं ? "

लीलेनें उत्तर दिलें, " तुह्मी सांप्रत ह्या स्थानाचे प्रभु आहां. राणीमातेला त्यांच्या शयनमंदिरांत दुष्ट नीलवर्णानें ठार केलें. पुढचें मला स्मरत नाहीं "

थोड्या वेळानें जयसेन शुद्धीवर आला. त्यानें लीलेस विचारलें, " युद्धाचें काय वर्तमान ? हे परकी गृहस्थ कोण ? "

" नाथ ! मालवेश्वरानें कांतिनगर घेतलें. हे त्याचे प्रिय सेनापति. आपण स्वस्थ असा. "

तेव्हां हरिहर त्यास ह्मणाला, " वीर जयसेन ! यश आमच्या वांट्यास आलें ह्मणून कष्टी होऊं नका. जयपराजय मानवाच्या स्वाधीन नाहीं. शत्रूशीं कसें वागावयाचें हें मालवेश्वरांना माहीत आहे. सध्यां मला आपल्याजवळ थांबतां येत नाहीं; पण संध्याकाळीं मी पुनः येईन. "

तिसरा प्रहरीं मालवेश्वरानें दरबार भरविला. सर्व नागरिकांना उद्देशून त्यानें एक भाषण केलें. कांतिनगरच्या सिंहासनावर तो अधिष्ठित झाला नाहीं. त्याच्याकरितां दुसरें एक सिंहासन मांडलें होतें. त्यानें कांतिनगरच्या सिंहासनावर अज्ञान राजकुमारास बसविलें. राणीच्या भयानक मृत्यूबद्दल त्यानें खेद प्रदर्शित केला. दुष्ट नीलवर्णाचें कृत्य त्यानें सर्वांस सांगितलें. स्वतःचा गोपनस्फोट होईल ह्मणून नीलवर्णानें कांतिनगराशीं प्रवंचक बनलेल्या शूरसिंहाला, आपल्या नूतन मित्राला, कसें ठार केलें हेंहि त्यानें सांगितलें. कांतिनगरचें शौर्य, राणीचा पराक्रम व विजयपूरकरांशीं अशा रीतीनें जोडलें जाणारें मित्रत्व ह्यांनीं आणून कांतिनगरला त्याची पर्ण

स्वतंत्रता देण्यांत येत आहे असें त्यानें जाहीर केलें. मात्र त्यानें नर्मदेच्या दक्षिणेकडील सूर्यकन्या तपतीपर्यंतचा प्रदेश आपल्या राज्यास जोडला.

संध्याकाळीं सेनापति हरिहर जयसेनास भेटावयाला गेला. जयसेनाच्या विचारें त्यानें राणीचा अंत्यविधि दुसऱ्या दिवशीं करण्याचें ठरविलें.

दुसऱ्या दिवशीं राणीच्या मृतदेहाची भव्य प्रेतयात्रा निघाली. तिला अखेरचा सन्मान देण्यास कांतिनगरच्या सैन्याप्रमाणें मालवसैनिकहि उभे होते. प्रेतयात्रेबरोबर जयसेन, सूर्यमणि, लीला, मनोरमा, कांतिनगरचा राजकुमार व सरदारमंडळ, तसाच सेनापति हरिहर व स्वतः मालवेश्वर हजर होता.

मालवेश्वराला कांहीं महत्वाच्या कामामुळें तातडीनें स्वदेशीं जाणें भाग आलें ह्मणून कांतिनगर जयसेनाच्या स्वाधीन करून तो लागलाच स्वनगराला परत गेला. जयसेनहि कांतिनगराची व्यवस्था लावून दुःखी मनानें राजकुमारासह विजयपुरास गेला. कांतिनगराचा कारभार पहाण्यास दुसऱ्या कोणाला नेमावें असें त्यानें राजास विनविलें. राणीच्या मृत्यूनें, तिच्या सहवासांत गेलेल्या सुखकालाची स्मृति होऊन त्याला कांतिनगरचें दर्शन नकोसें झालें.

राजा राजशेखरानें त्याची विनंति मान्य केली. त्याला रामगडास दुर्गपति नेमलें. सूर्यमणि मगधांतून परत आल्यापासून रामगडास गेला नव्हता, ह्मणून मनोरमेसह तोहि जयसेनाबरोबर गेला. रामगडाहून लीला पतीसह जलदुर्गास गेली. तिचा अत्याग्रह पाहून त्या बौद्ध बंधुभगिनी तिजबरोबर आलीं होतीं. किल्लेदार वीरसिंहानें दुर्गपतीकरतां महाल तयार केले; पण लीलादेवीचा विशेष मानस पाहून त्यानें वृद्ध सोमदत्ताच्या शिवमंदिरांत त्यांची सर्व व्यवस्था केली. संध्याकाळीं लीला मनोरमेसह त्या पर्वताच्या बुरुजावर जाऊन बसली. आज त्यांना व्याघ्रभय नव्हतें. वीरसिंहानें त्यांच्या सरंक्षणास कितीतरी सैनिक ठेवले होते. तसेंच लीलेला आतां नीलवर्णाचेंहि भय नव्हतें तो नराधम स्वतःच्या पापकृत्यांनीं कधींच नष्ट झाला होता. श्री कृष्णेचा प्रपात आजाहि आपलें सौंदर्य दर्शवीत होता. तो भयजनक नव्हता किंवा क्षुद्रहि नव्हता. तो सुंदर जलप्रपात इंद्रधनुष्यमय दिसत होता. प्रपातजीवन सूर्यकिरणांनी

सुवर्णरंजित झालें होतें. तिनें वनपुष्पांचा एक सुंदर हार गुंफून तो ब्रह्मीभूत पितामहाच्या शिवनादुर्गांतील—निज [illegible] सोमेश्वर ठेवलें देवी पार्वतीला भक्तिपूर्वक अर्पण केला.

रामगडास असतांना रामगडची दुर्गस्वामिनी आपल्या कुमारांसह प्रशांतसौंदर्य अवलोकन करण्यास जलदुर्गास अनेकशः जात असे.